12-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
RDB/ KGS/ ST/ 11:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.** : सुझलॉन कंपनीने दिलेल्या जाहिरातीमुळे सभागृहाचा झालेला अवमान

**मु.शी.** : सुझलॉन कंपनीने दिलेल्या जाहिरातीमुळे सभागृहाच्या झालेल्या अवमानाबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता प्रश्नोत्तराचा तास आहे याची मला कल्पना आहे परंतु कोणी अत्यंत खालच्या शब्दामध्ये जाहिरात देऊन या सदनाचा जाहीररीत्या अवमान करीत असेल तर तो गंभीर विषय आहे. या सदनामध्ये सुझलॉन कंपनीच्या संदर्भात चर्चा झाली. त्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात चर्चा झाली. त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी समिती वगैरे नेमली परंतु आपण किती स्वच्छ आहोत हे दाखविण्याकरिता सुझलॉन कंपनीने जाहिरात दिली आणि त्या जाहिरातीमधून या सदनाची जी अवहेलना केलेली आहे ती अत्यंत गंभीर आहे. या जाहिरातीमध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "सुझलॉनचे आजवरचे यश हे केवळ आमच्या पवन ऊर्जा क्षेत्रातील आकड्यांचे नसून एकूणच जागतिक उद्योग-व्यवसाय क्षेत्रात एक कर्तव्यदक्ष व सामाजिक जाणीवेचे भान असलेली कंपनी असा सुझलॉनचा सार्थ लौकिक आहे. असे असतानाही, काही असामाजिक प्रवृत्ती आपल्या क्षुद्र वैयक्तिक स्वार्थापोटी कंपनीवर बिनबुडाचे आरोप करु पाहात आहेत." सभापती महोदय, या सदनामध्ये क्षुद्रतेने काम केले जाते अशा प्रकारची जाहिरात छापली जात असेल तर तो पूर्ण सदनाचा अधिक्षेप आहे, अवमान आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. मी आपल्याला विनंती करतो की, याकरिता वेगळा कोणताही प्रस्ताव देण्यापेक्षा आपण स्वत:हून या विशेषाधिकार भंगाच्या संदर्भात कार्यवाही करावी. ही जाहिरात 'लोकमत' दैनिकामध्ये आलेली आहे.

श्री. अरविंद सावंत : लोकसत्ता' व इतर वर्तमानपत्रांमध्ये सुध्दा ही जाहिरात आलेली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, परवा या सभागृहामध्ये यासंदर्भात चर्चा झाली. अशा प्रकारे जाहिरात देऊन या सभागृहाचा आणि या सभागृहात काम करणाऱ्या सन्माननीय सदस्यांचा अवमान होईल अशा पध्दतीचे विधान सदर कंपनीने जाहिरातीमध्ये केलेले आहे. सभापती महोदय, यामध्ये केवळ सदस्यांचाच किंवा सभागृहाचाच नव्हे तर आपलाही अवमान झालेला आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

कारण हे सर्वोच्च सभागृह आहे. या सर्वोच्च सभागृहात महाराष्ट्रातील सर्व प्रश्नांच्या चर्चा होत असतात आणि चर्चा करीत असताना एखाद्यावर आरोप झाला असेल तर त्याबाबत क्षुद्र अशाप्रकारची वाक्य रचना करुन सभागृहातील चर्चा चुकीची आहे असा संदेश या कंपनीने दिलेला आहे. त्यामुळे या कंपनीविरुध्द सु-मोटो हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल केला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या कंपनीने दिलेल्या जाहिरातीचे वैशिष्टय असे आहे की, सभागृहात चर्चा झाल्यानंतर ही जाहिरात आलेली आहे. या जाहिरातीमधील पुढचे वाक्य असे आहे की, "स्वार्थापोटी आरोप करतात, प्रसार माध्यमांना हाताशी धरुन सुझलॉन कंपनी व आमच्या काही प्रतिष्ठित ग्राहकांवर चिखलफेकही करण्यात आली आहे." या सदनात काहींची नावे घेतली असतील, तो आमचा अधिकार आहे. सदनात चर्चा झाल्यानंतर ही जाहिरात प्रसिध्द झाली आहे. सदनातील सारे सभासद स्वार्थापोटी चर्चा करतात असा त्याचा अर्थ होतो. हा सदनाचा अधिक्षेप आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या विषयाला माझे अनुमोदन आहे. सभापती महोदय, आपण स्वत:हून या कंपनीविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करावा अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्या जाहिरातीत असेही म्हटले आहे की, यासंदर्भात सभागृहात समिती घोषित झाली आहे, त्या समितीमध्ये चर्चा करण्याला आमचा दुजोरा आहे. त्या समितीला सहकार्य करण्यास तयार आम्ही आहे असे ते सांगू इच्छितात.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, या सझलॉन कंपनीने दिलेली जाहिरात खचितच सभागृहाचा अवमान करणारी आहे. त्याबाबत त्यांच्यावर कडक कारवाई झालीच पाहिजे. एखाद्या सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये एखाद्या विषयावर मांडलेल्या मुद्याला संरक्षण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून या सुझलॉन कंपनीविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करण्याची जी सूचना सभागृहासमोर आली आहे त्या सूचनेला माझे सुध्दा अनुमोदन आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो मुद्दा मांडला आहे तो एका पक्षाचा किंवा एका सभागृहाचा प्रश्न नाही. संपूर्ण् लोकशाहीच्या संदर्भातील महत्वाचा प्रश्न आहे. या देशातील





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.अरुण गुजराथी....

लोकशाहीला कलंकित करण्याचा, त्यांचे अधिकार संकुचित करणारा हा विचार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि आपल्याला विनंती करतो की, याबाबत गांभीर्याने विचार करुन हा प्रस्ताव आपल्यामार्फत पुढील कार्यवाहीसाठी हक्कभंग समितीकडे पाठवावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, आज याठिकाणी जो मुद्दा मांडला गेला आहे महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रामध्ये पहिल्या पानावर जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. विधिमंडळात होणा-या कामकाजावर अशा पध्दतीने जर प्रतिबंध आणण्याचा प्रयत्न केला जात असेल तर संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. अशा कंपनीविरुध्द जेवढी कडक कारवाई करता येईल तेवढी करावी अशी सूचना मी याठिकाणी करीत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या सदनामध्ये चर्चा होतात. एखादी चुकीची गोष्ट झ ाली असेल तर त्याचा जाब या सभागृहामध्ये येतो. पण यामध्ये तशी परिस्थिती नाही. या जाहिरातीत समितीच्या नेमणुकीचा निर्णय झाल्यानंतर "स्वार्थापोटी चर्चा केली जाते, चिखलफेकही करण्यात आली आहे," अशाप्रकारचे शब्द वापरले आहेत, हा सरळ सरळ हक्कभंगाचा विषय होतो. त्या समितीला ते सहकार्य करणार असे म्हणतात, ते मोठे लोक आहेत. सहकार्य करण्याचे आश्वासन उदारपणे दिलेले आहे, ते वाखाणण्यासारखे आहे. हा विषय हक्कभंग समितीकडे पाठवावा आणि त्यांना असे विचारावे की, ते ज्या देशात राहतात त्या देशाची घटना, त्या देशातील विधिमंडळे, त्या विधानमंडळांमध्ये होणा-या चर्चांविषयी त्यांना काहीही माहिती नाही काय ? याठिकाणी सन्माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी थेट हक्कभंग समितीकडे हा विषय पाठवावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी व सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडला आहे. या सुझलॉन कंपनीसंबंधी या सदनात चर्चा झाली होती. या सदनात प्रश्न उपस्थित केला गेला होता. या सदनावर आरोप करणे किंवा अविश्वास दाखविणे हे सभागृहाच्या दृष्टीने योग्य नाही असे मी समजतो.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील.....)

तेव्हा सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्यानुषंगाने हा विशेषाधिकाराचा भंग असून या विशेषाधिकार भंगाच्या प्रस्तावास माझी देखील संमती आहे. तेव्हा सभापती महोदय, आपण याबाबतीत निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सुझलॉन कंपनीने जवळ जवळ सर्व वृत्तपत्रामध्ये ज्या पध्दतीने आपली जाहिरात दिलेली आहे त्या जाहिरातीमुळे कंपनीने ख-या अर्थाने या सार्वभौम सभागृहाचा अधिक्षेप केलेला आहे. या सदनाच्या माध्यमातून समाजातील समस्या आणि व्यथा मांडण्याचे हे व्यासपीठ आहे. या सर्वोच्च सभागृहामध्ये अनेक वेळा अनेक बाबीवर आपण सातत्याने आपले विचार मांडत असतो आणि ख-या अर्थाने लोकशाही संवर्धन करण्याच्या दृष्टीने आपण या ठिकाणी परखडपणे विचार मांडत असतो. वृत्तपत्रातून आलेल्या बातमीच्या दृष्टीने जे लिखाण प्रसिध्द केलेले आहे ते जरुर सन्माननीय सदस्यांचा आणि या सार्वभौम सभागृहाचाही अधिक्षेप करणारे आहे. आपण सर्वांनी आणि संसदीय कामकाज मंत्र्यांनी या बाबीची अत्यंत गांभीर्याने नोंद घ्यावी अशी सूचना केलेली आहे. तेव्हा हा विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव या दृष्टीने मी तो विशेषहक्क समितीकडे पाठवितो.

श्री. दिवाकर रावते : हा विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव विशेषहक्क समितीकडे पाठवावावा अशी मी सदनाला विनंती करतो.

**सभापती** : हा विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव सभागृहाने एकमताने संमत केलेला असून मी तो विशेषहक्क समितीकडे पाठवित आहे.

----

...2..

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**आद्य क्रांतीकारक लहूजी राऊत साळवे यांची समाधी उध्वस्त करणाऱ्यांविरुध्द आवश्यक कारवाई करून त्याच जागी भव्य स्मारक उभे करण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(१) * ५०३५१ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. प्रकाश शेंडगे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ रोजी साईरामा हॉटेल प्रा.लि.कंपनीचे मालक श्री.सदानंद रामान्ना शेट्टी यांनी पुणे जिल्ह्यातील संगमवाडी परिसरातील आद्य क्रांतीकारक लहूजी साळवे राऊत यांच्या समाधीची नासधूस केल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी त्या घटनेची तीव्र प्रतिक्रिया उमटली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ मार्च, २००९ रोजी या घटनेच्या निषेधार्थ विधान भवनावर मोर्चाचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आद्य क्रांतिकारकांच्या समाधीची नासधूस करणाऱ्या हॉटेल मालकाविरूध्द कोणत्या स्वरूपाची कठोर कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच समाधीच्या ठिकाणी भव्य स्मारक उभारण्याबाबत शासन किती कालावधीत कार्यवाही करणार आहे ?

**श्री. नितीन राऊत, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) मोर्चाचे आयोजनाबाबत निवेदन दिले होते.

(३) सदर प्रकरणी येरवडा पोलीस ठाणे गु.र.नं.३१२०/०९ भा.दं.वि.सं.कलम २९५, ३४ प्रमाणे चार आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) याबाबतचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न भाग (1) ला दिलेले उत्तर आक्षेपार्ह आहे. प्रश्न असा आहे की, दिनांक 16 फेब्रुवारी, 2009 रोजी साईरामा हॉटले प्रा.लि. कंपनीचे मालक श्री. सदानंद रामान्ना शेट्टी यांनी पुणे जिल्ह्यातील संगमवाडी परिसरातील आद्य क्रांतीकारक लहूजी साळवे राऊत यांच्या समाधीची नासधूस केल्यामुळे राज्यात अनेक ठिकणी त्या घटनेची तीव्र प्रतिक्रिया उमटली, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. ज्या दिवशी लहूजी साळवे यांच्या समाधीची नासधूस करण्यात आली त्या दिवशी या घटनेचा निषेध म्हणून सर्व जिल्हाधिका-यासमोर लोकांनी धरणे आंदोलने केली. मुंबईमध्ये आझाद मैदान येथे मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी 285 लोकांना अटक करण्यात आली. असे असताना कोणतीही प्रतिक्रिया उमटली

..3..



MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नाही असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. सभापती महोदय, बसेस, वाहने, रेल्वे इत्यादीची जाळपोळ करणे म्हणजे प्रतिक्रिया उमटणे असे शासनाला अभिप्रेत आहे काय ? तेव्हा दिलेल्या उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी दुरुस्ती केली पाहिजे.

श्री. नितीन राऊत : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी तीव्र प्रतिक्रिया उमटली, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला. मी सांगू इच्छितो की, या प्रकरणी मोर्चा निघालेला होता आणि त्यांनी संबंधित जिल्हाधिका-यांना निवेदन दिले आणि आपली त्यासंबंधीची मागणी नोंदविली....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ KGS/ प्रथम श्री. शिगम 11:15

ता.प्र.क्र.50351...

( गोंधळ )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय गृह राज्यमंत्री हे सभागृहात चुकीचे व दिशाभूल करणारे उत्तर देत आहेत.

**सभापती** : चुकीचे उत्तर असेल तर ते दुरुस्त करणे हे माननीय मंत्री महोदयांचे कर्तव्य आहे.

श्री. नितीन राऊत : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तरात दुरुस्ती केली जाऊ शकते. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने निश्चितपणे उत्तरात दुरुस्ती करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मुंबई शहरावर आंतकवादी हल्ला झाला. या हल्ल्याच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा झाली, त्यावेळी त्यांना उत्तर देऊ दिले नाही. या गोष्टीचा मी असा अर्थ काढलेला आहे की, सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांना त्यांच्या सरकारमधील मंत्री सहकार्य करीत नाहीत. त्यामुळे त्यांना प्रत्येक गोष्टीला बळी पडावे लागत आहे. त्यांच्या सहकार्याकडून त्यांना योग्य ते मार्गदर्शन वेळोवेळी मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर फजितीची वेळ येते.

श्री. नितीन राऊत : असे काही नाही. सदर तारांकित प्रश्न हा गृह विभागाचा जरी असला तरी तो शहर विभागाशी संबंधित आहे. माझ्याकडे ग्रामीण भागाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : मग ज्यांच्याकडे शहर विभाग आहे, त्या गृह राज्यमत्र्यांना उत्तर देण्यासाठी सभागृहात बोलवा.

श्री. नितीन राऊत : सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : या गृह राज्यमत्र्यांना त्यांचे सहकारी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

श्री. नितीन राऊत : माझे सहकारी गृह राज्यमंत्री (शहरे ) श्री. नसीम खान हे आजारी असल्याची माहिती मला आज सकाळी प्राप्त झाली. सदर माहिती मिळाल्याबरोबर या प्रश्नासंबंधी मी संबंधित अधिका-यांकडून ब्रिफींग घेऊन नंतरच उत्तर देण्यासाठी सभागृहात आलेलो आहे.

2...

12-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50351...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री. नितीन राऊत हे उत्तर देत आहेत. परंतु त्यांच्या उत्तराने आमचे समाधान होणार नाही. म्हणून हा प्रश्न राखून ठेवून तो उद्या चर्चेसाठी घेण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, एखाद्या प्रश्नाच्या अनुषंगाने सभागृहात उत्तर देण्यासाठी आपण येतो, त्यावेळी त्या प्रश्नासंबंधीची संपूर्ण माहिती संबंधित अधिका-यांकडून उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. आपल्याकडे हा विषय नाही, तो विषय त्या गृह राज्यमंत्र्यांच्या कक्षेतील आहे तो तुमचा अंतर्गत विषय आहे. परंतु या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे या प्रश्नाच्या अनुषंगाने समाधान व्हावे म्हणून मी हा प्रश्न आज राखून ठेवतो आणि हा प्रश्न आपण उद्या किंवा परवा चर्चेला घेऊ.

श्री. दिवाकर रावते : मी मघाशी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा योग्य आहे. माननीय गृह राज्यमंत्र्यांना त्यांचे सहकारी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मुंबई शहरावर आतंकवादी हल्ला झाला, त्यासंदर्भात सभागृहात चर्चा झाली, त्या चर्चेच्या सर्व नोटस् माननीय गृह राज्यमंत्र्यांनी लिहून घेतल्या होत्या, परंतु त्यांना त्या चर्चेचे उत्तर देऊ दिले नाही. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मागे शासनाची लाल दिव्याची गाडी देखील परत केली होती. एका दलित समाजाच्या मंत्र्यांवर त्यांच्याच सहकार्याकडून योग्य प्रकारचे मार्गदर्शन केले जात नाही ही दुर्देवी गोष्ट आहे.

----------------------

3....



ABG/ ST/ KGS/ प्रथम श्री. शिगम 11:15

**मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील पालक मंत्र्यांच्या आदेशावरुन ६३ लाभार्थींना मंजूर करण्यात आलेली जवाहर विहिरीची मान्यता रद्द केल्याबाबत**

**(२) * ५१९७६ श्री. गुरुमुख जगवानी , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. नितीन गडकरी , श्रीमती मधु जैन :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील स्थानिक पालक मंत्र्यांच्या आदेशावरुन ६३ लाभार्थींना मंजूर करण्यात आलेली जवाहर विहिरींची मान्यता जळगांव सिंचन विभागातील सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंत्याकडून रद्द करण्यात आल्यामुळे गरीब लाभार्थ्यांना लाभ मिळत नसल्याचे दिनांक १८ मार्च, २००९ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लाभार्थ्यांना जवाहर विहिरींचा लाभ देण्याप्रकरणी शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.मदन पाटील** : (१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यात मंजूर लक्षांकापेक्षा जास्त मान्यता देण्यात आलेल्या ६३ जवाहर विहिरींची मान्यता रद्द करण्यात आली.

(२),(३) व (४)

जिल्हयात वाटप करुन शिल्लक राहिलेल्या विहिरी, उर्वरित तालुक्यातील वाव लक्षात घेऊन मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.पाशा पटेल : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी तारांकित प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे.

**सभापती** : ठीक आहे.

-------

४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महिला व बालविकास विभागातर्फे देण्यात येणारे जिल्हा विभागीय व राज्यस्तरीय**
**अहिल्याबाई होळकर पुरस्कार देण्यास होत असलेला विलंब**

**(३) * ५१०७१ श्रीमती अलका देसाई : दिनांक १७ डिसेंबर,२००८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या बाराव्या यादीतील प्रश्न क्रमांक ४२६५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागातर्फे देण्यात येणारे जिल्हा विभागीय व राज्यस्तरीय अहिल्याबाई होळकर पुरस्कार देण्याची दिरंगाई गेल्या चार ते पाच वर्षापासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) याबाबत पुढील कारवाई करण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे व सदर कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**डॉ.सतीश पाटील,श्री.मदन पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) सन २००२-२००३ ते २००४-२००५ या ३ वर्षाकरीता पुरस्कार्थींची नांवे छाननी समितीच्या दिनांक ६.१२.२००५ च्या बैठकीत निवडली होती. तथापि, त्यामध्ये योग्य नामांकने नसल्याचे आढळल्याने सदर ३ वर्षांचे नामांकने प्रस्ताव रद्द करुन, सन २००२-२००३ ते २००६-२००७ या ५ वर्षांकरिता सदर पुरस्कार देणेसाठी प्रस्ताव पाठविणेबाबत दिनांक १०.६.२००८च्या पत्रान्वये आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना कळविले होते. आयुक्तालयाने दिनांक ३.३.२००९ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केले होते. त्या प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने शासनाने दिनांक २३.३.२००९ च्या पत्रान्वये त्रुटीरहित स्वयंपूर्ण प्रस्ताव आयुक्तालयाकडून मागविले आहेत. तसे प्रस्ताव प्राप्त होताच छाननी समितीची बैठक बोलावून शक्य तितक्या लवकर सदर पुरस्कार देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, महिला व बालविकास विभागातर्फे २००२ ते २००९ पर्यंत जिल्हा विभागीय व राज्यस्तरीय अहिल्याबाई होळकर पुरस्कार देण्यात आलेले नाहीत. या पुरस्काराचे कामकाज पाहण्यासाठी आयुक्तांना डेप्यूट केलेले असतानाही पुरस्कार देण्यामध्ये विलंब झालेला आहे. सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, आयुक्तालयाने दिनांक ३.३.२००९ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केले होते. त्या प्रस्तावात त्रुटी

५...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

असल्याने शासनाने दिनांक २३.३.२००९ च्या पत्रान्वये त्रुटीरहित स्वयंपूर्ण प्रस्ताव आयुक्तालयाकडून मागविले आहेत. तसे प्रस्ताव प्राप्त होताच छाननी समितीची बैठक बोलावून शक्य तितक्या लवकर सदर पुरस्कार देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. आयुक्तालयाकडून प्रस्ताव प्राप्त होऊन त्याची छाननी किती दिवसात करण्यात येईल व सदरहू पुरस्कार कधीपर्यंत वितरीत केले जाणार आहेत?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, जिल्हयातील एखादी महिला समाजसेवकाची चांगल्या पध्दतीने करीत असेल अशा महिलांना तसेच महिला संघटनेतील महिलांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार महिला व बालविकास विभागातर्फे देण्यात यावा अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सभापती महोदय, २००३ ते २००७ पर्यंत हे पुरस्कार देण्यात आले नाही, ते पुरस्कार देण्यास विलंब झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. छाननी कमिटीकडून शिफारस करुन सदर प्रस्ताव आयुक्तालयाकडे शिफारस करुन पाठविले होते आणि आयुक्तालयाने सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविले होते. परंतु या प्रस्तावात पुरस्कारासाठी निवड केलेल्या नावांच्या संदर्भात काही आक्षेप घेण्यात आले आहेत.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या छाननीमध्ये त्यांना काही दोष आढळले त्यामुळे हे प्रस्ताव परत पाठविले. पुन्हा या संदर्भात राज्य शासनाने आयुक्तालयाला कळविले की, जवळपास 5 वर्षापासून पुरस्कार दिलेले नाहीत. त्याची तात्काळ छाननी करुन जिल्हा स्तरावरुन आणि आयुक्त स्तरावरुन प्रस्ताव पाठवावेत आणि प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेले आहेत. तात्काळ त्या संदर्भातील निर्णय घेऊ.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात अतिशय मोलाचे कार्य करणाऱ्या एकमेव महाराष्ट्र कन्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आहेत. त्यांच्या नावाने सुरु केलेला पुरस्कार देण्यासाठी नामांकन मिळाले नाही, योग्य महिला मिळाली नाही अशा प्रकारचे उत्तर देऊन 5 वर्षे हा पुरस्कार देण्याचे थांबविले होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांना आमच्या समाजाचे शिष्टमंडळ भेटले असता त्यांनी हे मान्य केले आणि थांबविलेले पुरस्कार त्वरित जाहीर करु असे सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांची जयंती 31 मे रोजी असते. 31 मे रोजी हे पुरस्कार त्या त्या जिल्हयात जाहीर करण्यात येतील काय? या प्रकरणात दिरंगाई, कामचुकारपणा करणारा, भावनांशी खेळणारा हा जो उपद्व्याप केला आहे त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार आहात का? यापुढे लवकरात लवकर या पुरस्काराचे त्या त्या जिल्हयात वाटप करणार का?

डॉ.सतीश पाटील : हा पुरस्कार देण्याची प्रक्रिया थांबलेली नाही. काही त्रुटी आढळल्याने पुरस्काराची नावे परत पाठविली होती. अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने पुरस्कार देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यादृष्टीने शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्या प्रस्तावांची छाननी करुन एका महिन्याच्या आत सगळे पुरस्कार देण्याच्या संदर्भात निर्णय घेऊ. ज्या अधिकाऱ्यांमुळे ही दिरंगाई झालेली दिसते किंवा झाली असे आढळून आले तर त्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, गेली चार वर्षे प्रत्येक अधिवेशनात हा विषय मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. वास्तविक हा विषय महिला सदस्यांनी उपस्थित करणे अपेक्षित होते. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी हा प्रश्न मांडला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने पुरस्कार देण्याचा हा प्रश्न आहे. त्यांच्या भावनांशी खेळण्याचा उपद्व्याप गेली 5 वर्षे सुरु आहे. महिलांनी केलेल्या कार्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....... ता.प्र.क्र.51071.....

माहिती शासनाकडे कळवूनही गेली 5 वर्षे शासन निर्णय घेत नाही. अनेक महिलांनी माझी भेट घेतली आणि सांगितले की, आम्ही शासनाकडे माहिती पाठविली आहे परंतु आम्हाला साधे उत्तर पाठविले जात नाही की, तुमचे नाव पुरस्कारासाठी नाकारले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी या सभागृहात सांगितले होते की, ताबडतोब आदेश काढले जातील. दोन वर्षापासून हा उपद्व्याप सुरु आहे. 2002 पासून 2009 पर्यंत प्रलंबित असलेले हे पुरस्कार दिले जातील काय?

डॉ.सतीश पाटील : सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने प्रश्न विचारला आहे. खरे म्हणजे हा स्त्रियांच्या दृष्टीने घेतलेला चांगला निर्णय होता. परंतु 2003 ते 2008 पर्यंत काही चुकांमुळे, छाननीमध्ये काही दोष आढळल्यामुळे हे पुरस्कार प्रलंबित राहिले आहेत. ते 2003 ते 2008 पर्यंतचे सर्व पुरस्कार देण्यात येतील आणि या संदर्भात निधीची अडचण नाही. त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने द्यायचे पुरस्कार गेली पाच वर्षे प्रलंबित असण्याची कारणे ही माझ्या माहितीप्रमाणे प्रश्न उपस्थित झाला नसता तर मंत्रीमहोदयांना उत्तर देण्यासाठी ब्रिफिंग झाले नसते. याचा अर्थ महाराष्ट्र राज्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचा पुरस्कार आहे याची जाणीव मंत्रीमहोदय आपणही विसरलेले आहात. आपल्यालाही त्याची माहिती नाही. मंत्रीमहोदयांनी जाब विचारला असता तर प्रश्न विचारण्याची पाळी आमच्यावर आली नसती. अधिकाऱ्यांवर कारवाई करतो असे मंत्रीमहोदय म्हणाले असले तरी त्यांनी स्वत:वर काय कारवाई करणार हेही सांगितले पाहिजे. माझी अशी माहिती आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण देशामध्ये देवळे बांधली, ज्या ज्या ठिकाणी घाट आहेत त्या ठिकाणी आपल्या जीवनाचा पैसा खर्च केला.....

एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/ पूर्वी श्री. भोगले ..... 11:25

ता.प्र.क्र.51071...... श्री. दिवाकर रावते ....

पण नंतर फाजिलपणा करुन धार्मिक स्वरुप असलेला पुरस्कार देता येतो काय असे म्हणून पाच वर्षापर्यंत तो अडकवून ठेवला हा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाचा एक प्रकारे अवमानच आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, पहिल्यांदा यामध्ये खात्याचे प्रमुख म्हणून माननीय मंत्री महोदय प्रायश्चित्त घेणार आहेत काय ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, अगोदरच्या प्रस्तावांमध्ये काही त्रुटी होत्या त्या कशामुळे राहिल्यायासंबंधीची विचारणा केली आणि या खात्याचा कारभार स्वीकारल्यानंतर दि. 23.3.2009 रोजी मी आयुक्तांना एक पत्र लिहून कळविले की, आपल्याकडे अशा प्रकारचे जे प्रस्ताव असतील ते छाननीसह शासनाकडे पाठवावेत व एवढा विलंब का झाला याची कारणे सुध्दा द्यावीत. त्यानुसार आता शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. या खात्याचे मंत्री म्हणून माननीय श्री. मदन पाटील आणि मी दोघे मिळून याप्रकरणी न्याय देण्याची भूमिका आम्ही घेतलेली आहे. मागील काळात काय झाले यापेक्षा आम्ही सध्या न्याय देण्याची भूमिका घेतलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे नाव केवळ आपल्या राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशभरातील जनतेला परिचित असेच आहे. एकीकडे महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करणारे हे सरकार या कामाची जबाबदारी एका मंत्र्याकडून दुसऱ्या मंत्र्यांकडे ढकलण्याचे काम करतात. असे करुन चालणार नाही तर ही शासनाची सामुहिक जबाबदारी आहे. सन 2002-03 पासून सन 2008-09 अशा सात वर्षांपासून हे प्रस्ताव अडकले आहेत. त्याला कारणे काहीही असतील किंवा काही त्रुटी असतील परंतु ती जबाबदारी शासनाचीच आहे. तसेच माननीय मंत्री महोदय सांगतात 23 मार्च, 2009 रोजी आयुक्तांना पत्र लिहिले. इकडे मात्र वर्तमानपत्रातून जाहिराती देतात की आमचे सरकार गतिमान सरकार आहे आणि याच सरकारमध्ये इतके महान व्यक्तिमत्व असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या नावाने असलेल्या पुरस्कारावर एक पैसाही खर्च होत नाही. खरे तर या पुरस्कारासाठी शासनाला एक पैसा सुध्दा खर्च येत नाही तरी देखील पुरस्कारासंबंधीची कागदपत्रे जागची हलत नाहीत. अशा प्रकारे मागासवर्गियांचा एक प्रकारे हा अवमानच आहे. मागील मंत्र्यांवर जबाबदारी ढकलून चालणार नाही तर किती दिवसात हा पुरस्कार दिला जाईल ? याचे स्पष्टीकरण करणार काय ?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/

ता.प्र.क्र.51071......

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, मी मागील मंत्र्यांनी हे केले अथवा त्यांच्यावर जबाबदारी ढकलली नाही. मी असे म्हणालो की, जे प्रस्ताव प्राप्त झाले आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्यानावे पुरस्कार द्यावयाचा असल्याने तो चुकीच्या संस्थेला दिला गेला तरी ज्या व्यक्तिच्या नावाने हा पुरस्कार देतो त्या व्यक्तिचा अवमान होऊ शकतो. ज्यावेळी हा पुरस्कार आला त्यावेळी स्थानिक लोकांनी आक्षेप घेतला अशा काही त्रुटी यात राहिल्या. म्हणून त्रुटीरहित प्रस्ताव मागविण्यात आले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले ते खरे आहे. कारण हा पुरस्कार देण्यात दिरंगाई झालेली आहे. माझ्यासारख्या माणसाला सुध्दा या दिरंगाईबद्दल वाईट वाटत आहे. ज्या अधिकाऱ्यांमुळे हा विलंब झाला त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. तसेच दरवर्षी हा पुरस्कार देण्याच्या संदर्भातील निर्णय होत राहील व त्यात दिरंगाई होणार नाही याचीही काळजी घेण्यात येईल.

ॲड. उषा दराडे : महोदय, ज्या पध्दतीने माननीय मंत्री महोदयांनी "चुकीच्या लोकांना पुरस्कार दिला जाऊ नये" असे जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे व ते रेकॉर्डवर राहता कामा नये. या पुरस्कारासाठी शासनाला पाच वर्षे योग्य महिला मिळालीच नाही यावर आमचा बिलकूल विश्वास नाही. शासनाच्या दिरंगाईमुळे किंवा अधिकाऱ्यांमुळे विलंब झाला असेल परंतु हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन हा पुरस्कार देणार काय ?

डॉ. सतीश पाटील : महोदय, ज्या ज्या जिल्ह्यांचे प्रस्ताव छानन्नी करुन आले असतील त्यांना अधिवेशन संपण्याच्या आत पुरस्कार देण्याबाबतचा निर्णय घेतला जाईल. तसा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवून उद्याच यासंबंधीची बैठक घेण्याची विनंती करण्यात येईल. तसेच ज्या अधिकाऱ्यांमु दिरंगाई झाली त्यांच्याविरुध्द चौकशी करुन कारवाई केली जाईल.

------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पोलिसांना न्यायालयीन कामामध्ये मदत करण्यासाठी विधी अधिकाऱ्यांची करावयाची नेमणूक

**(4) * 52333 डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री. सुरेश जेथलिया** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) न्यायालयीन कामकाजात पोलिसांना मदत करण्यासाठी विधी अधिकाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, एकूण किती विधी अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे व कंत्राटी पध्दतीने निवड असल्याने त्यांना प्रतिमाहं किती रुपये वेतन देण्यात येत आहे,

(3) असल्यास, विधी अधिकाऱ्यांच्या नेमणुकीची प्रकिया गेली दोन वर्षे सुरु असून आता ती पूर्ण झाली आहे काय,

(4) असल्यास, मुंबईमध्ये नेमलेल्या विधी अधिकाऱ्यांवर कोणती जबाबदारी सोपविण्यात आली आहे व त्यांना कोणकोणत्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत ठेवण्यात आले आहे ?

**श्री नितीन राऊत, श्री.जयंत पाटील** यांच्या करिता : (1) होय.

(2) एकूण 365 विधी अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना पदनिहाय खालीलप्रमाणे प्रतिमहा ठराविक एकत्रित मानधन देण्यात येत आहे.

1) विधी सल्लागार -रू.28,000/- 2) विधी अधिकारी, गट-अ -रू.25,000/- 3) विधी अधिकारी, गट-ब -रू.20,000/- 4) विधी अधिकारी -रू.15,000/- 5) विधी निदेशक -रु.15,000/-

(3) शासन निर्णय दिनांक 1

5.9.2006 अनुसार सदर पदे ही 11-11 महिन्यांकरीता कंत्राटी तत्वावर करार पध्दतीने भरावयाची असल्याने करार अवधी संपल्यावर पुन्हा निवड प्रक्रियेद्वारे पात्र उमेदवारांची नेमणूक करावयाची असल्याने ही प्रक्रिया सतत सुरू राहणार आहे.

(4) कंत्राटी पध्दतीने भरलेल्या विधी अधिकाऱ्यांवर खालीप्रमाणे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

1) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2) सेवाविषयक/ प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

3) प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलांकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

4) शपथपत्राचा मसुदा करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल, हे पहाणे.

5) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

6) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधीत सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

7) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

8) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

विधी संवर्गातील पदावर मुंबईत नेमणूक झालेले अधिकारी पोलीस आयुक्त, सह पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या अधिपत्यांखाली कार्यरत आहेत.

डॉ. नीलम गो-हे :सभापती महोदय, न्यायालयीन कामकाजामध्ये गुन्हेगारी स्वरुपातील गुन्हयांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये सीआयडी ब्रँचच्या म्हणण्यानुसार केवळ 10 टक्के आहे. ही आकडेवारी सीआयडी ब्रँचच्या www महासीआयडी डॉट कॉमच्या वेबसाईटवर दिलेली आहे. यासंदर्भात आपण पदे भरण्यास सुरुवात केलेली आहे ही चांगली गोष्ट आहे. माझा प्रश्न असा आहे की, 2006 ते 2009 या काळात विधी अधिका-यांची पदे भरण्यास विलंब का झाला तसेच 11 महिन्यान्या कंत्राटी तत्वानुसार ही पदे आपण भरणार आहात त्यामुळे जुने कंत्राट संपल्यानंतर नवीन कंत्राट होईपर्यंत या केसेसचे काय होणार आहे ? नवीन कंत्राट होईपर्यंत

...3..

ता.प्र.क्र. : 52333....

डॉ. नीलम गो-हे...

त्या केसेस अगोदरच्याच वकिलाकडे राहतील की, दुस-या वकिलांकडे राहणार आहेत ? कंत्राटी पध्दतीमध्ये अशिलांची मोठया प्रमाणात हानी होऊ शकते. त्यामुळे जोपर्यंत केसचे निकाल होत नाही, समाधानकारक प्रगती त्या केसमध्ये होत असेल तर तोपर्यंत त्या वकीलांकडेच केस राहिली पाहिजे. असे झाले नाही तर अशिलांना यामध्ये फटका बसू शकतो किंबहुना चांगल्या वकिलाचे कंत्राट संपेपर्यंत गुन्हेगार लोक तारखा घेत राहतील आणि मधील काळात हे लोक फायदा उचलतील. त्यामुळे यासंदर्भात आपण कोणती संरक्षक योजना आखलेली आहे ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, पोलीस विभागाकडे विधीवत खटले दाखल व्हावे व त्यांना वैधानिक सहाय्य मिळावे तसेच गुन्हेगारांना शासन होऊन कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी यासाठी आपल्या राज्यामध्ये सर्व पोलीस आयुक्तालय, महासंचालकांची कार्यालये, पोलीस निरीक्षक कार्यालये तसेच इतर सगळया विभागात विधी सल्लागार आणि विधी अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. सन 2006 मध्ये काढलेल्या शासन निर्णयानुसार विधीसल्लागाराची 4 पदे, विधी अधिकारी गट -अ ची 30 पदे व विधी अधिकारी गट-ब ची 55 पदे, विधी अधिकारी 283 पदे व विधी निदेशकांची 99 पदे अशी विविध संवर्गातील 431 पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. सदर पदे ही कंत्राटी तत्वार भरण्याचे कार्य करार पध्दतीने करण्यात आलेले आहे. 11 महिन्याचा पहिला करार झाल्यानंतर त्याचे रिन्युअल करण्यात येईल. एखाद्याची वर्तणूक चांगली नसेल, त्याने योग्य पध्दतीने आपल्या अशिलांशी व्यवहार ठेवला नाही किंवा अशिलांच्या तक्रारी आल्या तर त्यासंदर्भात संबंधितांला नोटीस देऊन ती पदे पुन्हा भरण्याची प्रक्रिया सुरु असते त्यामुळे अशिलावर अन्याय होण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, न्यायालयीन कामकाजात पोलिसांना मदत करण्यासाठी विधी अधिका-यांवर महत्वाच्या जबाबदा-या सोपिविण्यात आलेल्या आहेत. इतकी महत्वाची जबाबदारी विधी अधिका-यांवर असतांना ही पदे कायम स्वरुपी का भरली जात नाहीत ? तसेच या विधी अधिका-यांना बाहेरची कामे करण्याची परवानगी आहे काय ? प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासंदर्भात महाराष्ट्र सरकारशी संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात किती प्रकरणे किती दिवसापासून प्रलंबित आहेत ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 52333....

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, विधी अधिका-यांची पदे कायमस्वरुपी भरता येत नाहीत कारण पुरेसे सक्षम अधिकारी मिळावेत असे शासनाचे धोरण आहे. या विधी अधिका-यांना विधीवत प्रशिक्षण देण्याचीही योजना आहे. ही योजना आपण पहिल्यांदाच आपल्या राज्यात राबवित आहोत. यामध्ये सुधारणा होण्याच्या संदर्भात सभासदांकडून ज्या काही सूचना येतील त्या निश्चितपणे अंतर्भूत करण्यात येतील व हा विभाग अधिक सक्षम करण्याचा विचार केला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 52333. श्री.नितीन राऊत...

विधी अधिका-यांना शपथपत्रांचा मसुदा तयार करावा लागतो यासबंधी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,संबंधित विधी अधिका-यांना त्यांच्या कामाचे प्रशिक्षण देण्यात येते या प्रशिक्षणानंतरच हे अधिकारी काम करीत असतात. त्यांना स्वत:चा स्वतंत्र कार्यभार असतो व त्या अंतर्गत हे अधिकारी सगळया प्रकारची कामे करीत असतात.

श्री.मधुकर चव्हाण : न्यायालयामध्ये किती प्रकरणे प्रलंबित आहेत ?

**सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांकडे आता ही माहिती नसेल तर ती महिती त्यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, न्यायालयात सध्या किती प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : विधी अधिका-यांच्या संदर्भात माझी अशी माहिती आहे की, त्यांना दरमहा 15 हजार रुपये मानधन देण्यात येते परंतु त्यांना रजा देण्यात येत नाही. एक दिवस जर तो अधिकारी गैरहजर राहिला तर त्याच्या मानधनातून 500 रुपये कापले जातात तेव्हा हे विधी अधिकारी डेली वेजेसवर काम करतात असाच त्याचा अर्थ होतो . हे अधिकारी 11 महिन्याच्या कंत्राट पध्दतीवर काम करतात असा त्याचा अर्थ होत नाही. अशा परिस्थितीत या विधी अधिका-याचा स्टेटसचा सांभाळण्याचा विचार करण्यात येणार आहे काय ? एखादा अधिकारी गैर हजर राहिला तरी 500 रुपये कापण्यात येणार नाहीत असे माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत काय ?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, विधी अधिकारी जर पूर्व सूचना न देता गैरहजर राहिले असतील तर त्यामुळे जो खटला न्यायालयात दाखल केलेला असतो वा जे प्रकरण न्यायालयात लागलेले असते त्यामध्ये अनेकांवर अन्याय होत असते .....

श्री.उषा दराडे : विधी अधिका-यांना रजा घेता येते काय ?

श्री.नितीन राऊत : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घेतल्यानंतर प्रश्न विचारावा विधी अधिका-याचे पद हे अंत्यत महत्वाचे असते त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा असते. त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा पूर्ण व्हावी यासाठी अशा प्रकारचे नियोजन करण्यात आलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 52333.....

श्रीमती उषा दराडे : सन्माननीय मंत्री महोदयांकडून माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांच्या दालनात भेट घ्यावी.

डॉ.नीलम गो-हे :s सभापती महोदय,एखाद्या केसमध्ये मोठया प्रमाणावर जागृती होते किंवा एखाद्या केसमध्ये वातावरण संतप्त झालेले असते अशावेळी विशेष सरकारी वकील नेमण्यात यावेत अशी मागणी केली जाते. आम्ही मागणी केलेल्या अनेक प्रकरणांमध्ये ॲडव्होकेट उज्ज्वल निकम यांनी काम केलेले आहे. ज्या प्रकरणामध्ये विशेष सरकारी वकील काम करावयास लागतात त्या प्रकरणासंबंधी त्यांनी त्यांचे मत आमच्याकडे पोहोचलेले आहे,त्यानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये विधी सल्लागार नेमण्यात आलेले आहेत, प्रत्येक जिल्हयात पब्लिक प्रॉसीक्युटर नेमण्यात आलेले आहेत चार्जशीट दाखल झाल्यानंतर त्यांचे कामकाज सुरु होत असते.परंतु चार्जशीट बरोबर तपासाच्या दृष्टीने कोणती कागदपत्रे हवी होती किंवा तपासामधील काही कच्चे दुवे राहिलेले आहेत काय यासंबंधी काहीही "से" नसतो त्यामुळे चार्जशीटमध्ये मोठया प्रमाणावर त्रृटी राहतात तेव्हा विधी सल्लागार अधिका-याची मदत चार्जशीट दाखल करण्यापूर्वीसुध्दा घेण्यात येणार आहे काय?.

श्री.नितीन राऊत : होय

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणदी तर्फ वाळवा (जि.सांगली) या गावातील अल्पशिक्षित व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा जिब्रालिक ॲसिड प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(५) * ५०७४१ श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.सय्यद जमा , श्री सुभाष चव्हाण , श्री. चरणसिंग सप्रा , श्रीमती अलका देसाई , श्री. भगवान साळुंखे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.चंद्रकांत पाटील , श्री. प्रकाश शेंडगे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणदी तर्फ वाळवा (जि.सांगली) या गावातील अल्पशिक्षित व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रस्तावित सहकारी जिब्रालिक ॲसिड प्रकल्प गेल्या २२ वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २००९ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात द्राक्षांचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते तसेच द्राक्षांच्या जोमदार वाढीसाठी द्राक्षांचे घड जिब्रालिक ॲसिडच्या द्रावणात बुडवले जात असल्यामुळे या ॲसिडला मोठी मागणी असते, हे ही खरे आहे काय,
(३) सदर जिब्रालिक ॲसिड परदेशातून आयात करावे लागते व सदर आयात केलेले ॲसिड खरेदी करणे शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जाते त्यामुळे या प्रकल्पास तातडीने मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) नाही. संस्थेची सन १९९३ साली नोंदणी झाली. दिनांक १७.४.१९९८ रोजी संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. परंतू दिनांक १७.०१.२००४ रोजी संस्था अवयायनात घेण्यात आली. संस्थेने प्रकल्प अहवाल बदलून मिरची पासून अर्क काढण्याचा प्रकल्प अहवाल सादर केल्याने दिनांक १९.०९.२००८ रोजी संस्थेचे पुनरुज्जीवन करण्यात आले. संस्थेने अर्थसहाय्याचा प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे मान्यता देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(२) होय.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना तीन स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, १९९३ साली नोंदणी झालेल्या संस्थेचे संचालक मंडळ केव्हा कार्यरत झाले होते ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, १९९८ मध्ये संचालक बरखास्त करुन प्रशासकाची नेमणूक कोणत्या कारणास्तव करण्यात आली होती.? त्यानंतर माझा तिसरा प्रश्न असा आहे की, १९९८ ते २००४ सालापर्यत म्हणजे ही संस्था अवसानयात येई पर्यत प्रशासक काम करीत होते या प्रशासकाच्या राजवटीत काम बरोबर झालेले नाही म्हणून कारवाई करण्यात आली आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, दिनांक २३.४.१९९३ रोजी या संस्थेची नोंदणी झालेली असून एखाद्या संस्थेची नोंदणी झाल्यानंतर सुरुवातीला प्रवर्तकाचे संचालक मंडळ असते पहिल्या सर्वसाधारण बैठकीत प्रवर्तकाचे रुपांतर संचालक मंडळात करत असतो त्याप्रमाणें १९९३ साली ही संस्था अस्तित्वात आली तथापि पुढच्या पाच वर्षात जिब्रालिक ॲसिड प्रकल्प ज्यांनी तयार केलेला होता त्यांच्याकडून प्रोज्क्ट रिपोर्ट, फिजिबिलीटी रिपोर्ट, बॅन्कीग संदर्भात बॅकअप इत्यादी सबंधी सहकार विभागाने, पणन संचालकानी वारंवार मागणी करुनसुध्दा त्यासबंधीचे प्रस्ताव त्यांना दाखल करता आलेले नाहीत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50741...

श्री. हर्षवर्धन पाटील...

आणि म्हणून पाच वर्षे वाट पाहिल्यानंतर 1998 मध्ये ही संस्था लिक्विडिशनमध्ये काढण्याचा निर्णय घेतला व त्याठिकाणी प्रशासक नेमण्याचा निर्णय घेतला ही वस्तुस्थिती आहे.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, जिब्रालिक ॲसिडच्या संदर्भात हा प्रश्न विचारण्यात आला आहे हे शेतकऱ्यांसाठी उपयोगी पडणारे औषध असलेतरी शेतकऱ्यांचे जे नुकसान होत आहे त्याकडे कृषी विभागाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. अल्प भू धारक शेतकऱ्यांनी प्रस्ताव दाखल केल्यानंतर माननीय सहकार मंत्र्यांनी निवेदन केले आहे. त्याबाबत माझी अशी मागणी आहे की, जे औषध येणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कृषी खात्याच्या अधिकाऱ्यांनी जागरुकपणे लक्ष घातले पाहिजे, ते घालणार काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा प्रस्ताव अतिशय चांगला होता. जिब्रालिक ॲसिड हे शेतकऱ्यांसाठी लागणारे अत्यंत महत्वाचे औषध आहे. हे औषध शेतकऱ्यांना खुल्या बाजारातून जास्त किंमतीने खरेदी करावे लागते. याबाबत हा प्रस्ताव तयार केल्यानंतर त्याची फिजिबिलिटी लक्षात घेतली पाहिजे. तसेच, त्यातील इंग्रेडिएंट परदेशामधून आणावे लागतील अशी परिस्थिती होती. त्या बाबत मॅनेजमेंटकडून कोणताही अहवाल सादर करण्यात आला नाही म्हणून हा प्रोजेक्ट लिक्विडिशनमध्ये काढला. तथापि, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, आता पणन विभागाच्या माध्यमातून 5 कोटींचे धोरण स्वीकारले असून अशाप्रकारे शेतीसाठी लागणारे कोणतेही प्रॉडक्शन करावयाचे असेल तर त्याबाबत पणन विभाग पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करील.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मिरचीपासून अर्क काढण्याचा प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर या संस्थेचे पुनरुज्जीवन करण्यात आले. हा मिरचीपासून अर्क काढण्याचा प्रकल्प अंदाजे किती रकमेचा आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,ज्यावेळी या संस्थेचे आपण डिरजिस्ट्रेशन केले त्यावेळी त्यांनी दुसरा प्रस्ताव सादर केला. श्री. रणखांबे नावाचे गृहस्थ आहेत त्यांनी चिली पावडर तयार करण्याच्या प्रकल्पाचा प्रस्ताव दिला होता. परंतु त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, आम्हाला मिरचीपासून अर्क तयार करावयाचा आहे म्हणून त्यांना डिरजिस्टेशन केले असतांनाही पुन्हा परवानगी दिली. आता त्यानंतर अशी परिस्थिती निर्माण झाली की, त्यांच्याकडून अजून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

ता.प्र.क्र. 50741...

श्री. हर्षवर्धन पाटील...

फिजिबिलिटी रिपोर्ट सादर करण्यात आला नाही. तो सादर करण्यासाठी आपण त्यांना एक महिन्याची मुदत दिली. त्या प्रकल्पाची एकूण किंमत, त्या प्रकल्पाचे वर्किग आणि त्याची फिजिबिलिटी याबाबत सर्व माहिती त्यांच्याकडून आल्यानंतर पुढील कारवाई करु.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, जिब्रालिक ॲसिड हे द्राक्ष पिकासाठी अत्यंत उपयुक्त असे रसायन आहे. ते तयार करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या प्रस्तावाला सरकार मान्यता कां देत नाही? हे शासन जिब्रालिक ॲसिडकरिता नवीन प्रकल्प आणणार आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सुरुवातीला त्यांनी 1993 मध्ये संपूर्ण राज्याचे कार्यक्षेत्र मागितले होते. त्याकरिता सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते . त्यावेळी त्या समितीकडे त्यांनी 8 कोटी 51 लाख 25 हजाराचा प्रकल्प अहवाल दिला होता. तो ग्राहय धरुन या स्टेट लेव्हलच्या कमिटीने ती संस्था रजिस्टर करण्यास परवानगी दिली. त्यानंतर त्या संस्थेला फिजिबिलिटी आणि बँक प्रपोजल सादर करण्यास कळविले. परंतु या संस्थेने त्या बाबतीत वारंवार मागणी करुन सुध्दा कोणतीही कार्यवाही केली नाही. या संस्थेला अनामत रक्कम दिली आहे ती आम्हाला कधी मिळणार म्हणून शेतकऱ्यांकडून वारंवार अर्ज करण्यात आले. त्यामुळे ही संस्था डिरजिस्ट्रेशन करण्याबाबत निर्णय घेतला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

**विदर्भातील सहकारी साखर कारखान्यांचा ऊस लागवड व पुनर्वसन कार्यक्रमात समावेश करण्याबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल**

**(६) * ५२५९४ श्री. व्ही.यु. डायगव्हाणे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८३१ ला दिनांक २९ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तरांच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व. बापूरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना मर्या. वेळा (जि.वर्धा) या कारखान्याच्या संचालक मंडळाने जाहीर केल्याप्रमाणे सन २००६-२००७ व २००७-२००८ मध्ये ऊस उत्पादकांच्या ऊसाला प्रति मे. टन रूपये १०००/- प्रमाणे भाव दिला आहे काय,

(२) असल्यास, फरकाची रक्कम केव्हा दिली,

(३) अद्यापही रक्कम अदा केली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) नाही.

(२) व (३) सदर कारखान्याची आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याने व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने कर्ज उचल दिली नसल्यामुळे सन २००६-०७ ची फरकाची रक्कम कारखान्याच्या संचालक मंडळाने जाहीर केलेल्या दरानुसार कारखान्यास अदा करात आली नाही.

हंगाम २००७-०८ साठी कारखान्याने केंद्र शासनाचे धोरणाप्रमाणे ऊस दर अदा करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार ऊसाची किंमत ऊस उत्पादकांना अदा केली आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय पंतप्रधान पॅकेज दिलेल्या आत्महत्त्याग्रस्त जिल्हयातील शेतकऱ्यांचा हा प्रश्न आहे. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी शासनाने जाहीर केल्याप्रमाणे सन 2007-08 मध्ये शेतकऱ्यांना योग्य भाव दिला असे म्हटले आहे. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, माझ्याजवळ त्यांचे निवेदन आहे. त्यात म्हटले आहे की, 1100 भाव देण्याचे कबूल केले असतांना 900 रुपये भाव दिला. पहिला प्रश्न हजार रुपये भाव देण्याबाबत जाहिरात देऊन सुध्दा प्रत्यक्षात 850 रुपये भाव दिला. सन 2006-07 मध्ये 150 रुपयांचा डिफरन्स आणि सन 2007-08 मध्ये 200 रुपयांचा डिफरन्स होता.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:45

ता.प्र.क्र.52594 . . . .

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे . . ..

आपण याठिकाणी सांगितले की, कारखान्याची आर्थिक स्थिती बरोबर नाही. दुसरीकडे शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्यात येत आहेत. ही योग्य बाब आहे. तसेच माननीय पंतप्रधान योजनेच्या अंतर्गत अनेक सुविधा दिल्या आणि कारखान्यांना का सूट देता? माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की,त्यांना कर्ज दिलेले नाही. पण त्यांना कर्ज द्या किंवा याबाबतीत काय व्यवस्था करावयाची आहे ती करा. पण या शेतकऱ्यांना 2006-2007 मधील 150 रुपयांचा जो डिफरन्स द्यावयाचा आहे आणि 2007-2008 मधील डिफरन्स् मधील 200 रुपये भाव द्यावयाचा आहे, तो शासनाच्या तरतुदी तून कर्ज घेऊन, वाटेल ते काही करा, पण या कारखानदारांचे लाड पुरविण्यासाठी शेतकऱ्यांना मारु नका. म्हणून याबाबतीत काही करणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कारखानदारांचे लाड पुरवू नका. पण त्यांचे लाड पुरविण्याचा प्रश्न नाही. याचे कारण असे आहे की, आपल्याकडे ऊसाचा भाव देण्याची प्रक्रिया एस.एम.पी.प्रमाणे असते, ज्याला आपण स्टॅट्युटरी मिनिमम प्राईज म्हणतो. 2006-2007 ची एस.एम.पी. ही 931 रुपये होती. शुगर कंट्रोल ऑर्डर प्रमाणे एस.एम.पी. देणे हे कायद्याने कारखान्यांवर बंधनकारक आहे.या कारखान्याने 2006-2007 ची एस.एम.पी.931 रुपये दिलेली आहे. याच कारखान्याने 2007-2008 ची एस.एम.पी.937 रुपये 80 पैसे ही केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे निधालेली आहे आणि ती देखील त्यांनी दिलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न अत्यंत व्हॅलिड आहे की, त्या साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने, चेअरमन यांनी एक परिपत्रक काढले आणि त्यामध्ये "आम्ही 1100 रुपये भाव देऊ" असे म्हटलेले आहे. जर त्यांनी परिपत्रक काढले असेल तर मी ती माहिती तपासून घेईन आणि परिपत्रकाप्रमाणे त्या कारखान्याने कारवाई करावी अशा प्रकारच्या सूचना कारखान्याला देण्यात येतील.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्री महोदयांना साखर कारखानदारीच्या संबंधातील ऊसाच्या भावाचा जो प्रश्न आहे, त्यामध्ये एस.एम.पी.च्या रेट प्रमाणे 1(अ) चे ड्रॉवल को-ऑपरेटीव्ह बँकेने मंजूर करावे असे नाबाडच्या आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सल्ल्यानुसार केले जाते.माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, ज्यांना एस.एम.पी.पेक्षा जास्त भाव द्यावा लागतो, आज साखरेचा दर 2400 रुपये आहे आणि साखरेचा ..

. . . .जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.52594 . . . .

डॉ.वसंत पवार . . . .

मार्केट रेट विचारात घेता, आपण साखर कारखानदारांना सुध्दा उचल दर वाढवून देणे गरजेचे आहे. असे झाले तरच ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, त्यांना मार्केटमधून हा ऊस शेतकऱ्यांकडून घेता येईल आणि शेतकऱ्यांना सुध्दा दोन पैसे मिळू शकतील. तेव्हा उचल दर ठरविण्याची जी प्रक्रिया आहे, त्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला मार्केट रेट गृहीत धरण्याच्या बाबतीत काही आदेश देणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, तसे पाहिले तर हा वेगळा प्रश्न आहे. परंतु एस.एम.पी.च्या संदर्भात आणि साखरेच्या पोत्यावर जी प्लेस दिली जाते, त्याबाबतीत सुध्दा नाबार्डचे काही गाईड लाईन्स् आहेत आणि त्याप्रमाणे राज्य सहकारी बँक ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना इश्यु करते. काही कारखाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे आहेत आणि काही कारखाने एम.एस.सी. बँकेकडे आहेत. आता मंत्री समितीची लवकरच बैठक होणार आहे. मला असे वाटते की, आता साखरेच्या भावामध्ये एकदम 700 ते 800 रुपयांनी वाढ झालेली आहे. त्यांनी जे सांगितल, ती बाब खरी आहे की, सुरुवातीला 1100 रुपये होते, नंतर 1450 झाले आणि आता 1700 रुपये आपण एका पोत्याला प्लेस देतो. काही जिल्हा-जिल्हा बँकेच्या संदर्भात व्हेरिएशन्स् आहेत. याबाबतीत मंत्री समितीच्या बैठकीमध्ये विचार करण्यात येईल.

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, साखर कारखान्याच्या ऊस बिल देण्याच्या बाबतीत आहे. राज्यात जे काही कायदे आहेत, त्यात अशा काही कारखान्यांकडून शेतकऱ्यांची बिले राहिली असतील, कामगारांच्या बाबतीत काही अडचणी असतील तर त्याबाबत माननीय सहकार मंत्री महोदयांनी त्या साखर कारखान्या बाबतीत लक्ष घालून, बँक असेल, जिल्हा बँक असेल किंवा एम.एस.सी.बँक असेल, तर याही बाबतीत लक्ष द्यावे अशी विनंती करतो. असे काही कारखाने असतील, तुम्ही सांगत आहात त्या पध्दतीने . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांनी फक्त प्रश्न विचारावा.

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, आमच्या जिल्ह्यात देखील कारखाना आहे. . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांनी प्रश्न विचारावा.

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी .....

. . . .जे-3



APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.52594 . . . .

श्री.संजय पाटील .. . .

सांगितले की, ऊस बिल वेळेवर दिले नाही तर त्याबाबतीत कायदा आहे. या अनुषंगाने आमच्या जिल्हयात देखील काही प्रश्न आहेत. तेव्हा माननीय मंत्री महोदय आणि संबंधित कारखान्याचे चेअरमन यांनी मदत करण्याची भूमिका घ्यावी अशी विनंती आहे. तेव्हा तशी भूमिका घेतील काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याबाबतीत जी काही मदत लागेल, ती करण्याची भूमिका शासन घेईल.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(७) * ५११४१ श्री.राजन तेली :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तेथील जनतेनी बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत लेखी तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने बोगस डॉक्टरांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. नितीन राऊत ,श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** (१) नाही.
(२) व (३) दि.७/१११/२००८ रोजी कणकवली पोलीस ठाण्यात प्राप्त अर्जानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदूर्ग यांच्या मदतीने केलेल्या चौकशीत अब्दुल्ला कासम शेख रा.कलमठ ता.कणकवली याने महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियन मेडीसीनकडे रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र नसताना तसेच आयुर्वेदिक अर्हतेचे कालबह्य नोंदणी प्रमाणपत्र बाळगून अवैध वैद्यकीय व्यावसाय करीत असल्याचे आढळून आले. त्याबाबत वैद्यकीय अधिकारी कणकवली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कणकवली पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ३०४४/०८ महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधि.१९६१, कलम ३३,३३ (अ) अन्वये गुन्हा नोंदविला आहे व आरोपीस अटक करण्यात आली. सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली :सभापती महोदय, फक्त सिंधुदुर्ग जिल्हयातच नाही तर संपूर्ण ग्रामीण भागात डॉक्टर्स कमी आहेत. त्यामुळे बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट चालू आहे. याबाबत कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या स्तरावर यंत्रणा आहे काय?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने बोगस डॉक्टर्सचा शोध करणे आणि त्यांच्यावर कारवाई करणे यासाठी सक्षम अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषदेमध्ये असतो. ते काम पोलिसांचे नसते. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी तशा प्रकारची तक्रार पोलिसांकडे दाखल केल्यानंतर पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येते.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये गेल्या दोन वर्षापासून जिल्हा आरोग्य अधिकारी नाही. असे असताना माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाचे उत्तर कुठल्या आधारे दिले आहे? सभापती महोदय, हा केवळ सिंधुदुर्ग जिल्हयाचा प्रश्न नाही तर संबंध ग्रामीण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली

भागातील हा प्रश्न आहे. ग्रामीण भागात बोगस डॉक्टर्स फार मोठया प्रमाणात आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये दोन वर्षापासून जिल्हा आरोग्य अधिकारी नाहीत तेव्हा याबाबतीत काय कारवाई करण्यात येणार आहे?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या प्रश्नाची दखल घेण्यात यावी याबाबत यासंबंधात विभागाला ही माहिती निश्चितपणे कळविण्यात येईल तसेच त्याठिकाणी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी असे उत्तर दिलेले आहे की, याबाबत तक्रारी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यामार्फत पोलिसांकडे आल्यानंतर त्याबाबत कारवाई करण्यात येते. परंतु जर समाजात काही चुकीचे घडत असेल तर त्याविरुध्द पोलीस सु-मोटो ॲक्शन घेत असतात, तक्रारीची वाट पहात नाहीत. असे असेल तर बोगर्स डॉक्टर्स विनापरवाना प्रॅक्टीस करीत आहेत या संदर्भातील तक्रारीची वाट पहाण्याची आवश्यकता आहे काय? याबाबतीत तक्रारीची वाट पहाण्याची आवश्यकता नाही. सु-मोटो चुकीचे घडत असेल तर पोलिसांनी त्याबाबत कारवाई केली पाहिजे. ग्रामीण भागात बोगस डॉक्टर्स मोठया प्रमाणात प्रॅक्टीस करतात तेव्हा याबाबतीत पोलिसांना आदेश देण्यात येतील काय?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या संबंधात राज्य शासनाने कायदा केलेला आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिकनियम,1961 च्या कलम 33 व 33(अ) मध्ये याबाबतची तरतूद आहे. अशा प्रकारची तक्रार आली किंवा सु-मोटो पोलिसांच्या लक्षात आले तर निश्चितपणे तो गुन्हा ठरतो आणि त्या गुन्हयाची नोंद पोलीस विभाग घेत असतो.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 51654**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी आणि श्री. जितेंद्र आव्हाड याचा प्रश्न काल जेव्हा चर्चेला आला होता तेव्हा ते सभागृहात उपस्थित नव्हते. त्यानंतर ते सभागृहात आले होते. आज पुन्हा ते सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. गरुनाथ कुलकर्णी : डॉ. हिराणी यांची प्रकृती बरी नसल्यामुळे ते डॉक्टरकडे गेलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : डॉ. हिराणी यांची तब्बेत ठीक नाही हे आम्हाला माहिती आहे पण श्री. जितेंद्र आव्हाड हे पनवेलच्या पोलीस स्टेशनमध्ये असल्याचे आम्ही त्यांना टी.व्ही.वर पाहिले आहे. ते तिकडे काय करीत आहेत?

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

**कु.श्वेता वामनराव देशमुख, रा.वाशिम (ता.जि.वाशिम) या विद्यार्थीनीचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला मृत्यू**

**(९) * ५०१९८ श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कु.श्वेता वामनराव देशमुख, रा.वाशिम (ता.जि.वाशिम) या बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमास असलेल्या विद्यार्थीनीचा दिनांक १३ सप्टेंबर, २००८ रोजी साई हॉस्पीटल, औरंगाबाद येथील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाबतीत विद्यार्थीनीच्या नातेवाईकांनी क्रांती चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे दिनांक १२ ऑक्टोबर, २००८ रोजी साई हॉस्पीटल, औरंगाबादच्या संचालकाविरुध्द तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, उपरोक्त बाबतीत तपासास लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितीन राऊत, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) व (२) कु.श्वेता वामनराव देशमुख हीच्या दि.१४.९.२००८ रोजी झालेल्या मृत्यूबाबत मयताच्या भावाने पोलीस स्टेशन क्रांतीचौक येथे दि.५.१२.२००८ रोजी फिर्याद दिली हे खरे आहे.

(३) या प्रकरणी पोलीस स्टेशन क्रांतीचौक येथे दि.५.१२.२००८ रोजी गु.नों.क्र.५५५/२००८ भा.दं.वि.सं. कलम ३०४ अ, २०१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून रुग्णालयाच्या डॉक्टरासह एकूण तीन आरोपींना अटक करण्यात आली. तीन्ही आरोपींविरुध्द दि.२२.१.२००९ रोजी दोषारोप पत्र क्र.२०/२००९ कोर्ट केस क्र.५४३/२००९ दि.२८.१.२००९ अन्वये मा.न्यायालयात सादर करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या ठिकाणी कु. श्वेता वामनराव देशमुख ही वाशिम जिल्हयातील विद्यार्थीनी आहे. ती एका खेडेगावात रहाणारी विद्यार्थीनी आहे. आपल्या समाजाची सेवा करावी, गोरगरिबांची सेवा करावी म्हणून तिने वैद्यकीय व्यवसाय निवडला आणि ती औरंगाबाद शहरामध्ये बी.ए.एम.एस. च्या तिसऱ्या वर्षाला शिकत होती. दि.13-9-2008 रोजी तिची तब्बेत अचानक बिघडली. त्यामुळे तिच्या वडिलांनी तिला साई हॉस्पिटल, समर्थनगर, औरंगाबाद येथे भरती केल. त्यावेळी तेथील डॉक्टरांनी तिला मलेरिया झाला असून क्विनिन हया गोळया घेण्यास संगितले. त्यावेळी या क्विनीन गोळयांमुळे मला री-ॲक्शन येत असल्यामुळे मला क्विनीन च्या गोळया देण्यात येऊ नयेत असे तिने सांगितले होते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50198...... श्री. वसंतराव खोटरे ...

परंतु त्या ठिकाणी त्या डॉक्टरने ऐकले नाही आणि त्यानंतर गोळ्या न देता त्या मुलीला आय. व्ही. 1 पॉइन्ट डीएनएस देण्यात आले. ते देण्यात आल्याबरोबर दीड तासात त्या मुलीचा तडफडत मृत्यू झाला. त्या मुलीने तसेच तिच्या भावाने सांगितले की, या गोळ्यांमुळे ॲलर्जी होते. आय.व्ही. 1 पॉइन्ट डीएनएस इंजेक्शन देत असताना किंवा तिची प्रकृती गंभीर असताना त्या ठिकाणी डॉक्टर हजर नव्हते किंवा तज्ज्ञ नर्स सुध्दा हजर नव्हती. त्यामुळे त्या ठिकाणी हलगर्जीपणा झाला आणि त्या मुलीचा मृत्यू झाला. त्या ठिकाणी जी केस दाखल केली त्यामध्ये 304 अ हे कलम लावलेले आहे. त्या ठिकाणी कलम 304 लावावयास पाहिजे होते. हा हलगर्जीपणा का केला ? शासन याबाबत चौकशी करुन त्या डॉक्टरवर 304 हे कलम लावणार काय ? त्या ठिकाणी त्यांच्या निष्काळजीपणामुळे गरीब मुलीचा मृत्यू झालेला आहे. त्यांची वैद्यकीय सनद रद्द करणार काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, अत्यंत गंभीर असा गुन्हा एका दलित आणि उच्चविद्याविभुषित मुलीच्या बाबतीत डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे घडलेला आहे. ती मुलगी स्वत: डॉक्टर असल्यामुळे तिने मला क्विनिन गोळ्या चालत नाही, रिॲक्शन होते असे नमूद केले होते तरी सुध्दा तिला जबरदस्तीने क्विनिनचे इंजेक्शन देण्यात आले आणि त्यात ती मरण पावली. तिचा मृत्यू झाल्यानंतर तिचे प्रेत नेण्याच्या वेळी तसेच पोस्टमार्टेम करण्याच्या वेळी डॉक्टर प्रसन्ना यांनी सांगितले की, तिचे पोस्टमार्टेम करण्याची गरज नाही, मी लिहून देतो. हे प्रकरण तपासासाठी संबंधित विभागाकडे पाठविण्यात आले. त्यांच्या निष्कर्षामध्ये डॉक्टरवर दोषारोप ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे त्या डॉक्टरची डिग्री परत का घेऊ नये यासंबंधी एमसीआयला निश्चितपणे लिहिले जाईल आणि सदर प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.मार्फत केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा जो घटनाक्रम घडला त्यानंतर दुर्दैवाने तिच्या भावाने उशिरा तक्रार दिल्यामुळे हा सगळा प्रश्न निर्माण झाला आणि त्यामुळे त्या विद्यार्थीनीचे पोस्टमार्टेम झाले नाही. ही केस कोर्टात स्टँड होण्यासाठी अतिशय अडचणी येतील आणि गुन्हेगार सुटू शकतात अशी भीती आहे. त्यामुळे आपण ही केस आणखी स्ट्रॉंग करण्यासाठी त्यांचा जो निष्कर्षाचा अहवाल आहे तो कोर्टात सादर केला का ? गुन्हा न्यायप्रविष्ट असल्याचे म्हटले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50198...... डॉ. दीपक सावंत ....

त्यामुळे तो अहवाल कोर्टात सादर केला का ? केला नसल्यास तो सादर करणार काय ? त्यांच्यावर जे 304 अ कलम लावले आहे त्याऐवजी कलम 304 लावणार काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, होय.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. मधुकर चव्हाण : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सरळ प्रश्न विचारला आहे की, त्यांची सनद रद्द करणार काय ? त्याची दोन कारणे आहे कोणताही डॉक्टर पेशन्टला विचारतो की, या गोळ्यांची आपल्याला ॲलर्जी आहे काय ? पेशन्ट सुशिक्षित असेल किंवा एखाद्याला दहा बारा वर्षे औषध घ्यावे लागणारा आजार असेल तर ते याबाबत सांगू शकतात. ती मुलगी स्वत: वैद्यकीय शिक्षण घेत होती. दुसरे असे की, ॲडमिट केल्यानंतर 24 तासांच्या आत एखादी व्यक्ती मृत्यू पावली तर पोस्टमार्टेम करावेच लागते किंवा पोस्टमार्टेम केले नाही तरी पोलीस स्टेशनला कळवावे लागते. नेल इंज्युरी असेल किंवा कॉटवरुन पडला असेल तरी नर्स पोलीस स्टेशनला कळवितात. नेल इंज्युरी झाल्यानंतर सुध्दा ती पोलीस केस होते. तिचे पोस्टमार्टेम केले काय ? त्या डॉक्टरची सदन रद्द करणार काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी सांगितले की, सनद रद्द करण्याचा अधिकार पोलीस खात्याला नाही. तो अधिकार एम.सी.आय.ला आहे आणि एम.सी.आय.कडे हे प्रकरण पाठविण्यात येईल. ही केस मजबूत करण्यासाठी कलम 304 लावण्यात येईल. काही सन्माननीय सदस्य सी.आय.डी. चौकशीची गरज नाही असे सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. सी.आय.डी. चौकशीची गरज नसेल तर हरकत नाही.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या केसमध्ये एका मुलीचा मृत्यू झाला आहे. या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्यावर बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. परंतु डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे त्यांचा एक हात निकामी झाला आहे. याची सुध्दा यानिमित्ताने दखल घेतली गेली पाहिजे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले आहेत त्यात दुरुस्ती करु इच्छितो. ही केस स्ट्राँग करण्यासाठी कलम 304 लावले जाणार असल्यामुळे सी.आय.डी. चौकशीची गरज राहणार नाही.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.हर्षवर्धन पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील सहकारी बँकांमध्ये जनतेच्या ठेवी आर्थिक गैरव्यवहारामुळे अडकल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया, अरविंद सावंत, अनिल परब, सुरेश जेथलिया, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. तसेच श्री.मधुकर सरपोतदार, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 27 नोव्हेंबर, 2007 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 35594 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे अधिक माहिती छापावी. )

----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन 2007-2008 या वर्षाचा (1) वित्तीय लेखे अहवाल (2) विनियोजन लेखे अहवाल (3) नागरी अहवाल (4) महसुली जमा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

---

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 1 एप्रिल 2008 ते 31 मार्च 2009 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळया विभागामार्फत देण्यात आलेल्या हमीविषयीचे वार्षिक विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

----

श्री.विजय वडेट्टीवार ( पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.सुरेश वरपुडकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008 चा 42 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ ST/

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला जिल्हयातील मलकापूर येथील सौ.शकुंतला कोठारी यांच्या मालकीची सर्व्हे नं.24/2 मधील 20 एकर 28 गुंठे जमीन शासनाने भूसंपादनाच्या नावाखाली संपादित केल्याबाबतचा विषय मी यापूर्वी देखील सभागृहात उपस्थित केलेला आहे....

**उपसभापती** : औचित्याच्या मुद्याच्या वेळी मी आपले म्हणणे ऐकून घेईन.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने सौ.शकुंतला कोठारी यांची जमीन शासनाने संपादित केली असल्याबाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. कारण या विषयावर सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. परंतु शासनाकडून देण्यात आलेल्या आश्वासनाची पूर्तता होत नाही....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मला हा विषय माहीत आहे. सौ.शकुंतला कोठारी यांचे प्रकरण म्हाडामध्ये आहे. हा विषय आतापर्यंत 20 ते 25 वेळा सभागृहात मांडण्यात आला आहे. त्यामुळे मला स्वत:ला देखील आता लाज वाटू लागली आहे. शासन किती उदासीन आहे त्याचे हे बोलके उदाहरण आहे. मी स्वत: संबंधित विभागाच्या सचिवांना बोलविले होते. त्यानंतर त्यांनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांचे म्हणणे योग्य वाटले. तरीही याप्रकरणाची नस्ती गृहनिर्माण विभागामध्ये अद्याप पोहोचलेली नाही. हा प्रश्न सभागृहात वारंवार उपस्थित करण्यात आलेला आहे. त्यामुळे यासंबंधीची नस्ती आजच्या आज गृहनिर्माण विभागाकडून सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवावी. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना वाटेल तो त्यांनी निर्णय घ्यावा. पण उद्या जर हा प्रश्न सभागृहात पुन्हा उपस्थित झाला तर मी सभागृहाचे कामकाज बंद करीन.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, या प्रश्नासाठी सभागृहाचे कामकाज कशासाठी बंद करावयाचे ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार यांना मी सांगू इच्छितो की, या सदनामध्ये जवळपास 25-30 वेळा चर्चा उपस्थित झालेली आहे. माझ्या कार्यालयात कमीत कमी 4-5 वेळा बैठक झाली आहे, ही सर्व वस्तुस्थिती शासनाला समजू नये ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती....)

सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ती फाईल मागविलेली असतानाही अजून ती फाईल त्यांच्याकडे जात नसेल तर तुम्हा आम्हाला दुसरा काय मार्ग आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : या संदर्भात शासनामार्फत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : उपसभापती महोदय, आपण दिलेले निदेश शासनाकडून पाळले जात नाहीत त्या बद्दल आपण या ठिकाणी संताप व्यक्त केला. छत्रपती शिवाजी टर्मिनस, लोकमान्य टिळक टर्मिनस, पोलीस स्टेशन्स, विमानतळ यांची नावे योग्य पध्दतीने लिहिण्यासंबंधी आपण आदेश दिले होते. तसेच दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी रात्री 11.00 वाजपर्यन्त झाली पाहिजे असेही आपण सांगितलेले होते. परंतु त्याबाबतीत अजून काही झालेले नाही.

**उपसभापती** : ज्या गोष्टी शासनाच्या अखत्यारितील आहेत, उदा. पोलीस स्टेशन वगैरे त्याठिकाणी त्यांनी कारवाई केलेली आहे. परंतु ज्या गोष्टी केन्द्र शासनाच्या अखत्यारित आहेत त्याबाबतीत केन्द्राशी पत्रव्यवहार करावा लागतो. ती कार्यवाही सुरु आहे.

आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, चर्चेला कोण उत्तर देणार आहे ? माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. प्रत्येक वेळी माननीय मंत्री महोदयांच्या अनुपस्थितीमुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागत आहे.

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 12.30 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.07 ते 12.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

....नंतर श्री.गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: देशाची आर्थिक राजधानी व राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची विविध समस्यांमुळे दुरावस्था होणे

**मु.शी.**: देशाची आर्थिक राजधानी व राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची विविध समस्यांमुळे दुरावस्था होणे यासबंधी सर्वश्री. पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते, नितीन गडकरी, अरविंद सावंत, विनोद तावडे,ॲड.अनिल परब, श्री.मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, श्री. प्रकाश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.संजय केळकर, किरण पावसकर,वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु...)

श्री. हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, काल माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मुंबई शहरातील जटील प्रश्नांच्या बाबतीत प्रस्ताव आणला होता. या प्रस्तावावर सभागृहात जवळपास चार ते पाच तास चर्चा झाली व या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी मुंबई शहरातील महत्वाच्या प्रश्नांचा उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विशेषत: मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, मुंबई ही औद्योगिक राजधानी आहे, मुंबई नगरी जगातील प्रसिध्द शहर आहे. मुंबई हे शहर या देशातील शांघाय आणि सिंगापूर असे आहे, मुंबई शहर हा कोहिनूर हिरा आहे अशा अनेक उपमा देऊन मुंबई शहराचा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, मी ग्रामीण भागात राहणारा माणूस आहे. लहानपणी मुंबई शहरात आल्यानंतर आम्ही मुंबई शहराच्या बाबतीत चर्चा करीत होतो. या मुंबई शहरात एवढे लोक कसे रहात असतील, त्या लोकांचे प्रश्न कसे सुटत असतील, या ठिकाणच्या लोकांच्या समस्या कशा सुटत असतील, याबद्दल आमच्या सारख्या ग्रामीण भागातील लोकांसमोर अनेक प्रश्न उभे रहात असे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

मुबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 30 लाखापर्यंत गेली आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरणाची लोकसंख्या 2.50 कोटीपर्यंत गेली आहे. इतक्या मोठया लोकसंख्येचा भार वाहणारे हे शहर आहे. मुंबई शहरात रोज वाहतुकीची कोंडी मोठया प्रमाणात होत असते. विशेषत: सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी राजकीय अभिनिवेष न ठेवता मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी संपविण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत यासंदर्भात सविस्तर वर्णन केले आहे व या वर्णनाच्या माध्यमातून त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारची दिशा देणारे भाषण केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे बांधकाम मंत्री होते. त्यावेळी त्यांनी पहिल्यांदा एम.एस.आर.डी.सी.ची स्थापना केली.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ.....

आणि या इन्फ्रास्ट्रक्चरला त्यांनी हात घातला. त्यांना चांगला अनुभव होता. त्यांनी अतिशय चांगले मार्गदर्शन या मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी केलेले आहे. विशेषत: त्यांनी मेट्रो रेल, मोनो रेल, वॉटर ट्रान्सपोर्ट, हार्बर लिंक, अंडरग्राऊंड टनेल वगैरे वाहतुकीच्या सुविधांमुळे वाहतुकीची कोंडी फुटू शकेल, वाहतूक सुरळीत होऊ शकेल अशा प्रकारचे वक्तव्य याठिकाणी केले होते.

सभापती महोदय, एमएमआरडीएची स्थापना 1975 साली झाली. एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिका या सवती आहेत असाही उल्लेख करण्यात आला. वास्तविक दोघांनी हातात हात घालून काम केले तर मुंबई शहराचा विकास चांगल्याप्रकारे होऊ शकेल, प्रश्न चांगल्या तऱ्हेने सुटू शकतात आणि चांगले काम होऊ शकते यावर शासनाचा विश्वास आहे. म्हणून या दोन्ही संस्था सवती नसून सख्ख्या बहिणीच्या नात्याने त्यांनी काम करावे अशी शासनाची अपेक्षा आहे. दोन्ही संस्थांच्या अधिकाऱ्यांमध्ये उत्तम समन्वय दिसून आला. राजकीय अभिनिवेषापोटी एकमेकांवर टीका होत असतील, परंतु जी कामे मुंबई शहरामध्ये एमएसआरडीसी, एमएमआरडीए, मुंबई महानगरपालिका, एमयुटीपी आणि एमयुआयपी यांच्या माध्यमातून केली जात आहेत, त्यावर जो निधी खर्च केला आहे ते खरोखरच आश्चर्यजनक आहे. मुंबई शहरामध्ये जी कामे सुरु आहेत त्यांचा मी उल्लेख करु इच्छितो. मुंबईमध्ये एमएसआरडीसी मार्फत 3 उड्डाण पुलाची कामे हाती घेण्यात आली असून त्यातील 3 कामे पूर्ण झाली आहेत. ठाकूर कॉम्प्लेक्स, दिंडोशी, सांताक्रूझ एअरपोर्ट येथील कामे पूर्ण झाली असून टाईम्स ऑफ इंडिया प्रेस, बर्फीवाला लेन आणि सुमन नगर येथील कामे प्रगतीपथावर आहेत. 14 पादचारी उड्डाण पुलाची कामे हाती घेतली आहेत. कांदिवली, गोरेगाव, वसई, विलेपार्ले, ग्रँट रोड, परळ याशिवाय मुंबई नागरी परिवहन म्हणजे एमयुआयपी अंतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्त्याचा 19 कोटी रुपये खर्चाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून 98 टक्के काम पूर्ण झाले आहे. सांताक्रूझ-चेंबूर जोड रस्त्याचा 114 कोटी रुपयांचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून 35 टक्के काम पूर्ण झाले आहे व दुसऱ्या टप्प्याचे 60 टक्के काम पूर्ण झाले असून 2011 डिसेंबर अखेरपर्यंत काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. वांद्रे-वरळी सागरी सेतू या 1638 कोटी रुपये खर्चाच्या पुलाच्या 4 मार्गिका असून दक्षिण वाहिनीवरील 4 मार्ग जून, 2009 अखेर पूर्ण होऊन संपूर्ण काम डिसेंबर, 2009 पर्यंत पूर्ण होईल.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ.....

सायन-पनवेल आणि मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, ठाणे खाडी पूल ही 3 कामे, वरळी-हाजीअली व वरळी ते नरिमन पॉईंट ही कामे पूर्ण झाली तर वाहतुकीचा बराच ताण कमी होईल. जल वाहतूक विचारात घेत असताना पश्चिम किनाऱ्यावर जल वाहतूक करण्यासाठी 1200 कोटी रुपयांची योजना आखण्यात आली आहे. त्यामध्ये वांद्रे-जुहू-वर्सोवा-मार्वे-बोरीवली असा मार्ग असणार आहे. त्यासाठी 220 कोटी रुपयांची कामे हाती घेणार आहोत. यामुळे मुंबईच्या या सगळ्या वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी मदत होणार आहे. विशेषत: एमएमआरडीए आणि केंद्र सरकारवर अनेकांनी टीका केली. केंद्र सरकारने कोणताही निधी मुंबई शहरासाठी दिला नाही असे सांगितले गेले. वास्तविक मी माहिती घेतली असता 3719 कोटी रुपयांची कामे केंद्र सरकारने जेएनएनयुआरएम अंतर्गत या शहरासाठी मंजूर केली आहेत असे कळले. 1301 कोटी रुपयांचा पहिला टप्पा केंद्र सरकारने मंजूर केला त्यापैकी 316 कोटी रुपयांची कामे या देशामध्ये जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर करण्याचे काम केंद्र सरकारच्या नगरविकास खात्याने पहिल्यांदा महाराष्ट्राच्या मुंबई शहरासाठी केले. देशात दुसऱ्या क्रमांकावर हैद्राबाद शहर असून या खात्याचे मंत्री श्री.नायडू यांचे ते गाव असताना ते दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि तिसऱ्या क्रमांकावरील पुणे शहराला 1955 कोटी रुपये दिले गेले. विशेषत: केंद्र सरकारने नागरी शहरांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. 43 टक्क्यावर नागरीकरण गेले आहे. म्हणूनच मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगू इच्छितो की, त्यांनी थोडेसे अंतर्मुख होऊन विचार केला तर या लोकसभा निवडणुकीमध्ये सगळ्या मोठया शहरांमध्ये काँग्रेसला विजय मिळाला याची कारणे काय हे समजून येईल. केंद्र सरकारने नागरी शहरांमध्ये, मोठया शहरांकडे चांगल्या पध्दतीने लक्ष दिले ही गोष्ट आपल्या लक्षात येईल.

क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

मग मुंबई शहर असेल, पुणे शहर अथवा लातूर शहर असेल या सर्व शहरांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध झालेला आहे. अशा प्रकारे विशिष्ट शहरांसाठी गेल्या पाच वर्षात केंद्रशासनाने भरपूर निधी या वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून दिलेलाआहे.

श्री. दिवाकर रावते : 3700 कोटी रुपये केंद्रशासनाने मंजूर केल्याचे आपण म्हटले. त्यापैकी किती रक्कम आतापर्यंत देण्यात आली आणि ती रक्कम मंजूर कधी झाली आणि कधी प्राप्त झाली ?

श्री. हसन मुश्रीफ : 1 हजार कोटीचा प्रस्ताव होता, 316 कोटी एवढी रक्कम आतापर्यंत प्राप्त झालेली असून जसजसे काम झाले तसतसे पैसे येत गेले.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही आकडेवारी खरी असेल तर केंद्राच्या नगरविकास विभागाकडून त्या त्या राज्यांसाठी हा पैसा जातच असतो परंतु ते वगळता स्पेशल किती पैसे आले? ही माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, जेएनयुआरएम ही योजना पहिल्यांदा या शासनाने हाती घेतली असून त्या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी मुंबईला तसेच इतर शहरांना दिलेला आहे, यापूर्वी कधीही दिला गेला नव्हता.

श्री. विनोद तावडे : महोदय, केंद्रशासनाच्या नगरविकास खात्यामार्फत निर्मल भारत, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना अशा अनेक योजना एकत्र करुन तसेच या योजनांमधील वाल्मिकी आंबेडकर यांची नावे काढून त्याचे नाव जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मोहीम ही योजना सुरु केली आणि त्या माध्यमातून ही रक्कम दिली जाते.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, डोळे दीपावे इतका निधी केंद्रशासनाकडून एमएमआरडीएला एमयुआयपी आणि एमयुटीपी साठी मिळतो. जागतिक बॅकेच्या सहकार्याने परिवहन प्रकल्पाअंतर्गत मेट्रो रेल्वेचे 70 टक्के काम पूर्ण झाले असून एमयुआयपीसाठी असलेली रक्कम 2447 कोटी आणि त्यापैकी 1980 कोटीची कामे हाती घेतली आहेत व त्यातील 16 उड्डाणपुलांची कामे प्रगतीपथावर आहेत, ही कामे 2010 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, यासाठी अंदाजे 400 कोटी खर्च होतील. मिठी नदी टप्प क्र.-2 च्या विकासासाठी 570 कोटीचा निधी असून 330 कोटी एवढी रक्कम जून

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

2010 पर्यंत खर्च होणे अपेक्षित आहे. स्कायवॉकसाठी 1480 कोटी एवढा खर्च अपेक्षित असून 300 कोटी रुपये खर्च झालेले आहेत व प्रस्तावित 67 कोटीची कामे आहेत त्यापैकी 39 कामे प्रगतीपथावर असून 19 कामे निविदा स्तरावर आहेत. मेट्रो रेल्वेचे 9 छन्न मार्ग असून वर्सोवा-अंधेरी हे काम सुरु असून 10 सप्टेबर 2010 पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. वर्सोवा-बांद्र- घाटकोपर हा 41 किलोमीटर लांबीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम 2356 कोटीचे असून प्रत्यक्षात 50 कोटी एवढा खर्च झालेला आहे आणि 2010 सप्टेबर पर्यंत मेट्रो रेल्वेचे काम पूर्ण होईल. चारकोप-बांद्रा-मानखुर्द या मार्गाच्या 8250 कोटीच्या कामाच्या निविदा प्राप्त झाल्या असून या मार्गात 27 स्टेशन्स आहेत, मार्गाची लांबी 32 किलोमीटर आहे. मोनो रेल गाडगे महाराज चौक ते चेंबूर-20 किलोमीटर या प्रकल्पाचा खर्च अंदाजे 2739 कोटी एवढा असून काम प्रगती पथावर आहे व हा प्रकल्प 2011 पर्यंत पूर्ण होईल. आतापर्यंत या कामावर 136 कोटी खर्च झालेला आहे. अशा रितीने मेट्रो रेल्वे, मोनो रेल आणि स्कायवॉकची प्रगती जी झाली त्याची माहिती मी सभागृहाला दिली आहे. परंतु स्कायवॉकच्या संदर्भात अनेक तक्रारी आल्या की अनावश्यक स्कायवॉक करण्यात आले. मी कालच चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्यांनी विशेषत: मुंबई भाजपाचे अध्यक्ष व सन्माननीय सदस्य श्री. गोपाळ शेट्टी यांनी सुध्दा अभिनंदनाचे पत्र दिलेले आहे व स्कायवॉकचा आग्रह धरला. तसेच सन्माननीय सदस्य श्री. सरदार तारा सिंह यांनी देखील अनेक पत्रे दिली आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : आमच्या अध्यक्षांचे नाव घेतले म्हणून सांगू इच्छितो की त्यांनी अनावश्यक स्कायवॉक किती सांगितले याचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला नाही.

डॉ. दीपक सावंत : महोदय, स्कायवॉकसंबंधीच्या रिपोर्टमध्ये अनेक अनावश्यक स्कायवॉक असल्याचा उल्ललेख केला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, ज्या ठिकाणी स्कायवॉकची गरज नाही, अनावयश्यक ठिकाणी स्कायवॉक बांधले आहेत, अशी जर सन्माननीय सदस्यांची तक्रार असेल तर एमएमआरडीच्या सगळया अधिका-यांना व सर्व सन्माननीय सदस्यांची एक बैठक घेण्यात येईल व त्यामध्ये सन्माननीय सदस्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. ज्या ठिकाणी स्कायवॉकची गरज नाही, अनावाश्यक असेल तर ती कामे रद्द करण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करेल. स्कायवॉक बांधल्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आम्हाला पत्र लिहून आमचे अभिनंदनही केले आहे तसेच अजून स्कायवॉकची मागणी देखील केली आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. मुंबईची काळजी तुम्हा आम्हाला सर्वांना आहे. मुंबई नगरासाठी सर्वांनी मिळून काम करण्याची गरज आहे. मुंबईसाठी सुविधा वाढविणे, नागरी सुविधा देणे, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न असतील, रस्त्याचे प्रश्न असतील, वाहतुकीची कोंडी फोडण्याचे काम असेल हे सर्व काम आपल्या सहकार्याशिवाय होणे अशक्य आहे. मुंबईसाठी सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे जे प्रश्न मांडले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी देत आहे तसेच आम्ही मुंबईच्या विकासासाठी जे काम करीत आहो ते मी सांगत आहे. एमएमआरडीएने जे काम केलेले आहे त्याची माहिती या ठिकाणी मी देत आहे. मुंबई शहरामध्ये आज ज्या झपाटयाने काम सुरु आहे ते तोंडामध्ये बोट घालण्यासारखे काम सुरु आहे. तसेच गिरणी कामगारांना घरे कधी देणार आहात, गिरणी कामगारांच्या जागेवर आपण मॉल उभे करीत आहात, अशा पध्दतीची टीका या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, मुंबई शहरामध्ये एकूण 58 गिरण्या होत्या त्यापैकी 43 गिरण्या बंद होत्या. बंद गिरणीतील 38362 गिरणी कामगारांना 1057.51 कोटी रुपयांची देणी या सरकारने दिलेली आहे. केवळ 7 गिरण्यातील 15796 कामगारांची 162 कोटी रुपये द्यावयाचे राहिले आहेत ते पैसे लवकरात लवकर देण्यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करेन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गिरणी मालकांना मॉल बांधण्याची आम्ही परवानगी दिली होती परंतु ते मालक या सरकारकडे आले व त्यांनी 33(2) कलम बदलून घेतले व जी 1/3 जमीन म्हाडाला द्यावयाची होती, 1/3 जमीन महानगरपालिकेला द्यावयाची होती परंतु त्यामध्ये असा

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

काही बदल करण्यात आला की, त्यांच्याकडे जी जमीन आहे ती सोडून उर्वरित जी जमीन मोकळी आहे त्याचे 1/3 करुन मालकांच्या घशात या सरकारने पूर्ण मिल घातली. या जागेतून जे काही थोडे पैसे आले त्यातून थेंब थेंब पैसे कामगारांना दिले. याचा अर्थ मालकांचा फायदा करण्यासाठी हे सरकार यशस्वी झाले व कामगारांना काही तरी तीर्थप्रसाद द्यावयाचा तसे दिले, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने सध्या 32 गिरण्यांच्या विकास कामांना मंजूरी दिलेली आहे. सुधारीत विकास नियम 58 नुसार या विकासासाठी म्हाडाला 1,16,424 चौरस मीटर जमीन प्रस्तावित असून त्यापैकी म्हाडाला 72143 चौरस मीटर जमिनीचा ताबा देण्यात आलेला आहे. म्हाडाला प्राप्त होणा-या जमिनीपैकी 50 टक्के जमीन कामगांराच्या घर बांधणीसाठी आणि 20 टक्के जमीन ट्रान्झीट कॅम्पसाठी देण्यात येणार आहे. म्हाडाने 10115 सदनिकेचे बांधकाम सुरु केले असून त्यापैकी 6816 सदनिका गिरणी कामगारांसाठी असून 3254 सदनिका ट्रॅन्झीट कॅम्पसाठी वापरली जाणार आहे. 58 गिरण्यांच्या विकासातून म्हाडाला 30 हेक्टर जमीन मिळेल. एकूण 68 हजार गिरणी कामगार असून 32 हजार गिरणी कामगारांना सदनिका निश्चितपणे मिळतील. गिरण्यातील चाळीच्या विकासकातून 8 हजार सदनिका प्राप्त होतील. एकूण 55 हजार सदनिका मिळतील आणि नियम 33(5) मध्ये प्रस्तावित 4 चटईक्षेत्र निर्देशकांमधून कामगारांसाठी प्राप्त होणा-या सर्व सदनिका आपण दिल्या तर कामगारांच्या सर्व सदनिकांचा प्रश्न मिटेल. विधानसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता येण्यापूर्वी कामगारांना सदनिका देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. थोडया फार हजार पाचशे सदनिका कामगारांना देण्याच्या संदर्भात मोठा कार्यक्रम करुन त्या सदनिका कामगारांना देण्याचा आमचा मनोदय आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...

मुंबई शहरामध्ये झोपडया वाढत आहेत त्या नियमित करण्यासबंधी .....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या मुलांना नोक-या देण्याबाबत शासनाने आश्वासन दिले होते. या प्रश्नाचा अभ्यास करण्या करिता शासनाने एक समिती नेमली होती त्याचबरोबर या मुलांना प्रशिक्षण देण्याचे सुध्दा ठरविण्यात आले होते. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी गिरणी कामगारांना द्यावयाच्या घरासबंधी उल्लेख केला आहे परंतु त्यांच्या मुलाना द्यावयाच्या नोक-यासंबंधी काहीही उल्लेख केलेला नाही तेव्हा त्याबाबतीत त्यांनी खुलासा करावा.

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्यांनी तो मुद्दा मांडला नव्हता.

श्री.अरविंद सावत : मी काल केलेले भाषण माननीय मंत्री महोदयांनी काढून पहावे. मी हा मुद्दा मांडला होता.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावत यांच्या भाषणातील सर्व मुद्यांची नोंद माझ्याकडे आहे. कालच्या भाषणात त्यांनी " ए दिल है मुश्किल जीना यहाँ, जरा हँट के, जरा बच के, यह है बॉम्बे मेरी जान " या गाण्याचा उल्लेख केला होता आणि त्याची नोंद माझ्या नोटमध्ये घेण्यात आलेली आहे. त्यावरुन मी किती बारीक सारीक मुद्याची नोंद केली होती हे आपल्या लक्षात येईल. तसेच मला त्यांना असे सांगावयाचे आहे की, " ये है बंबई नगरिया , तू देख बबुआ, ये है सोने-चांदी की नगरिया , तू देख बबुआ "

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधान भवनातील उद्वाहनामध्ये प्रवेश केल्यानंतर आपल्याला "ए दिल मुश्किल है जीना यहाँ, जरा हँट के, जरा बच के, यह है बॉम्बे मेरी जान " या गाण्याची धून ऐकावयास मिळते. त्या ठिकाणी आपल्याला हिंदी गाण्याची धून ऐकावयास मिळते परंतु मराठी गाण्याची धून ऐकावयास मिळत नाही मुंबईतील माणसांचे जीवन कशा प्रकारचे असते हे आम्ही या गाण्याच्या माध्यमातून रोजच ऐकत असतो अशा प्रकारचा संदर्भ मी काल दिला होता..

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य उद्वाहनामध्ये आल्यानंतर ते गाणे लागत असते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नवीन उद्वाहन जेव्हा सुरु झाले आणि हे गाणे ऐकू येऊ लागले तेव्हापासून किमान पाच सहा वेळा सचिवांकडे जाऊन हे गाणे बदलण्यास मी सांगितले होते तसेच मराठी गाण्याची धून आम्हाला ऐकावयास मिळावी असेसुध्दा सांगितले

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते. परंतु तशी व्यवस्था करण्याची त्यांची इच्छा नाही असे मला दिसून आले. त्यांना मी एकदा असेही बोललो होतो की, मी ही लिफ्ट तोडू काय ? काही तरी गडबड करु काय ? त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, " आपण काही दिवस थांबावे, सॉफ्टवेअर बदलावयाचे आहे., अमुक करावयाचे आहे, तमुक करावयाचे आहे " परतु प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. आपल्याला एक गाणेसुध्दा बदलता येत नाही. त्याच गाण्याचा आग्रह का धरण्यात येतो हे मला समजत नाही. याबाबतीत सचिवांनी योग्य ती नोंद घ्यावी अन्यथा सचिवांना एक दिवस कोंडून आम्हाला काही तरी करावे लागेल.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबईतील गिरण्यामध्ये काम करणा-या कामगारांच्या मुलांच्या नोक-यासबंधी या ठिकाणी उल्लेख करण्यात आला होता असे सन्माननीय सदस्यांनी सागितले आहे. त्याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी जे मुद्दे मांडले होते ते सर्व मी लिहून घेतलेले आहेत. त्यांनी ज्या गाण्याचा उल्लेख केला होता ते सुध्दा मी लिहून घेतले होते .

सभापती महोदय, " ही नगरी माय मराठीची, ही मुंबई शान सा-या हिंदुस्थानाची, ही नगरी अशा सा-या विश्वाची , ही अव्वल सस्कृतीची, एकीची आणि जगत्जेत्याची "

सभापती महोदय, गिरणी कामगारांना शासनाने असे आश्वासन दिले होते की, सगळया गिरणी कामगारांना सदनिका देण्यात येंतील

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा गंभीर मुद्दा असा आहे की, माननीय मंत्रीमहोदयांनी ट्वीस्ट करता कामा नये. सभागृहात स्पष्टपणे सांगितल्याप्रमाणे त्या कायद्यानुसार महानगरपालिका आणि म्हाडा यांना प्रत्यक्षात किती जमीन मिळाली आहे.? गिरणी मालकांना त्याठिकाणी बांधकाम करण्यास परवानगी दिल्यानंतर ताबडतोब म्हाडा आणि महानगरपालिकेच्या ताब्यात जमीन यावयास पाहिजे होती. त्यानुसार प्रत्यक्षात किती जमीन मिळाली हे आम्हाला समजले पाहिजे आणि त्यातून या चर्चेला कन्स्ट्रक्टीव्ह दिशा प्राप्त होईल. सगळयाच गोष्टी हसण्यावारी नेता कामा नये. 30 हेक्टर जमीन मिळेल असे सांगितले गेले परंतु म्हाडाला नक्की किती जमीन मिळाली आणि महानगरपालिकेला किती जमीन मिळाली या बाबतीत माननीय मंत्री



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ....

महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. कायद्यातील कलम 58 मध्ये बदल करण्यात आला असून त्या गिरणीतील भिंती , चिमण्या तशाच ठेवल्या गेल्या तसेच मुख्य भिंत आणि बांधकामाची भिंत यांच्या मधल्या भागाचा एफएसआय काऊन्ट करुन त्याच्या 1/3 जमीन किती आहे याचा हिशोब केला होता अशा प्रकारे गिरणी कामगारांची फसवणूक करुन बाकीची जमीन बिल्डरांच्या धशात घातली आहे. तेव्हा 30 हेक्टर जमीन केव्हा मिळाली होती ? म्हाडा आणि महानगरपालिकेला नक्की किती जमीन मिळाली याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी म्हणालो की, विकासकाकडून 58 कापड गिरण्यांची 30 हेक्टर जमीन म्हाडाला मिळाली. सद्या एकूण 68 हजार गिरणी कामगार असून त्यापैकी 32 हजार गिरणी कामगारांना सदनिका मिळाल्या आहेत. तसेच, गिरण्यांच्या चाळीचा विकास करीत असतांना त्यामधून 8 हजार सदनिका प्राप्त होतील. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे 55 हजार कामगारांना कशाप्रकारे सदनिका देणार आहोत, आणि त्याचा कार्यक्रम कधी करणार आहोत याचा उल्लेख केला. 1995 पूर्वीच्या झोपडया नियमित करण्याबाबत शासनाचा कायदा आहे. आणि सद्या लोकशाही आघाडी सरकारने प्रसिध्द केलेल्या जाहीरनाम्यामध्ये सन 2000 पर्यंत झोपडया नियमित करण्याबाबत म्हटले आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले की, सन 2000 पर्यंतच्या झोपडया कायम ठेवून पुढील झोपडया आपण पाडायला सुरुवात कां करीत नाही? याबाबत आजच मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांबरोबर मी चर्चा केली. या झोपडयांचे सर्व्हेक्षण करुन त्यामधील बेकायदेशीर झोपडया पाडून तेथील अतिक्रमण हटविण्याची कारवाई ताबडतोब करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुंबई हे "बेट" म्हणून नोटिफाय झ ाले पाहिजे असे सांगितले. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये 15 तलाव असून त्यांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे असे ते म्हणाले. तसेच, त्यांनी मुंबईतील स्काय वॉकबाबत मुद्दा मांडला. सभापती महोदय, 15 तलावांपैकी 2 तलावांचे पूर्णपणे पुनरुज्जीवन करण्यात येऊन त्यांचे ब्युटिफिकेशन करण्याचे काम मुंबई महानगरपालिकेने हातात घेतले आहे. सभापती महोदय, दि. 26.11.08 रोजी मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावरुन अतिरेक्यांचा हल्ला झाला.तेव्हापासून ही मुंबई खडबडून जागी झाली आहे. मुंबईवर आणि भारतावर समुद्र मार्गे पुन्हा हल्ला होण्यासारखी परिस्थिती राहू नये यासाठी फार मोठया प्रमाणावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने बजेटमध्ये निधी दिला आहे. या निधीमधून प्रस्तावित सागरी पोलीस ठाण्याकरिता 6.24 कोटी, विविध उपकरणे, मोटर परिवहन विभागाकरिता 21.15 कोटी, संपूर्ण पोलीस दलासाठी टॅक्टिकल ॲसॉल्ट वाहने, शस्त्रास्त्रे, बुलेट प्रुफ जॅकीट, हेल्मेट आणि छोटी वाहने खरेदी करण्यासाठी 9.24 कोटी रुपयांची तरतूद केली असून ही साधनसामुग्री खरेदी करण्याचे काम शासनाने हातात घेतले आहे. त्याचप्रमाण् राज्य सरकार नेव्हीच्या सहकार्याने कोस्टल एरीयामध्ये गस्ती घालण्याची कारवाई करीत आहे. सागरी किनारा असुरक्षित होता तो सुरक्षित करण्याचे काम शासनाने हाती घेतले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/ KGS/ ST/

श्री. हसन मुश्रीफ....

सभापती महोदय, बोगस रेशन कार्डचे वाटप आणि बांगला देशी घुसखोरांबाबत अनेक माननीय सदस्यांनी सूचना केल्या. बोगस कार्डाबाबत सांगू इच्छितो की, शासनाने अनेक ठिकाणी धाडी टाकून बोगस कार्ड तयार करणाऱ्या टोळया शोधून काढल्या आहेत. आता आपण कॉप्युटराईज रेशनकार्ड अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. हे काम लवकरात लवकर सुरु होऊन बोगस रेशन कार्ड आपोआप नष्ट होतील. तसेच, ज्यांच्याकडे बोगस रेशन कार्ड असतील त्यांना पकडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाईचे काम सुरु केले आहे. सभापती महोदय, 426 बांगला देशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे, आणि 477 बांगला देशी लोकांना हद्दपार केले आहे. सभागृहासमोर सातत्याने 15 वर्षे वास्तव्याचा प्रश्न मांडण्यात येतो. परंतु घटनेतील तरतुदीमुळे आपल्याला परप्रांतियांचे लोंढे रोखता येत नाहीत. तरीसुध्दा एमएमआरडीएने वर्षाला 1 लाख घरे भाडे तत्वावर देण्यासाठी पाच वर्षात 5 लाख घरे बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हातामध्ये घेतला आहे. याचे खरे कारण तेच आहे. मुंबईमध्ये लोक येतात, झ ोपडपट्टयांमध्ये अतिक्रमण करुन राहतात. त्यामुळे ही मुंबई बकाल होत चालली आहे. तसे होऊ नये याकरिता एमएमआरडीएने भाडयाच्या घराची चांगली संकल्पना स्वीकारली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये 15 वर्षापासून राहणारे भूमिपुत्र असतील आणि ज्यांच्याकडे डोमिसाईल सर्टिफिकेट असेल त्यांना कंपल्सरी घर देण्यात येईल. त्यामध्ये नवरा-बायको यांपैकी कुणीही मुंबई महानगर प्रदेशाच्या कार्यक्षेत्रामध्ये नोकरी करीत असेल व त्यांचे कौटुंबिक मासिक उत्पन्न 5 हजार रुपयांपेक्षा कमी असेल त्यांना भाडे तत्वावर ही घरे देण्याची योजना आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

मला असे वाटते की, हा सर्व प्रकल्प साकारला . . . .

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : डोमिसाईल सर्टीफीकेटच्या बाबतीत काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 15 वर्षाचे वास्तव्याचे सर्टीफीकेट कम्पलसरी आहे. ही योजना भूमीपुत्रांसाठी आहे. तुम्हाला मराठी लोकांची जेवढी काळजी आहे, त्याच्यापेक्षा जास्त आम्हाला काळजी असल्यामुळे, मराठी माणूस, भूमीपुत्र यांची शासन सातत्याने काळजी घेईल आणि त्यांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देणे. . . .

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय, मला वाटते की, काल सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, नोकऱ्यांमध्ये 80 टक्के . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी येथे जे वक्तव्य केलेले आहे, ते अत्यंत गंभीर आहे. त्यांनी असे म्हटलेले आहे की, "आम्ही बांगला देशींना रोखू शकतो, परंतु परप्रांतियांना रोखता येणार नाही." मी घटनेच्या कलम 19, ज्याचा सतत आणि सातत्याने वापर केला जातो. तसेच कोणालाही कुठेही जाऊन रहाण्याचा अधिकार आहे, असे सांगितले जाते. मी माननीय मंत्री महोदय आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कलम 19(4), उपखंड (ग) मध्ये असे म्हटलेले आहे की,

" यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे (भारताची सार्वभौमता व एकात्मता किंवा ) सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथेवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही ".

म्हणजे परप्रांतीय ते येथे का येऊ शकत नाहीत यासंदर्भात राज्याला कायदा करण्याचा अधिकार घटनेने प्रदान केलेला आहे. त्यानंतर कलम 19(5) मध्ये असे म्हटलेले आहे की, कायदा करताना काय करावे ? याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांनीही मार्गदर्शन केले तर बरे होईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (खाली बसून) : रिझनेबल रिस्ट्रीक्शन्स्.

.2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, "आम्ही बांगला देशींना रोखू शकतो, परंतु परप्रांतियांना रोखता येणार नाही." पण राज्य शासन जेव्हा असे म्हणते, तेव्हा राज्य शासनाची याबाबतीतील आगतिकता ही महाराष्ट्रासाठी दुर्दैवी आहे. कारण आता परप्रांतीयांचा मुद्दा लोकसभेमध्ये देखील गाजलेला आहे. आदरणीय श्री.मनोहर जोशी यांनी काल लोकसभमध्ये हा मुद्दा मांडलेला आहे.

कलम 19 (5) मध्ये असे म्हटलेले आहे की,

" उक्त खंडामधील (उपखंड (घ) व (ड्) ) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडांनी प्रदान केलेल्या अधिकारापैकी कोणत्याही अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या हितसंबंधच्या संरक्षणासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही ".

सभापती महोदय, "आव-जाव घर तुम्हारा " तसे नाही. घटनेनेच संरक्षण दिलेले आहे आणि त्या-त्या राज्यातील स्थानिक जनतेला दिलेले हे संरक्षण आहे. सर्वात महत्वाचे पुढे म्हटलेले आहे. कलम 19(6) मध्ये असे म्हटलेले आहे की,

" उक्त खंडाचा उपखंड (छ) या मधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या अधिकाराच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही, आणि, विशेषत:, (उक्त उपखंडातील कोणत्याही गोष्टीमुळे, जो कायदा ---

(एक) कोणताही पेशा आचरण्याकरता अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा चालवण्याकरिता आवश्यक असलेल्या पेशाविषयक किंवा तंत्रविषयक अर्हता, अथवा

(दोन) नागरिकांना पूर्णत: किंवा अंशत: वगळून अथवा अन्यथा राज्याने अथवा राज्याचे स्वामित्व किंवा नियंत्रण असलेल्या निगमाने कोणताही व्यापार, धंदा, उद्योग किंवा सेवा चालवणे, यांच्याशी जेथवर संबध्द असेल तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. )

....3

श्री.दिवाकर रावते ......

याचा अर्थ सरळ आहे की, या राज्यामध्ये कोणीही यावे आणि फूटपाथवर झोपडी बांधावी, पथारी पसरावी, कुठेही जाऊन बांबू गाडावेत, झोपडयांवर चटया बांधाव्यात, तर तुम्ही या राज्यामध्ये कशासाठी आलेला आहात ? तुमचा कामधंदा आहे, तर या. तुमची रहाण्याची व्यवस्था असेल तर या, पाहुणे म्हणून आला असाल तर 15 दिवस रहा, 20 दिवस रहा आणि मग तुम्ही तुमच्या घरी जावे, म्हणजे जर तुम्ही राज्यामध्ये कामाकरता आला असाल, नोकरी धंद्यासाठी आला असाल तर अशा लोकांना आपण प्रतिबंध करु शकत नाही. परंतु स्थानिक भूमीपुत्रांवर अन्याय होईल आणि त्यांच्यावर कुरघोडी करण्याचा प्रकार होईल, असे करता कामा नये. अशा प्रकारे स्थानिक भूमीपुत्रांचा न्याय्य हक्क कलम (19) प्रमाणे तुम्हाला मारता येणार नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे.... 13:05

श्री. दिवाकर रावते....

रिजनेबल रिस्ट्रिक्शन घालण्याच्या संदर्भात घटना स्वंयस्पष्ट आहे. म्हणून अशा प्रकारचे निर्बंध घालून येणारे अविरत लोंढे थांबविणे हे राज्याचे काम आहे.ते काम न करता, शासन आपल्या निवेदनामध्ये बेदरकारपणे असे सांगत असेल की, आम्ही त्यांना अडवू शकत नाही, फक्त बांगलादेशीयांना अडवित आहोत. अशा प्रकारे परप्रांतियांसाठी महाराष्ट्र राज्याचे दरवाजे उघडे करुन महाराष्ट्रातील भुमीपुत्रांची कोंडी निर्माण करण्यात येणार असेल तर ते अत्यंत चिंताजनक आणि निंदाजनक आहे. त्यातल्यात्यात या महाराष्ट्र सरकारचे भविष्यात पडणारे पाऊल महाराष्ट्राचे आणि मुंबईशहराचे प्रवेशद्वार मोकळे करुन, या मुंबई शहराचे वाटोळे करणारे आहे, अशा प्रकारची या शासनाची भूमिका आहे, ती शासनाने सष्ट करावी. रिजनेबल रिस्ट्रिक्शनच्या संदर्भामध्ये याच सभगृहामध्ये माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले होते की, "होय, लोंढे थांबवणारा कायदा आम्ही आणणार आहोत." सभापती महोदय, हे सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचा आपला मनोदय जाहीर केला असताना माननीय मंत्रिमहोदय, आम्ही परप्रांतियांना आडवू शकत नाही असे सांगत आहेत, ही माननीय मुख्यमंत्र्यांनी या सदनाला दिलेल्या आश्वासनाचा भंग करणारी कृती, माननीय मंत्रिमहोदय,आपणाकडून होत आहे, ही गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. माननीय मंत्रिमहोदय, सुरुवातीला असे म्हणाले की, "मुंबईचा विकास आपण सर्वांनी मिळून केला पाहिजे" यामध्ये जर राजकीय अभिनिवेष नसेल तर महाराष्ट्रातील व या मुंबई शहरातील भुमीपुत्रांचे संरक्षण करणे ही केवळ एका माणसाची जबाबदारी नाही. ती आपल्या सगळयांची जबाबदारी आहे. परंतु आपण राज्यकर्ते आहात. आपल्या हातामध्ये राजदंड आहे. त्याचा वापर करुन, घटनेने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, शासन रिजनल रिस्ट्रिक्शन्स निर्माण करणारा कायदा आणणार काय? याचे सुतोवाच करणे फार महत्वाचे आहे.

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी घटनेचा उल्ल्‍ेख करुन यासंदर्भात वाजवी निर्बंध राज्य सरकारला घालता येतील, यासंदर्भात कलम 19चा उल्लेख केला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"पुढील खंडांची भर घातली जाईल" खंड 2,3,4 व 5 यामध्ये येणाऱ्या वाजवी निर्बंध या शब्दाचा अर्थ सम्मुचित विधानमंडळाला वाजवी वाटतील असे निर्बंध असा लावला जाईल. विधानमंडळाला वाजवी वाटतील असे निर्बंध घालता येतील असे या कलमामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे. माननीय मंत्रिमहोदय, आपल्या भाषणाच्या सुरुवातील मुंबईचे

..2..

शांघाय करायला निघाले होते. चीनमधून शांघायला जाताना जे निर्बंध घालण्यात आलेले आहेत ते त्या शहराच्या विकासासाठी घालण्यात आलेले आहेत. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित कला आहे, त्याला शासनाकडून अनुकूल उत्तर दिले जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय असे म्हणाले की, जे बाहेर गावावरुन येतात ते झोपडपट्टीत राहातात, बकाल वस्ती निर्माण करतात. ती त्यांना निर्माण करता येऊ नये म्हणून आम्ही दर वर्षी एक-एक लाख घरे बांधणार आहोत. म्हणजे बाहेरगावावरुन येणाऱ्या लोकांसाठी ही घरे बांधण्यात येणार आहेत. त्यांनतर माननीय मंत्रिमहोय डोमिसाईल्ससाठी घरे बांधण्यात येतील असे म्हणाले. म्हणून या चर्चेतून याबाबतीत एक निश्चित दिशा देण्यात यावी, अशी माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. पूर्वी ब्रिटिशांकडे असलेले हॉन्कांग बदंर आता चीनकडे गेले आहे. त्या शहराचे स्वरुप कायम रहावे,तेथील लोकसंख्या वाढू नये म्हणून चीनच्या इतर भागातून जाताना सुध्दा परवानगी घ्यावी लागते. त्याठिकाणी या शहराचे जे महत्व, रचना आहे ते ढळू नये, त्या ठिकाणच्या लोकसंख्येचा समतोल ढळू नये, यासाठी तो देश काळजी घेतो. तेव्हा या मुंबई शहराच्या बाबतीत इतके हसे करण्यात येऊ नये. काल सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने श्वेतपत्रिका काढलेली आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे मुंबईमधील लोंढे वाढत आहेत. अनधिकृत बांधकाम वाढत आहे, याचा गांभीर्याने विचार करुन आम्ही अशा प्रकारच्या योजनांचा स्वीकार केला आहे, असे काही तरी या ठिकाणी सांगितले तर बरे हाईल.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी येणाऱ्या परप्रांतीयाच्या लोंढयाबद्दल घटनेतील कलम वाचून दाखविलेले आहे. व याबद्दल सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचे आश्वासन दिले असल्याचेही सांगितले आहे. ते निश्चितपणे तपासून घेण्यात येईल. सभापती महोदय, महाराष्ट्रात पंधरा वर्षे रहाणाऱ्यांसाठी डोमिसाईल सर्टिफिकेट सक्तीचे केले आहे. समजा महाराष्ट्रातील कोल्हापूरचा माणूस मुंबईत आला आणि तो झोपडीमध्ये रहावयास गेला तर तो त्या ठिकाणी जाऊ नये असाही त्यामागचा उद्देश होता.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : आम्ही कोल्हापूरच्या बाबतीत म्हणालो नाही. सन्माननीय सदस्य बाहेर गावाहून आलेले असे म्हणाले पण त्याचा अर्थ दिल्लीहून आलेले, मध्यप्रदेशमधून आलेले असे आम्हाला म्हणावयाचे आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी दोन गोष्टी ठामपणे सांगितलेल्या आहेत. जी भाड्याची घरे किंवा म्हाडाची घरे असतील ती पंधरा वर्षे वास्तव्य असणाऱ्या भूमिपुत्रांना, डोमिसाईल सर्टिफिकेट असणाऱ्यांनाच दिली जातील.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रिमहोदयांनी तपासून बघू असे म्हणण्यापेक्षा घटनेच्या अधीन राहून जे योग्य निर्बन्ध आहेत ते घालून आम्ही परप्रांतीयांचे लोंढे अडविण्याचा प्रयत्न करु असे सांगावे.

श्री. हसन मुश्रीफ : ते तपासून बघू.

श्री. दिवाकर रावते : आपण घटना काय तपासणार ?

श्री. हसन मुश्रीफ : माननीय मुख्यमंत्र्यांनी काय सांगितले ते तपासून बघू. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे साहेबांनी एफएसआय वाढवून दिल्यामुळे मुंबईमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढते असे श्वेतपत्रिकेमध्ये आहे असे सांगितले आणि या वाढवून दिलेल्या एफएसआयमुळे मुंबई महानगरपालिकेवर किती बोजा पडतो, त्यांना सुविधा देण्यामध्ये किती अडचणी येतात याचाही उल्लेख आपल्या भाषणामध्ये केला होता. त्यांनी मोनोरेलबद्दल एक भीती व्यक्त केली होती की, भाड्यामध्ये वाढ होईल काय आणि सामान्य नागरिकांना ते परवडेल काय असे त्यांनी विचारले ? मी सांगू इच्छितो की, सामान्य माणसाला परवडेल असे मोनो रेलचे भाडे शासन निश्चिपणे आकारील. कन्व्हेयंसचे रुल्स झालेले नाहीत असे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले. गृहनिर्माण खात्याचे सचिव या ठिकाणी उपस्थित आहेत. ते चर्चा ऐकत असतीलच. निश्चितपणे हे रुल्स करण्याबाबत सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्याबाबत निश्चितपणे त्यांना सूचना देऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मुंबईमध्ये मराठी मुलांवर नोकऱ्यांच्या बाबतीत अन्याय होतो अशी व्यथा काल व्यक्त केली होती. महाराष्ट्रातील विविध

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ......

औद्योगिक घटकांमधील नोकऱ्यांमध्ये स्थानिक व्यक्तींना नोकऱ्या देण्याचे धोरण राज्य शासनाने यापूर्वीपासून स्वीकारलेले आहे. या धोरणानुसार अकुशल कामांना किमान 80 टक्के व पर्यवेक्षीय श्रेणीत 50 टक्के स्थानिकांना संधी द्यावयास पाहिजे. स्थानिक म्हणजे जे 15 वर्षे महाराष्ट्रात राहतात त्यांना प्राधान्य देण्याचे शासनाने ठरविले आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक घटकामध्ये नोकरी करणारा अधिकारी सुध्दा स्थानिक व्यक्ती असण्याची व त्याला मराठी भाषा येणे आवश्यक असण्याची तरतूद या धोरणात करण्यात आली आहे. या धोरणाची काटेकोरपणाने अंमलबजावणी उद्योजकांनी करण्यासाठी शासनामार्फत सातत्याने पाठपुरावा केला जातो. त्यामुळे आज राज्यामध्ये बहुतांश उद्योगामध्ये स्थनिक व्यक्तींना प्राधान्याने नोकऱ्या मिळाल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळेल. 17 नोव्हेंबर, 2008 रोजी सर्व सूक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमामध्ये किमान 80 टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यामध्ये प्राधान्य देण्याचे धोरण आपण यापूर्वीच केलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदय वारंवार सांगत आहेत की भूमिपुत्रांना नोकऱ्या दिल्या जातील. शासनाने अध्यादेश काढला आहे. त्या अध्यादेशाला आस्थापनावाले केराची टोपली दाखवतात. हे करण्याची जर आपली खरोखर मानसिकता असेल तर त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करणार काय तसेच 80 टक्के स्थानिकांना नोकऱ्या देणार काय ?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कमिन्स कंपनीमध्ये झालेल्या घोटाळ्याच्या यासंदर्भात मी लक्षवेधी सूचना दिली होती. माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, 90 टक्के मराठी माणसांची भरती झाली. मी काल पुन्हा विशेष उल्लेखाव्दारे ती यादी आपल्याकडे दिली. त्यामध्ये 50 टक्के मराठी माणसे आहेत. बाकीचे सर्व परप्रांतीय आहेत. ओरिसामधून वगैरे आणलेली माणसे आहेत. काल विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी यासंदर्भात सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले. आज वर्तमानपत्रात त्याबाबत वाचले. माझा प्रश्न असा आहे की, या कमिन्स कंपनीच्या संदर्भात शासन सर्वेक्षण करणार काय ? सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

त्याप्रमाणे त्या जी.आर.ला काडीचीही किंमत नाही. त्या जी.आर.मध्ये खूप क्लॉजेस आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी सुक्ष्म, लघु उद्योग असा उल्लेख केला. आता मुंबईमध्ये सर्व्हिस इंडस्ट्री आली आहे. त्या इंडस्ट्रीला हा कायदा लागू नाही. प्रॉडक्टिव्हिटीच्या संदर्भात यामध्ये संबंध आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी उत्पन्न नाही त्या ठिकाणी कायदा लागू होणार नाही. आपल्याला मनात ते मांडावयाचे असेल तर त्या ठिकाणी ते लागू करणार काय याबाबत सांगावे.

यानंतर कु. थोरात ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे, त्याबाबत शासन जरुर विचार करील. राज्याच्या औद्योगिक 2006 मध्ये वरील धोरणाशी काही सुसंगत बाबी यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. मानव विकास निर्देशांकानुसार नांदेड, उस्मानाबाद, जालना, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, वाशिम, धुळे, नंदुरबार व बुलडाणा या मागासलेल्या 10 जिल्हयामध्ये नव्याने स्थापन होणारे जे उद्योग आहेत, त्यामध्ये 75 टक्के स्थानिकांना रोजगार दिलाच पाहिजे, त्यांना प्रॉव्हिडंट फंड, व कामगार विमा योजनेपोटी भरलेल्या रकमेची 75 टक्के रक्कम प्रतिपूर्ती म्हणून देण्यात यावी अशाप्रकारचा उल्लेख या अध्यादेशामध्ये करण्यात आलेला आहे. परप्रांतीय कंत्राटदारांनाच प्राधान्य या कंपन्या देत आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे होते. याबाबतीत सुध्दा सन्माननीय कामगार मंत्री व सन्माननीय उद्योग मंत्री यांना सांगून तेथे जे नवीन उद्योग येतात त्याचे कंत्राट परप्रांतियांना दिले जाते अशी तक्रार होती. त्याबाबत भूमिपुत्रांना नोक-या देण्यासाठी भाग पाडण्याचा निश्चितपणे प्रयत्न करील. मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रतिदिन 3410 द.ल.घ.मी.इतका पाण्याचा पुरवठा होत आहे. मुंबई शहराला अधिक पाणी पुरवठा करण्यासाठी मध्य वैतरणा प्रकल्प 2011-2012 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले आहे. पिंजाळ पाणी पुरवठा योजना हातामध्ये घेतलेली आहे. पिण्याच्या पाण्यासंबंधी बोलताना काल सदनामध्ये कोणी तरी म्हटले आहे की, देवाच्या भरवशावर हे काम चाललेले आहे. खरोखरच फार मोठे काम ब्रिटिशांनी आणि आपल्या पूर्वीच्या लोकांनी काम करुन ठेवलेले आहे. पावसाचे पाणी वाहून नेणे, पिण्याचे पाणी वाहून नेणे, मलनिस्सारण वाहून नेणे यासाठी चांगल्या प्रकारे या शहराची बांधणी झालेली आहे. मुंबईमध्ये सोयी सुविधा पुरविल्या जातात ते पहावयास बाहेरच्या देशातून अनेक लोक येतात. त्याचाही उल्लेख याठिकाणी करणे आवश्यक आहे. ब्रिमस्टोवॅडमार्फत पूर परिस्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी 1200 कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यापैकी 453 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. मुंबईची लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे मुंबईत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. वाहतुकीची कोंडी असेल, पाण्याचे प्रश्न असतील रस्त्याचे प्रश्न असतील, रेल्वेचे प्रश्न असतील, हे प्रश्न सोडविण्यासाठी मोनो रेल, मेट्रो रेल सारखे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.हसन मुश्रीफ....

तसेच मोठया प्रमाणावर रस्त्यांचे रुंदीकरण, स्काय वॉक व उड्डाणपुलांचे प्रकल्प हाती घेऊन वाहतूक सुरळीत कशी होईल यासाठी मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए व शासन प्रयत्न करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याच्या योजना असतील, मुंबईला पाणी कमी पडू नये, मुंबईत झोपडीत राहणा-या लोकांना भाडयाचे घर मिळावे, चांगले निवासस्थान मिळावे अशी अपेक्षा आहे. ज्याचा सर्व सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करण्याचे ठरविले आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सगळयांनी हातात हात घालून ज्या मुंबईचा आपल्या सगळयांना स्वाभिमान वाटतो, मुंबई वजा केली तर भारत देश सुध्दा आर्थिकदृष्टया कमकुवत होऊ शकेल असे या मुंबईचे स्थान संपूर्ण जगामध्ये व देशामध्ये आहे. ही मुंबई आपण सर्वांनी मिळून वाढवू या. (अडथळा) मी मघाशी सांगितले की, श्री.उध्दव ठाकरे साहेब हे परवा सन्माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. एमएमआरडीएने हाती घेतलेल्या कामामुळे पावसाचे पाणी तुंबण्याची शक्यता आहे असे त्यांनी म्हटलेले आहे. त्या भेटीच्या वेळी सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिका-यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. त्याबाबत कोणाचीही कोणतीही तक्रार राहणार नाही अशी अपेक्षा आहे. "यह है बम्बई नगरिया तू देख बबुआ, सोने-चाँदी की नगरिया तू देख बबुआ, यहाँ बदले मुकद्दर का खेल बबुआ" या मुंबईचा सगळयांनी मिळून विकास करु या अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये मुंबई महानगरीसंबंधी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना मांडल्या होत्या त्या सरकारवर टीका करण्यासाठी मांडल्या नव्हत्या. त्यात मुंबईच्या व्यथा होत्या आणि सरकार म्हणून आपण त्यावर नक्की काय उपाययोजना करणार आहे हे सांगावे अशी आमची भूमिका आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रस्ताव मांडलेला असेल त्यांच्या प्रस्तावाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर त्यांना पुन्हा भाषण करण्याची संधी असते. मी नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव मांडला. परंतु माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकण्यासाठी मी सभागृहामध्ये हजर नव्हतो. त्याबद्दल मी या सदनाची आणि माननीय मंत्री महोदयांची क्षमा मागतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकलेले आहे. त्यामुळे त्यांना 5 मिनिटे बोलण्याची परवानगी द्यावी...

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्री महोदयांनी दोन तीन महत्वाच्या मुद्यांना अजिबात स्पर्श केलेला नाही. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या दृष्टीने समाधानकारक उत्तर दिलेले आहे. मी म्हाडाच्या संदर्भात महत्वाचे प्रश्न उपस्थित केले होते. 52 ट्रान्झिट कॅम्प्सना एफएसआय देण्याची भूमिका घेतलेली आहे. 9 हजार घुससखोरांना बाहेर काढण्यासाठी काय कारवाई केली ? म्हाडातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणी सीआयडी चौकशीची मागणी केली होती. या प्रश्नांशी 34 लाख लोकांचा संबंध आहे. याबाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही.

श्री. हसन मुश्रीफ : कालच्या चर्चेमध्ये म्हाडाच्या संबंधातील विषय सन्माननीय सदस्यानी उपस्थित केले होते. भ्रष्टाचाराच्या चौकशी संबंधी काय केले अशी त्यांनी विचारणा केली. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेब आणि म्हाडाचे अधिकारी यांच्या बरोबर बसून ताबडतोबीने मार्ग काढण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : मी काल दोन मुद्दे मांडले होते. नेमक्या झोपडपट्टयांची नांवे सांगितलेली होती. त्यातून आता नवीन प्रश्न निर्माण झालेला आहे. जोगेश्वरी गुंफेजवळील 1977 पासूनच्या झोपडया निष्कासित करण्याचे आदेश मुंबई महानगरपालिकेने दिलेले आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा विषय मी मांडलेला होता. झोपडपट्टया नियमित करण्यासंबंधी 1995चा कायदा आहे. तुमच्या जाहीरनाम्यामध्ये 2000 पर्यन्तच्या झोपड्या नियमित करण्यासंबंधीचा उल्लेख असेल, त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. 1995 पूर्वीच्या झोपड्या नियमित आहेत. गंभीर बाब अशी आहे की, या कायद्याला छेद देणारे वर्तन एमएमआरडीए कडून होत आहे. एमएमआरडीए किंवा एमयूटीपीच्या प्रकल्पांच्या सर्वेक्षणाच्या वेळी त्या ठिकणी जी काही स्ट्रक्चर्स उभी झालेली असतील त्यांचे पुनर्वसन केले जाते. ही चांगली गोष्ट आहे. परंतु जेव्हा एखाद्या ठिकाणी नवीन प्रकल्प हाती

(श्री. अरविंद सावंत...)

घेतला जातो त्यावेळी तेथे तेथे ताबडतोबीने झोपड्या उभारल्या जातात आणि त्या झोपड्यांचे पुनर्वसन केले जाते. त्या झोपड्यांना 225 चौ.फुटाची घरे दिली जातात. हे 1995च्या कायद्याला छेद देणारे वर्तन एमएमआरडीएकडून होते. तेव्हा कोणताही नवीन प्रकल्प करताना त्या ठिकाणी झ ोपड्या असतील तर 1995च्या कायद्यानुसार त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे. परंतु प्रकल्पाच्या ठिकाणी 2007सालची झोपडी असेल तर तिचे पुनर्वसन होते. म्हणून 1995चा कायदा दुरुस्त करण्यात येणार आहे काय ? जोगेश्वरी गुंफेजवळील लोकांचे पुनर्वसन कसे करणार ?

श्री. हसन मुश्रीफ : जोगेश्वरी गुंफेजवळील झोपडपट्टीतील लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी मांडला. मी आज या संदर्भात मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना कारवाई करण्यासंबंधीच्या सूचना दिलेल्या आहेत.... निष्कासन कारवाई थांबविण्यास सांगितलेले आहे.... मी त्यांना योग्य ती कारवाई करा असे सांगितलेले आहे. 1995च्या झोपड्यांचे पुनर्वसन न होता दुस-या झोपड्यांचे पुनर्वसन केले जाते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आधीच्या लोकांचे पुनर्वसन आधी केले पाहिजे अशा एमएमआरडीएच्या अधिका-यांना सूचना देण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : म्हाडा मार्फत एसआरए स्कीम सुरु आहेत. मला याबाबतीत कमी माहिती आहे. काल घाटकोपर येथील सागर सोसायटीचे 70-80 लोक मला येऊन भेटले. गारोडिया नावाच्या विकासकाने बेकायदेशीर काम केलेले आहे. त्या लोकांनी तुमच्या कमिटीकडे अपिल केलेले आहे. जे गैरकारभार करतात, चुकीचे काम करतात त्यांना काढून योग्य तो निर्णय ताबडतोबीने करावा.

श्री. हसन मुश्रीफ : होय.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, कालपासून या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात झ ालेली आहे आणि त्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्याचे काम माननीय नगरविकास राज्यमंत्री यांनी केलेले आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव सभागृहात चर्चेला आल्या नंतर मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्या नंतर ज्या सदस्यांनी प्रस्ताव मांडलेला असतो त्यांना एखादा प्रश्न विचारण्याची संधी दिली जाते. व त्याला उत्तर देण्याची जबाबदारी ही माननीय मत्र्यांची असते. या प्रस्तावावरील उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्या माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना प्रश्न विचारीत आहेत. अशा प्रकारे प्रश्न विचारण्याची पध्दत, प्रथा आणि परंपरेला धरुन नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपला अधिकार स्वत: घेऊन सभागृह कंट्रोल करण्याचा प्रयत्न करणारे ते कोण आहेत ?

( गोंधळ )

**उपसभापती** : सभागृहातील कामकाजाबद्दल मी देखील उव्दिग्न झालेलो आहे. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री उत्तर देत होते, त्यावेळी मध्येच अडवून त्यांना प्रश्न विचारले गेले. आपल्याला त्यावेळी प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन देत होतो. परंतु या चर्चेला दोन तास होऊन गेले आहेत. ही चर्चा कुठे तरी थांबली पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपले अधिकार स्वत:कडे घेऊन आपल्याला झ ाान शिकविण्याचे काम या ठिकाणी होत आहे असे मला वाटते.

( गोंधळ )

**उपसभापती** : ही चर्चा संपलेली आहे असे मी जाहीर करु इच्छितो....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना राईट ऑफ रिप्लायच्या अनुषंगाने बोलण्यासाठी पाच मिनिटांचा अवधी द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

2...

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई शहराच्या संवेदना आम्ही मांडल्या होत्या. त्यात कोणत्याही प्रकारचे राजकारण आणले नाही. परंतु माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी सुरुवातीला उदगार काढले ते अत्यंत दुर्देवी आहेत. आम्ही राजकीय अभिनिवेष ठेवून बोललो अशा प्रकारचे वक्तव्य माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी केलेले आहे व ते रेकॉर्डवर आलेले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेष न ठेवता सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत असे मी बोललेलो आहे.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे. माननीय श्री. गडकरी साहेबांनी मुंबईत बांधलेल्या पुलांच्या बाबतीत माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. माननीय उप मुख्यमंत्री यांनी " नाका तेथे पूल " अशी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांच्यावर टीका केली होती. त्याबद्दल देखील त्यांचे मी कौतुक करतो. आमच्या नेत्याला तुम्ही खडे बोल सुनावले त्याबद्दल तुम्हाला मी धन्यवाद देतो. या ठिकाणी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, केंद्र शासनाकडून 3600 कोटी रुपये मुंबई शहरासाठी मंजूर झालेले आहेत. त्यापैकी 313 कोटी रुपये फक्त आलेले आहेत. चार पाच वर्षामध्ये फक्त दहा टक्केच निधी प्राप्त झालेला आहे. केंद्र सरकारकडून मुंबई शहराची किती उपेक्षा होते आहे हे आपण या ठिकाणी सांगितले त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. ( अडथळा )

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

काल आम्ही असे म्हणालो की, 1995 पर्यंतच्या झोपडपट्टयांना कायदेशीर मान्यता दिल्यानंतर आपण राजकारणाच्या आणि मताच्या लालसेने सातत्याने हायकोर्टामध्ये 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचे घोषित केले. परंतु हायकोर्टाने मान्यता न दिल्यामुळे आपल्या जाहीरनाम्यामध्ये 2000 सालाचा उल्लेख केला. परंतु 2000 सालापर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण द्या असे आम्ही म्हणालो असे आपण सांगितले. वास्तविक तसे आम्ही सांगितले नाही. 1995 पर्यंतच्या झोपड्या कायम ठेवाव्यात आणि त्यानंतरच्या झोपड्या तोडून टाकाव्यात. 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण असावे असे तुमचे म्हणणे असले तरी त्याला मान्यता मिळेल तेव्हा मिळेल. परंतु 1995 नंतरच्या झोपड्या तोडण्याची कारवाई करावी. आपण सांगितले, महानगरपालिकेला आदेश दिले. केवळ आदेश देऊन भागणार नाही. उद्यापासून महानगरपालिकेला एवढे एवढे पोलीस अधिकारी नेमले आहेत, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी हा फौजफाटा घेऊन जावा आणि ताबडतोब मुंबई शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करावी असे सांगणे अपेक्षित होते. बोरीवली येथे मागील 4-5 महिन्यात बांबू रोवून तेथील स्थानिक खासदाराच्या अनुयायांनी गणपत पाटील नगर या नावाने जी वस्ती उभारली आहे ती उखडून टाकणार आहात की नाही? केवळ आदेश दिले असे नेहमीच सांगितले जाते. होत काहीच नाही. त्यामुळे केवळ तुमच्या शब्दावर का विश्वास ठेवायचा? तुमच्या शब्दांनी विश्वासार्हता निर्माण होत नाही. मुंबई शहरात परप्रांतीयांचे लोंढे येतात त्यांचे आपण समर्थन केले. आम्ही घटनेतील तरतूद वाचून दाखविली. भूमिपुत्रांचे संरक्षण करण्यासाठी कायदा करणार का? असाही प्रश्न उपस्थित केला. आपण घटना तपासून पाहतो असे सांगितले. मला धक्का बसला. घटनेच्या आधीन राहूनच आपण येथे बसलो आहोत. घटना काय तपासणार? घटनेप्रमाणे राज्य सरकार भूमिपुत्रांचे संरक्षण करु शकणार नाही, लोंढ्यांवर निर्बंध आणणार नाही. म्हाडातर्फे लाखो घरे बांधून ती भाड्याने त्यांना देणार असे सांगून मुंबईकडे या असा संदेश आपण देत आहात. भूमिपुत्रांना उद्ध्वस्त करीत आहात. कोणत्याही प्रकारचा कायदा न करता, भूमिपुत्रांना नोकरीमध्ये संरक्षण देऊ असे न सांगता प्रस्तावाच्या उत्तरामध्ये निर्धारित केले नाही, या मुंबई शहरातील भूमिपुत्रांना उद्ध्वस्त करुन परप्रांतीयांना दरवाजे उघडे केले असे सांगितले त्याबद्दल निषेध करुन आपल्या उत्तराच्या विरोधात आम्ही सभात्याग करीत आहोत.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : 4000 कोटी रुपये दिल्याचे सांगितले परंतु केंद्र शासनाने फक्त 300 कोटी रुपये दिले.

(विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

**उपसभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

-----

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील जनतेला विजेच्या भारनियमनात देण्यात आलेला दिलासा

**मु.शी.**: राज्यातील जनतेला विजेच्या भारनियमनात देण्यात आलेला दिलासा यासंबंधी माननीय ऊर्जामंत्र्यांचे निवेदन.

श्री.सुनील तटकरे (ऊर्जामंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....2बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अत्यंत चांगले निवेदन केले आहे. या विषयाशी संबंधित एक प्रश्न मी विचारु इच्छितो की, ज्या भागात सिंचन कमी आहे तेथे कृषी पंप कमी आहेत, कारण पाणीच नाहीत म्हणून कृषी पंपांची संख्या नाही. पण नगर जिल्ह्यात जेवढे कृषी पंप आहेत तेवढे नागपूर विभागतील सहा जिल्ह्यांमध्ये सुध्दा नाहीत. आपण विचार केला असेही दिसून येईल की, अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये जेवढे कमी पंप आहेत त्यापेक्षा जास्त पंप या एकाच जिल्ह्यात असतील. म्हणून आत्महत्त्याग्रस्त भागातील कृषी पंपांच्या बाबतीत शासनाने पूर्णपणे रिलीफ दिला पाहिजे. त्याचा विचार शासन करणार काय ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली ती अत्यंत महत्वाची असून याबाबतीत नेमका विद्युत पुरवठा आणि लागणारी गरज याचा विचार करुन या भागात दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. कपिल पाटील : महोदय, उद्योग क्षेत्रात आपण विजेचा पुरवठा किंवा सवलत देतोच पण ज्या ठिकाणी कुटीरोद्योग आहेत, विशेषत: ठाणे जिल्ह्यातील पालघर पट्टयात घरा-घरातून डायमेकिंगसारखे कुटीरोद्योग चालतात. हे उद्योग उद्योगात मोडत नसल्यामुळे त्यांना अतिशय कमी काळ वीज पुरवठा होतो. म्हणून या उद्योगाला सुध्दा रिलीफ देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ ST/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे :--

"राज्यशासनाने या राज्यात ज्या ज्या शाळांना विना अनुदान तत्वावर वर्ग तुकड्यांना मानयता दिलेली आहे या सर्व वर्ग तुकड्यांना विशिष्ट कालावधीनंतर शासनाकडून अनुदानास पात्र ठरविले जाते व अनुदान दिले जाते. शासनाने या राज्यातील जे वर्ग अनुदानास पात्र ठरविले आहेत त्या वर्ग तुकड्यांना पात्र ठरण्याची घोषणा केल्यानंतर त्यासाठी आवश्यक असणारा निधी सुध्दा शासनाने संबंधित खात्याकडे वितरित केलेला आहे. शासनाने हा निधी देताना संचालकांना स्पष्टपणे आदेश संचालकांना दिलेले आहेत की, कुठल्याही परिस्थितीत 31 मार्च, 2009 पर्यंत संबंधित शाळा आणि त्यात काम करणाऱ्या शिक्षकांना निधीचे वाटप करावयाचे. परंतु अशा प्रकारचा निधी आल्यानंतर देखील अनेक जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकाऱ्यांनी हा निधी संबंधित शाळांना दिलेला नाही आणि त्यामुळे निधी शासनाकडे परत आलेला आहे, समर्पित झालेला आहे. त्यामुळे आजही त्या तुकड्यांना अनुदान मिळाले नाही, ही गंभीर बाब आहे. या बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि ज्या शिक्षणाधिकाऱ्यांनी वेळेवर निधीचे वितरण केलेले नाही त्यांची चौकशी करुन आवश्यक ती कारवाई करावी अशीही विनंती करीत आहे.

---------

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. संजय केळकर )**

**तालिका सभापती ( श्री. संजय केळकर )** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पुणे येथील पेशवेकालीन होळकर पुलाशेजारी कै. प्रथम तुकोजीराव होळकर यांचे स्मरणार्थ होळकर छत्री उभारलेली आहे. तसेच येथील पुलालाही होळकर पूल असे नाव दिलेले आहे. येथील पाणी पुरवठा केंद्रालाही होळकर पाणी पुरवठा केंद्र म्हणून ओळखले जाते तसेच ही ऐतिहासिक वास्तू असून मागील काही महिन्यामध्ये या वास्तूच्या जागेमध्ये छत्री भोवती मोठया प्रमाणावर बांधकाम चालू असल्याचे आढळून आले आहे. या छत्रीभोवती असलेले लोखंडी कंपाऊंडच्या मुख्य प्रवेशद्वारला कुलूप लावून बंद करण्यात आलेले आहे. या छत्रीचे दर्शन घेण्यासाठी जाणा-या नागरिकांना रखवालदाराकडून बंदी घालण्यात आली असून सदर वास्तू ऐतिहासिक वास्तू असल्याने भारत सरकार व महाराष्ट्र शासन ऐतिहासिक वास्तू जतन करण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय असे असतांना कै. तुकोजीराव होळकर यांची छत्री व समाधी व महादेव मंदिराच्या जागेमध्ये खरेदी विक्री तसेच बांधकामाचे व्यवहार होत असल्याचे दिसून आलेले आहे. या स्मारकाच्या संदर्भात खरेदी व्यवहार झालेला असून त्या व्यवहाराला ताबडतोब स्थगित द्यावी अशा प्रकारचा विशेष उल्लेख मी मागच्या अधिवेशनामध्ये सुध्दा दिला होता व त्यासंदर्भातील आदेश पुणे येथील कलेक्टरांना देण्यात आले होते परंतु असे असतांना सुध्दा या खरेदी व्यवहाराला अद्यापपर्यंत स्थगिती दिली गेली नाही तसेच कलेक्टरांनी यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. त्यामुळे मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे की, पुण्यातील ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी या ठिकाणच्या खरेदी व्यवहाराला त्वरित स्थगिती देण्यात यावी. पुण्यातील ही ऐतिहासीक वास्तू असलेली जागा एका बिल्डराच्या घशात घालण्याचा डाव झालेला असून पेशवेकालीन होळकर पुलाशेजारील कै. प्रथम तुकोजीराव होळकर यांचे स्मरणार्थ छत्री तसेच स्मारकाचे जतन व्हावे यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे.

------

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यात गेल्या 7-8 वर्षापासून पडलेला दुष्काळ व त्यामुळे कधीही भरुन न येणारे नुकसान, या नुकसानीमुळे ग्रामीण भागातील जनतेला चटके सोसावे लागतात त्यामुळे या सर्वांवर मात करण्यासाठी 72 तालुक्यांसाठी एक वेगळे दुष्काळी महामंडळ काढण्याची घोषणा शासनाने 4 वर्षापूर्वी केली होती. आता हे शेवटचे अधिवेशन आहे असे असतांना या 72 तालुक्यांसाठी दुष्काळी महामंडळाची निर्मिती करण्याची घोषणा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर शासनाने करावी अशी माझी औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने मागणी आहे.

------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, भंडारा जिल्हयाच्या विभाजनाच्या वेळी गोंदिया जिल्हयातील एकूण 262 हजेरी सहाय्यकांपैकी फक्त 225 हजेरी सहाय्यकांना कोणतीही पत मर्यादा न बाळगता थकीत वेतन देण्यात येणे परंतु उर्वरित 37 हजेरी सकहाय्यकांना त्यांचे थकीत वेतन अंदाजे 16 लक्ष 497 रुपये देण्यात न येणे या संदर्भात मा. विभागीय आयुक्त नागपूर यांनी पत्र क्र. रोहयो/सलेअ-1/कावि/309/06 दि. 14.3.06 अन्वये मा. सचिव (रोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर हजेरी सहाय्यकाचे थकीत वेतन ( अंदाजे 16 लक्ष, 497 रु.) मंजूर करण्यची शिफारस करणे, तसेच मा. वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य, आणि जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे वारंवार यांसदर्भात पाठपुरावा करणे, त्याच प्रमाणे लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आणि विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सदर प्रकरणी मुद्दा उपस्थित करुनही शासनाकडून उत्तर आलेले नाही. या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना सुध्दा मी दिली होती परंतु या लक्षवेधी सूचनेचे उत्तर अद्याप प्राप्त झालेले नाही, चार अधिवेशने झाले तरी त्याचे उत्तर अद्यापपर्यंत आलेले नाही. या विषयाच्या संदर्भात विशेष उल्लेख सुध्दा उपस्थित केला होता परंतु त्याचेही उत्तर अद्यापपर्यंत मिळालेले नाही. त्यामुळे हजेरी सहाय्यकांवर आज उपासमारीची वेळ आलेली आहे त्यामुळे सदर प्रकरणी हजेरी सहाय्यकांचे थकीत वेतन देण्यासंबंधी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून सदर हेजेरी सहाय्यकांना त्यांचे थकीत वेतन त्वरित देण्याची आवश्यकता आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात औचित्याच्या मुद्याच्या द्वारे उपस्थित केलेला आहे.

श्री. बबनराव पाचपुते : नोंद घेतलेली आहे.

-------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, बालकामगारांविषयी या सभागृहात वेगवेगळया आयुधांच्या माध्यमातून अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 13.45

श्री.किरण पावसकर ..

त्यांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांकडून कोणत्याही प्रकारे उत्तर आम्हाला देण्यात आलेले नाही .दिनांक 26 मे 2009 रोजी धारावी, मुंबई येथील कारखान्यात झालेल्या दुर्घटनेमध्ये तीन बाल कामगार ठार झाले व काही कामगार गंभीर जखमी झाले होते. त्याचबरोबर जळगाव जिल्हयातील पारोळा येथील सावित्री फटाक्याच्या कारखान्यात स्फोट होऊन 7 बाल कामगार मृत्युमुखी पडले होते व 9 बालकामगार जखमी झाले होते. बालकामार मुक्त योजना बाबत शासन वारंवार सांगत असतांनासुध्दा काही कारखान्यांमध्ये बालकामगार काम करीत आहेत. अशा कारखान्याच्या मालकांना 20 हजार रुपयाचा दंड केला जातो परंतु एखाद्या कारखान्यात स्फोट

झाल्यानंतर, अपघात झाल्यानंतर, बाल कामगार मृत्युमुखी पडल्यानंतर त्या कारखान्यात बाल कामगार काम करीत असल्याचे शासनाला समजते अशा वेळी केवळ .मालकांना शासन करुन किंवा दंड करुन चालणार नाही तर ज्या अधिका-याच्या कार्यक्षेत्रातील कारखान्यांमध्ये हे बाल कामगार काम करतात किंवा त्या ठिकाणी अपघात होऊन काही बालकामगार मृत्युमुखी पडतात तेव्हा अशा अधिका-यांच्या विरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? बाल कामगार योजनेच्या बाबतीत शासनाने फक्त न सांगता 14 किंवा 18 वर्षा खालील कामगारासाठी केन्द्र सरकारने जे नियम तयार केलेले आहेत त्यातील कोणते नियम राज्य सरकार अंमलात आणणार आहे ? आणि संबंधित कारखान्याच्या मालकाला फक्त दंड न लावता त्या अधिका-यांना कोणते शासन करणार आहे काय यासबंधी माहिती मिळण्याकरता मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गो-हे: सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, जळगाव येथून मुलींना पळवून नेण्याच्या, फूस लावण्याच्या तसेच त्यांच्या निष्पापपणाचा गैरफायदा घेण्याच्या घटना वारंवार घ्‍डत आहेत, जळगावमध्ये अशा प्रकारे 13 मुलींना संभाजीनगर येथे नेऊन निकाह लावण्याची घटना घडलेली आहे. या संदर्भात आम्ही लक्षवेधी सूचना व प्रश्न दिला होता. परंतु आठवडयाच्या शेवटच्या दिवशी आम्हाला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली जाते म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. जळगावातील रज्जाक कॉलनी येथील आश्रमखान या विवाहीत इसमाने अशाच प्रकारे एका कुमारिकेला पळविण्याचे उघडकीस आल्यावर याबाबत जळगावमध्ये सुध्दा अशाच प्रकारे बेजबाबदार समाजकंटकाचे साटेलोटे असल्याचे दिसून आले आहे. जमीर खान, युसुफ खान, मजहर खान, असीफ खान, अजीज खान, अखिल पटेल, अब्दुल रहीम उर्फ बाब्या शेख मोहिसीन रोप्यउद्दीन अशी त्यांच्या साथीदारांची नावे आहेत. जळगाव मधील शिवसेना व इतर संघटनांनी दिनांक 7 मे 2009 रोजी जळगावचे पोलीस अधीक्षक श्री संतोष रस्तोगी यांना याबाबत निवेदन दिले होते . हिंदुस्थानातील व महाराष्ट्रातील मुलींना पळवून नेले जाते अशा प्रकारच्या घटना जळगाव, संभाजीनगर आणि नाशिक , कल्याणमध्ये वारंवार घडत आहेत. ज्या मुलींना पळवले जाते त्या मुलींना बहुतेक वेळा मध्य पूर्वेतील देशांच्या वा इतर देशातील परदेशी नागरिकांना विकले जाते म्हणून केन्द्र व राज्यातील गृह विभाग, परराष्ट्र मंत्रालय, महिला - बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी ज्या अरब राष्ट्रातील हिंदुस्थानच्या वकालती मुंबईत आहेत त्यांच्यावर तसेच परदेशी नागरिकांवर कडक नियंत्रण ठेवून या प्रकरणातील धागेदोरे खणून काढावेत व या घटनांच्या मागील सूत्रधारांवर संघटीत गुन्हेगारांचा कायदा लावण्यात यावा आणि या मुली ताबडतोब परत मिळाव्यात यासाठी पोलिसांनी मोहीम राबवावी.त्याचप्रमाणे संबधित मुलीच्या पुनर्वसनाची योजना राबवावी . या मुलींना आमिष दाखवून त्यांना धर्मातर करण्यास भाग पाडून त्यांची अरब देशात विक्री करण्याचे षडयंत्र रचण्यात येते. त्यामुळे लोकांमध्ये घबराट निर्माण झालेली आहे हे प्रकार थाबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली याबाबत तातडीने माहिती मिळावी याकरता मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.



VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 13.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सांगली जिल्हयास सहकाराचे केन्द्र मानले जाते . या सांगली जिल्हयातील वसंतदादा सहकारी साखर कारखान्यामधील कामगारांनी गेले 7 दिवस जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आदोंलन केले असता कामगारांच्या मागण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी बोलाविलेल्या बैठकीत त्यांना काहीच ठोस आश्वासन मिळाले नसल्याचे दिसल्यावर संतप्त झालेल्या कामगारांनी दिनांक 10.6.2009 रोजी जिल्हाधिकारी श्री.श्याम वर्धने यांना त्यांच्याच कक्षात कोंडून ठेवण्याचा प्रकार घडलेला आहे , कामगारांची देणी द्यावी , भाडेतत्वावर कारखाना चालविण्यास द्यावा अशा प्रमुख मागण्यांसाठी गेले 7 दिवस आंदोलन करुनही याबाबतीत कोणताही ठोस निर्णय न झाल्यामुळे कामगारांचा उद्रेक झाला आहे त्यामुळे 250 हून अधिक कामगार आत घुसले आहेत. माननीय गृहमंत्री सांगली जिल्हयातील आहेत असे असतांना .....

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे..

असे प्रकार तिथे घडत आहेत आणि कामगारांना न्याय मिळत नाही. या प्रश्नाच्या बाबतीत दुसऱ्या कोणत्या मार्गाने न्याय मिळेल की नाही याबाबत लोकांच्या मनामध्ये संभ्रम आहे. त्यामुळे या कामगारांच्या न्याय्य मागण्यांबाबत विलंब न करता ताबडतोब कारवाई करावी. आणि त्या कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देऊन योग्य त्या पध्दतीने वसंतदादा सहकारी साखर कारखान्याचा कारभार चालवावा यासाठी मी औचित्याच्या मुद्दयाव्दारे शासनाचे लक्ष वेधते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

**तालिका सभापती (श्री. संजय केळकर)**: सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या काही दिवसांपासून एका विषयावर सातत्याने चर्चा सुरु होती. स्वाईन फ्लूचे एच-1 आणि एन-1 हे विषाणू म्हणजे जागतिक महामारी आहे असे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने म्हटले आहे. त्यांनी हा आजार म्हणजे एक पँडेमिक डिसीज असल्याचे घोषित केले आहे. आज महाराष्ट्रामध्ये इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि डॉमेस्टीक एअरपोर्टवर दिवसाला हजारो पर्यटक येत असतात. त्याचप्रमाणे समुद्रमार्गे बोटीने येत असतात, अनेक मार्गाने येत असतात. या पर्यटकांची विमानतळावरील वैद्यकीय तपासणी अतिशय जुजबी स्वरुपाची होत असते. आज आपण पाहिले तर हैद्राबाद, दिल्ली, कोईमतूर, गोवा याठिकाणी या रोगाचा फैलाव होण्यास सुरुवात झाली आहे. हा रोग श्वसनाव्दारे होणारा किंवा शिंकण्यामुळे, खोकल्यामुळे होणारा एअर बॉर्न डिसीज आहे. या रोगाचा फैलाव हवेव्दारे होतो. त्यामुळे मुंबईमध्ये एखादा रुग्ण आला तर त्याचे इन्फेक्शन हजारो लोकांना होऊ शकते अशाप्रकारची भीती निर्माण झाली आहे. विमानतळावरील प्रवाश्यांची वैद्यकीय चाचणी करीत असतांना त्यांचे स्कॅनिंग आणि स्क्रिनिंग अतिशय जुजबी पध्दतीने केले जाते. त्याठिकाणी फक्त मास्क बांधलेले मेडिकल पॅनेलवरील अधिकारी असतात. ते प्रवाश्यांना चार प्रश्न विचारुन सोडून देतात. त्याचप्रमाणे विमानातून उतरण्यापूर्वी प्रवाश्यांकडून एक हेल्थ कार्ड भरुन घेतले जाते. त्यामध्ये चार वेगवेगळे प्रश्न विचारले जातात. त्यामध्ये तुम्हाला खोकला झाला काय? ताप आला होता काय? अशाप्रकारचे जुजबी प्रश्न विचारुन पर्यटकांना सोडण्यात येते. म्हणून मुंबईचे डॉमेस्टिक विमानतळ किंवा इंटरनॅशनल विमानतळावरील वैद्यकीय चाचणी करणारी सर्व यंत्रणा वेल ईक्विप्ड करण्यात यावी. आणि विमानतळावर उतरलेल्या परदेशी पर्यटकांचा पुढील 15 दिवस फॉलो अप ठेवला पाहिजे. एखाद्या व्यक्तीला या रोगाचे इन्फेक्शन झाल्यानंतर 15 दिवसानंतर तो डिटेक्ट होतो. म्हणून या महामारीपासून मुंबईला वाचविण्यासाठी या पर्यटकांचा फॉलोअप 15 दिवस ठेवण्यात यावा अशी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. जालना जिल्हा परिषदेतील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. व्ही.एस.भालेराव हे दि.21.9.2002 पासून कार्यरत असल्यापासून त्यांच्या कार्यशैलीबाबत जिल्हा परिषद, जालना सदस्यांनी नाराजी व्यक्त करुन त्यांना कार्यमुक्त करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करुन शासनास सादर केला होता. डॉ. भालेराव यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या विभागीय चौकशीत दोषी आढळून येऊनही त्यांच्यावर कोणतीच कारवाई झालेली नाही. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर अर्थपूर्ण व्यवहार होऊन सदरहू अधिकारी चौकशी दडपण्याचा करीत असलेला प्रयत्न, यामुळे तेथील नागरिकांचा शासना वरचा उडत चाललेला विश्वास, या संदर्भात शासनाने तातडीने योग्य कारवाई करण्याबाबत शासनाने निवेदन करावे.

सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा आहे. संभाजीनगर येथील अंबाजोगाईच्या परिवहन कार्यालयात 40 लाखांचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी निलंबित असलेले रामेश्वर बबन तायडे (वय 52) यांच्या मुलाने आपल्या वडिलांना पुन्हा कामावर घेण्याबाबत आरटीओच्या केबिनमध्ये घुसून वाद घालता घालताच मध्यस्थी करणारे लेखापाल डी.एस.कोंडावार यांच्यावर अचानकपणे गोळी घालून दि.31.5.2009 रोजी त्यांची केलेली हत्या, निलंबित लिपिक रामेश्वर तायडे यांचा मुलगा परिवहन कार्यालयात कार्यरत नसतांना त्याला बेकायदा काम करण्यास परिवहन विभागातील अधिकाऱ्यांचे असलेले पाठबळ, हल्लेखोर सचिन तायडे संधीचा फायदा घेऊन मोटार सायकलवरुन फरार झाला असून सचिन तायडे याला फरार होण्यास एका पोलीस अधिकाऱ्याने मदत केल्याची चर्चा असणे, क्रांतीचौक पोलीस ठाण्याचे निरीक्षक दौलत मोरे यांचा हल्लेखोर सचिन तायडे नातेवाईक असणे, पोलिसांकडूनच हल्लेखोरांस पाठबळ मिळत असल्याने न्याय मिळण्याबाबत निर्माण झालेला संभ्रम, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत सखोल चौकशी करुन हल्लेखोरांना पाठिशी घालणाऱ्या व पाठबळ देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई होत आहे. त्याकरिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.संजय केळकर)** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी अतिशय गंभीर असा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, येथे विधान परिषदेच्या सभापतींचा, विधानसभेच्या अध्यक्षांचा आणि माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब हे ज्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत, ते प्रतिष्ठान एका ख्यातनाम चित्रकाराच्या कुटुंबियांचा कसा छळ करीत आहे यासंदर्भातील माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, याठिकाणी दि.31 ऑगस्ट 1988 रोजी विधानसभेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसाहेब आपण त्यावेळी विधानसभेचे अध्यक्ष होता. त्यावेळी ख्यातनाम चित्रकार श्री.एम.आर.आचरेकर यांच्या मुलाकडे, विधानमंडळातील एक तत्कालीन अधिकारी श्री.अनंत थोरात यांनी पत्र पाठवून त्यांचे एक तैलचित्र मागविले, ज्याची किंमत त्यांच्या दृष्टीने 1 कोटी रुपये इतकी आहे. ते चित्र प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आले. नंतर ते चित्र आचरेकर यांच्या मुलाने परत मागितल्यानंतर येथील अधिकाऱ्यांनी त्यांना असे उत्तर दिले की,"आम्हाला ते चित्र कुठे गेले, हे माहिती नाही." नंतर असे सांगण्यात आले की, "ते तैलचित्र यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या इमारतीमध्ये आहे. तुम्ही ते त्यांच्याकडून घ्यावे." मग यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील सरचिटणीस श्री.श.गं.काळे यांना संबंधितांनी पत्र लिहिले. त्यांनी असे सांगितले की, "आमच्याकडे हे चित्र कसे आले, ते माहिती नाही." नंतर याठिकाणी दि.21 मार्च 2007 रोजी श्री.नितीन मुरलीधर आचरेकर यांना, श्री.दि.श्री.चव्हाण, ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी, यांच्याकडून असे पत्र पाठविण्यात आले. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"यावरुन या प्रकरणासंदर्भातील सद्य: वस्तुस्थितीची आपणास पूर्ण माहिती आहे की, सदरच्या तैलचित्राबद्दल ते परत करण्यासंदर्भात प्रदर्शनानंतर सुमारे 18 वर्षे दोन्ही बाजूकडून काही प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे दरम्यान ते तैलचित्र प्रतिष्ठानमध्ये कसे गेले, कोणत्या आदेशान्वये व कोणी पाठविले, आचरेकर कुटुंबियांची परवानगी त्यासाठी घेतली होती काय किंवा त्यांना कळविले होते काय ? हे आम्हाला माहिती नाही. याबाबत कोणाकडेही काही कागदोपत्री माहिती उपलब्ध दिसत नाही.तसेच या काळात विधीमंडळामध्ये व महाराष्ट्र शासनाच्या माहिती संचालनालयामध्येही सेवारत

. . . .2 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

असणारे कोणी अधिकारी सध्या तेथे नसल्याने अधिकृत काही कागदपत्रे वा सबळ माहिती वा आदेश आमच्या कार्यालयामध्ये शोध घेतला व मंत्रालयामध्येही चौकशी केली असता हाती लागत नाहीत. परंतु ज्याच्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत ते "तैलचित्र मात्र यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या संस्थेमध्ये लावण्यात आलेले आहे त्यामुळे आपण यासंदर्भात त्यांच्याकडेच संपर्क साधून प्रयत्न करावेत अशी विनंती आहे." तशा प्रकारे संपर्क साधल्यानंतर विधानमंडळातील श्री.उमेश खडकीकर, जे सह सचिव होते, त्यांनी असे सांगितले की,"आमच्याकडे हे तैलचित्र नाही." नंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील सरचिटणीस श्री.श.गं.काळे यांनी एक विचित्र प्रकारचे पत्र पाठविले. त्यांनी सांगितले की,"याबाबत प्रतिष्ठानकडे माहिती उपलब्ध नाही." नंतर "पद्मश्री एम.आर.आचरेकर यांनी महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सव 1987-1988 प्रदर्शनासाठी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सोहळयाचे तैलरंगातील चित्राचे हस्तांतरण कोणाच्या शिफारशीवरुन श्री यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झाले ? त्या शिफारस पत्राची प्रत व तत्कालीन विधानसभेचा प्रस्ताव व मान्यता याबाबतची सविस्तर माहिती मागविलेली होती. परंतु याबाबत प्रतिष्ठानकडे माहिती उपलब्ध नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. नंतर श्री.शं.गो.काळे यांनी असे म्हटलेले आहे की,"दि.12 जून 2006 व 27 सप्टेंबर 2006 ची पत्रे प्रतिष्ठानला मिळालेली नाहीत. त्या पत्रातील विनंती प्रतिष्ठानच्या विचाराधीन आहे." हे लाखो रुपयांचे चित्र असून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आहे.

सभापती महोदय, त्यानंतर पुढील गोष्ट तर संतापजनक आहे."दि.4 मे 2007 रोजी कै.एम.आर.आचरेकर, ज्यांना भारत सरकारने पद्मश्री दिलेली आहे. त्यांना त्यांचे चित्र यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे परत दिले जात नाही. माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब यांनी देखील पत्र लिहिलेले आहे. परंतु त्याची देखील दखल घेतली जात नाही. म्हणून त्यांनी दोन्ही सभागृहाच्या माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. तसेच श्री.श.गं.काळे यांनी 7 मे रोजी पत्र लिहिलेले आहे की, या तैलचित्राची त्यांच्या दृष्टीने एक कोटी किंमत आहे आणि काही ठिकाणी काही लाख रुपयापर्यंत किंमत आहे. श्री.श.गं.काळे यांनी असे म्हटलेले आहे की"आपले दिनांक 2 जून 2006 रोजी पत्र आले. श्री.एम.आर.आचरेकर यांनी रेखाटलेले महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सवी सोहोळयाचे चित्र परत करावे. या आपल्या विनंतीचा विचार करण्यापूर्वी," म्हणजे

. . . .2 एफ-3



APR/ST/KGS 13:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जे चित्र त्यांचे नाही, त्यांनी येथे वापरलेला जो शब्द आहे, तो मी येथे उच्चारत नाही. त्यांनी असे लिहिलेले आहे की, हे चित्र कुणीतरी चोरुन तिकडे नेले." मला तो शब्द वापरण्याची इच्छा नाही. या विधीमंडळाच्या अध्यक्षांकडे प्रदर्शनासाठी चित्र दिले असताना,ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये कसे गेले ? आणि त्यांची गेली 18 वर्षे इथून-तिथे भलावण करीत आहेत. श्री.श.गं.काळे असे म्हणतात की,"सदर तैलचित्राचे मालक कोण आहेत" याचा पुरावा द्या. तसेच पद्मश्री कै.एम.आर. आचरेकर यांचे एकूण वारसदार कोणकोण आहेत व त्यांनी आपल्याला मुखत्यारपत्रात (Special Power of Attorney) दिली असल्यास त्याची एक प्रमाणित प्रत देण्यात यावी. म्हणजे त्यांच्या मुलाला असे सांगितले जात आहे की, तुझे तेच वडील आहेत, याचे प्रमाणपत्र दे." सभापती महोदय, हा काय प्रकार आहे?

सभापती महोदय, यानंतर माननीय श्री.मनोहर जोशी साहेबांनी पत्र लिहिले. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"त्यांनी आपल्या संस्थेकडे त्यांच्या वडिलांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सोहळयाच्या तैलरंगातील रेखाटलेल्या चित्राची मागणी केली आहे, ती उचित, योग्य व न्यायाला धरुन असून त्यांनी मागणी केल्यानुसार सदर चित्र त्यांना लवकरात लवकर परत करावे अशी मी आपणास आग्रहाची विनंती करीत आहे."

**(सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.सुरेश जेथलिया)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

त्यांनी मागणी केल्यानुसार त्यांना तैलचित्र परत देण्यात यावे. श्री. शरद काळे यांनी माननीय श्री. मनोहर जोशी यांना या संदर्भात एक पत्र लिहिले होते. सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याद्वारे या गंभीर प्रश्नाची नोंद घेऊन तैलचित्र परत करण्यासाठी विधिमंडळ काय कार्यवाही करणार आहे हे सभागृहाला कळले पाहिजे.

**तालिका सभापती** ( श्री. सुरेश जेथलिया ): औचित्याचे मुद्दे दोन मिनिटात मांडण्यात यावेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. औचित्याच्या मुद्दावर दोन मिनिटे बोलले पाहिजे असे कुठेही लिहिलेले नाही. सदर तैलचित्र कोटयावधी रुपयाचे आहे.त्यासंबंधात माननीय सभापतींना आणि माननीय अध्यक्षांना पत्र लिहिलेले आहे. त्या बाबतीत मी याठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यासाठी दोन मिनिटे वेळ जास्त लागला तर काय अडचण आहे?

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, कै. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा मी कार्याध्यक्ष आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या ठिकाणी जो सबंध पत्रव्यवहार वाचून दाखविलेला आहे तो मला माहीत आहे. ते तैलचित्र ज्यांचे असेल त्यांना परत करण्याची प्रतिष्ठानची शंभर टक्के भुमिका आहे. पण ज्यांचे असेल त्या मालकालाच ते दिले गेले पाहिजे ही महत्वाची बाब आहे. दुसरा काहीही हेतू नाही. (अडथळा) विधिमंळाचा हा प्रश्न आहे. 28 वर्षापूर्वी विधिमंडळातून ते कसे गेले याची चौकशी व्हावी पण उगीच कै. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला त्यामध्ये रेकॉर्डवर काही चूकीचे राहू नये, एवढाच माझा हेतू आहे. त्यासंबंधीची चौकशी करण्यास आमची काही अडचण नाही.

---

**तालिका सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्रात दर तासाला एक किंवा दोन असे मिळून दिवसभरात 33 आणि वर्षभरात बारा हजाराच्या वर लोक रस्ते अपघातात मृत्यू पडत असणे, हा मृत्युंचा आकडा पहाता दहशतवादी हल्ला, आपत्ती, साथीचे रोग किंवा दंगलीपेक्षाही मोठा असणे, रस्ता अपघातातून होणाऱ्या जीवितहानीचे, महाराष्ट्र राज्याचे

...2..

श्री. चंद्रकांत पाटील.....

प्रमाण 45 टक्के, म्हणजे देशाच्या सरासरी पेक्षा 28 टक्के, म्हणजे बरेच जास्त असणे, याला मुख्य कारण, वाहनाचा वेग, वाहन चालकांची नियम धुडकावण्याची वृत्ती, वाहनांतील बिघाड, व सर्वात मोठा दोष म्हणजे रस्ते बांधकामातील दोष असणे, शासनाने वेळोवेळी प्रयत्न करुन अद्यपही या दोषांवर नियंत्रण करण्यात येत असलेले अपयश त्यामुळे दिवसेंदिवस या अपघातांच्या प्रमाणात वाढ होणे, व नाहक बळी जात असणे, ही महत्वाची व सार्वजनिक हिताची बाब मी आज सभागृहात औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित करु इच्छितो.

---

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात सन 2005 साली झालेला धान्य घोटाळा आणि या धान्य घोटाळयामध्ये असलेले आरोपी व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासकीय धान्य अपहारप्रकरणी ओरोस पोलीस ठाण्यात, भाग 6 गु.र.नं. 3006 /2006 भारतीय जीवनावश्यक वस्तू कायदा वन 1955 चे कलम 3,7 व 8 सह भारतीय दंडविधान संहिता कलम 406,420,265,468,471 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्हयांच्या तपासात निष्पन्न झालेल्या सहभागानुसार आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयांचे तपासात आरोपींकडून रु.7,39,747 चा धान्यासाठा दोन टेम्पोसह हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर धान्य घोटाळा प्रकरणीच्या गुन्हयाचा तपास पूर्ण

झालेला असून गुन्हयांतील शासकीय अधिकारी व कर्मचारी (आरोपी) यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोप दाखल करण्यातबाबतचा प्रस्ताव शासनाकडे गेले तीन वर्षे विचाराधीन आहे असे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्र.49274 अनु.क्र. 22 दुसरे अधिवेशन, 2009 ला उत्तरात माननीय मंत्रिमहोदयांनी नमूद केले आहे. खरे पहाता या प्रकरणाला आज 4 वर्षे झाली असून अद्याप हया आरोपींवर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही. मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे व चुकीचे असल्यामुळे मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. सुरेश जेथलिया ) : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे मालवण येथील काळसे बागवाडीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी भरल्यामुळे ससेपालन करणाऱ्यांचे प्रचड नुसान झाले आहे. काही बेरोजगार तरुणांनी बँकेकडून अर्थसहाय्य घेऊन ससेपालन व्यवसाय सुरु करुन ते आपला व कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत होते. परंतु अचानक झालेल्या मुसळधार पावसाने त्यांचे ससे वाहून गेल्यामुळे त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले. आधीच बेरोजगारीच्या खाईत असताना त्यातच निसर्गानेही दगा दिल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली आहे. त्यांना बँकेकडून घेतलेले कर्ज देखील फेडणे अशक्य झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीची सर्वात मोठी झळ ससेपालन उद्योजकांना बसल्याने त्यांना शासनाने दिलासा म्हणून अर्थसहाय्य निधीतून अन्यथा बँकेची कर्जमाफी मिळवून दिल्यास त्यांना नव्याने उद्योग सुरु करण्यात मदत मिळेल. याकरिता मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील महत्वाचा विषय मी याव्दारे उपस्थित करीत आहे. आपल्या देशाचे आणि राज्याचे भाग्य आहे की, आपल्या राज्यात आणि देशात अनेक महामानव, राष्ट्रपुरुष, क्रांतिकारक, स्वातंत्र्य लढ्यातील योध्दे होऊन गेले. राज्यात अनेक ठिकाणी राष्ट्रपुरुषांची, क्रांतिकारकांची, स्वातंत्र्य लढ्यातील योध्यांची स्मारके आहेत. स्मारकांच्या निर्मितीसाठी शासन आर्थिक निधी जाहीर करते. स्मारक उभारले जाईल असे आश्वासन देते परंतु अनेक वेळा प्रत्यक्ष कार्यवाही होत नाही. त्यामुळे महापुरुषांचा अपमानच होतो. त्या राष्ट्रपुरुषांच्या स्मारकांमुळे नवीन पिढीला प्रेरणा मिळत असते. त्यांच्या कार्याचा गौरव होत असतो व त्यांनी केलेल्या महान कार्याची जपणूक केली जाते. पण दुर्दैवाने जी स्मारके आहेत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

त्याची देखभाल केली जात नाही आणि एकादृष्टीने त्याची विटंबनाच होते. ज्या स्मारकाची घोषणा केली जाते ती प्रत्यक्षात निर्माण होत नाहीत. त्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण होतो व त्यांच्या भावना दुखावतात. संगमेश्वरचे संभाजी स्मारक असो किंवा रायगड जिल्ह्यातील साने गुरुजी, सी.डी. देशमुख यांचे स्मारक असो, क्रांतिकारक अनंत कान्हेरे यांचे स्मारक असो किंवा राजगुरुनगर येथील राजगुरुंचे स्मारक असो, शासन अशा अनेक स्मारकांची घोषणा करते पण प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. म्हणजे जी स्मारके आहेत त्यांची योग्य पध्दतीने सन्मानपूर्वक देखभाल झाली पाहिजे. ज्यांच्या स्मारणाने प्रेरणा मिळते त्यांची कुठल्याही परिस्थितीत विटंबना होता कामा नये व ज्या स्मारकांच्या निर्मितीसाठी शासनाने निधी जाहीर केला आहे ती स्मारके त्वरित उभी राहिली पाहिजेत. श्री. अंतुलेजी मुख्यमंत्री असताना प्रत्येक तालुक्यात स्मारके बांधली पण आज त्यांची स्थिती अत्यंत खराब आहे. त्या स्मारकांची सुध्दा देखभाल दुरुस्ती झाली पाहिजे. आपल्या महापुरुषांच्या कार्याचे जतन आपणच केले पाहिजे. ही स्मारके येणाऱ्या पिढीला प्रेरणा देणारी असली पाहिजेत. सदरची बाब अत्यंत महत्वाची असून मी या औचित्याच्या मुद्याव्दारे निदर्शनास आणून देत आहे.

---

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई येथील वेलिंग्टन कलब, नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया, रेडिओ क्लब, जिमखाने इत्यादी क्लबचे सदस्यत्व माननीय विधानसभा व विधान परिषद सदस्यांना देण्याबाबत मी अनेक वेळा मागणी केलेली आहे. त्याचे अधिकारपत्र शासनाच्या अखत्यारित येते. कोणत्याही आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर हे संचालक मंडळ त्यांना ताबडतोब सदस्यत्व बहाल करते. मी तीन वेळा मागणी केली की, सन्माननीय विधानसभा सदस्य आणि विधान परिषद सदस्यांना या क्लबचे सदस्यत्व द्यावे. सभापती महोदय, आपण त्यासंदर्भात तीन वेळा निर्देश दिले. मुंबईचे जे पालकमत्री

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

श्री. सुभाष चव्हाण ....

आहेत त्यांच्या बैठकीमध्ये तसे निर्देश देण्यात येतात. मागे आपण निर्देश दिले की, अधिवेशन संपण्याच्या आत त्यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा. आज मी अतिमहत्वाचा, अतिगंभीर, वेळोवेळी मांडलेल्या आणि आपण निर्देश दिलेल्या विषयाच्या बाबतीत हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेण्याबाबत आपण मंत्रिमहोदयांना आदेश द्यावेत अशी विनंती करतो.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, यासंदर्भात माझी अशी विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांकडे तीन दिवसात बैठक लावण्यात यावी.

**तालिका सभापती** : हा विषय सन्माननीय सदस्यांनी बऱ्याच वेळा उपस्थित केलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या मुद्याची दखल घ्यावी.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या सूचनेची दखल घेतलेली आहे.

---

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये केंद्रीय अनुसूचित जाती जमातीच्या आश्रमशाळा चालविल्या जातात. त्या केंद्रीय आश्रमशाळा नुकत्याच राज्य शासनाकडे वर्ग करुन घेतलेल्या आहे. या केंद्रीय आश्रमशाळांमध्ये आज हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी काम करीत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

या दुर्गम भागातील आश्रमशाळा असल्यामुळे या आश्रमशाळांना अनुदान मिळाले पाहिजे. या दृष्टीकोनातून सातत्याने या शाळांमध्ये काम करणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. या सगळयांच्या प्रयत्नामुळे सामाजिक न्याय विभागाने केंद्रीय आश्रमशाळांचा कायम विनाअनुदान शब्द काढून टाकण्याचा महिन्यापूर्वी निर्णय घेतला आहे. कायम हा शब्द काढला, परंतु त्या आश्रमशाळांना अनुदान अद्याप देण्यात आलेले नाही. मागील 10 दिवसापासून शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अनुदान मिळावे म्हणून पुणे येथील संचालक कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. त्यापैकी जवळपास 10 कर्मचा-यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले आहे. त्यामुळे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो की, शासनाने ताबडताब याची दखल घेऊन या केंद्रीय अनुसूचित जाती/जमातीच्या आश्रमशाळांना शासन कधी अनुदान देणार आहे, यासंबंधीची शासनाने ठोस भूमिका जाहीर करावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

श्री.बबनराव पाचपुते : शासनाने दखल घेतली आहे.

-----

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी एका गंभीर बाबीकडे औचित्याच्या मुद्याद्वारे सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र राज्यात 2007 मध्ये महामार्गावर 10735 अपघाती मृत्यू होणे, 2008 मध्ये 12490 पर्यंत ही संख्या पोहोचणे, तसेच 2008 मध्ये 75520 अपघातांची दप्तरी नोंद होणे, अपघाताच्या संख्येत सुमारे 15 टक्क्यांनी वाढ होणे, याबाबत नियमांचे पालन न करणे, दारु पिऊन वाहन चालविणे, रस्त्यांची दुरावस्था असणे, अपघात स्थळी औषधोपचारांचा अभाव अशी विविध कारणे निदर्शनास आली आहेत. या विषयी आपण रोज वर्तमानपत्रातून बातमी वाचतो, टी.व्ही.वर पाहतो, तरीही दुर्घटनांचे प्रकार वाढत आहेत. या अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी योजना आखल्या आहेत परंतु त्याची ठोसपणे अंमलबजावणी शासनातर्फे करण्यात येत नाही. म्हणून या औचित्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. यावर शासनाने ठोस उपाययोजना करुन याबाबत ताबडतोब निर्णय घ्यावा.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ SBT/

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शिक्षण प्रकल्पांतर्गत बिहार राज्यात मोठया प्रमाणावर जागा भरल्या गेल्या आहेत. या पदांवर बोगस पदवीधारक उमेदवारांची नियुक्ती झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आणि बिहार मंत्रालयाने बोगस महाविद्यालयांची व विद्यापीठांची यादी प्रसिध्द केली आहे. त्या यादीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे नाव समाविष्ट असल्याची धक्कादायक बातमी बीड मधून प्रसिध्द होणा-या 'लोकाशा' या दैनिकात छापून आली आहे. बीड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य श्री.सलीम जहांगीर याबाबत विद्यापीठाकडे तक्रार केलेली आहे. मी यासंबंधी तारांकित प्रश्न दिला दिला होता. त्याचा क्रमांक 5148 असा होता, हा प्रश्न 32 व्या क्रमांकावर असल्याने तो चर्चेला येऊ शकला नाही. त्या यादीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा उल्लेख असल्यामुळे बिहार सरकारला नोटीस पाठविली आहे. परंतु त्या सरकारला केवळ नोटीस पाठवून समाधान होणार नाही. मराठवाडा व विदर्भातील सुशिक्षित बेरोजगार आहेत त्यांना नोकरीपासून वंचित केले आहे. त्यांचे फॉर्म रद्द केले आहेत. म्हणून मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सरकारला विनंती करते की, शासनाने केंद्र सरकारकडे याचा पाठपुरावा करावा आणि राज्यातील विद्यापीठांची यादी बदलली जावी व सध्याची यादी स्थगित करण्यास भाग पाडावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

(ॲड. उषा दराडे....)

सभापती महोदय, यामुळे मराठवाडा आणि विदर्भावर अन्याय झालेला आहे. आमचीच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राची अस्मिता दुखविण्याचा प्रयत्न झालेला आहे. याबाबतीत ताबडतोबीने न्याय देण्याची गरज आहे. तेव्हा याबाबतीत आपण शासनाला ताबडतोबीने निर्देश द्यावेत अशी मी आपणास विनंती करते.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ आणि संत तुकडोजी महाराज विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठांचे नॅशनल ॲक्रीडेशन कौन्सिलने इन्स्पेक्शन करुन मान्यता दिलेली आहे. असे असताना बिहार मधील लोक आपल्याला अशा प्रकारची वागणूक देणार असतील तर ते योग्य नाही.बिहारमध्ये अनेक छोट्या छोट्या युनिव्हर्सिटीज सुरु झालेल्या आहेत. त्यांच्यावर देखील ताबडतोबीने कारवाई होण्याची गरज आहे. सभापती महोदय, आपण या प्रकरणी शासनास निवेदन करण्यास सांगावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. सुरेश जेथलिया)** : माननीय मंत्री महोदयांनी या औचित्याच्या मुद्याची नोंद घेऊन संबंधित मंत्र्यांना सोमवारी निवेदन करण्यास सांगावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अत्यंत नाजूक आणि महत्वाच्या विषयाच्या संदर्भात माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी त्यांच्या बंगल्या समोरच्या गाडीमध्ये योगिता ठाकरे या अल्पवयीन मुलीच्या झालेल्या मृत्यूच्या संदर्भात स्वत:हून सांगितलेले आहे की या प्रकरणी चौकशी करावी, त्याबाबतीत माझा कोणताही हस्तक्षेप राहाणार नाही असे त्यांनी माननीय गृहमंत्र्यांना सांगितले. आजच्या वर्तमानपत्रामध्ये "वाचाळपणा पुरे चौकशी करा" अशा मथळयाखाली बातमी प्रसिध्द झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी आपली भूमिका मांडून या प्रकरणी संपूर्ण चौकशी करावी असे शासनास सांगितलेले आहे. या घटनेची चौकशी करण्याबाबत मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचने शासनाला डायरेक्शन्स दिलेले आहेत. या मृत्यू प्रकरणी चारवेळा चार वेगवेगळी

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....)

कारण् पोलिसांनी सांगितलेली आहेत. तसेच दरदिवशी मिडियावरुन देखील या मुलीच्या मृत्यूबाबत वेगवेगळी कारणे सांगितली जातात. तेव्हा या प्रकरणी कुठेही शंकेची पाल चुकचुकता कामा नये अशी या संदर्भातील माझी भूमिका आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

"नागपूर येथे योगिता ठाकरे या अल्पवयीन मुलीचा एका राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या मोटारीत मृतदेह आढळून येणे, वेगवेगळे निष्कर्ष काढून या मुलीच्या मृत्यूची योग्य चौकशी न करता आरोपींना पाठीशी घालण्याचा पोलिसांनी प्रयत्न करणे, हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले असता न्यायाधिशांनी पोलिसांच्या तपासावर तीव्र नाराजी व्यक्त करणे,

.....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

चौकशी पूर्ण होण्याआधीच पोलिसांनी वाटेल ते निष्कर्ष काढून वृत्तपत्रांना तशी माहिती देणे, याबाबत न्यायाधिशांनी पोलिसांच्या तपासावर नाराजी प्रकट करणे, ज्या गाडीत लहान मुलीचा मृतदेह आढळॅन आला त्या गाडीची पूर्ण चौकशी न करणे, तसेच या गाडीचे दरवाजे कुलुपबंद असताना ती मुलगी त्या गाडीत गेली कशी याचा तपास न करणे, हे प्रकरण पोलिसांनी सुरुवातीपासूनच गलथानपणा व निष्काळजीपणे हातळल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणात शासनाने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी व शिष्टमंडळानी शासनाकडे करणे, या बाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई" असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.सभापती महोदय, याबाबतीत शासनाला निवेदन करण्यासबंधी निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय श्री.नितीन गडकरी हे आमच्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. ज्या दिवशी यासंदर्भात सभागृहात उपस्थित झाला होता, त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या घटनेच्या अनुषंगाने विवरण केलेले आहे. त्यांनी स्वत: सांगितले की, या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.चौकशी करण्यात यावी किंवा सी.बी.आय.यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी. त्यावेळी माननीय गृह मंत्री उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, या प्रकरणाशी त्यांच्या कुठल्याही प्रकारचा संबंध नाही आणि त्याच बरोबर आवश्यकता भासली तर मी त्याची चौकशी करेन. सन्माननीय सदस्यांनी जो औचित्याचा मुद्दा काढला आहे, त्याला माझा पाठिंबा आहे. ते आमच्या पक्षाचे अध्यक्ष असून ते या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत. म्हणून या औचित्याच्या मुद्द्याला माझा पूर्णपणे पाठिंबा आहे. मी या सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, यासंदर्भात जी कोर्टात रिट पिटशन दाखल झाले आहे, त्यासंदर्भात कोर्टात ते स्वत: उभे राहणार आहेत. त्यांनी वारंवार सांगितले आहे की, या प्रकरणाची कोणत्याही स्तरावर चौकशी करण्यात यावी. या प्रकरणाच्या बाबतीत बऱ्याच दिवसापासून ब्लॅकमेलींगचे काम चालले आहे. त्यामुळे कुठल्याही माणसाला मनस्ताप होतो. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याचा मुद्याला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

माझा पाठिंबा आहे. या प्रकरणाची कोणत्याही स्तरावरुन तात्काळ चौकशी करण्यात यावी आणि या प्रकरणाच्या अनुषंगाने एक संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे ते दूर करुन खरे आरोपी पकडा.

**तालिका सभापती ( श्री.सुरेश जेथलिया )** :यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा प्रश्न उपस्थित करु इच्छिते. सिडकोने नवी मुंबई निर्माण करण्यासाठी जमीन संपादित केल्यानंतर त्या जमिनीवर वसाहती निर्माण केल्या. त्याचप्रमाणे एम.आय.डी.सी.ने सुध्दा प्रकल्पग्रस्तांसाठी जमिनी घेतल्या होत्या. या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, नवीन मुंबईमध्ये कुकशेत हे एकमेव गाव होते. एम.आय.डी.सी.ने कुकशेत गावाचे नेरुळ येथे नवीन कुकशेत गाव निर्माण करुन पुर्नवसन केले आहे. या कुकशेत गावातील लोकांचे पुर्नवसन करुन अनेक वर्षे होऊन गेली आहेत. परंतु त्या गावाला अद्याप स्मशानभूमी उपलब्ध करुन दिलेली नाही. प्राथमिक शाळेची सोय उपलब्ध करुन दिलेली नाही. नागरिकांना ज्या सोयी सुविधा मिळतात, त्यातील कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या गेलेल्या नाहीत. ज्या ठिकाणी या गावाचे पुर्नवसन करण्यात आले आहे, त्या ठिकाणी एम.आय.डी.सी.ने वेगवेगळया प्रयोजनासाठी भूखंड आरक्षित केले आहेत. परंतु त्या प्रकल्पग्रस्तांना अजूनपर्यंत कोणत्याही प्रकारची सुविधा दिल्या गेल्या नाहीत. कुकशेत गावातील पुर्नवसित गावक-यांना जो प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात आला आहे. वास्तविक हे लोक भूमिपुत्र असून त्यांना शहरी भागाप्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात आला आहे त्यामुळे अनेक वर्षापासून अन्याय होतो आहे आणि त्यामुळे ते भूमिपुत्र प्रॉपर्टी टॅक्स भरत नाहीत. भूमिपुत्रांचे असे म्हणणे आहे की, आमचे पूर्ण गावठाण उचलून आमचे पूर्णपणे स्थलांतर केलेले आहे. आमचे पुर्नवसन करताना आम्हाला साडेबारा टक्क्याचा देखील फायदा झाला नाही. आमच्या जमिनी सरकारने मोफत घेतल्या आहेत. त्या प्रकल्पग्रस्तांना फक्त एक-एक गुंठा प्लॉट देण्यात आला. कुकशेत गावातील पुर्नवसित प्रकल्पग्रस्तांना गावठाणाप्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात यावा व त्या अनुषंगाने शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशा प्रकारची मी शासनाला विनंती करते.

3...



ABG/ MAP/ SBT/ प्रथम श्री.शिगम 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**

**उपसभापती** :यानंतर सन्माननीय सदस्या श्री.सय्यद पाशा यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सय्यद पाशा : सभापती महोदय, बीड जिल्हयातील केज तालुक्यात ग्रामपंचायतीची नगरपालिका झाली पाहिजे म्हणून 1 तारखे पासून 10 तारखेपर्यंत तेथील लोकांनी साखळी उपोषण सुरु केलेले आहे. याबाबतीत रास्ता रोको आंदोलन सुध्दा झाले आहे. तेथील परिस्थिती अशी आहे की, 10 तारखे पासून 9-19 लोक आमरण उपोषणाला बसले आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. लोकभावनेचा आदर व्हावा, तेथील लोकांची जी भूमिका आहे, त्या भूमिकेकडे शासनाने गांभीर्याने पहावे अशी मी औचित्याच्या मुद्दयाव्दारे विनंती करतो.

------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "शासनाच्या नियमाप्रमाणे लॉटरी मालकांना प्रत्येक दिवशी फक्त 6 ड्रॉ उघडण्याची परवानगी देण्यात आली असतांनाही या नियमाचे उल्लंघन करुन लॉटरीच्या मालकांकडून दररोज 16 ड्रॉ काढण्यात येत असून त्यात शासनाचे कोट्यावधी रुपयांचे महसुलाचे होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे दादर येथील निवासस्थान हे ऐतिहासिक वास्तू व्हावे यासाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येऊन उच्च न्यायालयाने याबाबत 12 आठवड्यात निर्णय घ्यावा असे स्पष्ट आदेश देऊनही त्याबाबत कारवाई न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात 23 शाळा अनधिकृत म्हणून घोषित केल्या असून सदर शाळा बंद न केल्याने हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "चोंडी विकास प्रकल्पांतर्गत अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थानाचा विकास करणेसाठी नोव्हेंबर, 2008 मध्ये सुमारे 3 कोटी 33 लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर होऊनही त्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**........

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "दि.9 जून, 2009 रोजी अंबरनाथ येथील आठ वर्षीय शालेय विद्यार्थीनीचे अपहरण करुन तिचा बलात्कार करुन नंतर तिची निर्घृण हत्या करुन हत्येचा पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह आरोपीने शिव मंदिरात फेकून देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत राज्याला देशातील सर्वाधिक म्हणजे 77 प्रकल्पांसाठी 11,510 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येऊनही या मंजूर प्रकल्पांपैकी फक्त एकच प्रकल्प पूर्ण होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "नवी मुंबईचे उपमहापौर यांच्या मालकीच्या हॉटेल इंडजमधील सुरक्षा रक्षकाने दि.11.6.2009 च्या सुमारास चोरी केल्याच्या संशयावरुन दोन अल्पवयीन मुलांना दोरखंडाने विजेच्या खांबाला बांधून मुलांवर अत्याचार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री यांनी "केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "राज्यातील शेतकऱ्यांच्या नावे असलेल्या शेतजमिनी विविध योजनांकरिता शासनाने संपादित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब यांनी "अंधेरी पश्चिम, मुंबई येथील एसआरए योजनेत अपात्र ठरलेल्या झोपडपट्टीधारकांना निष्कासित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर झोपडपट्टीतील समाजकंटकांकडून दगडफेक होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**........

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "सोनपरी डॉल या फसव्या योजनेतून सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्हयातील 25 हजारापेक्षा जास्त गरीब महिलांची फसवणूक करण्यात येऊन सांगलीच्या नगरसेविका सुवर्णा पाटील यांच्यासह लुटारु टोळीने गेल्या वर्षभरात केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "दि.6 जून, 2009 रोजी सांगोला, जि.सोलापूर येथील श्री.प्रमोद बनसोडे यांचे दुकान व घर जमीनदोस्त करुन व त्यांना ठार मारण्याची धमकी देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबईत नाक्या-नाक्यावर पोलीस चौक्या बांधण्यात येणे, परंतु सदर पोलीस चौक्यांमध्ये पोलीस उपलब्ध नसल्याने जनतेला संकट काळात तात्काळ पोलिसांची मदत मिळणे अशक्य होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "सरदार सरोवर प्रकल्प बाधितांसाठी खरेदी करण्यात आलेल्या एकूण 4200 हेक्टर जमिनीपैकी 350 हेक्टर खराब जमीन व उर्वरित 899.20 हेक्टर जमिनीवरील पुनर्वसनाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "अखिल भारतीय विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेताना त्यांची मान्यता व इतर सोयी सुविधा युजीसीच्या नियमाप्रमाणे आहेत किंवा नाही हे तपासूनच त्यात प्रवेश घेण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4.



**उपसभापती**........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी "एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून या योजनेसाठी केंद्राने कोट्यावधी रुपये राज्य शासनाला देऊनही अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयांमध्ये सदर योजनेवर कुठलाही निधी न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

आता सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 2.27 ते 3.00 मध्यंतर)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सभागृहात एकही माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत.....

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 3.15 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( 3.01 ते 3.15 बैठक स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याचा मुद्दा

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, काल मी औचित्यांचा मुद्दा उपस्थित केला होता व त्यासंदर्भात आपण निर्णयही दिला होता. काल आपण असे निदेश दिले होते की, "श्री. राहुल घुले यांना आजच्या आज कामावर परत घ्यावे,त्यांना जे तात्काळ सेवामुक्त करण्याचे आदेश दिले होते ते रद्द करावेत तसेच या आदेशाची आजच अंमलबजावणी करावी" असे आदेश दिले होते परंतु आपण दिलेले आदेश अजूनपर्यंत गेलेले दिसत नाही. आपल्या आदेशानुसार कार्यवाही झालेली नसल्यामुळे श्री. धुले यांच्या सेवेत खंड पडलेलाच आहे. त्यामुळे यासंदर्भात तातडीने संबंधितांना समज द्यावी कारण आपले आदेश कम्युनिकेट झाले की, नाही याची माहिती मिळत नाही.

सभापती महोदय, तसेच आझाद मैदान येथे कायम विनाअनुदानाच्या विरोधोत गेल्या काही दिवसापासून शिक्षक बेमुदत उपोषणाला बसलेले आहेत. त्या ठिकाणी पोलिसांनी लाठीमार केल्याची बातमी आम्हाला मिळालेली आहे. पोलिसांच्या लाठीमारात अनेक शिक्षकांना लागलेले आहे. सरकारने शिक्षकांचा फार काळ अंत पाहू नये. त्यामुळे शासनाने याबाबतची वस्तुस्थिती सभागृहाला द्यावी आणि कायम विनाअनुदानाच्या बाबत शासन कधी निर्णय घेणार आहे व तो निर्णय या सभागृहात कधी जाहीर केला जाणार आहे ? तसेच आझाद मैदानावर नेमके काय घडले याचीही माहिती मंत्रीमहोदयांनी द्यावी.

श्री. नितीन राऊत : निवेदन केले जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यामुळे शिक्षकांच्या संदर्भात माननीय शिक्षणमंत्र्यांनी आपले विचार मांडावेत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर शिक्षकांच्या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल.माननीय मुख्यमंत्र्यांनी यांसदर्भात माहिती दिलेली असल्यामुळे यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे जाणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात जे आश्वासन दिलेले आहे त्या आश्वासनाप्रमाणेच पूर्तता होईल.

...2..

**<u>नियम 93 च्या निवेदनाबाबत</u>**

**उपसभापती** : आजच्या कामकाजात दाखविण्यात आलेल्या नियम 93 अन्वयेची निवेदने उद्याच्या कामकाजात घेण्यात येतील.

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्या बाबत.</u>**

**उपसभापती** : आजच्या लक्षेवधी सूचना क्रमांक एक च्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. राणा जगजितसिंह पाटील यांनी ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्याच्या संदर्भात विनंती केली आहे त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक एक नंतर घेण्यात येईल. त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक 2 वर चर्चा घेण्यात येईल.

-------

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील खाजगी / अशासकीय प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) अधिनियम, 1977 व नियमावली 81 मधील तरतुदी लागू करणे.

**मु. शी.** : राज्यातील खाजगी / अशासकीय प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) अधिनियम, 1977 व नियमावली 81 मधील तरतुदी लागू करणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, भगवान साळुंखे, विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील खाजगी/अशासकीय प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ मधील तरतुदी लागू असणे, नियमावली मधील तरतुदीनुसार आरक्षणाची टक्केवारी पूर्ण करणे बंधनकारक असणे, कलम ५ (१) प्रमाणे नवीन नियुक्ती करण्यापूर्वी अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी असल्यास त्यांना सामावून घेणे बंधनकारक असणे, अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतरांना सामावून घेतल्याने मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची संधी न मिळणे, नवीन पद निर्माण झाल्यानंतर नियुक्तीसाठी अनुशेषाच्या कारणास्तव जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडून मान्यता न मिळणे, अनुशेषाच्या पदांवर अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेतल्याने आरक्षणाची टक्केवारी कमी करण्याची आवश्यकता शासनाने विचारात न घेणे, अनेक संस्थांमध्ये खुल्या प्रवर्गातील शिक्षकांना मान्यता न मिळणे, मान्यता न मिळाल्याने शिक्षकांना वेतन व भत्ते न मिळणे, त्यामुळे त्या शिक्षकांचे जीवन उध्वस्त होणे, संस्थाचालकांनी अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेतलेल्या संख्येइतका अनुशेष कमी करण्याची मागणी करणे, याप्रकरणी शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी व्यस्थापक मंडळामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.
"

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथं मोते :सभापती महोदय,राज्यातील अनुदानित शिाळांमधील अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेण्यासंबंधी ज्या काही समस्या निर्माण होतात त्यासाबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. शासनाने 1977 साली कायदा मंजूर केला आहे आणि त्या काद्यातील कलम 5(1) मध्ये स्पष्टपणे असे सांगितलेले आहे की,एखाद्या शाळेत कायम स्वरुपी रिक्त पद झाल्यास त्या पदावर ज्या व्यक्तीची नेमणूक करावयाची आहे ती नेमणूक करण्यापूर्वी संबंधित संस्थेने जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पत्र पाठवून अतिरिक्त शिक्षकांची यादी त्यांच्याकडे असेल तर त्यातील अतिरिक्त शिक्षक भरण्याचे बंधन संबंधित संस्था चालकांवर आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती अधिनियम 1977 आणि नियमावली 1981 मधील नियम क्रमांक 9(7) मधील तरतुदीनुसार प्रत्येक शाळांमध्ये मागासावर्गीयासाठी 52 टक्के आरक्षण भरणे आवश्यक आहे पूर्वी 34 टक्के आरक्षण होते परंतु त्यामध्ये शासनाने सुधारणा केलेली असल्यामुळे आता मागासवर्गीयासाठी 52 टक्के आरक्षण ठरविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक शाळांमध्ये मागासवर्गीयासाठी 52 टक्के आरक्षण त्या संस्था चालकांनी ठेवणे बंधनकारक आहे. परंतु अनेक शाळांमध्ये त्याप्रमाणें् आरक्षण पूर्ण केले जात नाही, अनेक शाळांमध्ये मागासवर्गीयांचा अनुशेष असतो काही संस्था चालक तो अनुशेष भरण्याचा प्रयत्नही करीत असतात. परंतु काही भागामध्ये अनुसूचित जमातीचे वा अन्य काही प्रवर्गातील उमेदवार मिळाले नाही तर त्या शाळांमध्ये सबंधित प्रवर्गाचा अनुशेष शिल्लक राहतो .सभापती महोदय, जे अतिरिक्त शिक्षक असतात त्यांना सामावून घेण्याची जबाबदारी सबंधित शाळांवर आणि संस्थावर बंधनकारक असल्यामुळे सबंधित शिक्षणाधिका-याकडून ज्या ज्या वेळेस अतिरिक्त शिक्षक त्या शाळांमध्ये सामावून घेण्यासाठी पाठविले जातात त्या त्या वेळी त्या शाळा त्या शिक्षकांना सामावून घेतात . अतिरिक्त शिक्षक जर तेथे गेला नसता तर कदाचित त्यांनी जाहिरात देऊन वा अन्य काही मार्गाने शिक्षक भरले असते मागासवर्गीयाची पदे भरणे त्यांच्यावर घटनेने बंधनकारक आहे.त्याचबरोबर त्यांच्यावर कायदेशीर बंधनसुध्दा आहे. त्यामधून त्यांना पळवाट काढता येत नाही. त्यांनी आरक्षण पूर्ण केले पाहिजे अशा प्रकारे त्यांच्यावर बंधन असातांना आरक्षित जागेवर खुल्या प्रवर्गातील अतिरिक्त शिक्षक गेल्यामुळे तेथील अनुशेष भरला जात नाही त्यामुळे अनुशेष तसाच शिल्लक राहतो. या निवेदनामध्ये शासनाने असे सांगितले आहे की, " या संदर्भात आम्ही सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करीत

. . .OO 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ...

आहोत." त्या संदर्भात सुवर्णमध्य साधण्यासाठी प्रयत्न करण्याची काहीही आवश्यकता नाही.या संदर्भातील कायदा अत्यंत स्पष्ट आहे. त्यामुळे मला शासनाला एवढेच सांगावयाचे आहे की अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करीत असतांना ज्या शाळामध्ये खुल्या प्रवर्गातील जागा आहेत त्याच शाळेत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे. कारण ज्या शाळेमध्ये अनुशेष आहे त्याच शाळेमध्ये अतिरिक्त शिक्षक जर पाठविला तर अनुशेष तसाच शिल्लक राहतो. त्यामुळे मागासवर्गायाना आरक्षणानुसार नोकरीची जी संधी मिळणार होती ती संधी त्यांना मिळणार नाही. तेव्हा याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेऊन जिल्हा शिक्षणाधिका-यांना सूचना देण्यात येणार आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, या निवेदनामधून शासनाने आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे . त्याचप्रमाणे या संदर्भात घटनात्मक जबाबदारी आहे. आरक्षित जागांच्या संदर्भात प्रचलित पध्दत आहे एखाद्या शिक्षकांची अतिरिक्त जागा झाल्यानतर त्याला बसून आपण वेतन देऊ शकत नाही. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी अशा जागा आहेत त्या जागा भरण्यासंबंधी शिक्षणाधिका-यांना सूचना देण्यात येतात . रोस्टरची पध्दत पाळली गेलीच पाहिजे त्याबाबतीत शासनाची वेगळी भूमिका नाही. सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी सांगितले की, आरक्षित जागेवर खुल्या प्रवर्गातील शिक्षक घेतल्यानंतर अनुशेष वाढत जातो असे काही ठिकाणी लक्षात आलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे तीच भावना शासनाची सुध्दा आहे. हा अनुशेष कसा वाढणार नाही या अनुषंगाने ज्या ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्या करण्याच्या बाबतीत विभागाला आदेश देण्यात येतील .

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, जिन संस्थाओं को अल्पसंख्यक दर्जा है, उनके बारे में मायनोरिटी वेलफेअर डिपार्टमेंट का सरकुलर निकला है कि अल्पसंख्यक शैक्षणिक संस्थाओं पर रोस्टर लागू नहीं होता है. बॉम्बे हाईकोर्ट के 1995 के रिट पिटीशन नं. 489 "Bombay Institution for Deaf and Dumb" versus "Social Welfare Department" के निर्णय के आधार पर यह सरकुलर निकाला गया है. लेकिन मैं माननीय मंत्री महोदय को बताना चाहती हूँ कि उर्दू मीडियम स्कूल के डिवीजन्स के प्रस्ताव डिप्टी डायरेक्टर ने रोक लिए हैं, क्योंकि वहां पर रोस्टर लागू नहीं है. मराठी मीडियम के स्कूल के डिवीजन्स के प्रस्ताव को

. . . OO 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

मान्यता दी गई है, जबकि उर्दू मीडियम के स्कूल के डिवीजन्स के प्रस्ताव रोक लिए गए हैं आर्टिकल 30 के प्रोवीजन के अनुसार अल्पसंख्यक संस्थाओं को खुद चलाने के पूरे अधिकार है. मेरा प्रश्न यह है कि ऐसा सरकुलर होने के बाद उस पर अमल क्यों नहीं हो रहा है ? क्या माननीय मंत्री महोदय इस सरकुलर को लागू करने के लिए अपने अधिकारियों को डायरेक्शन देंगे ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, त्याबाबतीत विधी व न्याय विभागाच्या माध्यमातून या प्रस्तावाची पुनर्तपासणी केली जात आहे. सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की मायनॉरिटीज संस्थांना आरक्षण लागू नाही. विधी व न्यायविभागाकडून अभिप्राय व्यक्त केल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री.कपिल पाटील : माननीय मंत्री महोदयांनी या उत्तरामध्ये जी भूमिका घेतली ती अत्यंत स्वागतार्ह आहे त्याबाबतीत मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. आरक्षित पदांना कोणताही हात न लावण्याची शासनाने भूमिका घेतलेली आहे तसेच जरी कोणी मागणी केलेली असली तरी तशी सवलत देता येणार नाही असे म्हटलेले आहे.

नंतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

यामधील मुख्य प्रश्न असा आहे की, रिक्त होणाऱ्या जागांवर अतिरिक्त शिक्षकांची नेमणूक करुन मुंबईमध्ये काही प्रमाणात आम्ही हा प्रश्न सोडवू शकलो. यामध्ये अडचण अशी आहे की, एक विद्यार्थी कमी झाला तरी एक तुकडी कमी होते. म्हणजे 69 विद्यार्थी झाले तर तुकडी कमी होते. कारण 71 पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असेल तर नवीन तुकडीला मान्यता दिली जाते. त्यामुळे एक विद्यार्थी कमी झाल्यानंतर ती तुकडी कमी होते व तो शिक्षक अतिरिक्त ठरतो. काही मोठया शाळांमध्ये प्रत्येक तुकडीमध्ये 70 ते 80 विद्यार्थी आहेत. आणि काही शाळांमध्ये विद्यार्थी संख्या किमान त्यांना जेमतेम संभाळता येईल इतकी आहे. त्यामुळे विद्यार्थी संख्येची मर्यादा ही कमीत कमी संख्येची असली पाहिजे असे यापूर्वीचे धोरण होते. ते आपल्याला पाळता येत नाही हे खरे असले तरी तुम्ही तुकडीची मर्यादा 70 पर्यंत नेऊन ठेवली आहे. ती कमी केली तर अनेक शिक्षक त्या शाळांमध्ये सामावले जातील व त्याचबरोबर कुणीही शिक्षक अतिरिक्त ठरणार नाही. वर्ग मोकळा होऊन अध्यापनाला मोकळीक मिळेल. त्यामुळे तुकडीची मर्यादा ही 70 न ठेवता 50 विद्यार्थ्यांनंतर 51 विद्यार्थी किंवा 60 विद्यार्थ्यांसाठी तुकडी दिली तरी हा प्रश्न सुटेल. त्यामुळे ज्या शाळामध्ये अतिरिक्त शिक्षक झाल्यामुळे शासनावर पडणाऱ्या बोजामुळे निर्माण होणारे प्रश्न मिटतील. यासाठी आपण ही उपाय योजना करणार काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. याबाबतीत शासनाचे प्रचलित धोरण आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, विद्यार्थी संख्येअभावी जर एखादी तुकडी कमी होत असेल तर तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त होतात. त्यामुळे दुसऱ्या वर्षी त्या पदांचे समायोजन करण्याची प्रक्रिया करावयाची असते. याचे पालन शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांच्याकडून काटेकोरपणे होत नाही. अकोला जिल्हयामध्ये 126 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अजूनही अतिरिक्त आहेत. संचालकांनी वारंवार आदेश देऊनही त्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे गेल्या चार-पाच वर्षापासून समायोजन करण्यात आले नाही. तेव्हा ते समायोजन तातडीने करणार काय? असल्यास केव्हा करणार?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय गंभीर आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे अनुदानित व वेतनेतर अनुदानित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...
शाळांमधील शिक्षकांचे समायोजन होत नाही, त्यांना घरी बसून रहावे लागते. याबाबत निश्चितपणे दखल घेऊन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होतांना या शिक्षकांचे समायोजन करुन त्यांची नेमणूक केली जाईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नगरपरिषद, उमरखेड आणि इतर नगरपरिषदांमध्ये काही शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्यांनी मागणी देखील केलेली असून अजूनही अकोला जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना तेथे पाठविण्यात आलेले नाही. याबाबतीत काय करणार आहात ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, मी सांगितले की, आम्ही याची गंभीर दखल घेतलेली आहे आणि जर शिक्षण अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा होत असेल तर जरुर याची चौकशी करु.आता जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरु होत आहे. त्यामुळे आम्ही आजच आदेश पाठवितो की, ज्या-ज्या शाळेची, ज्या-ज्या नगरपालिकेची मागणी असेल , तेथे त्यांचे समायोजन करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे. आपल्याकडे असा कायदा आहे की, एखादा कर्मचारी कायम झालेला असेल आणि तो जर अतिरिक्त ठरला तर, त्याला कामावर घेता येत नसले तरी, तो कायम झालेला असल्यामुळे त्याचे वेतन सुरु रहाते. अनेक शिक्षण अधिकारी महोदय जागा असताना सुध्दा अतिरिक्त असलेल्या शिक्षकांचे समायोजन केले जात नाही. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. अशा वेळी भविष्यकाळामध्ये या शिक्षकांना तेथे सामावून घेणार आहात काय ? हा माझा पहिला महत्वाचा प्रश्न आहे. तसेच शिक्षक कर्मचारी हे अतिरिक्त का होतात ? या प्रश्नाचे देखील माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, या संदर्भात दिवसेंदिवस प्रश्न जटील होत जाणार आहे. आता शिक्षणाचे माध्यम बदलल्यामुळे सुध्दा विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली की मग अतिरिक्त शिक्षकांचे प्रश्न तयार होतात. याबाबतीत शासनाला निश्चित असे धोरण करावे लागणार आहे. सन्माननीय सदस्यांच्या अशा भावना आहेत. आमच्या दृष्टीने जवळजवळ 280 वर शिक्षक अतिरिक्त असल्याचे दिसत आहेत की, ज्यांचे समायोजन करण्याची जबाबदारी शासनावर आहे. या शैक्षणिक वर्षापासून शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अशी कोणतीही त्रुटी ठेवलेली नाही की, जेणेकरुन शिक्षक घरी बसलेले आहेत. कारण शिक्षक कायम झाल्यानंतर शासनाला पगार द्यावाच लागतो. म्हणून यामध्ये शासनाची वेगळी अशी भूमिका नाही. सगळया शिक्षकांना ज्या-ज्या ठिकाणी सामावून घेणे शक्य आहे, त्याठिकाणी आपण कार्यवाही करीत आहोत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनावर आर्थिक बोजा पडणार नाही अशा प्रकारचा

. . . .2 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा प्रश्न आहे. याठिकाणी कायद्याच्या तरतुदीनुसार फक्त प्रशासनाने योग्य ते आदेश देण्याची आवश्यकता आहे. म्हणून माझा अगदी पॉईंटेड प्रश्न आहे की, हा संघर्ष टाळण्यासाठी किंवा अशा प्रकारच्या समस्या दूर करण्यासाठी आपण सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना तातडीने आदेश द्यावयास पाहिजेत की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना ज्या शाळेमध्ये अनुशेष आहे, त्या शाळेमध्ये अनुशेषाच्या जागेवर कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त शिक्षकाचे, खुल्या प्रवर्गातील शिक्षकांचे समायोजन करण्यात येणार नाही. तसेच ज्याठिकाणी खुल्या प्रवर्गातील जागा आहेत, त्याच शाळांमध्ये या शिक्षकांचे समायोजन केले जाईल आणि तसे करण्यात यावे असे आदेश आपण तातडीने देणार आहत काय ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, आपल्याकडे अतिरिक्त जागा आहेत, शिक्षक अतिरिक्त झालेले आहेत. ज्याठिकाणी अनुशेष आहे, तेथे खुल्या प्रवर्गातील जागा भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

श्री.रामनाथ मोते (खाली बसून) : तशा प्रकारे शिक्षकांना पाठविण्यात येते.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, जागा रिक्त आहे म्हणून शिक्षकाला कुठेतरी सामावून घ्यावयाचे म्हणून शिक्षकाला तेथे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याबाबतीत शासन जरुर निश्चितपणे याची दखल घेईल आणि आम्ही विभागाला याबाबतीत सूचना देऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला अजून या सदनामध्ये कसल्या-कसल्या चर्चा होतात हे कळलेले नाही. याठिकाणी विद्यार्थ्यांच्या गळतीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित होतो की, विद्यार्थ्यांची गळती थांबविली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, 70 विद्यार्थ्यांची संख्या 69 वर आल्यानंतर शिक्षक कमी होतो. मग तो शिक्षक एक विद्यार्थी आणत का नाही ? दहा घरी जावयाचे, जे अशिक्षित आहेत, गरीब आहेत, त्यांच्या घरी जाऊन सांगितले पाहिजे की, तुमच्या मुलाने शिकणे गरजेचे आहे. मी मघापासून ऐकत आहे की, तुकडया कमी होतात म्हणून शिक्षक अतिरिक्ति होतात. पण विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही वानवा आहे काय ? मी सर्व जिल्हयांमध्ये फिरत असतो, तुम्ही देखील फिरत असता.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अशी काय वानवा आहे? मी सगळया जिल्हयात फिरतो तुम्हीही फिरता अशी वानवा नाही की, मुले मिळत नाहीत. किमान पगार मिळावेत यासाठी तरी शिक्षकांनी त्या गावात फिरावे आणि शिक्षणासाठी दोन मुलांना घेऊन यावे. अशा प्रकारे शिक्षकांनी तुकडी सांभाळली तर त्यांची नोकरी सांभाळली जाईल.

( काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात )

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून माझा हरकतीचा मुद्दा आहे. शिक्षकांचा अवमान करणारे वक्तृत्व रेकॉर्डवरु काढले पाहिजे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शिक्षकाच्या उच्च परंपरेचा हा अवमान आहे..

श्री. दिवाकर रावते : श्री. जितेंद्र आव्हाड प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहात उपस्थित नसतात. आणि आता याठिकाणी प्रश्न विचारतात .

श्री. कपिल पाटील :सभापती महोदय, आदरणीय रावते साहेबांनी माहितीच्या अभावी चुकीचे काही बोलू नये याचा खुलासा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यातून शिक्षकांचा अवमान होतोच पण त्याचबरोबर वर्गामध्ये किती विद्यार्थी हवेत? ज्यांची मुले कॉन्व्हेंन्ट, आय.सी.सी. आणि स्कॉटिश शाळांमध्ये शिकतात त्यांच्या बाबतीत हा प्रश्न नाही. त्या ठिकाणी शिक्षकांसमोर पंचवीस विद्यार्थी असतात त्यांच्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलत असतील तर ते ठीक आहे. पण गरीब विद्यार्थी कोंडवाडयागत, जनावरागत, छोटयाशा खोलीमध्ये 70 ते 80 बसत असतात आणि शिक्षक वर्गाच्या एका टोकावरुन ओरडून शिकवत असतो, त्यामुळे त्या मुलांच्या शिक्षणावर मोठा परिणाम होत असतो. जगामध्ये कोठेही इतके विद्यार्थी एका वर्गात नाहीत. त्यामुळे मी मुद्दा मांडला की, ही विद्यार्थी संख्या कमी करण्याची आवश्यकता आहे. एक विद्यार्थी कमी झाला की, एक शिक्षक अतिरिक्त होतो. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

SMT/ KGS/ ST/

**उपसभापती** : या लक्षवेधीच्या अनुषंगाने शिक्षक हा निश्चितपणे समाजातील आदरणीय असा घटक आहे. पुढच्या पिढीचा तो शिल्पकार आहे असे आपण मानतो, एवढा आदर आपणा सर्वांना शिक्षकांबद्दल आहे. परंतु ज्या समाजाचे उत्तरदायीत्व घेऊन आपण सगळेचजण पुढे जात असतो. आपण लोकप्रतिनिधी आहात. मी सुध्दा लोकप्रतिनिधी आहे.सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखांना मी सांगू इच्छितो की, माझी देखील एक खंत आहे. मी स्वत: महानगरपालिकेच्या मराठी शाळा नंबर 3, ठाणे या शाळेत शिकलेला विद्यार्थी आहे. या ठिकाणी प्रामुख्याने शिक्षक वर्गाला मला एक गोष्ट मुद्दाम सांगावयाची आहे की, आपण कुठल्याही महापालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचा कारभार बघावा. महापालिकेच्या शाळांमध्ये शिकवणारा शिक्षक, नगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकविणारा शिक्षक किंवा जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिकविणारा शिक्षक पाहिला तर ग्रामीण भागातील शिक्षकांच्या बाबतीत मी समजू शकतो की, त्या ठिकाणी शिक्षक खरोखरच समर्पित भावनेने काम करतात. परंतु शहरी भागामध्ये आम्ही स्वत: अनुभवले आणि स्वत: पाहिले आहे. शहरी भागातील या संस्थांमध्ये जे शिक्षक काम करतात, हे शिक्षक शाळेमध्ये शिकवायचे सोडून शिक्षण मंडळाच्या कार्यालयात आपापल्या मागण्या मान्य करुन घ्यायला सदैव उपस्थित असतात. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख साहेबांना मी सागू इच्छितो आणि मी जे सांगणार आहे ते आपण तपासून पहावे. माझे म्हणणे खोटे असेल तर आपण द्याल ती शिक्षा मी भोगायला मी तयार आहे. मी या ठिकाणी ठाण्याचे उदाहरण देईन. तीन-तीन, चार-चार कोटी रुपये खर्च करुन या ठिकाणी शाळा बांधलेल्या आहेत. श्री. सतिश प्रधान महापौर असताना देखील त्यांनी मोठ-मोठया शाळा बांधल्या आहेत. अपल्याला कल्पना नसेल की, खाजगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षकांना जो पगार मिळतो त्याच्यापेक्षा जवळपास दीडपट ते दुप्पट पगार या शाळेतील शिक्षकांना मिळतो. परंतु शिक्षणाचे पवित्र कार्य त्याठिकाणी पार पाडण्याऐवजी ही सगळी मंडळी, गुलहौसी मंडळी आहेत. त्याला थोडेफार आम्ही देखील जबाबदार आहोत कारण आम्ही जेव्हा शिक्षकांची भरती करतो तेव्हा त्या ठिकाणी सगळे वशिल्याचे तट्टू भरले जातात. मी ठाण्याचा महापौर झालो त्यावेळी शाळांचा निकाल 2 ते 5 टक्के इतका भयानक लागला होता.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** .....

मी त्या आसनावर एप्रिल महिन्यामध्ये बसलो. परीक्षा मार्चमध्ये होऊन गेल्या होत्या. त्यानंतर विशेष महासभा झाली. जी खंत मी आता बोलून दाखवली ती खंत तत्कालीन महापौरांनी बोलून दाखविली होती. त्यांनी जवळपास दीड ते दोन तास त्यावर भाषण केले आणि त्यांनी सांगितले की, याला आपण जबाबदार आहोत. त्यांनी असे म्हटल्यानंतर मी त्यांना म्हणालो की, प्रधान साहेब, मला आपली व्यथा कळली तसेच आपण जे मांडले ते सर्व मला मान्य आहे परंतु आपण दोन तास यावर जे भाषण केले तेवढा काळ आपण यावर काम केले असते तर हे बोलण्याची परिस्थिती आपल्यावर आणि हे ऐकण्याची परिस्थिती माझ्यावर आली नसती. आज या ठिकाणी शिक्षकवर्गाला माझी हात जोडून विनंती आहे. गोरगरिबांची मुले त्या शाळांमध्ये शिकत असतात. आजकाल ज्यावेळी आपण खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी जातो तेव्हा दहा हजार, वीस हजार, पंचवीस हजार रुपये डोनेशन द्यावे लागते. त्या शाळांनाही मी दोष देऊ इच्छित नाही. कारण त्यांचा मेन्टेनन्सचा खर्चही तेवढाच असतो. पण या ठिकाणी जेव्हा शिक्षकवर्ग आपल्या मागण्यांसाठी इतक्या जोराने आणि अट्टहासाने सगळे बोलत असतो, आपल्या या सगळ्या बंधुंना आणि भगिनींना माझी विनंती आहे तसेच आपणही नक्की विनंती करावी की, आपण ज्या एका कार्यासाठी त्या ठिकाणी जातो, जे पिढी घडविण्याचे काम करीत असतो, त्या गोरगरिबांच्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांना चांगले शिक्षण मिळावे याकरिता कमीतकमी आपण सर्वजण प्रयत्नशील राहावे. या ठिकाणी आपण ज्या आपल्या सर्व संकल्पना मांडतो त्या मूर्त स्वरुपात साकार व्हावयाच्या असतील तर त्यांनी देखील त्यांच्या पेशाशी, त्यांच्या कामाशी प्रामाणिक राहिले पाहिजे. असे माझे आजच्या चर्चेच्या निमित्ताने सांगणे आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण जी भावना व्यक्त केली त्या भावनेचा आम्ही मनापासून आदर करतो. गरिबांच्या शिक्षणावर होणारे जे हल्ले आहेत त्यातील एक अतिषय जिव्हाळ्याचा विषय आपण मांडला. खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी असे म्हटले होते की, एखादा मुलगा जर कमी पडतो तेव्हा शिक्षकाच्या शिकविण्यामुळे आणि त्याचे एकंदर त्या गावामध्ये जे वजन असते त्यामुळे त्यांना एखाददुसरा मुलगा मिळविणे ही गोष्ट काही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख .....

कठीण नाही. सन्माननीय सदस्यानी 69-70 हा जो उल्लेख केला तो त्या अर्थाने आपण घेऊ नका. आपण त्या ठिकाणी जर अनुदानित किंवा कायम विनाअनुदानितच्या दोन तीन शाळा देऊन टाकल्या तर इतकी मुले ते कोठून पैदा करणार, हे आपण लक्षात घ्यावे. एका गावात किती मुले पैदा होणार. शेवटी जी मुले आहेत त्यातूनच आणावी लागतील. तेव्हा 69-70 च्या बाबतीत त्यांचे म्हणणे बेसिकली काही चूक नव्हते.

सभापती महोदय, शिक्षकांच्या काम करण्याच्या बाबतीत आपण जे म्हणता त्याबाबत सांगू इच्छितो की, जर कोणी शिक्षक कुचराई करीत असेल तर तो शिक्षक तर जबाबदार आहेच पण त्याने आपले काम इमानेइतबारे केले पाहिजे हे पाहण्याचे काम ज्यांच्याकडे आहे ते काय करतात ? या प्रश्नाचे उत्तर हा मोठ्या चर्चेचा विषय आहे. त्याचे उत्तर थोडक्यात देता येणार नाही. महापालिकांमध्ये, जिल्हा परिषदांमध्ये काय स्थिती झालेली आहे हे आपल्यालाही माहीत आहे आणि मलाही माहीत आहे. मी आपल्या एका मताला दाद देतो, मनापासून त्या मताचा आदर करतो की, गरिबांच्या शिक्षणाकडे पाहण्याची जी वेगळी दृष्टी झालेली आहे, हे एक साधन झालेले आहे अशा पध्दतीने पाहण्याचा जो भाग आहे तो दुरुस्त होणे, हा तो कॅन्सर दुरुस्त होण्याचा महत्वपूर्ण असा उपाय आहे. अनेक ठिकाणी शिक्षकांचे काही दोष नसतील असे नाही. आपण काही शिक्षकांच्या बाबतीत जे म्हणाला ती धिक्कार करण्यासारखी बाब आहे. आपले काम न करणे ही गोष्ट कोणत्याही शिक्षकाला शोभणारी नाही. पण मी आपल्याला एक सांगतो की आपल्याला फार मोठा अंधार दिसेल. ज्यांच्याकडे ते पाहण्याची जबाबदारी आहे ते हात वर करुन आहेत. कारण ते रात्रभर त्यांच्याकरिता फिरलेले आहेत. मी आपल्या एका मताशी पूर्णपणे सहमती व्यक्त करतो. या लक्षवेधीमध्ये हा विषय येत नाही. हा फार मोठा विषय आहे. गरिबांच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष हा गरिबीची जाणीव असलेल्या कोणत्याही माणसाचे मन विषण्ण करुन टाकणारा विषय आहे.

कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपला पूर्ण आदर राखून सांगतो. मी आपल्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी नेमकेपणाने बोट ठेवलेले आहे. एका बाजूला शाळांची संख्या नको तेवढी वाढविणे आणि दुसऱ्या बाजूला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

इन्स्पेक्शनची सगळी व्यवस्था जाणीवपूर्वक कोलमडून टाकणे असा प्रकार आहे. आपण जे म्हणाला की, ज्या व्यवस्थेमार्फत आपण कारभार पाहतो, पूर्वी जे इन्स्पेक्शन होत होते ते आता होत नाही आणि त्याचा दोष केवळ शिक्षकांवर टाकणे हे अत्यंत गैर आहे. सगळेच बरोबर असतील असे मी म्हणत नाही. दोन चार ठिकाणी चुका होत असतील. पण मुख्य मुद्दा असा आहे की, गरिबांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे की नाही आणि तो अधिकार मागत असताना शेवटी तो प्रश्न शिक्षकांशी निगडित आहे. शिक्षक असल्याशिवाय शाळा चालू शकत नाही. वर्गात जर शिक्षक नसतील तर ते होऊ शकणार नाही. गरिबांच्या मुलांना शंभर मुलांमागे एक शिक्षक आणि श्रीमंतांच्या मुलांना 25 मुलांमागे चार-चार शिक्षक ही पध्दत आपण बदलणार की नाही. त्यासाठी माझा प्रश्न होता. त्याचा गैर अर्थ काढण्यात आला. सन्माननीय सदस्यांचा तो उद्देश नाही हे मला माहीत आहे. पण केवळ दोन-तीन लोकांवर बोट ठेऊन आपण सबंध शिक्षकवर्गाला दोषी ठरवितो ही पध्दत काही बरोबर नाही.

**उपसभापती** : यांनतर अनुक्रमांक 1 वरील लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ यापूर्वी श्री.बरवड 15:45

**पृ. शी.** : पैठण, अंबड व गेवराई या तालुक्यांच्या हद्दीतील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळूचा होत असलेला उपसा.

**मु. शी.** : पैठण, अंबड व गेवराई या तालुक्यांच्या हद्दीतील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळूचा होत असलेला उपसा यासंबंधी सर्वश्री सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, श्रीमती उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुरेश जेथलिया ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

मराठवाड्यातील पैठण, अंबड व गेवराई या तालुक्यांच्या हद्दीतील गोदावरी नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा अवैधरित्या सुरु असणे, तेथील महसूल प्रशासनाच्या अर्थपूर्ण सहकार्यामुळे गोदावरी नदीच्या पात्रातून राजरोसपणे वाळूची होत असलेली तस्करी, वाळू तस्करीला स्थानिक नागरिकांनी विरोध करणे, परंतु वाळू व्यापारी त्यांना धमक्या देत असणे, दररोज किमान पाचशे ट्रक्स व तीनशे ट्रॅक्टर भरुन वाळू नेली जात असून वाळू गुत्तेदार परवान्यापेक्षा अधिक वाळूचा उपसा करीत असणे, वाळू उपशाकडे संबंधित अधिकारी करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाच्या अटी व शर्तीचे ठेकेदार करीत असलेले उल्लंघन, सदर गोदावरी नदीच्या पात्रातून अनधिकृत व चोरटी वाळू काढण्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून वाळू तस्करीला आळा घालण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य उदासिनता त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता वाळू तस्करीला कडक प्रतिबंध करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मराठवाडयातील पैठण, अंबड, गेवराई त्याचबरोबर परतूर तालुक्यातील दुधना नदीतून बाबुलतारा या गावातून मोठया प्रमाणात वाळूचा अवैधरित्या उपसा होत असून त्यामागे महसूल प्रशासनाच्या सहकार्यामुळे गोदावरी नदीच्या पात्रातून राजरोसपणे तस्करी होत आहे. या नदीच्या पात्रातून 400-500 ट्रक वाळूचा उपसा होतो. सभापती महोदय, नदीच्या पात्रातून किती मर्यादेपर्यंत उपसा केला पाहिजे ते प्रत्येक कंत्राटदाराला लिलावाच्या वेळी ठरवून दिलेले असते. परंतु त्याठिकाणी एवढे मोठे खड्डे पडले आहेत की, त्या खड्डयांना विहिरीचे स्वरुप आले आहे. त्याचप्रमाणे वाळू उपसण्यासाठी वेळ देखील ठरवून दिलेली असते, रात्रीच्या वेळी शेकडो ट्रक वाळूची वाहतूक करतात. या निवेदनात असे नमूद केले आहे की, उपसा करण्यासाठी ग्रामसभेने ठराव दिला पाहिजे. ग्रामसभेला व तलाठयाला व ग्रामसेवकाला मॅनेज करुन हे ठराव झालेले असतात. ग्रामसभेने ठराव केल्यावर वाळूच्या लिलावाचे पैसे ग्रामपंचायतीला दिले तर चोरीचे प्रमाणे कमी होईल आणि ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळेल किंवा शासनाला मिळेल. यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी चौकशी करुन अहवाल दिलेला आहे. त्यांनी वाळूच्या उपशाला स्थगिती दिलेली असताना पुन्हा त्याच कंत्राटदारांना महसूल प्रशासनाने ठेका दिलेला आहे. त्याचे फोटो माझ्याजवळ आहेत. या अवैधरित्या होत असलेल्या वाळूच्या उपशाबाबत शासन कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधीच्या निमित्ताने 3-4 मुद्दे उपस्थित केले आहेत. बीड जिल्हयामध्ये प्रत्येक गावातून वाळूचा उपसा केला जातो अशातील भाग नाही. वाळूचा उपसा करावयाचा असेल तर ग्रामसभेचा ठराव आवश्यक करण्यात आलेला आहे. सध्या मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी परिस्थिती असल्यामुळे असे गैरप्रकार होतात. त्यासाठी वेगळे बोलण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भात महसूल विभागाच्या माध्यमातून निश्चितपणे कारवाई केली जाते. पैठण तालुक्याबाबत बोलावयाचे झाल्यास एप्रिल-मे महिन्यात 49 प्रकरणात दंडात्मक कारवाई केली होती. त्याचप्रमाणे या तालुक्यात 273 ठिकाणी कारवाई केली होती. तसेच दोन लोकांविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. म्हणजे काही प्रमाणात कारवाई चालू आहे. विभागीय आयुक्तांनी याबाबत चौकशी अहवाल दिलेला आहे, परंतु

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील....

सन्माननीय सदस्यांनी स्पेसिपिक तक्रार दिली तर त्याबाबत चौकशी करुन कारवाई केली जाईल. मी यासंदर्भात हे सुध्दा सांगेन की, ऑफसेट प्राईजपेक्षा जास्त किंमत दिलेली आहे. 53 लाख ऐवजी 70 लाख इतकी किंमत मिळाली आहे, पैठणमध्ये 18.5 लाखाऐवजी 20 लाख रुपये मिळाली आहे. सन्माननीय सदस्यांनी रात्रीच्या वेळी मोठया संख्येने ट्रकमधून वाहतूक केली जाते असे त्यांनी म्हटले आहे. उपशाचा लिलाव देताना लेंथ, विड्थ, डेप्थ या तिन्ही गोष्टी ठरविल्या जातात. त्यापेक्षा जास्त वाळूचा उपसा केला तर साहजिकच त्या कंत्राटदारावर कारवाई केली पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राणा जगजितसिंह पाटील....)

माझी सन्माननीय सदस्यांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी स्पेसिफिक तक्रार केल्यानंतर त्याबाबतीत निश्चितपणे व्यवस्थित चौकशी करुन कारवाई केली जाईल.

श्री. किरण पावसकर : बेकायदशीर वाळू उपसा होत असल्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडत असल्यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. महाड तालुक्यातील सावित्री नदीतून बेकायदा वाळूचा उपसा होत आहे. 35 होड्यांना वाळू उपसा करण्याची परवानगी दिलेली असताना 500-500 होड्या वाळूचा उपसा करण्याचे काम करीत आहेत. या बाबतीत तलाठी, मंडल अधिकारी, तहसीलदार, प्रांत अधिकारी या सर्वांकडे तक्रारी करुन देखील काही कारवाई होत नाही. तेव्हा हा बेकायदा वाळू उपसा थांबविण्यासाठी शासन कोणती ठोस भूमिका घेणार आहे ? वसई, मीरारोड, महाड या ठिकाणी वाळू काढण्यासाठी टेंडर मागविले जातात आणि ही टेंडर प्रक्रिया पुन्हा थांबविली जाते. परंतु वाळू काढणे थांबविले जात नाही. ज्या प्रमाणे जमिनीच्या बाबतीत माफीयांचा प्रभाव वाढत चाललेला आहे त्याप्रमाणे वाळूच्या बाबतीत देखील काही गॅंगस्टर्स कामाला लागले आहेत. तेव्हा या वाळूपासून शासनाला करोडो रुपयाचा महसूल मिळावा यासाठी शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : वाळूची तस्करी केली जाते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यादृष्टीने उपाययोजना करण्याचे प्रयत्न चालू आहेत. सन्माननीय सदस्यांनी महाड येथील सावित्री नदीचे उदाहरण दिले. त्याबाबतीत विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून चौकशी करुन पुढच्या एक महिन्यामध्ये कारवाई करु.

श्री. किरण पावसकर : महाड तालुक्यातील केंबुर्ली, दासगाव, काफिला बंदर, टोळा या ठिकाणी होणा-या बेकायदा वाळू उपशाबाबत तक्रारी करुनही कोणतीही कारवाई होत नाही. वाळू उपसा करण्याबाबत टेंडर मागविले जाते. अधिका-यांबरोबर बोलणी झाल्यानंतर टेंडर थांबविले जाते. परंतु टेंडर प्रक्रिया थांबली म्हणून वाळूचा उपसा करण्याचे काम थांबत नाही. त्यामुळे शासनाचा जो महसूल बुडतो त्याला कोण जबाबदार आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मघाशी मी सांगितल्या प्रमाणे या बाबतीत विभागीय आयुक्यांच्या मार्फत चौकशी करुन महिन्याभरामध्ये कारवाई करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : पर्यावरणाच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा असा प्रश्न आहे. वाळूचा उपसा हा सूर्योदयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी करावा असे कायद्याने बंधन आहे. असे असताना महाराष्ट्रातील नद्यातून आणि खाड्यातून मात्र 24 तास वाळूचा उपसा चालू असतो. सागरातील मत्स्यजीवनावर परिणाम होऊ नये, पर्यावरणाचा समतोल राखला जावा यासाठी वाळू उपसा करण्यावर वेळेचे बंधन टाकलेले आहे. परंतु ते पाळले जात नाही. तेव्हा वाळू उपसा करण्याचे काम हे कायद्यानुसार वेळेत करण्यासंबंधीचे आदेश त्वरित देण्यात येतील काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी आठ दिवसापूर्वी असे जाहीरपणे सांगितलेले आहे की, पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून जगामध्ये सर्वत्र नदीतून किंवा खाडीतून वाळू उपसा काढण्यावर बंदी घातलेली आहे. तेव्हा नदी आणि खाडीच्या संगमाच्या ठिकाणी वाळू उपसा करण्यावर बंदी घालण्यात येणार आहे काय ? मात्र जे डुबीने वाळू काढतात त्यांना परवानगी द्यावी. कारण डुबीने वाळू काढून त्यावर जगणारी माणसे आहेत. त्यांच्या पोटापाण्याची सोय देखील पहावी. परंतु धनदांडगे व्यावसायिक जे मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा करतात आणि पर्यावरणाचा ऱ्हास करतात त्यांच्या वाळू उपसा करण्याच्या कामावर शासन बंदी घालणार आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यावर पूर्णपणे अभ्यास झालेला नाही. पण दगडाचा वापर करुन, नवीन टेक्नॉलॉजिचा वापर करुन याबाबतीत काही पर्याय निवडता येतो का यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:50

**पृ.शी.** : विनाअनुदान तत्वावर हजारो प्राथमिक आणि माध्यमिक शाळा मंजूर करण्याचा होत असलेला प्रयत्न

**मु.शी.** : विनाअनुदान तत्वावर हजारो प्राथमिक आणि माध्यमिक शाळा मंजूर करण्याचा होत असलेला प्रयत्न यासंबंधी सर्वश्री विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, सुरेश नवले, सतीश चव्हाण, चंद्रकांत रघुवंशी, हेमंत टकले, डॉ. वसंत पवार, श्रीमती मंदा म्हात्रे व श्री. सुभाष चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात एक लाख सव्वीस हजार तीनशे चौऱ्याहत्तर शाळा असून दरवर्षी पटसंख्येअभावी शेकडो शिक्षक अतिरिक्त होत असताना राज्यात विनाअनुदान तत्वावर 20 हजार प्राथमिक आणि 15 हजार माध्यमिक शाळा मंजूर करण्याचा शासनाकडून होत असलेला प्रयत्न, तद्अनुषंगाने खाजगी शाळांकडून पालकांना आमिष दाखवून विद्यार्थ्यांच्या घेण्यात येणाऱ्या प्रवेशांमुळे अनुदानित शाळांच्या पटसंख्येवर होणारा विपरीत परिणाम शिक्षकांच्या नियुक्तीची उद्‌भवणारी समस्या, शिक्षण विभाग व मंडळावर पडणारा कामाचा अतिरिक्त ताण, तसेच इंग्रजी माध्यमातील शाळांची झपाट्याने होत असलेली वाढ, त्यामुळे मराठी शाळांचे अस्तित्व धोक्यात येणे, यासर्व बाबींमुळे शिक्षकांवर येणारी बेकाराची पाळी, परिणामी शिक्षकांमध्ये पसरलेला असंतोष व चितेंचे वातावरण, याबाबत सदर शाळांना मान्यता न देण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

....4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या सभागृहात अत्यंत महत्वाचा विषय सभागृहात उपस्थित केलेला आहे. राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची संख्या किती आहे त्यासंबंधीची माहिती मी या ठिकाणी सांगतो. राज्यात आजच्या स्थितीला प्राथमिक शाळांची संख्या 69 हजार 330 एवढी आहे. वस्ती शाळांची संख्या 9हजार 361 एवढी आहे. महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्राची संख्या 20हजार 918 एवढी आहे. माध्यमिक शाळांची संख्या 20 हजार 830 एवढी आहे आणि उच्च माध्यमिक शाळांची संख्या 5 हजार 935 एवढी आहे. या सर्व आकडयांची बेरीज केली तर 1 लाख 26 हजार 374 एवढया प्राथमिक आणि माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आजच्या स्थितीला उपलब्ध आहेत. शिक्षण विभागाच्या बाबतीत नुकतीच लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती, त्या वेळी शिक्षक अतिरिक्त का होतात अशा स्वरुपाचा मी एक प्रश्न उपस्थित केला होता, त्या प्रश्नास अनुसरुन माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे शिक्षकांची संख्या अतिरिक्त होत असते. अशा प्रकारचे उत्तर माननीय लेखी स्वरुपात देखील पूर्वी दिलेले आहे. ग्रामीण भागात शिक्षणाच्या बाबतीत अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. शिक्षक म्हणजे चोर आहे की काय असे या ठिकाणी बघितले जाते. शिक्षक नसते आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकविले नसते तर या राज्यात या देशात महान व्यक्ती निर्माण झाल्या असत्या काय ?

श्री.दिवाकर रावते : या सभागृहात शिक्षकांना कोण चोर म्हणाले याबाबतचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी सभागृहात करावा. संस्थेला शासनाकडून मान्यता मिळेपर्यंत त्यांचेकडून पैसे घेऊन ठेवतात. त्या संस्थेला शासनाची मान्यता मिळाल्या बरोबर पूर्वीच्या शिक्षकाला कमी करुन टाकतात, त्याच्या जागेवर दुस-या शिक्षकांची नेमणूक करतात. त्याबद्दल आम्ही या सदनात काहीच बोललो नाही. महाराष्ट्रात वेढबिगाराची जेवढी पिळवणूक आणि लुबाडणूक कंपनी मालकांकडून होते त्यापेक्षा जास्त लुबाडणूक आणि पिळवणूक शिक्षण संस्था चालकांकडून शिक्षकांची होते आहे. हे या राज्याचे मोठे दुर्देव आहे. या विषयावर सभागृहात चर्चा करण्यास तयार आहोत. शिक्षकांना या सभागृहात चोर कोण म्हणाले याचा सन्माननीय सदस्यांनी खुलासा करावा. जर सन्माननीय सदस्य यासंबंधी खुलासा करणार नसतील तर त्यांची लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या सभागृहात कोणाही सदस्यांनी शिक्षकांच्या बाबतीत तसा उल्ल्ेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनीच तो उल्लेख केलेला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, जेव्हा जेव्हा या सभागृहात शिक्षकांचा विषय चर्चेला येतो. त्यावेळी या सभागृहात शिक्षकांकडे वेगळया नजरेने बघितले जाते असा माझा म्हणण्याचा उद्देश होता. शिक्षक आहेत म्हणून या देशात, या जगात महान व्यक्ती झालेल्या आहेत. आज ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाची अतिशय बिकट अवस्था निर्माण झाली आहे. सभापती महोदय, पाऊस पडण्यापूर्वी शेतक-याला पेरणीसाठी सर्व तयारी अगोदरच तयारी करावी लागते. तिफण आणावे लागते, कोपळे आणावे लागता, बियाणे खरेदी करावे लागतात, खते खरेदी करावी लागतात. त्या पध्दतीने जून, जुलै महिना सुरु झाला की, शिक्षकांना विद्यार्थ्यांसाठी वाडी-वस्तीवर जावे लागते. खेडयात शेतक-यांच्या घरासमोर जाऊन विनंती करावी लागते की, तुमच्या मुलांना शाळेत पाठवा. शिक्षकाला शेतक-यांना सांगावे लागते की, आम्ही तुमची खताची तयारी करुन देतो, तुमच्या मुलांना गणवेश उपलब्ध करुन देतो. त्याला पुस्तके देतो. परंतु तुम्ही तुमच्या मुला-मुलींना आमच्या शाळेत पाठवा. पोरगं राहिले तर वर्ग राहतो, वर्ग राहिला तर आमचा शिक्षक राहतो.

**उपसभापती** : आपण स्पेसिफीक प्रश्न विचारावा.

श्री. विक्रम काळे : आज राज्यामध्ये एवढया मोठया प्रमाणात शाळांची संख्या असताना देखील आज राज्य सरकारने प्रस्ताव मागवून 22 हजार नवीन शाळांना मान्यता देण्याचा घाट या ठिकाणी घातलेला आहे. शाळांना मान्यता देऊ नका असे माझे म्हणणे नाही. 2007-08 या वर्षाचा यासंदर्भातील मास्टर प्लॅन तयार केला आहे. त्या मास्टर प्लॅन नुसार राज्यामध्ये 56 माध्यमिक शाळांना मान्यता देण्याची गरज होती.......

यानंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SGJ/ MAP/ SBT/ ST/ KGS/ प्रथम श्री. गिते... 16:00

श्री. विक्रम काळे ...

सभापती महोदय, माझा शिक्षण मंत्र्यांना एकच प्रश्न आहे की, आपण ज्या नवीन शाळा देणार आहात त्या ठिकाणी शाळांची गरज आहे काय हे लक्षात घेतले जाईल काय? तसेच शाळेच्या संदर्भात जे प्रस्ताव मागितले आहेत त्या संस्था या शाळा चालविण्यासाठी सक्षम आहे काय? या विषयाची सर्व तपासणी करुन आपण या नवीन शाळांना मान्यता देणार आहात काय हा माझा मुळ प्रश्न आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती प्रचलित धोरणाच्या आधीन राहून शासन कार्यवाही करीत असते.

--------------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खाजगी रिसॉर्टमधील जलतरण तलावांबाबत कडक नियम करणे

**मु. शी.** :खाजगी रिसॉर्टमधील जलतरण तलावांबाबत कडक नियम करणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, प्रतापसिंह मोहिते-पाटील, चरणसिंग सप्रा, जैनुददीन जव्हेरी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन राऊत ( गृह(ग्रामीण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, भिवंडी, मुरबाड, शहापूर, भाईंदर, वसई, विरार, पालघर, आदी परिसरातील वॉटर रिसॉटर्समध्ये मोठ्या प्रमाणात मुला, मुलींची पोहण्यासाठी गर्दी दिसून येणे, वॉटर रिसॉटर्सच्या सुरक्षा व्यवस्थेची रिसॉटर्सचे मालक फारशी काळजी घेताना दिसून न येणे, पोहण्यासाठी गेलेल्या पर्यटकांना जीव गमवावा लागणे, रिर्साटर्स मालकांच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे वॉटर रिसॉटर्समधील पाण्यात बुडून अनेकांचे बळी जाणे, वॉटर रिसॉटर्समधील पाणी खूप दिवस बदलले जात नसल्याने ते पाणी जंतूमिश्रित व प्रदुषित असणे, काही रिसॉटर्समधील पाण्यामध्ये गाळ साचलेला असणे, लोणावळा येथील एका रिसॉटमधील दुर्घटनेत गाळामध्ये अडकल्यामुळे एका मुलीला जीव गमवावा लागणे, जीवरक्षक ठेवणे सक्तीचे असतानाही रिसॉटर्स मालक सोयीस्करित्या त्याकडे दुर्लक्ष करणे, एखादी दुर्घटना घडल्यानंतर चौकशी करण्याचे अधिकार पोलीसांकडे असतात मात्र अशी दुर्घटना घडू नये म्हणून ते टाळण्याकरिता करण्यात येणाया उपाययोजनांवर अधिकाधिक भर देण्याची गरज असतांना शासन याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे पुण्यात मुकूल जाखेडेकर तर लोणावळ्यात गाया धरा या लहान मुलांना रिसॉर्टमधील स्विमिंग टँकमध्ये जीव गमवावा लागणे, अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत म्हणून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर अधिकाधिक भर देण्याची गरज निर्माण झाली असून त्याकरिता शासनाने खाजगी रिसॉर्टमधील जलतरण तलावांबाबत कडक नियम करण्याची व निर्बंध लादण्याची नितांत आवश्यकता त्यादृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. नितीन राऊत ( गृह (ग्रामीण) राज्य मंत्री ) : सभापती महोदय, निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती आहे. निवेदनाच्या शेवटच्या पॅरामध्ये तिस-या ओळीत "नाईट गार्ड" शब्द आलेला आहे. त्या ऐवजी "लाईफ गार्ड" असा वाचण्यात यावा. लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री. नितीन राऊत : सभापती निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, अत्यंत गंभीर विषयाकडे शासनाचे मी लक्ष वेधू इच्छितो. कोणत्याही रिसॉर्टमध्ये रिसॉर्टचे मालक काळजी घेतांना दिसत नाही. रिसॉर्ट मालक लोकांची काळजी घेत नसल्यामुळे अनेक लोकांचे रिसॉर्टमध्ये मृत्यू झालेले आहेत. पर्यटनाचा आंनंद लुटण्यासाठी पर्यटक रिसॉर्टमध्ये येतात आणि आपला जीव गमावून बसतात अशी परिस्थिती आहे. तसेच रिसॉर्टमधील गाळ वरचेवर काढला जात नाही तसेच ब-याच रिसॉर्टमध्ये लाईफ गार्ड सुध्दा नसतात, लाईफ गार्ड असले तर त्यांना पोहताही येत नाही अशी परिस्थिती आहे. ठाणे, मुंबई, पुणे या ठिकाणी रिसॉर्टमध्ये अनेक माणसे बुडून मरण पावली आहेत. रिसॉर्टमध्ये कशा प्रकारची व्यवस्था असते याची माननीय मंत्रीमहोदयांना माहिती असेलच. रिसॉर्टमध्ये कोणत्याही नियमांची अंमलबजावणी केली जात नाही हे मला येथे खेदाने सांगावे लागते. रिसॉर्टमध्ये घटना घडून गेल्यानंतर पोलीस चौकशी करतात व नंतर पोस्ट मार्टेम केले जाते. परंतु पोस्ट मार्टेम करुन काही एक उपयोग होत नाही. त्यामुळे रिसॉर्टमध्ये नियमांची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय काही पुढाकार घेणार आहेत काय? रिसॉर्टमध्ये असे प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी शासन काही ठोस उपाय योजना करणार आहे काय? रिसॉर्टच्या संदर्भात शासन ठोस उपाययोजना करणारे असेल तर त्याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी कृपया सभागृहाला द्यावी.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य, आमचे स्नेही श्री. संजय दत्त यांनी वॉटर रिसॉर्टमध्ये दुर्घटना होऊ नये यासाठी काय उपाययोजना केल्या जातील यासंदर्भात प्रश्न लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, वॉटर रिसॉर्टमध्ये वॉटर रिसॉर्टचे परवाने देण्यासाठी The Greater Bombay Swimming Pools Licensing and Controlling Rules, 1972.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम वाचून दाखवतांना "मुंबई" या शब्दा ऐवजी "बॉम्बे" या शब्दाचा उपयोग केलेला आहे. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी "मुंबई" असा उल्लेख करावा अशी विनंती आहे.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, "बॉम्बे" शब्दा ऐवजी "मुंबई" शब्द वापरण्याच्या संदर्भात संबंधितांना सूचना दिल्या जातील. वॉटर रिसॉर्ट ही मनोरंजनाची जागा आहे. वॉटर रिसॉर्टला लायन्स देणे, त्यांचे नियंत्रण करणे यासाठी नियम 1960 च्या अन्वये,

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत..

ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी व पोलीस आयुक्त परीक्षेत्रात पोलीस आयुक्त परवाने प्रदान करीत असतात. अशा प्रकारचे परवाने देत असतांना वरील नियमातील नियम क्रमांक 108 अन्वये जागेची उपलब्धता, शाळा, हॉस्पिटल कॉलेजेस पासूनचे अंतर पाहिल्यानंतर,विविध प्राधिकरणाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच परवाने देण्यात येत असतात . स्वीमींग पुलाच्या लायसेन्सींग अॅन्ड कन्ट्रोलींग रुल्सप्रमाणे स्वीमीग पुलमध्ये लाईफ सेव्हींग गार्डस, महिलां व पुरुषासाठी स्वतंत्र बाथरुममध्ये शॉवरची व्यवस्था, वॉटर पूलमधील पाणी स्वच्छ ठेवणे आणि आठवडयातून एकदा ते स्वच्छ आणि फिल्टर करुन ठेवणे तसेच बदलणे आवश्यक आहे, त्या ठिकाणी फायर फायटीगचीसुध्दा व्यवस्था करणे आवश्यक असते.तसेच प्रथमोपचार सामुग्रीसह डॉक्टर उपलब्ध करुन देणेही आवश्यक आहे.परंतु तरीसुध्दा पाण्यात जंतू सापडणे,पाणी अशुध्द असणे तसेच काही अपघात घडणे यासारखे प्रकार होत असतात .सभापती महोदय, दोन महिन्यापूर्वी वसईला निवडणूक असतांना एका रिसॉर्टमध्ये थांबण्याची संधी मला प्राप्त झाली होती. तो दिवस शनिवार रविवारचा असल्यामुळे त्या रिसॉर्टमध्ये लोकांची प्रचंड गर्दी होती. सकाळी लहान मुले स्वीमींग पूलमध्ये जातांना मला दिसले होते . एकाच वेळी जवळजवळ 150 मुले त्या ठिकाणी जात असल्याचे पाहिल्यानंतर मलासुध्दा आश्चर्य वाटले. एकाच वेळी एवढया मोठया संख्यने मुलांनी तेथे जाणे धोक्याचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, परवाना देत असतांना किंमान वर्षातून दोन वेळा तरी परवान्याच्या अटी आणि शर्ती गृह विभागाने तपासून पाहिल्या पाहिजेत अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील .तसेच शनिवारी आणि रविवारी त्या ठिकाणी गर्दी जमते त्यावेळी त्या ठिकाणी जाऊन तेथील सुरक्षा यंत्रणा तपासून पाहिली पाहिजे त्याचप्रमाणे पाण्याची शुध्दता तपासली पाहिजे, महानगरपालिका, नगरपालिकांच्या अधिका-यांची मदत घेऊन नंतरच मुलांना तेथे पाठविले पाहिजे यासंबंधी सूचना देण्यात येतील. एखाद्या ठिकाणी दुर्घटना घडण्याची चिन्ह दिसले किंवा व्यवस्थापनाने योग्य पध्दतीने काळजी घेतली नसेल तर त्याचा परवाना रद्द करण्याचे अधिकार सुध्दा कायद्याव्दारे त्यांना देण्यात येतील. सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागात असलेल्या रिसॉर्टमध्ये काही दुर्घटना घडल्या आहेत तसेच पुणे जिल्हयाच्या ग्रामीण

श्री.नितीन राऊत..

भागात व लोणावळा येथेसुध्दा काही घटना घडल्या असून रिसॉर्ट मालकांनी निष्काळजीपणा दाखविला आहे त्यामुळे ही मंडळी मुलांच्या मृत्यूस कारणीभूत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द सुध्दा कडक कारवाई करण्यात येईल.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 1972 सालचा हा कायदा असून त्यामध्ये जुजबी दंड लावण्यात आला आहे. आपण धर्मादाय रुग्णालयांच्या बाबतीत अध्यादेश काढून त्यामध्ये 1 हजाराऐवजी 25 हजाराचा दंड आणि 3 महिन्यांच्या शिक्षेची तरतूद केली आहे. 1972 साली हा कायदा करण्यात आला त्यावेळी स्विमिंग पूल कमी होते, रिसॉर्टस कमी होते. म्हणून या कायद्यामध्ये बदल करुन तो अधिक कठोर करणार काय? अनेक स्विमिंग पूलच्या ठिकाणी असलेल्या वॉचमेनना पोहता सुध्दा येत नाही. शनिवार-रविवारी मोठया प्रमाणावर मुले रिसॉर्टवर पोहण्यासाठी जातात त्यावेळी तेथील स्विमिंग पूलमध्ये अतिशय घाणेरडे पाणी असते. आपण निवेदनात सर्व रिसॉर्ट मालकांना सूचना देण्यात आल्या आहेत असे म्हटले आहे. सदर सूचनांचे पालन रिसॉर्ट मालक करीत नाहीत यासाठी आपण कडक कायदा करणार काय? दुसरा प्रश्न असा की, आपण त्यांच्याकडून एक फॉर्म भरुन घेणार काय? आज त्याठिकाणी लाईफ गार्ड दिले जात नाहीत. त्याऐवजी बाहेर असलेल्या दुकानांमधून लाईफ गार्ड विकत घ्या असे लोकांना सांगितले जाते. म्हणून आपण हा कायदा बदलणार काय? आणि अधिक कडक सुरक्षा व्यवस्था करण्यासाठी आपण कोणती प्रभावी उपाय योजना करुन अंमलबजावणी करणार आहात?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न विचारतांना अधिक सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत दाद मागितली आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सुध्दा तीच मागणी केली आहे. माननीय सदस्यांकडून येणाऱ्या सूचनांचे निश्चितपणे स्वागत करुन त्यांची नोंद घेण्यात येईल. वॉटर रिसॉर्ट व स्विमिंग पूल परवानाधारकांनी त्यांच्या जलतरण तलावामध्ये लहान मुले व मोठयांकरिता वेगवेगळे विभाग करण्याबाबत, तसेच तलावात रबर टयूब, मॅट, आवश्यकतेनुसार लाईफगार्ड, बोट, हवेची टयूब, धोक्याची सूचना लावण्याचे बोर्ड इत्यादी बाबतच्या सूचना संबंधित पोलीस ठाण्याकडून वॉटर रिसॉर्ट परवानाधारकास वेळोवेळी देण्यात येतात. तरीसुध्दा व्यवस्थापक त्याकडे काळजीपूर्वक लक्ष पुरवीत नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी अपघात होतात. म्हणूनच मी म्हणालो की, मुंबईतील लोक आठवडाभर आपल्या कामामध्ये व्यस्त असतात. आणि म्हणून आठवडयाच्या शेवटच्या सुटीच्या दिवशी आपल्या मुला-बाळांसह रिसॉर्टवर जात असल्यामुळे त्या दिवशी जास्त गर्दी जमते. म्हणून त्या दिवशी जास्तीची सुरक्षा व्यवस्था केली आहे की नाही, आणि लोकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही यादृष्टीने

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/

श्री. नितीन राऊत...

पुरेशी काळजी घेतली आहे की नाही या गोष्टींचे निरीक्षण केले जाईल व तशाप्रकारचे प्रमाणपत्र रिसॉर्ट व्यवस्थापकांना दिले जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा 1972 सालचा कायदा आहे. मुंबईच्या भोवताली आता रिसॉर्टचे जाळे पसरु लागले आहे. या रिसॉर्टच्या भोवती कुंपण घातल्यामुळे आतमध्ये काय चालते हे कुणालाही कळत नाही. म्हणजे दिवसभर स्विमिंग पूलवर स्विमिंग होत असते आणि रात्री काय चालते हा प्रश्न आजही लोकांच्या मनामध्ये कायम आहे. ॲम्युजमेंटसाठी स्विमिंग पूल वापरणे वेगळे आणि प्रोफेशनल म्हणून स्विमिंग पूल वापरणे वेगळे. स्विमिंग पूलमध्ये 3 फूटाचा भाग असतो, 15 फूटाचा भाग असतो आणि 20 फूटाचाही भाग असतो. परंतु त्याचे लेखी स्वरुपात वर्गीकरण केले असले पाहिजे. तशाप्रकारचे वर्गीकरण कुठल्याही स्विमिंग पूलच्या ठिकाणी केले जात नाही. म्हणून माझा प्रश्न असा की, रिसॉर्टमध्ये ॲम्युजमेंटसाठी स्विमिंग पूल वापरला जाणार असेल तर त्याच्या खोलीवर कां बंधन घालण्यात येऊ नये? कारण 5 फूट खोलीचे ॲम्यूजमेंट स्विमिंग पूल असेल तर त्याठिकाणी बुडून मृत्यू पावण्याचे प्रमाण निश्चित कमी होईल. जर 20 फूट खोल पाणी असेल अशा ठिकाणी वर्गीकरण न केल्यामुळे पोहता न येणारा माणूस चालत जातो किंवा त्याठिकाणी उडी मारल्यानंतर बुडून मरण पावतो. बुडाल्यानंतर तो दिसत सुध्दा नाही. त्यामुळे ॲम्युजमेंट पार्क मधील स्विमिंग पूल असेल किंवा रिसॉर्टमधील स्विमिंग पूल असेल तो प्रोफेशनल स्विमिंग पूल म्हणून वापरला जात नाही. फक्त थोडा वेळ घालविण्यासाठी तो वापरला जात असेल तर त्याच्या खोलीवर नियंत्रण आणण्यासाठी ॲम्युजमेंटचे कारण देऊन या कायद्यात आपण बदल करणार काय? सभापती महोदय, रिसॉर्टवाले चार एकर जमीन घेऊन चाळीस एकरापर्यंत पसरत जातात. उदा. शांग्रीला नावाचे हॉटेल आहे त्यांनी 10x10 चा स्विमिंग पूल बांधला. आज तो 100x100चा स्विमिंग पूल झाला आहे. त्यासाठी जमीन कोठून आणली अल्ला जाणे. त्याठिकाणी बांधलेल्या खोल्यांना लॉजिंग आणि बोर्डींगची परवानगी नाही. त्याठिकाणी बिनदिक्कतपणे दारु विकली जाते, बिनदिक्कतपणे वेश्या व्यवसाय सुरु असतो. त्यांच्या स्विमिंग पूलला परवानगी नाही. मुंबईच्या जवळपास लोकांना ॲम्युजमेंटची साधने उपलब्ध नसल्यामुळे या धंद्यामध्ये प्रचंड पैसा जमा होत आहे. या एकाच कारणास्तव या धंद्यामध्ये आता अंडरवर्ल्डची मोठ मोठी माणसे उतरु लागली आहेत. जर आपण त्यावर आज बंधने घातली नाही तर उद्या त्याठिकाणी दारुचे अड्डे होतील, बेकायदेशीर अंमली पदार्थांचे सेवन होईल, वेश्याव्यवसाय सुरु



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड...

होईल. आणि तुम्हा-आम्हाला दिसण्याकरिता ॲम्युजमेंट स्विमिंग पूल म्हणून सुरु असलेले दिसेल. सभापती महोदय, उदा. बदलापूर येथे सन अँड सँड नावाचे रिसॉर्ट सुरु आहे. ते पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्याठिकाणी 24 तास वेश्या व्यवसाय सुरु असतो. लोकांना दाखविण्यासाठी स्विमिंग पूल आहे, त्याठिकाणी बेकायदेशीर दारुची विक्री केली जाते. अशाप्रकारे ठाणे आणि मुंबईला प्रदूषित करणाऱ्या रिसॉर्टना परवानगी नसेल तर त्यांना आपण टाळे लावणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न असा होता की, सर्वसाधारणपणे स्विमिंग टँकची खोली किती असते ? मी आपल्याला सांगू इच्छितो की, स्विमिंग टँकची नियमानुसार सर्वसाधारण खोली 6 फूटापेक्षा अधिक असते. परंतु वॉटर रिसॉर्टमध्ये विविध प्रकारचे गेम्स् असल्यामुळे त्यामध्ये येणाऱ्या ग्राहकांना, मुले-मुली यांना दुखापत होऊ नये म्हणून तेथे जे स्विमिंग टँक बांधले जातात, त्याची खोली साडेचार फूटापेक्षा जास्त असू नये असा नियम आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला की, ठाणे परिसरामध्ये शांग्रीला रिसॉर्ट आहे आणि बदलापूर येथे सन ॲण्ड सन रिसॉर्ट आहे, त्याच्या जमिनीसंबंधात येथे माहिती देण्यात आली. ही माहिती निश्चितपणे तपासली जाईल आणि ईलिगल रिसॉर्ट असतील, ज्याठिकाणी लॉजिंग-बोर्डींग आहे, तसेच ईलिगल दारुची विक्री किंवा धोका संभवणारे असे काही व्यवसाय केले जात असतील तर निश्चितपणे त्यांच्यावर कडक कारवाई 24 तासामध्ये केली जाईल आणि सभापती महोदय, आपल्याच दालनामध्ये आता कायदा व सुव्यवस्थेच्या संबंधात बैठक होणार आहे. त्यावेळी संबंधितांना निश्चितपणे सूचना दिल्या जातील.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "सदर गुन्ह्यामध्ये दोन आरोपिंना अटक करण्यात आली आहे." हे आरोपी कोण आहेत ? ते मालक आहे की मॅनेजर आहे की ट्रेनर आहे? दुसरा प्रश्न असा आहे की, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"सर्व संबंधित वॉटर रिसॉर्ट मालकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत." जेव्हा आपण मालकांना सूचना देतो, तेव्हा त्यांच्यावर देखील गुन्हा नोंदविला जातो काय?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, यामध्ये संबंधित व्यवस्थापनातील कर्मचारी आहेत आणि त्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर कारवाई सुरु आहे.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, मालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, यामध्ये एक मालक व दोन लाईफ गार्डस् यांचा समावेश आहे. मी व्यवस्थापनाच्या बाबतीत सांगितलेले नाही.

-----

. . . .3 झेड-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी क्रमांक 5 बाबत

**उपसभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमधील लक्षवेधी सूचना क्रमांक 5 ही सन्माननीय सदस्य विनोद तावडे आणि इतर सन्माननीय सदस्यांची आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी ही लक्षवेधी सूचना सोमवारी घेण्यात यावी अशी लेखी पत्राव्दारे विनंती केलेली आहे. मी त्यांची विनंती मान्य करीत आहे.

----

. . . .3 झेड- 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी बेमुदत काम बंद आंदोलन करण्याची दिलेली नोटीस

**मु.शी.** : "राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी बेमुदत काम बंद आंदोलन करण्याची दिलेली नोटीस" यासंबंधी श्री.वसंतराव खोटरे,प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री. दिलीपराव सोनवणे, विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिजे-पाटील,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक बेमुदत काम बंद आंदोलन करण्याची दिनांक 20 एप्रिल 2009 रोजीच्या निवेदनाव्दारे उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेली नोटीस, नेटसेट परीक्षा सक्तीची करण्याची कारवाई सन 1999 पर्यंत राज्यात पार पाडली न जाणे, नेटसेटबाबतची अट शिफारशीच्या स्वरुपात असणे, ती पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे तर भावी प्रभावाने लागू करावी लागेल, असा मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.8 सप्टेंबर 1994 रोजी दिलेला निर्णय, सर्वोच्य न्यायालयाने असा निर्णय दिलेला असल्याचे उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिनांक 11 डिसेंबर 2001 रोजी सभागृहात मान्य करणे,परिणामी नेटसेट बाबतच्या पूवीच्या सर्व अधिसूचना रद्द करुन विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक 4 एप्रिल 2000 चे नवे रेग्युलेशन अधिसूचनेसह निर्गमित करणे, विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार नेटसेटची परीक्षा भरतीपूर्व पात्रता परीक्षा म्हणून डिसेंबर 1999 पूर्वी राज्यात विधिवतरित्या लागू करण्यात न येणे, ही राज्य सरकारकडून त्यावेळी झालेली चूक आहे असे तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक 3 ऑगस्ट 2001 रोजी सभागृहात मान्य करणे, विद्यमान उच्च शिक्षण मंत्र्यांनी सुध्दा त्यावेळी राज्य शासनाची चूक झाली होती, हे दिनांक 17 डिसेंबर 2008 रोजी सभागृहात मान्य करणे, दिनांक 27 नोव्हेंबर 2008 रोजी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक 4266/2006,5037/2008, 4486/2007, 4386/2007,4500/2007 आणि 462/2008 या प्रकरणी दिनांक 5 नोव्हेंबर, 2008 च्या विद्यापीठ

. . . .3 झेड-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुदान आयोगाच्या पत्राचा उल्लेख करुन समान प्रकरणी निर्णय घेण्याचा दिलेला आदेश, मा.कुलपतीच्या संमतीने करण्यात आलेल्या परिनियमातील तरतुदीप्रमाणे 2 वर्षाच्या सेवेनंतर सेवेत कायम झालेल्या या अधिव्याख्यात्यांच्या सेवा दिनांक 18 ऑक्टोबर 2001 च्या शासन निर्णयान्वये अखंडित राहतील अशी तरतूद केलेली असताना त्यांच्या नेमणूका तदर्थ आहेत असा भ्रम पसरविण्याचा होत असलेला प्रयत्न, राज्यामध्ये विधिवतरित्या नेटसेटची पात्रता परीक्षा सक्तीची करण्यात आल्यापूर्वीच्या कालखंडात व त्यानंतरच्या कालखंडात भरती झालेल्या शिक्षकांना एकसारखी वागणूक देण्याचा होत असलेला दुराग्रह, या सर्व स्थितीची माहिती करुन घेतल्यानंतर उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिनांक 24 डिसेंबर 2008 च्या आत याबाबतचा शासन निर्णय काढण्यात येईल व पुढच्या तीन महिन्यात या सर्व प्रश्नांना पूर्णविराम देण्यात येईल असे सांगून सुध्दा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, यामुळे पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .3 झेड-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. यामध्ये महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि महाविद्यालयीन शिक्षकांचा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. मी एकच

प्रश्न विचारु इच्छितो. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातील शेवटून तिसऱ्या परिच्छेदामध्ये जे सांगण्यात आले आहे, त्यासंदर्भात माझा प्रश्न आहे. माननीय उच्च न्यायालय यांच्या खंडपीठाने दिनांक 27 नोव्हेंबर 2008 रोजी दिलेल्या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.5-11-2008 च्या पत्रान्वये काही विद्यापीठातील अधिव्याख्यात्यांना नेटसेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, नागपूर येथील 834 लोकांना यु.जी.सी.ने मुक्तता दिलेली आहे. याच विद्यापिठाने दि.19 मार्च 2001 रोजी 400 केसेस शासनाकडे पाठविल्या आहेत. पण शासनाने निर्णय न घेतल्यामुळे वरिष्ठ व निवड श्रेणीतील स्थान निश्चिती देता आली नाही. म्हणून याबाबतचा शासन निर्णय केव्हा काढणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्या बाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, माझ्यासमोर एक जी.आर.असून शासनाने दि.27-2-2002ला निगर्मित केलेला आहे. ज्यामध्ये विद्यापीठाच्या विभागातील प्रपाठक करिअर्स् ॲडव्हान्समेंट योजने अंतर्गत प्राध्यापक पदावर पदोन्नती वगैरे संदर्भात आहे. यामध्ये ज्या अधिव्याख्यात्यांना नियमित करण्यासाठी यु.जी.सी.ने मान्यता दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते बरोबर आहे की, 400 च्या बाबतीत विद्यापिठाकडून अंतिम आदेश झालेले आहेत. यु.जी.सी.कडून क्लिअर होऊन आलेले असे एकंदर 856 आहेत. अजूनही उर्वरित काही विद्यापीठांनी अंतिम आदेश काढणे बाकी आहे. पण मी 400 च्या बाबतीत एवढेच सांगेन की, हे काम खरेतर विद्यापीठाने करणे अपेक्षित आहे. या जी.आर.च्या अनुषंगाने यात अतिशय सुस्पष्ट लिहिलेले आहे की, कॅशच्या संदर्भातील जो निर्णय आहे, तो विद्यापीठानेच घ्यावयाचा आहे. त्यामुळे विद्यापीठाने कॅशच्या संदर्भातील निर्णय घेतल्यानंतर पे-फिक्सेशनच्या संदर्भातील निर्णय डायरेक्टर घेतात.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

अशा पध्दतीची ही प्रोसिजर आहे.या संदर्भात खरे तर मागचा जी.आर.अतिशय सुस्पष्ट आहे परंतु सन्माननीय सदस्य आणि सभागृहाची भावना लक्षात घेऊन शासनाकडून परत एकदा या संदर्भात अत्यंत कडक सूचना देण्यात येतील.

प्रा. बी. टी. देशमुख : निवेदनातील खालून दुसरा परिच्छेद आहे तो लक्षवेधीतील विषय नाही, त्यावर आम्हाला बोलावयाचे नाही. तो परिच्छेद निवेदनामध्ये आला आहे हे ठीक आहे. क्वालिफिकशेनच्या बद्दल खरोखर हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे काही लोक कन्टेप्टमध्ये गेले आहेत त्यामुळे तेवढा विषय कन्टेप्टमध्ये आहे. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी जो परिच्छेद वाचून दाखविला तो सुध्दा हायकोर्टाचाच निर्णय आहे. माननीय मंत्रिमहोदय म्हणतात ती गोष्ट खरी आहे. याबबतीतील दिनांक 27-2-2000 चा शासन निर्णय अतिशय स्वंयस्पष्ट आहे. सभापती महोदय, डिसेंबर अधिवेशनामध्ये नागपूरला हे जे एक्झम्शन झाले आहेत, त्याबाबतचा विषय मांडल्या नंतर माननीय मंत्रिमहोदय, स्वत: असे म्हणाले की, आम्ही दि. 24 डिसेंबर, 2008 च्या आत याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करु. म्हणून मी त्यावेळी त्याबाबतीत उपप्रश्न विचारले नाहीत. ठीक आहे. पण माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दिनांक 24 डिसेंबर, 2008 पर्यंत हे झाले नाही. संबंध महाराष्ट्रात हा विषय 1991-1999 या कालखंडातील शिक्षकांचा आहे.माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर अतिशय समाधानकारक आहे. परंतु आमचे ओठ भाजलेले असल्यामुळे ताक सुध्दा फुंकून पिण्याची वेळ आमच्यावर आलेली आहे. दि.27-2-2002 च्या निर्णयाप्रमाणे वेगळा शासन निर्णय काढण्याची गरज नाही, हे म्हणणे बरोबर आहे. पण त्या विद्यापीठाने शासनाला स्पष्टपणे कळविलेले आहे की, त्यांच्याकडे ज्या 800 केसेस आलेल्या आहेत त्यातील 400 केसेसचे काम त्यांनी संपवलेले आहे. त्यांनी ज्या केसेसचे काम संपलेले आहे त्या 400 केसेस असतील 410 केसेस असतील, त्यांचे प्लेसमेंट त्यांनी केलेले आहे ती बाब जॉईंट डायरेक्टरकडे ॲप्रुव्हलसाठी किंवा त्या प्लेसमेंटच्या वितरणासाठी ठेवण्याच्या सूचनांसाठी जी.आर. काढण्याची आवश्यकता नाही. त्या सूचना सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवल्या जातील काय? सभापती महोदय, सहा महिन्यापासून याबाबतीत काहीही झालेले नाही. यु.जी.सी.ने निर्णय दिल्यावर, हायकोर्टाने निर्णय दिल्यावर जसे हे लोक कन्टेम्प्टमध्ये गेले तसे हे लोक सुध्दा माझ्याकडे येऊन असे म्हणाले की, आम्हीही कन्टेम्प्टमध्ये जातो. त्यावेळी मी त्यांना असे सांगितले की, माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात दि.24 डिसेंबर,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

प्रा. बी.टी.देशमुख....

2008 पर्यत आदेश काढतो असे सांगितलेले आहे. तेव्हा याबाबतच्या सूचना नागपूर विद्यापीठाला देऊन त्याची प्रत सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 'होय'.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना जरुर धन्यवाद देतो. अनेक दिवसांपासून भिजत पडलेला प्रश्न मार्गी लागणार आहे. पण या निवेदनातील दोन-तीन चूका या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. याचे कारण असे की, आम्हाला सभागृहाबाहेर बोलण्याची संधी माननीय मंत्रिमहोदय देत नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी वाचलेल्या परिच्छेदाच्या वरच्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, "माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल ॲप्लीकेशन नं.1819/1994 मध्ये जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय दिल्ली विद्यापीठाशी संबंधित आहे." हे संपूर्णपणे चुकीचे आहे. दिल्ली विद्यापीठाची ती केस होती पण निर्णय संबंध देशासाठी दिलेला आहे. त्या परिच्छेदाची सुरुवात अशी आहे की, "Now we turn to analyse the regulations. 1991 चे रेग्युलेशन्स आहेत, त्याचे विश्लेषण करायला आम्ही सुरुवात करतो, असे म्हटले आहे. त्याप्रमाणे त्यांनी अतिशय तपशीलवार विश्लेषण केलेले आहे. त्यानंतर शेवटच्या परिच्छेदातील विश्लेषण दिल्लीला लागू केलेले आहे. त्यामुळे दिल्ली विद्यापीठाच्या बाबतीतील निर्णय आहे, हे बरोबर आहे. पण तो फक्त दिल्ली विद्यापीठाशीच लागू नाही तर संबंध देशासाठी लागू आहे. म्हणून यु.जी.सी.ला आपली पावले मागे घ्यावी लागली. मी निवेदनाच्या पान 2 वरील पहिल्या परिच्छोकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की,"तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक 4-4-2000 च्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेले विनियम 2000 मध्ये सुध्दा वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हत/पात्रतेची अट अंतर्भूत करुन सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना असेही सूचित करण्यात आले आहे की, यापुढे दिनांक 4-4-2000 नंतर राज्यातील महाविद्यालयात/विद्यापीठात अधिव्याख्याता पदावर नेट-सेट असल्याशिवाय लागू होणार नाही. याच नोटिफिकेशनमधील वरचा परिच्छेद सुप्रिम कोर्टाच्या निर्णयामुळे आलेला आहे. यापूर्वीच्या लोकांना नेट-सेट लागू रहाणार नाही असे त्या नोटिफिकेशनमध्ये म्हटलेले आहे ही गोष्ट खरी आहे काय? माननीय शिक्षणमंत्री असे सूचवित आहेत की, या संदर्भात बैठक घ्या. परंतु राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी पाच दिवस बैठकी घेतल्या आहेत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले )**

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ......

माननीय मंत्रिमहोदयांनी बैठकीची गोष्ट काढली म्हणून सांगतो. एकामागे एक बैठकीत जे ठरले त्याप्रमाणे जी.आर. निघाला. परंतु त्यांच्या विरोधात एकामागे एक अशा 7 अटी टाकाव्या लागल्या आणि त्या सर्व परत घ्याव्या लागल्या. म्हणजे 1994 पर्यंत केले नाही तर त्याला काढून टाका अशी अट टाकली. भारतात जी परीक्षा झाली नाही तर ते कसे काय करणार ? 1995 पर्यंत झाले नाही तर काढून टाका, 1996 पर्यंत झाले नाही तर काटून टाका अशी अट घातली नंतर नंतर सर्व सर्क्युलर मागे घेतले. म्हणजे काढून टाका हीच अट काढून टाकली. त्यांना तदर्थ समजा अशी जी अट घातली ती काढून टाकली. त्यांना इन्क्रिमेंट देऊ नका अशी जी अट घातली ती काढून टाकली. त्यांना प्लेसमेंट देऊ नका हा यातील एक मुद्दा अपूर्ण राहिला आहे तो आता शासनाच्या निर्णयामुळे निकाली निघालेला आहे. हे 4.4.2000 चे जे नोटिफिकेशन आहे ते नेट-सेट शिवाय लावू नये यासंदर्भात आहे. त्याच्या अगोदरच्या लोकांना ते लागू होणार नाही असे स्पष्ट वाक्य आहे. यथोचितरीत्या अस्तित्वात आलेल्या निवड समितीमार्फत त्यांची निवड झालेली आहे आणि त्यामुळे अस्तित्वात असलेली किमान पात्रता तो पूर्ण करतो, त्याला नेट-सेटच्या पात्रतेचा नियम लागू राहणार नाही असे त्या नोटिफिकेशनमध्ये म्हटले आहे. निदान ते आपण पाहून घ्यावे. त्यादृष्टीने विभागाला सूचना देणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : नवी मुंबई परिसरातील वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांची लूट करण्यात येणे

**मु. शी.** : नवी मुंबई परिसरातील वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांची लूट करण्यात येणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले )** : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडते.

"नवी मुंबई परिसरात बेलापूर, नेरुळ, खांदा कॉलनी, खारघर परिसरातील वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांची लूट करण्यात येणे, वर्ष-वर्ष मीटर रिडींग न होता अंदाजे सरासरी बिले पाठविली जाणे व नंतर कधीतरी रिडींग घेऊन सदनिकाधारकाला लाखो रुपयांची बिले पाठविणे, खांदा कॉलनीतील यारिमन या इमारतीत तर सुमारे साडेतीन वर्षापासून वीज बिले न पाठविता एकाच वेळी लाखो रुपयांची बिले पाठविणे, नवी मुंबई परिसरात वीज वितरण कंपनी विरोधात अनेक तक्रारी करुन सुध्दा त्याची दखल घेण्यात न येणे, त्यामुळे सर्वसामान्य रहिवाशांमध्ये निर्माण झालेली चीड, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, माझ्याकडे एक पत्र आलेले आहे. आपल्या विधानमंडळ सचिवालयाचे रिपार्टर श्री. अरुण गिते जे या सभागृहामध्ये बसतात त्यांना यापूर्वी महिन्याचे 1400 रुपये, 900 रुपये, 500 रुपये या प्रमाणे दरमहा बिल येत असताना आता मे महिन्याचे 16 हजार 969 रुपये बिल आलेले आहे. रिडींग न घेता बिल दिले जाते त्यामुळे बिल भरणाऱ्याला फार मोठा त्रास होतो. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने ताबडतोब कार्यवाही करावी अशी मी विनंती करते.

-----

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

**पृ. शी.** : राज्यात विक्रीकर विभागाने व्यापाऱ्यांना वैध नोंदणीपत्र न देणे

**मु. शी.** : राज्यात विक्रीकर विभागाने व्यपाऱ्यांना वैध नोंदणीपत्र न देणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र व्हॅट कायदा 2002 च्या कलम 16(1) प्रमाणे राज्याच्या विक्रीकर विभागाने व्यापाऱ्यांना वैध नोंदणीपत्र दिल्याशिवाय ग्राहकांकडून व्हॅट वसूल करता येत नाही. 1 एप्रिल, 2006 पासून महाराष्ट्रातील एकाही व्यापाऱ्यास विक्रीकर विभागाने वैध नोंदणीपत्र दिलेले नाही. त्यामुळे विक्रीकर विभागाला व्यापाऱ्यांमार्फत ग्राहकांकडून व्हॅट वसूल करण्याचा अधिकारच नाही. नोंदणीपत्र नसताना व्हॅट वसूल केल्यास कलम 74(1)(अ) नुसार एक वर्षापर्यंतची सश्रम कारावासाची सजा होऊ शकते. व्हॅट कायदा हा टॅक्स वसुलीचा कायदा आहे. यातील प्रत्येक तरतुदीचे पालन कठोरपणेच व्हावयास पाहिजे. कायद्याच्या नियम 2(एल) प्रमाणे नेमलेल्या अधिकाऱ्यानेच नोंदणीपत्रावर सही करुन द्यावयास पाहिजे, परंतु सर्व व्यापाऱ्यांची नोंदणीपत्रे अधिकार नसलेल्या मुंबईतील एकाच अधिकाऱ्याने सही करुन दिली आहेत. या नोंदणीपत्रात नोंदणीपत्र क्रमांकच असावयास पाहिजे त्याऐवजी टॅक्स पेयर आयडेन्टीफिकेशन नंबर देण्यात आला आहे. हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. पूर्वी आयकर कायद्यानुसार जीआयआर नंबर देण्यात येत असे, परंतु आयकर विभागाने पॅन नंबर द्यायचा ठरविल्यानंतर आयकर कायद्यात दुरुस्ती केल्यावरच पॅन नंबर दिले गेले. अशा प्रकारची कोणतीही दुरुस्ती टॅक्स पेयर आयडेन्टीफिकेशन नंबर देताना करण्यात आलेली नाही. भारतीय घटनेच्या कलम 265 प्रमाणे कोणत्याही टॅक्सची वसुली देखील कायद्यातील तरतुदींप्रमाणेच करावयास पाहिजे. व्हॅटची वसुली ही व्हॅट कायद्याच्या अकरा तरतुदींचे उल्लंघन करुन होत आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून मी तो आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे. याबाबत शासनाने त्वरित स्पष्टीकरण करावे"

---

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माध्यमिक शाळेतील पात्र शिक्षकांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे सेवाज्येष्ठता व गुणवत्ता पाहून बदलीचा करण्याबाबचा शासन आदेश रद्द केल्याबाबत

**मु. शी.** : माध्यमिक शाळेतील पात्र शिक्षकांची कनिष्ठ महाविद्यालयाकडे सेवाज्येष्ठता व गुणवत्ता पाहून बदलीचा करण्याबाबचा शासन आदेश रद्द केल्याबाबत श्री.रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्री.हेमंत टकले )**: मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"माध्यमिक शाळेतील पात्र शिक्षकाची कनिष्ठ महाविद्यालयाकडे सेवाज्येष्ठता व गुणवत्ता पाहून बदली करण्याबाबचा दि.28 एप्रिल, 1980 चा शासन आदेश रद्द केल्याबाबतचा विषय मांडू इच्छितो."

सभापती महोदय, राज्यात अनेक माध्यमिक शाळांना कनिष्ठ महाविद्यालयाचे अकरावी व बारावीचे वर्ग जोडलेले आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी एकत्रितपणे ठेवावी असे शासनाचे धोरण आहे त्याप्रमाणे ती ठेवली जाते. उच्च माध्यमिक विभागाकडील शिक्षकांच्या नेमणुका उपलब्ध कार्यभारानुसार केल्या जातात. शासन निर्णय क्र.1379/76331/20-21, दि.28.4.1980 नुसार माध्यमिक विभागात काम करणारा शिक्षक आवश्यक पात्रताधारक असल्यास त्या शिक्षकास उच्च माध्यमिकचा कार्यभार सेवाज्येष्ठतेनुसार देण्याचे शासनाने निदेश दिलेले आहेत. शासनाने दिनांक 27.71999 च्या पत्रानुसार दिनांक 28.4.1980 चा जी.आर.रद्द केला असून उच्च माध्यमिक विभागाकडे माध्यमिक शिक्षकांना नियुक्ती

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

न देण्याचे व नवीन भरती प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे जे शिक्षक अर्धवेळ शिक्षक म्हणून अथवा घड्याळी तासावर अथवा माध्यमिक स्तरावरचा कार्यभार सांभाळून विशेष वेतनावर उच्च माध्यमिककडे काम करतात अशा शिक्षकांना उच्च माध्यमिककडे पूर्णवेळ पद निर्माण झाल्यास अशा शिक्षकांनाच नियुक्ती देण्यात यावी व या शिक्षकांसाठी शासनाचे दि.27.7.99 चे पत्र व शिक्षण संचालकांचे दि.18.8.99चे आदेश लागू करु नये अशी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करुन या सभागृहाला व आम्हाला अवगत करावे ही विनंती.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : ठाणे जिल्हयातील उल्हासनगर, बदलापूर व अंबरनाथ या भागातील कारखान्यातून बालमजुरांना कमी वेतनावर राबविण्यात येणे

**मु. शी.** : ठाणे जिल्हयातील उल्हासनगर, बदलापूर व अंबरनाथ या भागातील कारखान्यातून बालमजुरांना कमी वेतनावर राबविण्यात येणे याबाबत श्री.किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"बालमजुरी हा कायद्याने गुन्हा असताना कायदा धाब्यावर बसवून ठाणे जिल्हयातील उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ या परिसरात लहान मोठया धोकादायक कारखान्यातून शेकडो बालमजुरांचा सर्रासपणे कमी वेतनावर राबवित असणे, हया धोकादायक कारखान्यातून बाजमजुरांचा अपघात झाल्यास अथवा मृत्यू आल्यास त्याची कुठेही नोंद केली जात नसणे, अथवा त्यांना नुकसान भरपाई सुध्दा दिली जात नसणे, अशी बालमजुरी करणा-या बालकांची संख्या लाखाच्या घरात असल्याने निदर्शनास येऊनही त्याकडे संबंधित कामगार मंत्रालय व कामगार उपायुक्त दुर्लक्ष करीत असल्याने बालकामगारांच्या संख्येत अधिकच भर पडत असणे, मोठमोठया औद्योगिक आस्थापनातूनही सर्रासपणे बालकामगारांना अवघड व धोकादायक कामे करण्यास भाग पाडले जाता असल्याच्या तक्रारी कामगार मंत्रालय व कामगार उपायुक्त यांच्याकडे प्राप्त होऊनही त्यांना कोणतेही संरक्षण देण्यात न येणे, नुकतेच ठाणे जिल्हयातील मुंब्रा येथील अन्सा टॉवर, सोनाजीनगर येथील काही अल्पवीयन बालकामगार काम करीत असताना पोलिसांनी टाकलेल्या

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

धाडीत आढळून येणे तसेच जळगाव येथील पारोळा येथे एप्रिल, 2009 मध्ये एका फटाक्याच्या लागलेल्या आगीत सहा बालकामगारांचा झालेला मृत्यू, परिणामी अत्यंत असुरक्षित वातावरणात हे बालमजूर काम करीत असल्याचे चित्र दिसणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, राज्यात बालमजूर कायदा असताना राज्यात लहान मोठया धोकादायक कारखान्यात शेकडो बालमजुरांना सर्रासपणे कमी वेतनावर राबविले जात आहे. मी मघाशी औचित्याच्या मुद्याद्वारे बालकामगारांच्या विषयावर बोललो होतो. जळगाव येथील सावित्री फायर वर्क कारखान्यात स्फोट होऊन दोन बालकामगारांचा मृत्यू झालेला आहे. शासनाने याबाबत तातडीने कारवाई करावी अशी विनंती करतो.

----

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील मौजे धामापूर या गावाचा पर्यटन क्षेत्र म्हणून समावेश करणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील मौजे धामापूर या गावाचा पर्यटन क्षेत्र म्हणून समावेश करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केला आहे. याच सिंधुदुर्ग जिल्हयातील नैसर्गिकरित्या अतिशय सुंदर व भौगोलिकदृष्टया योग्य मांडणी असलेल्या या गावाचा देखील पर्यटन क्षेत्र म्हणून समावेश करण्यात आलेला आहे.

मौजे धामापूर या गावामध्ये एक सुंदर रमणीय असे शिवकालीन धामापूर तलाव आहे. त्या तलावाच्या काठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सुंदर पर्यटन बंगले पर्यटकांसाठी बांधले आहेत. त्या पर्यटन बंगल्याचे राज्याचे पर्यटन मंत्री, पर्यटन राज्यमंत्री, पालक मंत्री, जिल्हाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, शासकीय वरिष्ठ अधिकारी इत्यादीच्या उपस्थितीत रितसर सुमारे पाच वर्षापूर्वी उद्‌घाटन करण्यात आले. परंतु आजतागायत पर्यटकांसाठी ते खुले झाले नाही ते ताबडतोब सुरु करावे, असे मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सूचित करु इच्छितो."

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : फळबाग आणि बिगर फळबाग पिकांसाठी केंद्र पुरस्कृत सिंचन योजना राबविणे

**मु. शी.** : फळबाग आणि बिगर फळबाग पिकांसाठी केंद्र पुरस्कृत सिंचन योजना राबविणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"पिकाच्या पाण्याच्या गरजेनुसार पाणी मिळावे, उपलब्ध पाण्याचा काटेकोरपणे वापर व्हावा, तसेच तणवाढीवर नियंत्रण बसून खर्च कमी यावा यासाठी फळबाग आणि गिर फळबाग पिकांसाठी केंद्र पुरस्कृत सिंचन योजना राबविली जाणे, या योजनेत ठिबक व तुषार संच बसविले जाणे, यासाठी 50 टक्के अनुदान दिले जाणे, मात्र 50 टक्के अनुदान देऊन 10 हजार 115 हेक्टर क्षेत्र ठिबक आणि तुषार सिंचनाखाली येणे, वास्तविक ज्या भागात पाण्याची कमी उपलब्धता असणे, अशा भागात या योजनेंतर्गत अधिकाधिक ठिबक सिंचन होणे गरजेचे असताना शेतकरी फारसे पुढे येत नसणे याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

सभापती महोदय, वास्तविक ज्या भागात पाण्याची कमी उपलब्धता आहे तेथे अधिकाधिक ठिबक संच बसविणे आवश्यक आहे. पण शेतक-यांची असलेली उदासिनता आणि कर्मचा-यांनी परिश्रम न घेतल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत अजून एक चिंतेची बाब अशी आहे की, ठिबक सिंचनसाठी 50 टक्के अनुदान दिले जाते, पण त्याची प्रत्यक्षात असलेली किंमत आणि शासनाकडून मिळत असलेले अनुदान यामध्ये फरक आहे. शेतक-यांच्या पदरात केवळ 30-35 टक्के अनुदान पडते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 16:35

(ॲड. उषा दराडे....

आणि बाकीच्या फरकाची रक्कम शेतक-याला खर्च करावी लागते. याबाबतीत शासनाने गंभीरपणे विचार करुन ताबडतोबीने उपाययोजना करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे त्रुटी असलेल्या बँडसह शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत

**मु.शी.** : सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे त्रुटी असलेल्या बँडसह शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले)** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे 6वा वेतन आयोग नुकताच राज्य शासनाने दिलेला आहे. काही दिवसात 6व्या वेतन आयोगाप्रमाणे त्रुटी असलेल्या बँडसह शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन मिळेल अशी अपेक्षा आहे. परंतु जे शिक्षण सेवक म्हणून हजारो शिक्षक राज्यात काम करत आहेत त्यांना मात्र 6वा वेतन आयोगा लागू करताना दुर्लक्षित ठेलेले आहे. त्यांच्या मानधनाबाबत कुठलाही उल्लेख केलेला नाही.

तरी 6व्या वेतन आयोगाच्या तलुनेत किमान शिक्षण सेवकांचे मानधन रु. 10 हजार करावे व त्याचा कालावधी 3 वर्षाऐवजी 2 वर्षे करुन तो परिविक्षाधीन कालावधी म्हणून गृहीत धरावा. याबाबतीत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : रायगड जिल्हयातील 116 गावातून गेल कंपनीची पाईपलाईन गेल्यामुळे बाधित क्षेत्राच्या नुकसानीबाबत

**मु.शी.** : रायगड जिल्हयातील 116 गावातून गेल कंपनीची पाईपलाईन गेल्यामुळे बाधित क्षेत्राच्या नुकसानीबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, खालापूर, पनवेल, माणगाव, रोहा, सुधागड व महाड या आठ तालुक्यातील 116 गावातून गेल कंपनीची पाईपलाईन गेल्यामुळे एकूण 1 हजार 118 हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

या आठ तालुक्यातील बाधित क्षेत्रावरील शेतीच्या नुकसानीची रक्कम 2 कोटी 78 लाख 68 हजार 400 इतकी असून त्या नुकसानीची समक्ष तहसीलदार व कृषि विभागाने पाहणी केली व रीतसर पंचनामे करुन नुकसानीची रक्कम ठरविली आहे. तसा अहवाल विभागीय अधिका-यांमार्फत जिल्हाधिकारी, रायगड यांना दिला आहे.

जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्राप्त झालेल्या अहवालानुसार कंपनीला नुकसान भरपाई देण्यासाठी कळविले आहे. मात्र गेल कंपनीने अद्याप जिल्हाधिका-यांच्या पत्राला प्रतिसाद दिला नाही. सबब शेतक-यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे. तरी शासनाने यासंबंधी त्वरित कार्यवाही करण्याच्या दृष्टीने मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सायंकाळी 5 वाजून 5 मिनिटानी सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

( सायंकाळी 4.37 ते 5.05 वाजेपर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

---

...नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: विनियोजन विधेयक

**L. A. BILL NO. XII OF 2009**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2010.)

श्री. दिलीप वळसे-पाटील (अर्थमंत्री): सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक दिनांक 31 मार्च 2010 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यास अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतलीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207,खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांनाप्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 , अनुसूची, खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही)

**उपसभापती** : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री. दिलीप वळसे-पाटील ( अर्थमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असतांना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203(3) मधील तरतूदींना अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**उपसभापती** : सन 2009-2010 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झ ाले आहे.

---------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज-विधेयके**

**पृ. शी.** : मुल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO.II OF 2009**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.)**

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 2, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरित विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

सभापती महोदय, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा ) या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ...

सभापती महोदय, गेली 46 वर्षे विक्रीकर निर्धारणाचे 95 टक्के लेखा परीक्षणाची कामे 30,000 कर व्यावसायिक करीत आहेत. त्यापैकी 15,000 कर व्यावसायिक शासनमान्य आणि नोंदणीकृत विक्रीकर ॲडव्होकेट सल्लागार बार कौन्सिल, महाराष्ट्र राज्याचे मान्यता प्राप्त आहेत. महाराष्ट्रात दिनांक 1.4.2005 पासून व्हॅट कायदा सुरु झाला असून सर्व व्यवहार ऑडिट पात्र आहेत. आता शासनाने त्यांचे अधिकार काढून त्या ऐवजी चार्टर्ड अकाऊन्टट व कॉस्ट अकाऊन्टंट यांना हे काम दिले आहे राज्यात सीए आणि कॉस्ट अकाऊन्टंटची संख्या फक्त 30 ते 35 टक्के आहे आणि विक्रीकर भरणा-या व्यापा-याची संख्या 40 लाख आहे. त्यामुळे व्हॅटची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने सदर मान्यता प्राप्त लेखा परीक्षकांना पूर्वीप्रमाणे विक्री कराची कामे देण्यात यावीत.

सभापती महोदय, मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 हा महाराष्ट्र राज्यात दिनांक 1 एप्रिल 2005 पासून लागू करण्यात आला आहे उक्त अधिनियमानुसार राज्यात 40 लाखापेक्षा जास्त व्यापारी आहेत.

सभापती महोदय, उक्त अधिनियमाचे कलम 61 मध्ये सनदी लेखापाल आणि परिव्यय लेखापाल यांना लेखापरीक्षा अहवाल सादर करण्यासबंधीची तरतूद केली आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या 40 वर्षापासूनची ही प्रथा होती की अर्हताप्राप्त विक्रीकर संमंत्रक व्यापा-याच्या मूल्यनिर्धारणाची जी आकारणी करीत होते त्यालाच आता लेखापरीक्षा असे संबोधले जाते. अलीकडेच विधानमंडळाने संमत केलेल्या नवीनतम सुधारणेनुसार केवळ सनदी लेखापाल आणि परिव्यय लेखापाल हेच लेखा परीक्षणासाठी हक्कदार आहेत म्हणून अर्हताप्राप्त विक्रीकर संमंत्रक संकटात सापडले आहेत. आणखी असेही आढळून आले आहे की, सदनी लेखापाल आणि परिव्यय लेखापाल यांच्या कमतरतेमुळे गेल्या तीन वर्षापासून पुष्कळ प्रकरणे प्रलंबित आहेत म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 61 अन्वये योग्य सुधारणा करण्याची गरज आहे म्हणजे विक्रीकर संमंत्रकाना न्याय मिळेल आणि प्रलंबित प्रकरणे विहित वेळेत निकाली काढली जातील.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वि.प.वि.क्रमांक 4 मांडते

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : खाजगी शाळांतील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) विनियमन (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. IV OF 2009**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977)

श्री.रामनाथ मोते सभापती महोदय, सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 4 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) विनियमन अधिनियम, 1977 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये बहुसंख्य शाळा खाजगी संस्थामार्फत चालविल्या जातात. अनुदानित असो वा विनाअनुदानित असो या सर्व शाळांसाठी राज्य सरकारने महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी ( सेवाशर्ती ) अधिनियम, 1977 व महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा कर्मचारी सेवा नियमावली 1981 मधील तरतुदी लागू केलेल्या आहेत. 1977 मधील कायदा आणि 1981 च्या सेवा नियमावली जरी राज्यातील शासन मान्य शाळासाठी खाजगी किंवा शासकीय शाळांसाठी लागू करण्यात आलेल्या असल्या तरी त्या कायद्याच्या कक्षेत आणि 1981 च्या नियमावलीत सी.बी.एस.सी. आणि आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळा तसेच आय.बी. च्या शाळा येत नाहीत या शाळांना राज्य शासनाने मान्यता दिलेली नसते फक्त राज्य शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र दिलेले असते तसेच माध्यमिक शाळा शिक्षण मडळाची किंवा एस.एसा.सी. बोर्डाशी त्या शाळा जोडलेल्या नसतात . या शाळांमध्ये प्रवेश घेतांना विद्यार्थ्याचे वय, शाळेची वेळ, ..

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.संजय केळकर)**

**नंतर श्री.सरफरे**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

घटनात्मक आरक्षण, सार्वजनिक सुट्टया, राष्ट्रीय कार्यक्रम करणे अशा अन्य बाबींमध्ये अत्यंत आक्षेपार्ह अशाप्रकारची पध्दत अवलंबिली जाते. आज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे सीबीएसई आणि आयसीएसएफच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी काही कोटा ठरवावयाचा आहे. त्याकरिता 90/10 टक्के कोटा ठरवीत असतांना काही अडचणी निर्माण होतील की काय असा संभ्रम निर्माण झाला आहे. याचे प्रमुख कारण असे की, सीबीएसई आणि आयसीएसएफ बोर्डाच्या शाळा राज्य शासनाच्या कायद्याच्या कक्षेत येत नसल्यामुळे राज्य शासनाच्या आदेशांचे उल्लंघन केले किंवा आदेशाचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कारवाई करता येत नाही. त्यामुळे राज्यात सुरु असलेल्या या सर्व शाळांना कायद्याच्या कक्षेमध्ये आणण्यासाठी विधानसभेमध्ये चर्चा झाली. त्याबाबत शासनाने कोणतीही कारवाई केली नाही. त्याकरिता सीबीएसई आणि आयसीएसएफ व अन्य तत्सम शाळांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी हे अशासकीय दुरुस्ती विधेयक मी सभागृहासमोर मांडीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. संजय केळकर)** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 200 चे वि. प. वि. क्रमांक 4 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

**अशासकीय कामकाज - ठराव**

**पृ.शी.**: दूरचित्रवाहिन्यांवरुन प्रक्षेपित होणाऱ्या कार्यक्रमांचे नियंत्रण करणे

**मु.शी.**: दूरचित्रवाहिन्यांवरुन प्रक्षेपित होणाऱ्या कार्यक्रमांचे नियंत्रण करणे या विषयावरील डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते.

''दूरचित्रवाणी वाहिन्यांवर प्रक्षेपित केले जाणारे अश्लिल व हिंसाचाराची प्रक्षेपण व त्यामुळे समाजावर होणारे अनिष्ट परिणाम लक्षात घेता विविध दूरचित्रवाहिन्यांवरुन प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या मालिका व अन्य कार्यक्रम, हे प्रक्षेपण योग्य आहेत किंवा नाही याबाबतची तपासणी करणारी चित्रपटांसाठी असणाऱ्या सेन्सॉर बोर्डाप्रमाणे तत्सम यंत्रणा स्थापन करुन त्या अन्वये दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन प्रक्षेपित होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे नियंत्रण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारास ही विधानपरिषद शासनास करीत आहे.'

सभापती महोदय, मी अनेक वर्षापासून या ठरावाबाबत पाठपुरावा करीत आहे. परंतु काही ना काही कारणाने अशासकीय कामकाज पुढे ढकलले जात आहे किंवा ते लॅप्स होत आहे. विधानसभा किंवा विधानपरिषदेमध्ये या विषयावर चर्चा घेण्यात यावी याकरिता जवळ जवळ तीन वर्षे सामाजिक संस्था व महिलांच्या संघटना पाठपुरावा करीत आहेत. आज दूरचित्रवाहिन्यांवरील वेगवेगळया वाहिन्यांवर अनेक प्रकारचे कार्यक्रम दाखविले जातात. त्यामध्ये बातम्या, चर्चा, मालिका, वादविवाद, चित्रपट, धार्मिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम सादर केले जातात. त्याचप्रमाणे् वृत्त वाहिन्या व चित्रपट वाहिन्यांवरुन संमिश्र व विविध भाषांमधून कार्यक्रम दाखविले जातात. अशाप्रकारे जवळपास 150ते 175 वाहिन्या असून त्यांना नियंत्रित करण्याची गरज काय? असा प्रश्न विचारला जातो. किंबहुना, एखाद्या वाहिनीवरुन वेगवेगळया प्रकारच्या चर्चा आयोजित केल्या जातात, किंवा पाकिस्तान वाहिनीचे कार्यक्रम दाखविले जातात. काही केबल नेटवर्कवरुन पाकिस्तान वाहिन्यांचे कार्यक्रम चोरुन दाखविले जातात अशाप्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे...

त्याचप्रमाणे रात्री 9-10 वाजल्यानंतर बऱ्याच वाहिन्यांवरुन गुन्हे कसे घडतात किंवा त्यांचे काल्पनिक चित्रण केलेले कार्यक्रम दाखविले जातात. किंवा वेगवेगळया प्रकारच्या संगिताचा वापर करुन हिंसेचे उदात्तीकरण करणारे कार्यक्रम दाखविले जातात. अशा वाहिन्यांचे स्वरुप पाहता त्यावरील अशाप्रकारचे कार्यक्रम 31 डिसेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमामधून प्रक्षेपित केले जातात.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:20

डॉ.नीलम गोऱ्हे . . . . .

त्यामध्ये अशोभनीय, अश्लील, त्याचबरोबर आपण घरातील सगळया सदस्यांबरोबर एकत्र बसून, लहान मुलांसमोर बघण्यासारखे हे कार्यक्रम आहेत की नाहीत याबाबतीत शासन काही विचार करते की नाही असा संभ्रम प्रत्येक समाजातील घटकांच्या मनामध्ये निर्माण होत आहे. तसेच आतापर्यंत या विषयाच्या संदर्भात काहीच काम केलेले नाही काय ? असाही प्रत्येकाच्या मनात प्रश्न निर्माण होतो. यासंदर्भात कोर्टाने वेळोवेळी राज्य शासनाला काय आदेश दिलेले आहेत. विशेषत: मुंबई उच्च न्यायालयाने काही पिटीशनमध्ये सामाजिक संस्थांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात निर्णय देताना शासनाने याबाबतीत कोणकोणती कर्तव्ये पार पाडली पाहिजेत याबाबत आदेश दिलेले आहेत. मी त्याचे संदर्भ माझ्या भाषणामध्ये देणार आहे. 2004 मध्ये दलवीर भंडारी आणि डॉ.डी.वाय.चंद्रचूड यांच्यासमोरील रिट पिटीशन क्र.1232 दाखल करण्यात आला होता. त्यावेळी तो रिट पिटीशन दाखल करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती प्रतिभा नाथानी यांनी काही उदाहरणे दिली होती. त्यानुसार दि. 18 व 19 फेब्रुवारी 2004 मध्ये "झी" सिनेमाने "कामसूत्र" हा सिनेमा दाखविला होता. तसेच दि.21-02-2004 रोजी "बॅण्डीट् क्वीन", दि.14-02-2004 रोजी "वाईल्ड थिंग्ज" हे सर्व "ए" सर्टीफीकेट असलेले पिक्चर दाखविले होते.

(काही माननीय मंत्री महोदय आपसात बोलतात.)

सभापती महोदय, एकतर या चर्चेच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर घ्यावे की नाही याबद्दल माझ्या मनामध्ये शंका होती. पण माननीय मंत्री महोदय येथे बसून भलत्याच गप्पा मारणार असतील आणि या चर्चेमध्ये त्यांचे कॉन्सन्ट्रेशन रहाणार नसेल, त्यांना बाहेर काही कामे करावयाची असतील तर मी आताच्या आता अशासकीय ठरावावरील ही चर्चा येथेच थांबविते. दुसरे म्हणजे बाकीच्या मंत्री महोदयांना या मंत्री महोदयांची काही विचारपूस करावयाची असेल तर तुम्ही ते लॉबी मध्ये जाऊन करु शकतात. मुद्दा असा आहे की, सदनामध्ये एकतर अशासकीय कामकाज कमी वेळा होते आणि आज ते कामकाज होत असताना जर त्याबद्दल गांभीर्य रहाणार नसेल तर ते योग्य नाही. राज्यातील जनता सभागृहातील सन्माननीय सदस्यांकडून अपेक्षा करते की, याठिकाणी काही जबाबदारीचे काम झाले पाहिजे. पण जर याठिकाणी गांभीर्य ठेवले नाही तर आपण जनतेचा अपेक्षाभंग करीत आहोत असे म्हणावे लागेल.म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की,या विषयाच्या बाबतीत आपण स्वत: आणि तुमचे जे अधिकारी आहेत, त्यांनीही एकाग्रपणे लक्ष दिले पाहिजे.

. . . .3 एच-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . . .

सभापती महोदय, जेव्हा "ए" ग्रेडचे सिनेमे वेगवेगळया वाहिन्यांवर दाखविले जातात, तेव्हा सिनेमॅटोग्राफ कायदा 1952 याचा संपूर्णपणे भंग झालेला आहे आणि याची अनेक उदाहरणे सामाजिक कार्यकर्त्यांनी रिट पिटीशनच्या माध्यमातून दाखविली आहेत. यामध्ये "ए" ग्रेड सिनेमांच्या संबंधीच्या जाहिराती, त्या कार्यक्रमांचे फोटो दाखविणे हे सुध्दा बेकायदेशीर आहे. म्हणून त्यावेळी कोर्टाने असे आदेश दिले होते की, तुम्ही तीन महिन्यांमध्ये "ए"ग्रेडचे कोणकोणते सिनेमे दाखविले, विशेषत: सिनेमा दाखविणाऱ्या ज्या वाहिन्या आहेत उदाहरणार्थ "झी" सिनेमा, "सेट मॅक्स","स्टार गोल्ड", "स्टार मुव्हीज" इ.वाहिन्यांना कोर्टाने नोटीसेस दिल्या होत्या. त्यावेळी पोलीस आयुक्तांनी प्रतिज्ञापत्र देताना असे सांगितले आहे की,"यावर केंद्र शासनाचे नियंत्रण असते. त्यामुळे आमच्या हातामध्ये काही नाही." तसेच चीफ जस्टीस डॉ.डी.वाय. चंद्रचूड यांनी नंतर जेव्हा त्यांच्यासमोर अशी काही उदाहरणे आली, तेव्हा परत इतर काही कायद्यांचे संबंध दिलेले आहेत. त्यावेळी असा प्रश्न उपस्थित झाला की, "ए"ग्रेडचा सिनेमा फक्त 18 वर्षाच्या वरील लोक थिएटरमध्ये जाऊन पाहू शकतात. असे असतानाही या विविध वाहिन्या कोणतेही बंधन न ठेवता सातत्याने सर्रास असे सिनेमे प्रक्षेपित करीत असतात. अशा वेळी पोलिसांकडून किंवा सांस्कृतिक विभागाकडून त्यांच्या कडे काही विचारणा केली जाते की नाही ? असा प्रश्न निर्माण होतो. परंतु सदरहू विभाग अशा प्रकारची विचारणा करीत नसावेत असे या वाहिन्यांच्या संपूर्ण वर्तनावरुन दिसते.

सभापती महोदय, मी दुसरे उदाहरण देऊ इच्छिते. काही वाहिन्या अशा आहेत की ज्या मध्ये सरळ-सरळ भारतीय देशाचे हित आणि संस्कृती याबद्दल कुचाळकी किंवा कुचेष्टा केल्याचे दिसून येते. यामध्ये संबंधितांनी "व्हीएच-1" म्युझिक चॅनेलचे उदाहरण नमूद केले होते. त्यामध्ये 8 ऑक्टोबर रोजी "Saturday Night Live" नावाचा कार्यक्रम दाखविण्यात आला होता. त्यामध्ये भारताचा तिरंगा दाखविण्यात आला. पण त्यातील केशरी भागावर "इंडिया"असे लिहिलेले होते आणि "हिरव्या भागावर लैंगिकतेच्या संदर्भातील वाक्य होते. त्यामध्ये म्हटले होते की, "भारतामध्ये जो अभ्यास करण्यात आला, त्यावरुन असे दिसते की, भारतीय पुरुषांमध्ये काहीतरी कमी आहे असे म्हणून त्यासंदर्भात विनोद केले होते. "व्हीएच-1" म्युझिक चॅनेलवर बोलत असताना असेही सांगण्यात आले होते की, "म्हणूनच जेव्हा अमेरिकेकडून भारताला तांत्रिक मदत देण्याची वेळ येते, तेव्हा भारतीय लोक त्या तांत्रिक मदतीमध्ये कमी पडतात. कारण भारतीय पुरुषांमध्येच कुठेतरी पुरुषत्व कमी आहे" असे म्हणून याबाबतीत विनोद करण्यात आले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

ही व्हीएच-1 वेबसाईट भारतामध्ये 20 लाख लोक बघतात असे त्यांच्या वेबसाइटवर म्हटलेले आहे. 148 मिलियन घरांमधून आणि 124 देशामधून व्हीएच-1 चॅनेल बघितले जाते अशी माहिती मिळाली आहे. या वाहिनीवरुन या गोष्टी "सॅटर्डे नाईट लाईव्ह"मध्ये दाखविल्या गेल्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही, असे याचिका कर्त्यांनी कोर्टासमोर स्पष्ट केलेले आहे. या व्हीएच-1 चॅनेल बरोबरच झी-कॅफे वर 'सेक्स ॲण्ड द सिटी' ही इंग्रजी सीरियल देखील दाखविली गेली, ती संपूर्ण ॲडल्ट स्वरुपाची होती. तसेच या वाहिन्यांवरुन काय दाखविले जाते याची माहिती वर्तमानपत्रातून दिली जाते. डीएनए वर्तमान पत्रात अशी बातमी आली होती की, एका 9 वर्षाच्या चंदनसिंग नावाच्या तिसरीतील मुलाने लखनौमध्ये एम.टी.व्ही.वर रिॲलिटी शो नावाचा धाडशी शो पाहिला होता. तो रिॲलिटी शो असा होता की, एका स्टूलवर उभे रहायचे, गळयाभोवती दोर बांधून घ्यायचा आणि तो स्टूल ढकलण्यचा प्रयत्न करायचा, अशी दोन मुलांमधील ती स्पर्धा होती. हा कार्यक्रम या चॅनेलवर बघितल्यावर त्या मुलाने तो तसाच्या तसा करायचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये तो चंदनसिंग नावाचा मुलगा गळफास लागून मेला. ही बातमी वर्तमानपत्रात आलेली आहे. त्यामुळे अशा पध्दतीचे रीॲलिटी शो किती मर्यादेपर्यंत असावेत याच्या बद्दल शासन विचार करणार आहे काय?

अश्लिलता आणि हिंसाचाराच्या समर्थनाच्या बरोबरच चॅनल 'व्ही' वर एक स्पर्धा दाखविलेली आहे. त्यामध्ये मुलगे आणि मुली यांची स्पर्धा होती. ती स्पर्धा अशी होती की, त्या मुलाने त्या मुलीबद्दल आणि तिच्या आई बद्दल तो किती घाणेरडे बोलू शकतो, ते त्यांने बोलायचे. या सगळया गोष्टीचा पिटिशनमध्ये उल्लेख केलेला आहे. हे सगळे या कार्यक्रमामधून सातत्याने दाखविले जाते. आपल्याकडे नेहमी मराठी आणि हिंदी मालिकांपुरतीच चर्चा मर्यादित रहाते परंतु या परदेशातून प्रक्षेपित होणाऱ्या वाहिन्यांवर जे कार्यक्रम प्रसारित केले जातात त्याबद्दल शासनाने

असे म्हटले आहे की, हे आमच्या हातात नाही. कारण हे केबल नेटवर्कवरुन डायरेक्टली प्रक्षेपित होतात. या गैरसमजाचा पर्दाफाश कोर्टासमोर झालेला आहे. दिनांक 14 सप्टेंबर, 2004 ला श्री. जावेद अहमद यांनी असे सांगितले की, केबल टेलिव्हिजन नेटवर्क 1995 च्या कायद्यावर केंद्र सरकारचे नियंत्रण आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, तिसरा प्रश्न असा उपस्थित झाला होता की, भारतातील कोणता कायदा याला लागू आहे? त्यावेळी श्री. दलबीर भांडारी बरोबरच श्री. बोबडे यांचे न्यायालय आणि त्यांनी शेवटी जो निकाल दिला त्यामध्ये त्यांनी सरकारला असे सांगितले आहे की, तीन कायद्यांचा उपयोग अश्लिलतेचे आणि या अशोभनीय गोष्टींचे नियंत्रण करण्यासाठी शासन करु शकते. त्यातील पहिला कायदा सिनेमॅटोग्राफ सेक्शन 4 आणि 5 आहे. त्याच्यामध्ये व्हिडियो फिल्म्स आणि वेगवेगळया प्रकारचे सर्व कार्यक्रम येतात. मग ते संगिताचे असतील,खाजगीमध्ये केलेले कार्यक्रम असतील परंतु त्याचे फायद्यासाठी प्रक्षेपण होत असेल किंवा ते दाखविले जात असतील तर या सगळयांमध्ये शासन हस्तक्षेप करु शकते आणि कायद्याचा भंग झाला आहे असे शासन म्हणू शकते. दुसरा कायदा, केबल टेलिव्हिजन नेटवर्क 1995 चा जो कायदा आहे त्या संदर्भातील पिटिशनची कॉपी माझ्याकडे आहे. माननीय मंत्रिमहोदयांना त्या पिटिशनच्या प्रती मी देणार आहे. त्यामध्ये त्यांनी "प्रोग्रॅम कोड" असे म्हटलेले आहे. त्यात त्यांनी म्हटलेले आहे की, चित्रपटांचे कार्यक्रम, नाटके, जाहिराती, मालिका या सगळयामध्ये काहीही अश्लील आणि बदनामीकारक असेल तर शासन त्याचे नियंत्रण करु शकते आणि जिल्हा मॅजिस्ट्रेटला याबाबत आक्षेप घेण्याचे, त्याच्याबद्दल कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत. तिसरा कायदा, मुंबई उच्च न्यायालयाने 2004 च्या निकालपत्रात सांगितलेला आहे, तो म्हणजे "Indecent Representation of Women's Prohibition Act, 1986" या कायद्यानुसार स्त्रीदेहाचे अश्लील प्रदर्शन करण्यावर बंदी आहे. याची जबाबदारी महिला व बालकल्याण विभाग, मनुष्यबळ विकास विभाग आणि गृह विभाग या तिघांवर आहे. यांनी हे रोखण्याचे काम करायला पाहिजे. जे अश्लील पोस्टर्स लावली जातात त्याची सुध्दा मंजुरी देणाचे किंवा त्याला रोखण्याचे काम करणाऱ्या सहा ॲथॉरिटीज आहेत.त्या देखील या प्रतिज्ञापत्रामध्ये निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आपण जर असे म्हणावयास लागलो की, आमच्या हातात काय आहे, परस्पर प्रक्षेपण होत असेल तर आम्ही कसे थांबविणार ? त्याबाबत मला असे वाटते की, या सगळ्या वाहिन्यांवर जे कार्यक्रम होतात त्यांचे विभाजन आपण तीन भागांमध्ये करु शकतो. एक म्हणजे ज्या मालिका आणि जे कार्यक्रम मुंबईमध्येच तयार होतात, जवळजवळ अनेक मालिकांचे स्टडिओ मुंबईमध्ये आहेत आणि त्याच ठिकाणी या वाहिन्यांवरचे कार्यक्रम तयार होतात. दुसऱ्या ज्या आहेत त्या महाराष्ट्रात प्रसारित होतात पण भारतात कोठे तरी अन्यत्र तयार होत असतात. तिसरे ज्या आहेत त्या भारताबाहेर बनतात आणि या ठिकाणी प्रक्षेपित होतात. तिसरा जो भाग आहे त्यामध्ये ज्या भारताबाहेरुन येणाऱ्या फिल्म्स आहेत त्यांच्यासाठी केबल नेटवर्क कायदा आहे त्यानुसार त्याचे जे प्रोग्राम कोड आहे त्यानुसार आपण केबल नेटवर्कवर काय दाखविले जात आहे यासंदर्भात एखादी समिती नेमू शकता. परंतु केवळ केबल नेटवर्कला यामध्ये जबाबदार धरण्यापेक्षा पोलिसांनी डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस आणि अंमलबजावणीची जी सीआयडीची ब्रँच आहे त्यांच्यावर याची जबाबदारी कोर्टाने टाकली आणि त्यांनी असे सांगितले की, संबंधित जे जे लोक आहेत, मग या मालिकांचे प्रक्षेपण करणाऱ्या वाहिन्या आहेत, त्यांच्यावर आपण असे बंधन आणा की, त्यांनी दर महिन्याच्या 5 तारखेला कळवावे की त्यांनी कोणकोणते कार्यक्रम प्रक्षेपित केले. मला ठरावाव्दारे या ठिकाणी असे सुचवावयाचे आहे की, कोठले कार्यक्रम प्रक्षेपित केले हे नंतर सरकारला कळविण्यापेक्षा पुढच्या महिनाभरामध्ये सिनेमा दाखविणाऱ्या ज्या वाहिन्या आहेत त्या वाहिन्या कोणते सिनेमे दाखविणार आहेत आणि त्यांच्या संदर्भात सेंसॉर बोर्डाचे सर्टिफिकेट त्यांच्याकडे आहेत काय त्याची माहिती एकत्र करणारी यंत्रणा त्यांच्याकडे आहे काय आणि नसली तर ती यंत्रणा आपण उभी करावी असे मला सुचवावेसे वाटते. काही वाहिन्यांवर बातम्यांचा भाग म्हणून अनेक वेळेला अश्लील चित्रफितीचे शॉट्स परत परत दाखविले जातात. जसे आपण पाहिले की, क्रिकेटच्या मॅचच्या वेळेला काही नृत्यांगणा काही ठिकाणी नृत्य करीत होत्या. काही ठिकाणी 31 डिसेंबरला मल्लीका शेरावतचे नृत्य अनेक वाहिन्यांवरुन दाखविले जात होते. यासाठी प्रत्यक्षात ज्या पोलिसांच्या दक्षता समित्या आहेत त्या आणि सांस्कृतिक विभाग, महिला व बालकल्याण विभाग याची काय घडते आणि त्याच्याबद्दल काही तक्रारी आल्या तर कारवाई करणे यासंदर्भात एखादी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे.......

यंत्रणा पाहिजे. तिसरा महत्वाचा भाग असा की, ज्या मालिका तयार होतात त्यासंदर्भात आम्ही कालच वर्तमानपत्रात वाचले की, बाल कामगार काम करीत आहेत म्हणून सरकारने त्यांना नोटीस दिली. पण प्रत्येक वेळेला ती घटना घडल्यानंतर आपण सगळी पावले उचलतो. मला आपल्याला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मालिकांचा परिणाम फक्त स्त्रियांवर वाईट होतो काय किंवा मालिकांचा परिणाम फक्त पुरुषांवर वाईट होतो काय ? एकूण समाजातील हिंसाचाराचे उदात्तीकरण, स्त्रिचे संपूर्णपणे सातत्याने अवमूल्यन केले जाणे आणि त्याचबरोबर अतिमहत्वाची गोष्ट म्हणजे लहान मुलांवर गुन्हेगारीचे आणि अश्लीलतेचे संस्कार सातत्याने होत आहेत. प्रश्न असा येतो की, फिल्म सेसॉर बोर्ड आहे, नाटकाचे सेसॉर बोर्ड आहे. मध्यंतरी केंद्र सरकारमार्फत श्रीमती अंबिका सोनी यांनी 26/11 च्या हल्ल्यानंतर असे जाहीर केले की, आम्ही वाहिन्यांवर काही रेग्युलेशन आणणार आहोत. त्याला अनेक वाहिन्यांनी प्रचंड विरोध केला आणि वाहिन्यांनी निश्चितपणे असे सांगितले की, आम्हाला कुठलेही नियंत्रण नको, आम्ही स्वत:च्या जबाबदारीने हे काम करु. मग प्रश्न हा उपस्थित होतो की, वाहिन्या जर स्वत:च्या जबाबदारीने काम करु असे म्हणत आहेत तर त्यांनी जर खरेच जबाबदारीने हे काम केले नाही असे आपल्याला ज्या ज्या ठिकाणी वाटत असेल त्याबाबतीत आपल्याकडे एखादी यंत्रणा आहे काय की या वाहिनीवर ही जी बातमी दाखवली ती अमूक एक बातमी बेजबाबदारपणाची होती, किंवा मी आपिल्याला उदाहरण देईन की,कलर्स वाहिनीवर बिगबॉस म्हणून एक शो झाला. अगरी तीन चार महिने तो शो चालू होता. खासदार श्री. संजय निरुपम पण त्यामध्ये काम करीत होते. त्यामध्ये त्यांच्या घरातील फक्त स्वच्छतागृहातील दृश्ये सोडून बाकी सर्व दृश्ये कलर्स वाहिनीवर दाखविली जात होती आणि संपूर्ण यातील उदाहरणे पाहिली तर अशा गोष्टींमध्ये ज्या ठिकाणी आपल्याला सरळसरळ दिसते की, अश्लीलताच नव्हे तर मर्यादेचा सर्व प्रकारचा भंग अगदी खुलेआम चाललेला आहे अशा वेळेला तिथल्यातिथे सरकारचे डोळे जागे नाही काय ? जे समाजाच्या डोळ्यांना दिसते ते सरकारच्या डोळयांना का दिसत नाही असे माझा प्रश्न आहे

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

म्हणून सरकारने सुध्दा हे प्रक्षेपित होणारे कार्यक्रम चालू असताना त्यावर एखादी गोष्ट आक्षेपार्ह आहे म्हणून, त्या वाहिनीला ती मालिका तयार करणा-यांना आपण अश्लिलतेचा भंग केला म्हणून शिक्षा करता येते. उच्च न्यायालयाने या तीन कायद्याचा उल्लेख केलेला आहे. सिनेमाटोग्राफचा कायदा, अश्लिलता विरोधी कायदा आणि आयपीसी 292 या तिन्ही तुम्ही भंग केला आहे म्हणून शासनाने तुमच्यावर का कारवाई करु नये असा प्रश्न विचारुन या मालिकाकर्त्यांना, किंवा वहिन्यांच्या संचालकांना दोन वर्षापासून ते पाच वर्षापर्यंतची शिक्षा होऊ शकते. परंतु सरकारची कोणतीही यंत्रणा जागेवर नसल्यामुळे 2004 मध्ये उच्च न्यायालयाने निकालपत्र देऊन देखील सरळसरळ भूत प्रेत, वेगवेगळया पध्दतीने नरबळी देणे, खून, वेगवेगळया पध्दतीचे अपमृत्यू, कटकारस्थाने दाखविली जातात. मी असे म्हणणार नाही की, शासन त्यातील प्रत्येक गोष्टीवर नियंत्रण ठेवू शकेल. शेवटी सर्जनशीलता व कलात्मकता हे व्यक्तीचे दोन्ही अधिकार आहेत. ठोकळेबाज पध्दतीचे साहित्य तयार व्हावे असे मी म्हणणार नाही. ज्या कार्यक्रमांमध्ये अश्लीलता तर दिसतेच आहे, परंतु भाषा सभ्यतेच्या मर्यादा सोडून सातत्याने चित्र दिसत आहे. त्याबाबत त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे की, संगीत दाखविणा-या ज्या वाहिन्या आहेत त्यांच्यावर सुध्दा हे बंधन आहे. या सगळयांवर तिन्ही कायद्याच्या आधारे, त्याला शब्द सेन्सॉर वापरावयाचा किंवा नाही याच्यावर चर्चा होऊ शकते. ज्यावेळी आम्ही एखादा मुद्दा मांडतो त्यावेळी नैतिक संरक्षण असा शब्द वापरुन शिवसेना व भारतीय जनता पक्षाला झोडण्यासाठी बरेच लोक नेहमी तयार असतात. तुम्ही नैतिक संरक्षण का करीत आहात असे विचारतात. पण मॉरल पोलिसिंग करावयाचे नसेल तर स्वत:ची जबाबदारी त्या वाहिन्या पार पाडतात की नाही हे बघण्यासाठी संवेदनशीलतेने आणि या कार्यक्रमाचा मतितार्थ समजून घेऊन काम करणारी एखादी यंत्रणा सरकारमध्ये असावयास पाहिजे. आज नाटय सेन्सॉर बोर्ड आहे, सिनेमा सेन्सॉर बोर्ड आहे, परंतु मालिका आणि वाहिन्यांवरुन होणा-या कार्यक्रमांवर कोणाचेही नियंत्रण नाही. परदेशातून जे सरळ येत आहे ते आपण कसे रोखणार असे आपण म्हणतो. तांत्रिकदृष्टया ते जरी अवघड असले तरी ज्या वाहिन्या देशविरोधी आहेत अशा काही साईट्स शासन ब्लॉक करु शकते. अशा पध्दतीने काही वाहिन्यांसंबंधी कसा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे...

विचार करता येईल ते एक निश्चित आव्हान आहे. परंतु महाराष्ट्रात ज्या मालिका तयार होतात त्या मालिका व विविध कार्यक्रम जर का कोणाचेच निर्बंध मानणार नसतील आणि ते लोक म्हणत असतील की आम्ही स्वत: सी.डी.बनवितो आणि आम्ही त्या बघतो. जसे मध्यंतरी 'छमिया' नावाच्या सी.डी.ने धुमाकूळ घातला होता आणि लोक असे म्हणत होते की अशा सी.डी. सगळीकडे मिळतात. माझा प्रश्न असा आहे की, जेथे सामूहिकरित्या प्रसारण होते आणि सरकारची कर वसुलीची जबाबदारी आहे असे सरकार मानते. तर त्यावर नियंत्रण आणण्याची जबाबदारी सुध्दा शासनावरच येते. शासनाने सेटटॉप बॉक्सबद्दल नियंत्रण आणले आहे त्याप्रमाणे यावर शासनाने नियंत्रण आणले नाही तर पुढील काळामध्ये अजून अध:पतन सातत्याने सुरु झाल्याचे दिसून येईल. सध्या नजरेत बोथटपणा येत आहे आणि इतकेच नव्हे तर या मालिकांमध्ये वेगवेगळया प्रकारचे दिवस लोक शोधून काढत आहेत. मध्यंतरी त्यांनी 'हेड लाईन्स टूडे' चे उदाहरण दिले आहे. त्यांनी 'बिकनी डे' म्हणजे आपण वेगवेगळे दिवस ऐकत आलो आहोत. आम्ही 'व्हेलेंटाईन डे' ला विरोध करतो. पण त्यांनी आता 'बिकनी डे' शोधला आहे. मग त्यामध्ये वेगवेगळया वेशभूषा काय, वेगवेगळया बिकनी घातलेल्या बायका दाखविण्याचा धुमाकूळ दिवसभर चालला होता. प्रश्न असा येतो की, चंगळवाद आणि स्त्रीचे शरीर केवळ उपभोगाची वस्तू समजायचे, एवढे नव्हे तर केवळ उपभोग घेऊन ती फेकून द्यावयाची अशी त्यामध्ये त्यांनी वर्णनं केली आहेत, तसेच चाबकाने फटकारे मारणे अशा शॉटचा उल्लेख आहे, ज्यायला आपण विकृती म्हणू. सॅडीस पध्दतीच्या सगळया विकृत स्वरुपाच्या गोष्टींचे उदात्तीकरण करणारे वेगवेगळया पध्दतीचे मुद्दे आमच्या प्रेक्षकांसमोर जात असतील तर ते कितपत योग्य आहे याचा विचार केला पाहिजे. केवळ मी नैतिक, अनैतिकतेमध्ये जाणार नाही. नैतिकता आणि अनैतिकता या सापेक्ष गोष्टी आहेत असे आपण गृहित धरले तरी देखील आपण लक्षात घेतले पाहिजे की, गुन्हयांचे समर्थन, स्त्री देहाचे प्रदर्शन, अश्लिलतेचा व्यापार, या  या गोष्टी गुन्हयामध्ये घडतात. म्हणून सरकारने आयपीसी 292, सिनेमाटोग्राफच्या कायद्याचे सेक्शन 4 व 5 व....

यानंतर श्री.शिगम....

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...

"इनडिसेण्ट रिप्रेझेण्टेशन ऑफ वुमेन्स ॲक्ट" आणि "केबल नेट वर्क" या संबंधातील तीन कायद्यांची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे. मात्र ही अंमलबजावणी करीत असताना हप्ते गोळा करण्याचे ते साधन होऊ नये. नाही तर अमूक अमूक दाखविल्या मुळे पैसे द्या अन्यथा कारवाई होईल असेही पोलिसांकडून सांगितले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा चर्चेच्या माध्यमातून आणखीन एक दोन मुद्दे उपस्थित होतात ते म्हणजे महिलांनी अशा प्रकारचे काम करावे का ? याबाबतीत मतभेद असू शकतात. आमचे मत असे आहे की, अशा प्रकारचे काम महिलांनी करु नये. आर्थिकदृष्ट्या प्रोत्साहन देऊन महिलांना अशा प्रकारचे काम करण्यास प्रवृत्त केले जात असावे. जेवढे कमी कपडे घातलेले असतील तेवढी जास्त माणसे असतात. म्हणून लेडीज बार बंद पडले. परंतु घराघरामध्ये ते सुरु होतील की काय अशा प्रकारचे चित्रण या वाहिन्यांवरुन दिसते. तेव्हा याबाबतीत सरकार कोणती कायदेशीर जबाबदारी उचलणार आहे यासंबंधीचे आव्हान सरकारसमोर आहे. तेव्हा मी जो हा अशासकीय ठराव मांडलेला आहे त्याचा या सदनाने गांभीर्याने विचार करुन याबाबतीत ठोस पावले उचलण्यास सरकारला भाग पाडावे अशी मी सदनाला विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

ठराव प्रस्तुत झाला.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी एक चांगला विषय या सदनासमोर आणलेला आहे. या अशासकीय ठरावाच्या संदर्भात बोलत असताना मी एक गोष्ट निश्चितपणे सांगेन की वाहिन्यांवरुन, चित्रपटांद्वारे, नाटकांद्वारे आजकाल ज्या भूमिका केल्या जातात त्याबाबतीत मर्यादा घालण्याची गरज आहे. शेवटी कोणतीही गोष्ट करीत असताना समाजाचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी किमान त्या निर्मात्यांनी घेणे गरजेचे आहे. एखाद्या वाहिनीवरुन एखादी मालिका प्रदर्शित करताना, नाटक दाखविताना, सिनेमा प्रदर्शित करीत असताना तो कमर्शियल किती असावा आणि समाजिक किती असावा यासंबंधीच्या मर्यादा गळून पडतात की काय असे वाटू लागले आहे. आम्ही देखील लज्जा, अंकूर, सत्यकाम, आनंद, श्वास यासारखे चित्रपट पाहिलेले आहेत. पण आता या कलाक्षेत्राकडे बघत असताना घृणा यावी अशा कलाकृती दाखविल्या जात आहेत. एखाद्या कलाकृतीच्या नावे एका समाजव्यवस्थेतील घटकाचे विकृतीकरण केले जात असेल, एक्स्प्लॉयटेशन केले जात असेल तर त्याची या सभागृहाने गंभीरपणे दखल घपेण्याची गरज आहे. अतिशय आक्षेपार्ह बाब अशी आहे की महिलांसमोर, समाजासमोर काय, तरुण पिढीसमोर काय आदर्श ठेवावा ? शेवटी समाजमनावर आपल्या देशाचा इतिहास, चांगल्या परंपरा ह्या ठसल्या पाहिजेत, सिनेमातून, नाटकातून त्या दिसल्या पाहिजेत. पण आज अशी परिस्थीती दिसते की या विकृत चित्रीकरणामुळे येणारी नवीन पिढी काय विचार घेईल ? छत्रपती शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले यांचे विचार समाजमनावर ठसविण्याचे किती प्रयत्न केले जातात ? माणसांच्या नात्यातील विकृतीकरण करुन मालिका दाखविल्या जात आहेत. स्वयंवर या मालिकेत अभिनेत्री राखी सावंत ही लग्नासाठी इच्छूक असलेल्या मुलांना फॉर्म्स वाटते, त्यातून मुलांची निवड करते आणि लग्न करते, असे खोटे लग्न त्या मालिकेतून दाखविण्यात येणार आहे. मग खोटा हनिमूनही दाखविला गेला तर त्यात आश्चर्य वाटायला नको. सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचे चित्रिकरण दाखविताना, कलाकृती प्रदर्शित करताना आपण समाजाचे काय देणे लागतो याचा निर्मात्यानी आणि

..3..





(ॲड. उषा दराडे...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कलाकृतीमध्ये काम करणा-यांनी विचार केला पाहिजे. पण आज आपणाला सिनेमा, दूरचित्रवाहिन्या यांच्या द्वारे हे जे सर्व प्रकार सहन करायला लागत आहेत ते कुठे तरी थांबायला पाहिजेत. भयपट, भविष्य मालिका, सासू-सुनाच्या मालिका, नंनद-भावजयची छळवणूक करते आणि भावजय ननंदेची छळवणू करते अशा प्रकारच्या मालिका सर्रासपणे दाखविल्या जातात. त्यामधून समाजामध्ये कोणता विचार जाणार आहे ? आज समाजामध्ये देशासाठी जीव देणारी माणसे आहेत. स्वातंत्र्य संग्रामामध्ये प्राणांचे बलिदान करुन देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारी माणसे आहेत. एका वेळी त्याच माणसाशी 10 लग्ने होतील असे या देशामध्ये होऊ शकते काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

सासू सुनेला आणि सून सासूला कसा त्रास देते हे सगळे दाखवून चुकीचा पायंडा पाडला जात आहे. या देशाला पुरोगामीत्वाची परंपरा आहे. असे असताना महिलांच्या अस्तित्वाचा प्रश्न समोर येतो. महिलांकडे उपभोगाची वस्तू म्हणून बघण्याचे पाप केले जात आहे याची सभागृहाने गांभीर्याने दखल घ्यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपल्या भाषणातून सर्वच मुद्दे प्रकट केले आहेत. दुर्दैवाने यावर करावयाच्या कारवाईचा प्रश्न येतो त्यावेळी राज्य सरकारपेक्षा केंद्र सरकारच्या कोर्टामध्ये बॉल टाकला जातो. त्यामुळे या संदर्भात कारवाई करण्याची केंद्र सरकारची जबाबदारी आहे. वेगवेगळया प्रकारचे कायदे आज अस्तित्वात आहेत. सेन्सॉर बोर्ड आहे, केबलचा कायदा आहे याची आम्हाला कल्पना आहे. तरी देखील त्यांनी ज्या भावना सभागृहात व्यक्त केल्या त्याच्याशी मी या सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्य सहमत असेलच. त्यांनी काही उदाहरणे सांगितली आहेत. अश्लिलतेबाबत, हिंसाचाराबाबतची उदाहरणे दिली आहेत. क्राईम डायरी या सारखे कार्यक्रम आज प्रत्येक वाहिनीवर वेगवेगळया नावानिशी दाखविले जात आहेत. गुन्हा कसा करावा, गुन्ह्याचे उदात्तीकरण त्या कार्यक्रमाच्या स्लॉटमध्ये दाखविले जाते. त्यामुळे गुन्हेगारांना गुन्हा करण्यास प्रेरणा मिळते. आपण गुन्हा केल्यानंतर त्यातून कसे बाहेर पडू शकतो, पुरावा कसा नष्ट करायचा हे दाखविले जाते, हे अतिशय चुकीचे आहे. या वाहिन्यांवर अशा प्रकारच्या सिरियल्स, पर्टिक्युलर कार्यक्रम येण्यापूर्वीच ते रोखले जाणे आवश्यक आहे. केवळ हिंदीतून नव्हे तर मराठीतून देखील असे कार्यक्रम दाखविले जातात. आज सगळ्या सिरियल्स स्टार वाहिन्यांवर दाखविल्या जात आहेत त्या विवाहबाह्य संबंधावर अवलंबून आहेत. प्रत्येक सिरियल्समध्ये हेच दाखविले जात असल्यामुळे दुर्दैवाने संस्काराचा स्तर कुठपर्यंत चालला आहे यावर आपल्याला अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, दुसरे एक उदाहरण भयपटाचे देऊ इच्छितो. कलर्स या वाहिनीवर सध्या "कोई है" ही सिरियल दाखविली जात आहे. आपण एका बाजूला म्हणतो की, आजच्या आधुनिक जगात भूत, प्रेत, पिशाच्च यावर विश्वास ठेवायचा की नाही? दुसरीकडे या सिरियलद्वारे रिॲलिस्टीक स्टोरी दाखवून भूत कसे असते, काय असते हे दाखविले जाते. या सिरियलच्या माध्यमातून आपल्याला 50 वर्षामागील काळात घेऊन जातात. झाडाखाली गेल्यानंतर महिलेला भूतबाधा कशी होते अशा प्रकारच्या सिरियल्स आहेत. या सिरियल्सवर बंदी आणावी असे मी म्हणत नाही. परंतु एखाद्या घरात लहान मूल दूरदर्शन बघत असते, मोठी माणसे बघत असतात, त्यांच्या मनावर अशा कार्यक्रमामुळे विकृत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

सभापती महोदय, आज दूरदर्शनवर एकही कमर्शियल जाहिरात ही स्त्रीशिवाय पूर्ण होत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अक्षयकुमारची जाहिरात असो, धोनी-बिपाशा बसूची जाहिरात असो, प्रत्येक जाहिरात स्त्री कॅरेक्टरशिवाय पूर्ण होत नाही. अशा प्रकारच्या एक्स्प्लॉयटेशनसाठी, फक्त कमर्शियल जाहिरातीसाठी स्त्रियांचा वापर करणे अतिशय चुकीचे आहे. त्यासाठी आपल्याकडे कायदा कोणता आहे याची माहिती नाही. परंतु या कायद्यामध्ये कठोरता आणणे गरजेचे आहे. केबलवाल्यांकडून मिडनाईट शो म्हणून रात्री उशिरा 1-2 वाजल्यानंतर असे चित्रपट दाखविले जातात. यावर राज्य शासन बंदी घालू शकते. खेडेगावात, चॅनेल्सवरुन असे चित्रपट दाखविले जातात. टॉकिजमधून, व्हिडिओ पार्लरमधून असे चित्रपट दाखविले जातात त्यावर बंदी आणणे आवश्यक आहे. यासाठी जास्तीत जास्त कठोर कायदा करुन याबाबत शासन करणे अत्यंत आवश्यक आहे.

-------

3एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, हम आने वाली पीढ़ी के लिए कैसे समाज का वारसा देना चाहते हैं, यह हमें आज सोचना पड़ेगा. एक समाज जिसमें गुन्हेगारी इतनी है कि उसको कोई पुलिस, कोई कायदा कंट्रोल में नहीं ला सकता, आज ऐसी परिस्थिति है. औरत की डिगिनिटी के लिए आज हमें बात करनी पड़ रही है, ऐसे वातावरण में अगर हम अपनी नैतिक जिम्मेदारी की बात करना गलत समझते हों तो मैं इस बात का निषेध करती हूँ. क्योंकि हम सब की जिम्मेदारी है. सभागृह में बैठे हुए माननीय सदस्य समाज में अपने आप को ऊँचे स्तर का समझते हैं. पॉलिसी मेकिंग हाउस के अन्दर माननीय सदस्या नीलम ताई ने बहुत अच्छा प्रश्न उपस्थित किया है, इसलिए मैं उनका अभिनंदन करना चाहती हूँ.

सभापति महोदय, मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहती हूँ कि जब हम अंध श्रद्धा निर्मूलन का कायदा ला सकते हैं तो नैतिक जिम्मेदारी के लिए कायदा क्यों नहीं बना सकते हैं ? इस तरह का नियंत्रण बहुत जरुरी है. हम अपने समाज को मर्यादा के बाहर नहीं जाने दे सकते. इसके लिए शासन को माननीय सदस्या नीलम ताई के सुझावों पर विचार करना चाहिए और इस बारे में कायदा बनाना चाहिए. धन्यवाद.

. . . . .

भाषण पूर्ण, नंतर 3N 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे, त्याला समर्थन देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज ज्या पध्दतीने हिंसेचे किंवा अश्लिलतेचे प्रदर्शन किंवा उदात्तीकरण चालले आहे, ते पाहता हा विषय केंद्रसरकारच्या अखत्यारीत येतो असे म्हणून चालणार नाही. या विषयाच्या संदर्भात राज्य शासनाने त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी घेणे गरजेचे आहे. केंद्रसरकारने कंडीशनल ॲक्सेस सिस्टीमच्या संदर्भात चार महानगरामध्ये म्हणजे मुंबई, दिल्ली, चेन्नई आणि बंगलोर या महानगरांमध्ये ही सिस्टीम सुरु केली होती. जे अश्लील मालिका किंवा पिक्चर आहेत, ज्यांना "ए" सर्टिफिकेट मिळालेले आहे. ते 18 वर्षावरील व्यक्तींना पाहण्यासाठी सेन्सॉरची परमिशन लागते व तशा पध्दतीने ही सिस्टीम सुरु करण्यात आली होती. परंतु महाराष्ट्र सरकारने त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जे धोरण अवलंबावयास पाहिजे होते, किंवा कायद्याची अंमलबजावणी करावयाची होती, त्याकडे महाराष्ट्र सरकारने दुर्लक्ष केले. म्हणून या कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी झाली नाही, होऊ शकली नाही. या विषयावर बरेच काही बोलता येण्यासारखे आहे. या विषयामध्ये टेक्नॉलॉजी आहे, तसेच या विषयामध्ये अनेक कायदेशीर बाबी आहेत. परंतु किमान कंडीशनल ॲक्सेस सिस्टीम सुरु करण्यासाठी आणि ती यशस्वीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्रशासनाला जर हमी दिली तर कंडीशनल ॲक्सेस सिस्टीमची अंमलबजावणी होऊ शकते. या ठिकाणी जो विषय आहे त्याला दोन बाजू आहेत. त्या दोन्ही बाजू व्यवस्थित बघितल्या गेल्या पाहिजेत. कंडीश्नल ॲक्सेस सिस्टीम सुरु झाली तर हे सर्व प्रकार त्वरित थांबतील असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवतो.

--------

...2 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, जगातील सर्वात मोठी लोकशाही भारतामध्ये आहे. त्याच पध्दतीने जगाच्या पाठीवर सर्वात सुसंस्कृत देश, सुसंस्कृत विचारसरणी घेऊन राहणारा देश कुठला असेल तर तो भारत देश आहे. परंतु आज आपण टी.व्ही. चॅनलच्या माध्यमातून बघत आहोत की, या देशातील मोठयात मोठा बंगला असेल किंवा लहानात लहान झोपडी असेल त्या ठिकाणी दूरदर्शनच्या माध्यमातून प्रत्येक चॅनल पोहचलेले आहे. या चॅनलवर वेगवेगळया मालिका बघावयास मिळतात. या अगोदर एम टी.व्ही., व्ही. चॅनल अशा पाश्चिमात्य चॅनल्सला आपण दोष देत होतो. परंतु आता आपण पहायला लागलो आहोत की, अशा पध्दतीच्या काही मालिका आपल्याच देशात तयार व्हावयास लागल्या आहेत. त्यामध्ये अश्लिलता भयानक प्रमाणात दिसावयास लागलेली आहे. केंद्र सरकार किंवा राज्य सरकारला हा विषय आमच्या अखत्यारित येत नाही, असे म्हणून जबाबदारी झटकून चालणार नाही. कारण या सभागृहात बसलेल्या सर्वांच्याच घरात आज हे चॅनल्स घुसलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

श्री.रमेश शेंडगे ...

पुढच्या पिढीच्या अस्तित्वाचा प्रश्न यातून निर्माण झालेला आहे.सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अतिशय महत्वाच्या आणि चांगल्या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी अशासकीय ठराव मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.त्याच बरोबर मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, एका सामाजिक बांधिलकच्या भावनेतून या ठरावाकडे शासनाने पहावे व आपल्या संस्कृतीवर जे पाश्चिमात्य आक्रमण होत आहे ते त्वरित रोखण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी . केवळ पैसे मिळविण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचा धंदा करण्यासाठी पाश्चिमात्यांकडून आपल्या संस्कृतीवर आक्रमण होत आहे ते थांबविण्यासाठी शासनाने प्रयत्न केला पाहिजे. अनुकरण करण्याची प्रवृत्ती प्रत्येक माणसामध्ये असते.अनुकरणाच्या बाबतीत मी आपल्याला येथे एक उदाहरण देऊ इच्छितो. काही वर्षापूर्वी "एक दुजे के लिये " नावाचा सिनेमा प्रदर्शित झाला होता हा सिनेमा पहिल्यानंतर एकमेकांवर प्रेम करणा-या नवयुवक युवतींनी आत्महत्या केल्या होत्या. अशा प्रकारे आपल्या घरात, आपल्या संस्कृतीवर आक्रमण करणारी ही गोष्ट असून देशाच्या अस्मितेचा प्रश्न त्यातून निर्माण होत आहे. " इस्कॉन "नावाच्या संस्थेबाबत किंवा अन्य काही पाश्चिमात्य संस्थेबाबत मला असे सांगावयाचे आहे की, आपल्या संस्कृतीचे ते अनुकरण करावयास लागले आहेत. परंतु आपण मात्र पाश्चिमात्यांचे अनुकरण करावयास लागलो आहे या कृत्यामध्ये धंदेवाईक लोक पैसे कमविण्यासाठी घुसलेले आहेत तेव्हा हे प्रकार त्वरित थांबविण्यात आले पाहिजे. आपल्या संस्कृतीचे चांगल्या प्रकारे जतन कसे होईल याकडे आपण अधिक लक्ष दिले पाहिजे परंतु ते काम आपण झिडकारावयास लागलो आहोत हे योग्य नाही तेव्हा हे प्रकार थांबविण्यासाइी जे काही कडक उपाय आपल्याला करता येतील ते त्वरित करावेत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी या ठिकाणी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय,अश्लीलता आणि श्रृंगार असे दोन शब्द असून श्रृगांराकडे बघत असतांना आपण कोणत्या भावनेतून पाहणार आहोत ? आपल्या राज्यात अजिंठा व वेरुळ येथे लेण्या आहेत त्या लेण्यांकडे पहात असतांना आपण कोणत्या भावनेतून पाहणार आहोत ? त्याचबरोबर आज दूरदर्शनच्या विविध चॅनल्सच्या माध्यमातून जो बाजार मांडलेला आहे त्याकडे कोणत्या भावनेतून पाहणार आहोत? आज विविध चॅनल्यवरुन जी अश्लीलता दाखवली जाते तो एक सामाजिक व्यभिचार आहे. या चॅनल्सवरुन सामाजिक व्याभिचार सुरु आहे हेच शब्द त्याकरिता वापरावे लागतील. मघाशी सन्माननीय सदस्यानी "साऱ्याच संवेदना बोथट होतात " असे शब्द प्रयोग वापरले असून तो शब्द प्रयोग मला आवडला आहे. आता अश्लील व हिसांचाराचे दूरदशर्नवरुन जे प्रक्षेपण केले जाते त्याचे आम्हाला काहीच वाटत नाही. त्या संदर्भात आता आम्हाला वाईटही वाटत नाही आणि चांगलेही वाटत नाही. या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने विविध चॅनल्सच्या अश्लीलतेचा मुद्दा आम्ही मांडत आहोत परंतु ही अश्लीलता कोठे कोठे आपण थांबविणारआहोत तसेच ती अश्लीलता कशी कशी थांबविणार आहोत हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते असे म्हणाले की, "तुम्ही अश्लील प्रक्षेपण पाहू नका." त्यांचे हे म्हणणे सत्य आहे. परंतु एखाद्याचे तरुण वय असल्यामुळे त्याच्यामध्ये अश्लील प्रक्षेपण पाहण्याचे आकर्षण निर्माण होते. त्याच बरोबर त्याच्या घरामध्ये कोणाचेही बंधन नसते, दूरदर्शनवर अश्लील प्रक्षेपण पहावयास मिळत आहे. त्याचप्रमाणे इंटरनेटच्या माध्यमातून कोणं्त्याही वेबसाईटवर गेल्यावर काहीही पहावयास मिळते. त्यामुळे तो युवक हे अश्लील दृश्ये पहात असतो. तेव्हा या सर्वावर बंधन कसे घालता येईल या दृष्टीने सन्माननीय सदस्य श्री अनिल वरब यांनी जो मुद्दा मांडला होता तो राष्ट्रीय पातळीवर अंमलात आणण्यासारखा आहे. जेव्हा एखादा विनोद होत असतो त्या विनोदामध्येसुध्दा अश्लीलता असते. परंतु शृगांराकडे कोणत्या भावनेतून पाहणार आहात हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे. या ठिकाणी मला एक आठवण झाली ती मी आपल्याला सांगतो." मोगले आझम" या चित्रपटात दिलीपकुमार आणि मधुबाला यांचे प्रेम दाखवित असतांना दिलीपकुमार



VTG/ MAP/ KGS/ ST/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे

श्री.अरविंद सावंत ..

मधुबालाच्या चेह-यावर मोरपीस फिरवतो  परंतु तो शृंगार पाहतांना अश्लीलता वाटत नाही.आता मात्र अत्यंत अश्लील व विवस्त्र प्रक्षेपण पाहत असतांना त्याचा परिणाम तरुणांईवर कसा होतो हे पाहणे आवश्यक आहे. अर्थात सर्वच तरुण आणि दूरदर्शनवरील मालिका वाईट आहेत असे मी म्हणणार नाही. आज सारेगमपचा कार्यक्रम आपण सर्वानी पहिलेला आहे त्यामध्ये लहान पाच मुला मुलीचा कार्यक्रम पाहिल्यानंतर संपूर्ण् देशभर वा महाराष्ट्रभर त्यांचे कौतूक सुरु आहे . केवळ मिडियामुळेच हे कौतूक होत आहे हे सुध्दा आपण मान्य केले पाहिजे. सारेगमप कार्यक्रमामुळे या मुलांना गाण्याचा कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळाली. त्यामुळेच त्यांच्यातील टॅलेन्ट आपणा सर्वाना पाहता आले. तेव्हा दूरदर्शनमुळे  खूप एनर्जी मिळते ,बरेच काही शिकता येते हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे.एखादे गाणे झाल्यानंतर ज्यावेळी संगीतकार वा इतर व्यक्ती त्यावर कॉमेन्टस देत असतात त्यावेळी आपल्या असे लक्षात येते की, या ॲगलमधून या गाण्याकडे पाहण्याचा आपला ॲगलच नाही. अर्थात आपण काही त्या क्षेत्रातील पारंगत नाही. आपण काही तानसेन नाही आपण फक्त कानसेन आहोत .तरीसुध्दा त्या गाण्यातील बारीक सारीक गोष्ट आपल्या लक्षात येत नाही.या गोष्टी तिसरा माणूस जेव्हा लक्षात आणून देतो तेव्हा आपल्याला असे वाटू लागते की, खरेच हे वरदान त्याला मिळालेले आहे. परंतु हीच गोष्ट आणखी दुसरीकडे जाते तेव्हा ते शाप आहे काय असे वाटू लागते . त्यामुळे सामाजिक संस्काराचे  अभिसरण करणा-यांची  जबाबदारी ज्यांच्यावर आहे  त्या  व्यक्ती आपणच आहोत. म्हणूनच माननीय सदस्यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे.आताची  कुटुंब पध्दती बदलली आहे पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती त्यामध्ये आजी, आजोबा,काका, भावंडे एकत्रच रहात होती. भावाचे लग्न झाले तरी तो एकत्र कुटुंबातच राहत असल्यामुळे ते कुटुंब मोठे असावयाचे. त्या मुळे त्या कुटुंबात कोणाचे तरी लक्ष असावयाचे .परंतु आता विभक्त कुटुंब पध्दती असल्यामुळे प्रत्येक घरात हम दो आणि हमारे दो एवढयाच व्यक्ती असतात.  ..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आम्ही दोघे नोकरी करतो, आमची मुले आमच्या मागे काय करतात, इंटरनेटवर काय पहातात हे आम्हाला माहीत नाही. आम्हाला त्यांच्याकडे बघायला वेळ मिळत नाही. अशा परिस्थितीत पुढे काय होईल? याचे भय पालकांच्या मनात असणे स्वाभाविक आहे. म्हणून आपण त्यांना सावरले पाहिजे असा त्याच्या पाठिमागे हेतू असावा. माझ्याकडे पार्लमेंटचे पुस्तक आहे त्यातील शेवटचे वाक्य वाचून दाखवितो. "Adopting resolutions to combat human trafficking." याठिकाणी हयुमन ट्रॅफिकींग म्हटले आहे. परवा पनवेल येथे राधाकृष्ण हॉटेलमध्ये तरुण मुली पकडल्या गेल्या. त्यामध्ये कुणाची तरी मुलगी असेल याचे आपल्याला दु:ख होते. त्याठिकाणी 20-22 वर्षाच्या तरुण मुली जीन पँट घालून वेश्या व्यवसाय करीत असतांना पकडण्यात आल्या. कमी श्रमामध्ये अधिक मजा कशी मारता येईल अशाप्रकारचे चंगळवादी आयुष्य जगण्याचा आनंद कसा घेतला जात आहे. मुंबईची परिस्थिती पाहिल्यानंतर एकदा बॉम्ब स्फोट झाल्यानंतर या मुंबईचे काही खरे नाही. म्हणून आहे तेवढे दिवस मौज मजा करावयाची असा नवीन विचार तरुण मुलांच्या मनामध्ये झिरपत चालला आहे. आणि म्हणून हयुमन ट्रॅफिकिंगला प्रतिबंध करण्याची गरज आहे. सभापती महोदय, मी आपल्याला नेपोलियन बोनापार्टचे शेवटचे वाक्य वाचून दाखवितो. "Give us healthy, secured and well looked after women and we can proudly see the development of the greatest nation" यावरुन स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बोनाफाईड आहे हे स्पष्ट होते. आणि म्हणून जर इच्छा असेल तर आपण चांगला देश घडवू शकतो असे सुचवून व या प्रस्तावाला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

श्री. राणा जगजितसिंह पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एका अतिशय महत्वाच्या विषयावर अशासकीय ठराव मांडून चर्चा घडवून आणली आहे. या ठरावाच्या मसुद्यामध्ये दूर चित्रवाहिन्यांवर प्रक्षेपित केले जाणाऱ्या अश्लील व हिंसाचाराच्या प्रक्षेपणामुळे समाजावर परिणाम होत आहे असे म्हटले आहे. म्हणून त्यानी या ठरावाच्या माध्यमातून याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा आणि या कार्यक्रमामध्ये जे चुकीचे घडत आहे त्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे अशी विनंती केली आहे.

या चर्चेच्या माध्यमातून अनेक माननीय सदस्यांनी वेगवेगळे मुद्दे मांडले आहेत. यामध्ये विचार करण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. सभागृहामध्ये खरोखरच काही निर्णय घ्यावयाचा असेल तर त्यासाठी खूप इनोव्हेशन लागते. लगेच तातडीने काही सांगता येईल अशी परिस्थिती नाही. परंतु गेल्या काही वर्षामध्ये जे काही काय घडले, त्याबाबत सभागृहाला आवर्जून सांगितले पाहिजे सन 2005 मध्ये या विषयावर चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने transmission of violent movies and advertisements याबाबत मिनिस्ट्री ऑफ ब्रॉडकास्टींग अँड इन्फॉर्मेशन यांच्या पत्रामध्ये आवर्जून उल्लेख केला होता. त्यामध्ये अशाप्रकारचे कार्यक्रम दाखविणाऱ्या चॅनेलवर बंदी आणावी. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी तात्काळ उत्तर देतांना सांगितले की, केबल टीव्ही नेटवर्क रेगुलेशन 1995 ॲक्टमधील तरतुदीनुसार आपण कारवाई केली आहे. त्यांनी अेएक्सएन चॅनेलचा उल्लेख केला. त्याबाबत सांगितले पाहिजे की, या चॅनेलवर मध्यंतरी बंदी घातली होती. त्या बंदीच्या ऑर्डरमध्ये म्हटले होते की, "They are telecasting programmes which are against good taste and decency and are likely to affect public morality" असा आवर्जून उल्लेख करुन या चॅनेलचे ट्रान्समिशन किंवा रिट्रान्समिशन करण्यावर बंदी घातली होती. ही प्रोव्हिजन त्यांनी दोन-तीन महिन्यासाठी केली होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

एक अतिशय महत्वपूर्ण स्टेप उचलली गेली होती. हे मला येथे आवर्जून नमूद करावयाचे आहे. तसेच हा जो ॲक्ट आहे, त्याबद्दल देखील आपण सर्वांनी समजून घेण्याची गरज आहे. "Cable TV Networks Act. 1995" आहे. त्यामध्ये ऑथराईज् ऑफीसरची व्याख्या दिलेली आहे,म्हणजे जो डी.एम. असतो म्हणजे कलेक्टर, सब डिव्हीजनल मॅजिस्ट्रेट किंवा शहरी भागामध्ये कमिशनर ऑफ पुलीस यांना त्यांनी ऑथराईज् ऑफीसर असा मुद्दाम उल्लेख केलेला आहे. हा जो ऑथराईज् ऑफीसर आहे, त्याला अनेक पॉवर्स् दिलेल्या आहेत. उदाहरण द्यावयाचे तर जर त्यांना काही इक्वीपमेंट सीझ करावयाच्या असतील तर तसे करता येऊ शकते किंवा "power to prohibit transmission of certain programmes in public interest" हे देखील करण्याचे त्यांना अधिकार आहेत. मी अगोदर जे उदाहरण दिले. त्या अनुषंगाने केंद्र सरकारला देखील पूर्ण केबल टेलिव्हीजन नेटवर्क आहे, त्याचे देखील ट्रान्समिशन बंद करण्याचे अधिकार आहेत. या अशासकीय ठरावाच्या अनुषंगाने आपल्या राज्याच्या बाबतीत सांगावयाचे तर गुन्हे शाखेतील अंमलबजावणीचे जे विंग आहे, त्यांच्याकडून माहिती घेतली होती की, आपण मुंबई शहरामध्ये साधारणपणे आपल्याकडे कोणत्या तक्रारी आल्या आहेत ? त्याबाबत कोणती-कोणती कारवाई केली आहे ? याठिकाणी ही सर्व माहिती वाचून दाखविणे मला काही योग्य वाटत नाही. परंतु ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवता येईल. "एमटी.व्ही." चा "Splitsvilla" नावाचा कार्यक्रम आहे. त्यामध्ये असभ्य व शिवराळ भाषा वापरण्यात आली होती. त्या अनुषंगाने नोटीस जारी केली आहे. त्याबाबत पुढील कारवाई सुरु आहे. तसेच वर्जिन मोबाईल कंपनीने चॅनेलवर जाहिरात प्रक्षेपित केली होती, त्याबाबतीत देखील आक्षेपार्ह आढळून आलेले आहे. त्यांना नोटीस देऊन ही जाहिरात बंद करण्याबाबत सांगितलेले आहे. कलर्स् टी.व्ही.वर देखील "बिग बॉस" च्या अनुषंगाने गुन्हा रजिस्टर करण्यात आलेला आहे. याठिकाणी हे सर्व सांगण्याचा हेतू असा आहे की, आपण यासंदर्भात पावले उचलण्याचा निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत. या चर्चेच्या दरम्यान मोरल पोलिसींगच्या बाबतीत सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनीच उल्लेख केला होता. आपण मॉरल पोलिसींग करतो असा देखील आक्षेप यावयास नको आणि त्याचबरोबर लोकांनी जबाबदारीने वागावयास हवे हे देखील मला येथे आवर्जून सांगण्याची गरज आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब साहेबांनी "Conditional Access System (कॅस)"

. . . .3 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

बाबत उल्लेख केला होता. पण इंटरनेट कनेक्शन असलेले कॅस असेल किंवा कॉम्प्युटर असेल, त्याचा वापर आपण योग्यरितीने केला नाहीतर चुकीच्या गोष्टी घडू शकतात आणि घडतील. त्यामुळे याबाबतीत अधिक भाष्य करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी सूचना केली होती की, आपण राज्यस्तरीय सेन्सॉर बोर्ड निर्माण करावयास पाहिजे आणि जे प्रोग्रॅम प्रक्षेपित होणार आहेत, ते कोणीतरी अगोदर पाहून मग त्याचे सर्टीफीकेशन करावे. त्याबाबत आपल्याला निश्चित विचार करता येईल. परंतु याची अंमलबजावणी करण्यासाठी नेमके काय करावयाचे हे मात्र आता याक्षणी सांगणे कठीण आहे. आपल्याला याबाबतीत एक बैठक घेऊन निश्चितपणे चर्चा करता येईल हे मला आपल्याला आवर्जून सांगावयाचे आहे. परंतु ठरावाचा जो मुख्य मुद्दा आहे की, अशा प्रकारे अश्लील आणि हिंसाचारी स्वरुपाचे प्रक्षेपण होत आहे, यावर नियंत्रण करण्यासाठी आपण केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा. पण आज याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. तेव्हा मी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांना विनंती करतो की, त्यांनी आपला ठराव मागे घ्यावे आणि त्याचबरोबर मी आपल्याला असे आश्वासन देतो की, आपण उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे आणि राज्य शासनाच्या माध्यमातून याबाबत जे काही करणे शक्य आहे, ते निश्चितपणे करु. याठिकाणी सेन्सॉर बोर्ड निर्माण करण्याच्या संबंधात जी सूचना केली आहे, त्या दृष्टीने पावले उचलण्याच्या बाबतीत एक बैठक घेऊन चर्चा करु असे मला या निमित्ताने आवर्जून सांगावयाचे आहे. तरी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

-----

. . . .3 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मला शासनाला एक प्रश्न विचारावयाचा आहे की, काल विधानसभेमध्ये माननीय मंत्री श्री.नवाब मलिक यांनी सिरिअलमध्ये काम करणाऱ्या बाल कलाकारांवर काही ॲक्शनच्या बाबतीत सांगितले आहे. तो योग्य की अयोग्य हे माहिती नाही. पण स्लमडॉग मिलेनिअर मधील कलाकारांना सुध्दा असेच प्रचंड काम करावे लागले. परंतु आपण त्यांना फ्लॅट दिले आणि "बालिका वधू" या सिरिअलमधील कलाकारांबाबत आपण ॲक्शन घेत आहोत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

सरकारने या बाबतची आपली भूमिका आज नाही तर उद्या स्पष्ट करणे आवश्यक आहे. आज या निमित्ताने मी या ठिकाणी हा विषय मांडला आहे. या दोन्ही कलाकारांमध्ये तफावत का करण्यात येत आहे, आणि यातील लॉजिक काय आहे हे मला कळत नाही.

श्री.राण जगजितसिंह पाटील : सभापती महोदय,या विषयी आपणच काही निर्देश दिले तर जास्त चांगले होईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, समानता त्याचबरोबर व्यक्तिची प्रतिष्ठा, जबाबदारी, सभ्यता या सगळया मुद्यांचा साहित्यात अविष्कार होतो, असे आपण मानतो त्याच पध्दतीने वेगवेगळया वाहिन्यांवरुन प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांच्या बद्दल शासनाची संस्कार करण्याची, आणि त्याबद्दलची जबाबदारी निभावण्याचा विचार माननीय मंत्रिमहोदयांनी तत्वत: मान्य केला आहे असे माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणावरुन दिसते. ते निश्चितपणे स्वागतार्ह आहे. पण किती दिवसात ही प्रक्रिया सुरु करण्यात येईल किंवा सांस्कृतिक धोरण सरकार करीत आहे असे माझ्या वाचनात आले आहे तर त्या सांस्कृतिक धोरणामध्ये या मालिकांच्या कार्यक्रमाच्या बाबतीत धोरणात्मक विचार करुन त्याबाबतचा स्वीकार करण्यात येणार असेल तर आपोआपच त्या प्रक्रियेला गती मिळू शकेल. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांकडून मला आश्वासनाची अपेक्षा आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, जे सांस्कृतिक धोरण ठरणार आहे त्याबाबतीत मी शब्द देऊ शकत नाही. परंतु आज जी चर्चा झाली आणि त्याच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जो महत्वचा मुद्दा मांडला, तो 'सेन्सर' हा शब्द मी वापरतो परंतु त्याच्या अनुषंगाने जे काही प्रोग्रॅम प्रक्षेपित केले जातात ते "विदीन लिमिट्स ऑफ डिसेन्सी" असावे यासाठी आपण जे काही म्हटलेले आहे त्याच्या अनुषंगाने निश्चित बैठक बोलावण्यात येईल. राज्य शासनाच्या माध्यमातून ते कंट्रोलमध्ये कसे आणता येईल याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील.

डॉ.नीलम गोऱ्हे :शासनाने तत्वत: यासंदर्भात स्वत:ची जबाबदारी मान्य करुन काही सकारात्मक पाऊले उचलण्याची तयारी दखविलेली आहे म्हणून मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागगृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MAP/

**पृ.शी.**: अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देणे

**मु.शी.**: अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देणे या विषयावरील श्री. विक्रम काळे वि.प.स.यांचा ठराव

**तालिका सभापती** : या प्रस्तावासाठी उत्तरासह एकूण 40 मिनिटे वेळ देण्यात आलेला आहे.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मोडतो.

" शासनातर्फे राज्यातील मागसवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते. त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयात स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, या राज्यतील एकूण शाळांपैकी 90 टक्के शाळा ग्रामीण भागात, खेडयांमध्ये चालतात. 10 टक्के शाळा शहरी भागात चालतात. ग्रामीण भागातील 90 टक्के शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी हे साधारणपणे गरीब कुटुंबातील, शेतकरी कुटुंबातील, मोलमजुरी करणाऱ्या कामगारांची मुले शिक्षण घेतात. शेतकरी आणि गोरगरिबांची मुले शिक्षण घेत असतांना शिक्षणाचा खर्च ते पेलू शकत नाहीत. ग्रामीण भागातील शिक्षणाच्या अवस्थेवर मी या ठिकाणी थोडासा प्रकाश टाकू इच्छितो. साधारणपणे दहा वर्षापूर्वी अशी परिस्थिती होती की, दहा ते पंधरा कि.मी. दूर बाहेर गावी मुलांना शिक्षणासठी जावे लागत होते. परंतु आज ग्रामीण भागातील शिक्षणाची परिस्थिती बघितली तर असे लक्षात येते की, किमान 1000 ते 2000 इतक्या कमी लोकसंख्येच्या गावामध्ये शाळा सुरु झालेल्या आहेत. अगदी वाडी-तांडयावर सुध्दा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा सुरु झालेल्या आहेत. साखर कामगारांसाठी साखर शाळा सुरु झालेल्या आहेत. महात्मा फुले शिक्षण हमी योजनेची केंद्रे सुरु झालेली आहेत. छोटया-छोटया वस्त्यांवर वस्तीशाळा सुरु करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. आज राज्यातील शाळांची एकूण परिस्थिती विचारात घेतली तर साधारणपणे राज्यामध्ये जिल्हा परिषदेच्या आणि खाजगी प्राथमिक शाळांची संख्या जवळपास 69,330 इतकी आहे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

छोट्या छोट्या वस्त्यांमधील मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून ज्या वस्तीशाळा काढण्यात आल्या त्यांची संख्या 9361 इतकी आहे. राज्यामध्ये शासनाने जी महात्मा फुले शिक्षण हमी केंद्रे सुरु केली त्यांची संख्या 20918 झालेली आहे. जिल्हा परिषदा तसेच खाजगी संस्थांच्या मार्फत ज्या माध्यमिक शाळा चालविल्या जातात त्यांची संख्या 20830 आहे. उच्च माध्यमिक शाळा ज्याला आपण कनिष्ठ महाविद्यालय म्हणतो त्यांची संख्या 5935 आहे. या सगळ्यांचा एकत्रित विचार केला तर आज राज्यामध्ये इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या सर्व शाळांची संख्या 1 लाख 26 हजार 374 इतकी झालेली आहे. शाळांची ही संख्या राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी पुरशी आहे काय हा एक विचार करण्याचा भाग आहे. आपल्याकडे दर दहा वर्षानंतर मास्टर प्लॅन तयार केला जातो. त्याला आपण बृहत आराखडा म्हणतो. तो बृहत आराखडा शासनाने 2007-08 या वर्षी या राज्यामधील शाळांच्या बाबतीत तयार केला होता. त्याचा थोडा परामर्श घेतला तर या मास्टर प्लॅनच्या अनुषंगाने राज्यामध्ये आणखी किती माध्यमिक शाळा लागणार आहे या विषयीचा जो निष्कर्ष त्या मास्टर प्लॅनमध्ये काढलेला आहे त्यानुसार या राज्यामध्ये फक्त 56 माध्यमिक शाळा भविष्यामध्ये लागणार आहेत. मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. आम्ही माहिती घेतली त्यानुसार नवीन प्राथमिक आणि माध्यमिक शाळा मागण्यासाठी जे अर्ज आलेले आहेत त्यांची संख्या 22 हजार आहे. मास्टर प्लॅन असे सांगतो की, फक्त 56 शाळा पाहिजेत आणि दुसरीकडे शासनामार्फत जे अर्ज मागविण्यात आले त्यानुसार 22 हजार प्रस्ताव आलेले आहेत. हे शिक्षण कोणासाठी आहे याचा सुध्दा विचार करावा लागणार आहे. आज ग्रामीण भागामध्ये एका गावात एकच शाळा चालू शकते. त्या शाळेमधून गोरगरिबांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी त्या शाळा निर्माण केलेल्या आहेत. त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शासनामार्फत काही सोयीसुविधा दिल्या जातात. आज ग्रामीण भागामध्ये ज्या शाळा चालतात त्या शाळेमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर त्याला वह्या-पुस्तके मोफत दिली जातात. गरीब विद्यार्थ्यांना गणवेषाची सवलत दिली जाते. इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या गरीब किंवा सगळ्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे. अशा योजना किंवा या सवलती कोणाला लागू असणार आहेत ? याबाबत शासनाने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. विक्रम काळे .....

आदेश काढून सांगितले की, ज्या शाळांना अनुदान आहे त्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू असेल. त्याच ठिकाणी या योजनांचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण भागामध्ये जर काही शाळा चालत असतील, त्या शाळेमध्ये जर शेतकऱ्यांची मुले शिकत असतील, त्या शाळेमध्ये जर गरीब विद्यार्थी शिकत असतील तर ती शाळा फक्त कायम विना अनुदानित आहे म्हणून मध्यान्ह भोजन योजना लागू नाही. पाठ्यपुस्तक योजना लागू नाही. त्यांना फी माफीची सवलत लागू नाही. त्यांना इ.बी.सी.ची सवलत लागू नाही. ग्रामीण भागामध्ये ज्या कायम विनाअनुदानित शाळा दिल्या त्या शाळांमध्ये जे गोरगरीब विद्याथी शिक्षण घेतात त्यांना मध्यान्ह भोजन योजना लागू नाही. त्या विद्याथ्यांना खिचडी मिळणार नाही. त्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, वह्या मिळणार नाहीत. त्यांना गणवेष मिळणार नाहीत. ज्या शाळांना अनुदान मिळते त्या शाळांना सर्व सवलती लागू राहणार. ही परिस्थिती ग्रामीण भागामध्ये आहे. आज ग्रामीण भागामध्ये पाहिले तर इंग्रजी माध्यमाकडे जो ओढा आहे, सगळीकडे जे इंग्रजी बाबत बोलले जाते त्या अनुषंगाने सुध्दा जो गरीब विद्यार्थी आहे किंवा शेतकऱ्याला जर असे वाटले की, आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये, कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश द्यावा तर ते देऊ शकणार नाहीत. कारण इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये इयत्ता पहिलीची फी पाहिली तर औरंगाबाद सारख्या शहरामध्ये इयत्ता पहिलीची फी 60 हजार रुपये आहे. मुंबई-पुण्याच्या बाबतीत तर विचारच करावयास नको. मुंबई-पुण्याचा विचार जरी सोडला आणि माझ्या मतदारसंघाचा जरी विचार केला तरी औरंगाबाद सारख्या शहरामध्ये इंग्रजी माध्यमासाठी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल तर 60 हजार रुपये द्यावे लागतात. आमच्या शेतकऱ्याच्या मुलाला त्या ठिकाणी शिक्षण घ्यावयाचे असेल तो इयत्ता पहिलीमध्ये कसा प्रवेश घेऊ शकेल हा महत्वाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

हा मुख्यत: प्रश्न यानिमित्ताने निर्माण झालेला आहे. गरीबांच्या मुलांनी इंग्रजी शाळेत शिकू नये काय ? शासनाने मागासवर्गीय शाळांना दिलेल्या नाहीत, या सवलती शेतक-यांच्या मुलांना दिल्या पाहिजेत. त्यांची फी सरकारने भरली पाहिजे. आज शेतक-यांची मुले इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये, मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावयाचा झाल्यास फीची मोठी अडचण येते. या महाविद्यालयांची फी शूल्क समिती ठरविते. ही फी लाखोच्या घरामध्ये जाते. तेवढी फी भरावयाची झाल्यास शेतक-यांना बँकेच्या दारात जावे लागते. बँकांनी कर्ज दिले तर या मुलांची उच्च शिक्षणाची इच्छा पूर्ण होऊ शकते. बँकांनी कर्ज दिले नाही तर ही मुले इंजिनिअरिंग किंवा मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ शकत नाही. ही शेतक-यांच्या मुलांची व्यथा आहे. म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, ख-या अर्थाने महाराष्ट्र राज्याला पुरोगामी राज्य म्हणत असू, शाहू, फुले, आंबेडकरांचे राज्य म्हणत असू, भारत हा देश शेती प्रधान आहे असे म्हणत असू तर या प्रश्नाकडेही शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. बहुतेक शेतकरी बांधव शेतात काम करतात. शेतक-यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळण्यासाठी शासनाला ठोस भूमिका घ्यावी लागणार आहे. शासन आज ग्रामीण भागातील शाळांना काय सवलती देत आहे हा प्रश्न सुध्दा महत्वाचा आहे. एका वर्गामध्ये ठराविक मुलांची संख्या असावी यासाठी शासनाचे निर्देश आहेत, परंतु त्याचे कोठेही पालन होत नाही. शासनाने एका वर्गासाठी 25-30 विद्यार्थ्यांची संख्या निश्चित केलेली आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळा या निर्देशांचे पालन तंतोतंत करतात, त्यांची 60 हजार फी असली तरी ते 26 व्या विद्यार्थ्याला प्रवेश देत नाहीत. पण ग्रामीण भागातील शाळांमध्ये, खेडयातील शाळांमध्ये एकेका वर्गात 100-100 विद्यार्थी असतात. एक शिक्षक या सर्व मुलांकडे कसे काय लक्ष देऊ शकतो ? म्हणून या भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण द्यावयाचे असेल तर प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांच्या संख्येला मर्यादा ठेवण्यासाठी कडक धोरण स्वीकारले पाहिजे. एखाद्या संस्थेला इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज, डी.एड,बी.एड.कॉलेज सुरु करावयाचे त्यासाठी निकष ठरलेले आहेत. तुमच्याकडे ठराविक एकर जमीन पाहिजे, तेवढी जागा नसेल तर भाडयाची जागा घेतली आहे काय, ही सगळी माहिती द्यावी लागते. त्याप्रमाणे विद्यार्थी संख्येबाबत विचार करावा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

लागेल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागातील शेतक-यांच्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण घेता यावे यासाठी त्यांची फी भरण्याची व्यवस्था करावी लागेल. या विद्यार्थ्यांची प्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंतची फी शासनाने भरावी अशी या ठरावाच्या माध्यमातून विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी चांगल्या विषयाचा अशासकीय ठराव मांडलेला आहे. त्यावर मी केवळ दोन शब्द बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये अल्पभूधारक शेतकरी आहेत. एक तर त्यांना शेती परवत नसल्यामुळे ते शेती करीत नाहीत. काही लोकांचे शहरामध्ये काही नसते. त्यामुळे तो तेथे खितपत पडला असला तरी आपल्या मुलांना तो उच्च शिक्षण देऊ इच्छितो. अशा अल्पभूधारक शेतक-यांना कोणत्या स्वरुपात सहाय्य द्यावयाचे आणि किती द्यावयाचे याचाही शासनाने विचार करावा असे मी यानिमित्ताने सुचवू इच्छितो.

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

(श्री. मधुकर चव्हाण...)

मला असे वाटते की आपण या शालेय शिक्षण खात्याची सूत्रे सांभाळल्यानंतर चांगले निर्णय घ्यायला लागला आहात. या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून चांगली सूचना सरकारला करण्यात आलेली आहे. गरीब कुटुंबातील मुलांची शिक्षणाची भूक भागेल अशा त-हेची कोणकोणती आर्थिक सवलत देता येईल हे माननीय मंत्री महोदयांनी पहावे, एवढीच माझी त्यांना विनंती आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाच्या संदर्भात एकच सूचना करु इच्छितो की, या अशासकीय ठरावामध्ये दारिद्रय रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल या दोन घटकांचा समावेश केला तर हा अशासकीय ठराव पूर्ण होईल, एवढेच मला सांगावयाचे आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणामध्ये स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्याच्या संदर्भात मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून अनेक प्रश्न याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. महत्वाचा विषय असा आहे की, या राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणच नाही तर इयत्ता दहावी पर्यन्तचे शिक्षण सर्वांना मोफत केलेले आहे. मुलींसाठी इयता अकरावी आणि बारावी पर्यन्तचे शिक्षण मोफत केलेले आहे. जे अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा जे दारिद्रय रेषेखालचे लोक आहेत, भूमिहीन शेतमजूर आहेत त्यांच्या मुलांना शालेय शिक्षण मोफत मिळत असले तरी उच्च शिक्षणासाठी शालेय शिक्षणाच्या कालावधीत ज्या काही अन्य सुविधा व सवलती अन्य विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपच्या माध्यमातून मिळतात त्या त्यांना मिळाव्यात हा या ठरावाच्या पाठीमागील उद्देश आहे. या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या पालकांनासुध्दा काही मदत होण्याच्यादृष्टीने या विद्यार्थ्यांना विशेष प्रकारची स्कॉलरशिप देणे आवश्यक आहे. मग त्याला आपण मेरिट स्कॉलरशिप किंवा अन्य प्रकारचे नाव देऊ शकता. अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीरन शेतमजूर, दारिद्रय रेषेखालील लोक यांच्या पाल्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाची जबाबदारी सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री घेऊ शकणार नसले तरी या सभागृहाच्या भावना ते माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यापर्यन्त जरुर पोहोचवतील असा मला विश्वास आहे. शाळा आणि महाविद्यालयीन स्तरावर या गरीब घटकातील जे विद्यार्थी शिक्षण घेतात त्यांच्यासाठी नव्याने स्कॉलरशीप योजना तयार करावी अशी मी या ठरावाच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो आणि सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

----

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एक कार्यकर्ता म्हणून गेली 28-30 वर्षे मी या शिक्षण क्षेत्रात काम करीत आहे. या शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना ज्या गोष्टी माझ्या लक्षात आलेल्या आहेत, त्याला अनुसरुन हा ठराव असल्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे मनापासून अभिनंदन करतो. गरीब विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणा-या गोष्टी या ठरावामध्ये आहेत. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालया मार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी असे ठरावामध्ये म्हटलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अल्पभूधारक शेतक-यांच्या मुलांसाठीच नाही तर अन्य गरीब घटकातील विद्यार्थ्यांसाठी देखील स्कॉलरशिप मिळावी आणि शिक्षण शुल्कामध्ये सवलत मिळावी असे सांगितलेले आहे. दहावी आणि बारावी पर्यन्तचे शिक्षण मोफत मिळत असले तरी अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्याच्या बाबतीत काही सोय नाही. म्हणून ती सोय शासनाने उपलब्ध करुन द्यावी अशी मी या ठरावाच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो. आजची परिस्थिती अशी आहे की, अनुदानित शाळामध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत आणि इंग्रजी माध्यमांच्या विनाअनुदानित शाळामध्ये प्रवेश मिळण्यासाठी पालकांच्या रांगा लागलेल्या असतात. हे सत्य आहे. हे सत्य आपल्याला बदलायचे असेल तर आपण अनुदानित शाळातून दिल्या जाणा-या शिक्षणाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी खेड्यापाड्यातील शाळांमधून, जिल्हापरिषदेच्या शाळांमधून इंग्रजीचे आणि अन्य सर्व विषयांचे दर्जेदार शिक्षण मिळण्याची आवश्यकता आहे. तेव्हा या दृष्टीने पावले उचलावीत अशी मी शासनाला विनंती करतो आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवत देण्यात यावी अशा प्रकारचा अशासकीय ठराव सभागृहात मांडला आहे. या ठरावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, अशोक मानकर व अन्य सदस्यांनी अनुमोदन देऊन शिक्षणाच्या अनुषंगाने ब-याच काही चांगल्या सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी राज्याच्या शिक्षण खात्याची एकूण व्याप्ती किती मोठी आहे यासबंधीची माहिती दिली. अधिवेशन दोन, तीन दिवसात संपणार असल्यामुळे त्यांनी ब-याच मुद्यांना स्पर्श केला आहे.

सभापती महोदय, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे की, महाराष्ट्र राज्यात इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण मोफत केलेले आहे. तसेच इयत्ता 12 वी पर्यंतचे शिक्षण मुलींना मोफत केलेले आहे. आर्थिकदृष्टया मागासलेले आहे आणि ज्यांना आरक्षण दिलेले आहे त्यांना काही आर्थिक मर्यादा घालून त्यांना देखील शिक्षण शुल्कात सवलत दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या बाबतीतील मूळ मुद्दा मला दिसतो आहे. इयत्ता 12 वी पर्यंत येणारे विद्यार्थी मग ते मागासवर्गीय असेल, अल्पभूधारक गटातील असेल. या राज्यात इयत्ता 10 वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जात आहे आणि मुलींना इयत्ता 12 वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जात आहे. त्यातील बहुतांशी बहुतांशी विद्यार्थी हे अल्पभूधारक गटातील असतात. परंतु विशेष करुन महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीमध्ये व्यवसायीक शिक्षणाकरिता सरकारने गेल्या दोन वर्षापासून जे मागासवर्गीय आहेत, त्या अनुषंगाने जे नोटिफाईड आहेत, त्या विद्यार्थ्यांना शंभर टक्के फी मध्ये सवलत देतो असा एक वर्ग आहे आणि आर्थिकदृष्टया मागासलेला वर्गाला 50 टक्के सवलत देतो. या वर्षाच्या अर्थसंकल्पात राज्य शासनाने 1500 कोटी रुपये विद्यार्थ्यांच्या फी च्या सवलती करिता तरतूद केलेली आहे. मला वाटते देशामध्ये या प्रयोजनासाठी एवढी मोठी तरतूद करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. प्रोफेशनल कॉलेजची फी 50 हजार रुपये आहे. वैद्यकीय महाविद्यालयांची फी जास्त आहे. सन्माननीय सदस्यांनी अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी अशी मागणी केली आहे. यामध्ये

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

अल्पभूधारक शेतकरी आहेतच. मागासवर्गीय हा शेतकरी नसतो असे काही नाही, तो देखील अल्पभूधारक शेतकरी असतो. इतर मागासवर्गीय प्रवर्गात शेतकरी वर्ग असतो. आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना 50 टक्के सवलत मिळते, त्यात देखील अल्पभूधारक शेतकरी आहेतच. याची व्याप्ती मोठी आहे. बहुतांशी लोकांना सरकार सवलत देण्याचा प्रयत्न करीत आहे. विशेष करुन ग्रामीण भागामध्ये ज्या शिष्यवृत्त्या सुरु केलेल्या आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना गणुवत्तेप्रमाणेच शिष्यवृत्ती आपण देतो आहोत. त्यातून काही विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करीत असतो. परंतु शिष्यवृत्तीची रक्कम फार कमी आहे. चार रुपये, पाच रुपये अशी शिष्यवृत्ती पूवीपासून ठरविलेली आहे. त्यात सुधारणा करण्याची गरज आहे ही गोष्ट मी मान्य करतो. आता एक, दोन नवीन योजना आणण्याचा राज्य शासनाचा स्तरावर विचाराधीन आहे. जीवन श्री योजना आहे. अल्प उत्पन्न गटातील किंवा अल्पभूधारक शेतक-यांच्या किंवा जो घटक आर्थिकदृष्टया मागासलेला आहे. देशाची राष्ट्रीय विमा योजना आहे. त्याच्यातून एक एल.आय.सी.ची एक योजना राबविली जाते आहे. या गटातील विद्यार्थ्यांच्या पालकांना 100 रुपये दिले तर वर्षभरात 1200 रुपये विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मिळते. अनुदानित विद्यालयातील विद्यार्थ्यांना शासनाकडून गणवेशाचा पुरवठा केला जातो आह. परंतु या शिष्यवृत्तीतून पुस्तके व इतर गोष्टी विद्यार्थी घेऊ शकतो. या ठिकाणी विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांचा एक प्रश्न आहे. जे कायम स्वरुपी विना अनुदानित शाळा आहेत. आता "कायम" हा शब्द सरकारने काढून टाकण्याचे मान्य केले आहे. त्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत त्यांना समावून घेता येतील काय ? या विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश इत्यादी सवलतीमध्ये कसे समावून घेता येईल या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. हे विद्यार्थी देखील आपलेच आहेत. कायम विना अनुदानित शाळेत शिकतो म्हणून त्याचा काही दोष नाही. सरकारने त्या त्या वेळी शिक्षणाच्या बाबतीत अनुदानित, कायम विना अनुदानित व्यवस्था निर्माण केलेल्या आहेत. विना अनुदानित विद्यालयातील विद्यार्थ्यांना देखील शिक्षण योजनेमध्ये सामावून घेण्याची गरज आहे...

यानंतर श्री. भोगले....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 18:35

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.......

या संदर्भात राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत आहे. तो विद्यार्थी या राज्यातील आहे, म्हणून तो कोणत्या शाळेत जातो हे न पाहता त्याला सवलतीपासून वंचित ठेवायचे का हा प्रश्न होता. म्हणून सर्व शिक्षा अभियानांतर्गत त्यांना सामावून घेण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. याठिकाणी जसा पायाभूत सुविधांबाबत उल्लेख केला, त्या अनुषंगाने ज्यावेळी चर्चा होईल तेव्हा सविस्तरपणे बोलता येईल. परंतु मी सन्माननीय सदस्यांना आश्वासित करु इच्छितो की, मघाशी जी आकडेवारी सांगितली त्यावरुन सरकारची ही बांधिलकी आहे. या सगळ्या विद्यार्थ्यांच्या, विशेष करुन गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संदर्भात एवढा मोठा खर्च राज्य सरकार करीत आहे. या सगळ्या घटकांमध्ये अल्पभूधारक आणि दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना सुध्दा सवलत आहे, त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्यांनी आणखी एक सूचना केली त्या सूचनेचा राज्य सरकारच्या स्तरावर भूमिका मांडली आहे, त्या संदर्भात कार्यवाही सुरु आहे. सरकारच्या धोरणाचा पुरस्कार करताना जी भूमिका आपल्यासमोर सरकारची मांडली आहे त्या संदर्भात काही मुद्दे असतील तर मला जरुर सांगावेत. परंतु सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल असे मानून त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी दोन सूचना आणि मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करणार आहे. त्यांनी एक चांगली बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. निश्चितपणे शिक्षणाबाबत शासनामार्फत चांगला निर्णय आपण आल्यापासून करण्याचा प्रयत्न करीत आहात. आम्हाला आशा आणि आपल्याकडून अपेक्षा आहे. आपण बोलता बोलता सांगितले की, कायम हा शब्द काढण्याचा निर्णय शासनाने तत्वत: केलेला आहे. बहुधा जीआर सोमवारपर्यंत निघेल असे आपल्याला म्हणावयाचे होते. सभापती महोदय, त्या निमित्ताने मी आपल्यामार्फत मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. मंत्रीमहोदयांनी महत्वाची बाब विषद केली आहे. लवकरच कायम विनाअनुदानित शाळा आहेत, कायम हा शब्द निघणार असला तरी या शाळातील मुलांना अनुदानित शाळातील विद्यार्थ्यांना ज्या सुविधा मिळतात, त्यामध्ये पाठ्यपुस्तके, माध्यान्ह भोजन, गणवेश असेल त्या सुविधा देण्याचा विचार करीत आहात. त्या अनुषंगाने मंत्रीमहोदयांना एक विनंती करतो की, इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण केले आहे. मुलांना सुध्दा आपण सांगितल्याप्रमाणे 1 ली ते 10 वी पर्यंत मोफत शिक्षणाची सुविधा आहे. त्याच धर्तीवर 11 वी आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.विक्रम काळे....

12 वी शिकणाऱ्या मुलांना सुध्दा मोफत शिक्षण भविष्य काळात करण्याचा निर्णय आपण याठिकाणी घ्यावा एवढी विनंती आपल्याला मान्य असेल तर मी माझा ठराव मागे घेतो.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, शासन याबाबत आता पुष्कळ सकारात्मक भूमिका घेऊन पुढे चालले आहे. मेजर वर्ग होता तो विनाअनुदानित शाळांचा, त्याबाबत शासनाने भूमिका मांडली आहे. 11 वी व 12 वी मुलांच्या मोफत शिक्षणाच्या संदर्भात सरकारला विचार करावयास हरकत नाही. त्या बाबी तपासून घ्याव्या लागतील. याठिकाणी जाहीर करणे योग्य होणार नाही. परंतु आपली सूचना आहे त्या सूचनेचे मी स्वागत करतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, समाधानकारक उत्तर दिल्यामुळे मी अशासकीय ठराव मांडला आहे तो मागे घेण्यापूर्वी एक सूचना करतो. जी संपूर्ण परिस्थिती याठिकाणी विषद केली त्यामागील महत्वाचे म्हणजे शाळा विद्यार्थ्यांसाठी असतात, विद्यार्थी शाळेसाठी नसतात. म्हणून भविष्यकाळात ज्या काही शाळा लागणार आहेत त्या अनुषंगाने भविष्यात शासनाने परवानगी देण्याची विनंती आणि सूचना माननीय शिक्षणमंत्र्यांनी प्रकर्षाने लक्षात घ्यावी. ती घेऊ शकणारे आपण आहात याची जाणीव असल्यामुळे प्रकर्षाने ही सूचना आपल्यापुढे मांडली आहे. एवढे बोलून माझा ठराव मागे घेण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खान्देशातील अपूर्ण सिंचन व्यवस्थेबाबत

**मु.शी.**: खान्देशातील अपूर्ण सिंचन व्यवस्थेबाबत या विषयावरील श्री. अरुण गुजराथी, वि.प.स. यांचा ठराव

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो :--

"खान्देशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खान्देशातील सिंचनविषयक प्रगती होण्याच्यादृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, खान्देशातील शेती असेल, राज्यातील शेती असेल एक प्रकारे शेती म्हणजे "पावसाची माया, पावसाची दया, निसर्गाची लहर आणि निसर्गाची नजर" यावर अवलंबून असलेली ही शेती. खान्देश म्हटल्यानंतर जळगांव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक मधील तीन तालुके असे क्षेत्र खान्देशात येते. तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत खान्देशच्या सिंचनाची सोय केली जाते. गेल्या वर्षात खान्देशच्या पॅकेजच्या माध्यमातून काही प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात आला. माननीय श्री. अजितदादा पवार या खात्याचे मंत्री झाल्यापासून काही प्रमाणात जास्त निधी खान्देशला मिळाला ही देखील वस्तुस्थिती आहे. तथापि खान्देशचा समावेश ज्या उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळात होतो त्या उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळामध्ये खान्देशचा समावेश होत असल्यामुळे हव्या त्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नाही, ही एक वस्तुस्थिती आहे. म्हणून जादा निधी उपलब्ध व्हावा यासाठी मी ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे.

महोदय, दुसरा मुद्दा म्हणजे वन क्षेत्राची जमीन उपलब्ध होत नाही, त्यासाठी केंद्रशासनाची परवानगी मिळत नाही. अनेक प्रकल्प असे दाखविता येतील की, 20 वर्षांपासून वन खात्याची परवानगी न मिळाल्यामुळे, वन खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे हे सर्व प्रकल्प रखडून पडले आहेत. खान्देशातील सर्वात महत्वाची, खान्देशची जीवनरेषा म्हणजे तापी नदी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MAP/

श्री. अरुण गुजराथी .....

आहे. इतर ज्या नद्या आहेत त्यात गिरणा, वाघूर या नद्या देखील खान्देशच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. नाशिकमधील नद्यांच्या बाबतीत मी नंतर बोलणार आहे. खान्देशचे जे भौगोलिक क्षेत्र आहे ते 29.58 लक्ष हेक्टर आणि एकूण लागवडीचे क्षेत्र 19.65 लक्ष हेक्टर, अंतिम सिंचन क्षेत्र जे तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून प्रकाशित झालेले आहे ते फक्त 8.47 टक्के. याचा अर्थ लक्ष्यांक जो आहे तो 43.11 टक्के एवढे इरिगेशन व्हावे. असा लक्ष्यांक असताना देखील पाहिजे त्या प्रमाणात पाटबंधाऱ्यांची कामे, धरणाची कामे होत नाहीत याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना झाल्यापासून 65 प्रकल्प पूर्ण केले यातून सिंचन क्षमता 34045 हेक्टर म्हणजे एकूण लक्ष्यांकाच्या फक्त चार ते साडेचार टक्के एवढीच सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. याच गतीने पुढे गेलो तर अजून किती वर्षे लागतील हाच खान्देशातील शेतकऱ्यांचा चिंतेचा विषय आहे. आपण जिल्हा एके जिल्हा जरी विचार केला तरी बांधकामामधील प्रकल्प जळगांव जिल्ह्यात 57 पूर्ण झाले, 7 प्रकल्प वन खात्याने अडवून ठेवलेले असे 10 सोडले तरी अजून 47 प्रकल्प राहिलेले आहेत. धुळे जिल्ह्याचा विचार केला तर 21 प्रकल्प बांधकामात असून त्यातील फक्त 6 जिल्हे पूर्ण, 6 प्रकल्प वन खात्यामुळे अडकलेले असे 12 प्रकल्प सोडले तर उर्वरित 9 प्रकल्प राहिलेले आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील बांधकामातील प्रकल्पांचा विचार केला तर एकूण 24 प्रकल्प, पूर्ण झालेले 2, वन खात्यामुळे अडलेले 7 असे एकूण 15 प्रकल्प आहेत. नाशिकमध्ये 10 प्रकल्प असून त्यातील पूर्ण झालेले फक्त 2 प्रकल्प आणि उर्वरित 8 प्रकल्प बाकी आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

निधीसाठी अपूर्ण राहिलेले 79 प्रकल्प आहेत. माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आपण एका एका जिल्हयाच्या एका एका प्रकल्पाचा अभ्यास करुन कमी खर्चात प्रकल्प लवकर पूर्ण कसे होतील, जास्तीत जास्त सिंचन कसे होईल, यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सन 2008-2009 मध्ये एआयबीपीच्या माध्यमातून 270 कोटी रुपये मिळाले होते. एआयबीपीच्या माध्यमातून केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात निधी मिळत असतो. परंतु हा निधी मिळवण्यासाठी अनेक क्लिष्ट बाबींना सामोरे जावे लागत असते. एआयबीपीचा निधी मिळवण्यासाठी 4-5 वर्षे लागत असतात. एआयबीपी अंतर्गत आपल्याला 270 कोटी रुपये प्राप्त झाले होते त्यातील 177 कोटी रुपये आपण खर्च करु शकलो व उर्वरित 193 कोटी रुपये आपण खर्च करु शकलो नाही.एआयबीपीच्या माध्यमातून मिळालेला पैसा आपण खर्च करु शकलो नाही. नाबार्ड अंतर्गत आपल्याला 38 कोटी रुपये मिळाले. त्यातील 19 कोटी रुपये आपण खर्च करु शकलो व 19 कोटी रुपये आपण खर्च करु शकलो नाही. शासनाचे अंशदान 198 कोटी, खर्च केले 132 कोटी व 65 कोटी रुपये खर्च होऊ शकले नाहीत. आदिवासी खात्याच्या माध्यमातून माननीय मंत्री श्री विजय गावित साहेबांना विनंती केल्यावरुन आपल्याला 168 कोटी रुपये उपलब्ध झाले, त्यातील 80 कोटी रुपये आपण खर्च केले व 88 कोटी रुपये आपण खर्च केले नाही. एमपीव्हीसी अंतर्गत आपल्याला 68 लक्ष रुपये प्राप्त झाले होते व हे संपूर्ण पैसे खर्च झालेले आहेत. सन 2008-09 मध्ये आपल्याला एकूण 681 कोटी रुपये प्राप्त झाले असतांना आपण केवळ 415 कोटी रुपये खर्च करु शकलो व 266 कोटी रुपये आपण खर्च करु शकलो नाही.

सभापती महोदय, एक तर आपण जेवढा निधी मागतो तेवढा निधी मिळत नाही आणि जो काही निधी मिळतो, त्यातील काही निधी परत जातो हे काही योग्य नाही. एखाद्या वर्षात पैसे खर्च केला नाही, तर हा निधी परत जातो त्यामुळे जास्तीत जास्त निधी खर्च होण्याची आवश्यकता आहे. खानदेशातील एकूण प्रकल्पासाठी 10 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. सन 2008-2009 मध्ये आपण 265 कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु त्यावर 498 कोटी रुपये खर्च झाले ही एक समाधानाची बाब आहे. हे सर्व पैसे एआयबीपीच्या माध्यमातून खर्च झालेले आहेत. खानदेशात एकूण चार मोठे प्रकल्प आहे. 1) निम्न तापी प्रकल्प 2) वाघुर प्रकल्प 3) उर्ध्वतापी टप्पा क्रमांक





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

-1(हातनूर) आणि 4) उर्ध्वतापी टप्पा क्रमांक -2(नावथा आणि खै्रिया घुटी). निम्न तापी प्रकल्पाचे मूळ बजेट 399 कोटी रुपयांचे होते. परंतु आता या प्रकल्पाची किंमत 655 कोटी रुपये झाली असून त्यापैकी 108 कोटी रुपये खर्च झालेले असून अजून 546 कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

अमळनेर, चोपडा या तालुक्यांना जोडणारा पूल या ठिकाणी आहे. हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे. या प्रकल्पाचा फायदा जळगाव, धुळे व नंदुरबार या तिनही जिल्हयांना होणार आहे. वाघूर प्रकल्पाचे मूळ बजेट 578 कोटी रुपयांचे होते. त्यापैकी आतापर्यंत म्हणजे मार्च अखेर 287 कोटी रुपये खर्च झाले असून, अजून 291 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या प्रकल्पामध्ये वन विभागाच्या कायद्याची कोणतीही अडचण येत नाही. उर्ध्व तापी-हातनूरचे काम जवळपास पूर्ण झ ाालेले आहे. 230 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाला 8 दरवाजे आहेत. या नदीचा गाळ काढण्याच्या तसेच जादा दरवाजे बसवण्याच्या संदर्भात मागे चर्चा झालेली आहे. ऊर्ध्वतापी प्रकल्पाच्या संदर्भात आमची फारशी काही तक्रार नाही. या ठिकाणी चारीचा प्रश्न आहे. ज्या प्रकारे चारी पाहिजे होत्या, त्या प्रकारच्या चारी झालेल्या नाहीत. त्या चारी कशा सुधारता येतील हे पाहिले पाहिजे तसेच मुख्य चारी कशी सुधरवता येईल हे सुध्दा पाहिले पाहिजे हे काम शासनाने हाती घेतले असून हे काम सत्वर पूर्ण व्हावे अशी आशा आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

सभापती महोदय, उर्ध्व तापी - टप्पा दोन हा प्रकल्प 20 वर्षापूर्वी मंजूर करण्यात आला होता त्यावेळी या प्रकल्पाच्या कामाची किंमत 140 कोटी रुपयांची होती परंतु आता या प्रकल्पाची किंमत 900 कोटी रुपये एवढी झालेली आहे . या प्रकल्पावर 32 लाख् रुपये खर्च झालेले आहे. या कामाला फारशी सुरुवातच झालेली नाही. निम्न तापीच्या प्रकल्पाला कामाला 5 वर्षापूर्वी सुरुवात झाली होती परंतु त्यासाठी निधी मिळत नाही. उर्ध्व तापी प्रकल्पाचे काम वन खात्याच्या अडचणीमुळे सुरु होऊ शकत नाही. तेव्हा निम्न तापी आणि उर्ध्व तापी -टप्पा दोन हे दोन्ही प्रकल्प आमच्या भागातील अत्यंत महत्वाचे प्रकल्प आहेत त्या प्रकल्पावरील कार्यवाही सत्वर सुरु व्हावी यासाठी मी हा अशासकीय ठराव येथे मांडलेला आहे.

सभापती महोदय, हे प्रकल्प झाल्यामुळे मोठया प्रमाणावर फायदा होणार आहे. जळगाव जिल्हयात 39 हजार हेक्टर्स, धुळे जिल्हयात 26 हजार हेक्टर्स, नंदूरबार जिल्हयात 22 हजार हेक्टर्स अशा प्रकारे एकूण 87 हजार हेक्टर्स जमिनीला या मोठया प्रकल्पाच्या माध्यमातून सिंचन फायदा मिळणार आहे.या ठिकाणी मी जास्त आकडेवारी देणार नाही परंतु आमच्या भागातील आठ मध्यम प्रकल्प महत्वाचे आहेत. त्या प्रकल्पामध्ये अंजनी, बहुला, गूळ, मंगरुळ,कमानी तांडा,शेवगाव बॅरेज, वरखेडे लोंढे यांचा समावेश आहे. या प्रकल्पाची सध्याची किंमत 912 कोटी रुपयांची असून आतापर्यत 327 कोटी रुपयांचा खर्च झाला आहे अजून 585 कोटी रुपये लागणार आहेत. या प्रकल्पासाठी शासनाने 2008-2009 मध्ये फक्त 45 कोटी रुपये दिलेले आहेत या कामासाठी शसानाला कर्ज काढावयाचे असेल, ओएमबी काढावयाचे असेल तर त्या मार्फत वा एआयबीपीच्या मार्फत किंवा नाबार्डच्या मार्फत निधी त्वरित उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, सातपुडा पर्वताच्या जवळ अनेक तालुके असून त्यामध्ये माझ्याही तालुक्याचा समावेश आहे.त्या भागात पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली गेलेली असून 400 फूट खोल खोदल्या नंतरसुध्दा पाणी लागत नाही. त्यामुळे 500 ते 600 फूट खाली खोदावे लागते त्यामुळे या भागात मोठे, मध्यम ,लघू प्रकल्प पूर्ण झाले तर व तेथे पाणी साठविण्यास सुरुवात केली तर त्याचा फायदा सर्वांना होऊ शकेल. आपल्याला जर शेती फायद्यात आणावयाची असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

तर खात्रीचे पाणी आणि वीज दिली गेली पाहिजे. विजेच्या बाबतीत शासनाकडून असे सांगण्यात येते की, दोन वर्षात विजेचा प्रश्न सुटेल परंतु पाण्याचा प्रश्न लवकर सोडविण्यात आला पाहिजे शेतक-यांना खात्रीने पाणी व वीज मिळाली पाहिजे. आपण धरणाच्या माध्यमातून ,कालव्याच्या माध्यमातून सरफेस इरिगेशन केले तर विजेची अडचण येणार नाही त्यामुळे विहिरीतील पाण्यापेक्षा हे पाणी स्वस्त असून चांगल्या प्रकारे मिळू श्याकेल हे पाणी मिळविण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येत नाही. निम्न तापी प्रकल्पाचा फायदा चोपडा तालुक्याला होणार आहे त्याचप्रमाणे अम ळनेर तालुक्यालाही फायदा होणार आहे इतकेच नव्हे तर धुळे व नंदूरबार जिल्हयाला फायदा होणार असल्यामुळे हा प्रकल्प लवकर पूर्ण्ं करण्यात यावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. त्याचप्रमाणे आमच्याकडील गुळचा प्रकल्प देखील महत्वाचा आहे परवा माननीय मंत्री महोदयांनी असे सागितले की, या ठिकाणी दरवाजे बसविण्यात आलेले आहेत परंतु किती पाणी साठवणार आहात या बाबतीत सांगण्यात आलेले नाही. तसेच त्या ठिकाणी चा-यांची कामे होणे आवश्यक आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी धुळे आणि जळगाव येथे एक बैठक घेऊन पाटबंधा-याच्या कामाला कशी गती देता येईल हे पहावे.गुळ प्रकल्प लवकर व्हावा अशी आमच्या भागातील शेतक-यांची मागणी आहे. नांगरवाडी - गोराजंटी ही नवीन चारी असून ती व-हाडपर्यत जाणार आहे या चारीचे काम झाले तर आदिवासी लोकांना त्याचा फायदा होईल. त्या गावामध्ये आदिवासी बांधव मोठया प्रमाणावर राहतात. या कामासाठी लागणा-या निधीचा फारसा प्रश्न निर्माण होणार नाही कारण या कामाकरिता आदिवासी विभागाकडून आपल्याला निधी मिळू शकेल. परंतु त्या भागात नवीन चारीचे काम कशा प्रकारे घेता येईल याचा देखील विचार व्हावयास पाहिजे त्याचबरोबर शासनाने जर तपासाणी केली तर असे आढळून येईल की, गुळचा जो बंधारा आहे त्याच्या जवळ एक नैसर्गिक साईट उपलब्ध आहे त्या ठिकाणी बंधारा बांधण्यासाठी फार पैसे लागणार नाहीत कमी खर्चात हे काम होऊ शकेल तेव्हा त्यासाठी एक किलोमिटरवरुन तेथे पाणी आणले तर त्याचाही फायदा अनेक शेतक-यांना होऊ शकेल. ली नाही. या प्रकल्पाची कामे त्वरित पूर्ण करावीत अशी माझी शासनाला विनंती आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

आमच्या एरंडोलमधील अंजनी, चिंचपाणीच्या संदर्भात आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून पैसे भरल्यामुळे आमच्या तालुक्याला चांगला लाभ होणार आहे. त्या कामाला अजून सुरुवात झाली नसल्यामुळे हे काम त्वरीत व्हावे अशी माझी विनंती आहे. धुळे जिल्हयामध्ये सुंजवाडे, सारंगखेडा , प्रकाशा, करवंदा, अभ्रावती हे बॅरेजेस आहेत. यामध्ये 1985 पासून अभ्रावती आणि देहली ही दोन नावे मी ऐकत आहे . हा देहली प्रकल्प नंदूरबारमध्ये आहे. त्याचप्रमाणे अक्कलकुवा, कोरडी, नगाव, रंगावली, शिवण हे प्रकल्प आहेत. आणि नाशिकमध्ये नाग्यासाक्या हा फार महत्वाचा प्रकल्प आहे. या नाग्यासाक्या प्रकल्पाचा प्रवाह बदलला तर नाशिकमधील तीन चार तालुक्यांना त्याचा फायदा होणार आहे. तसेच, मोसम, केळजर, चाणकापूर, ठेंगवडे बंधारा आणि पाचोरा चाळीसगाव क्षेत्रामधील बहुळा, हिवरा, अंगणावती, मन्याड या सर्व प्रकल्पामधून पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आपण निधी द्यावा आणिशासनाच्या माध्यमातून खानदेशाच्या या क्षेत्राला जास्तीत जास्त न्याय मिळावा अशी पुनःश्च मंत्रिमहोदयांना विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

खानदेशामध्ये सिंचनाचे प्रकल्प न झाल्यामुळे किंवा सिंचन क्षेत्र न वाढल्यामुळे खानदेशचा शेतकरी सर्वसामान्य परिस्थितीमध्ये जगत आहे. आतापर्यंत खानदेशचा समावेश पश्चिम महाराष्ट्रामध्ये केला जात असे. आता आम्ही उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचा मध्ये समाविष्ट आहोत. त्यामुळे एकीकडे मानव निर्देशांकामध्ये सर्वात जास्त उत्पन्न असलेला जिल्हा सुध्दा त्या उर्वरित वैधानिक विकास महामंडळामध्ये समाविष्ट आहे. सर्वात शेवटचा असलेला नंदूरबार जिल्हा सुध्दा त्या उर्वरित वैधानिक विकास महामंडळामध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे सातत्याने खानदेशावर अन्याय होत गेला आहे. गेल्या पाच-दहा वर्षापासून तापीचे महामंडळ कार्यान्वित झाले. तेव्हापासून खानदेशच्या परिसराला थोडया फार प्रमाणात निश्चित न्याय मिळाला. छोटे-मोठे प्रकल्प पूर्ण झाले. तरीसुध्दा तापी महामंडळाचे नियोजन चुकले या मताचा मी आहे. आज आपण आमच्या नंदूरबार जिल्हयामध्ये आलात तर नंदूरबार आणि धुळे जिल्हयामध्ये तापीचे बॅरेजेस आहेत त्यामध्ये प्रकाशा, सारंगखेडा, सुलवाडा या बॅरेजमध्ये या वर्षीचे पावसाचे पाणी 100 टक्के आम्ही थांबविणार आहोत. परंतु त्यामधील एक लिटर सुध्दा पाणी शासनाव्दारे शेतकऱ्याच्या शेतामध्ये पोहोचणार नाही. नदीच्या पात्रामधील पाणी पाहून आम्हाला आनंद होईल. परंतु सर्वसामान्य शेतकऱ्याच्या शेतामध्ये पाणी पोहोचविण्याचे नियोजन राज्य सरकारने करावयास हवे होते ते दुर्दैवाने झाले नाही. आणि म्हणून खानदेशातील आम्हा सर्व लोकप्रतिनिधींची शासनाकडे मागणी आहे. मागील मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये तसा ठराव करण्यात आला आहे. आमच्या जळगावमधील सहकारी तत्वावरील सर्व 64 उपसा सिंचन योजना तापी सिंचन विकास महामंडळाने ताब्यात घ्याव्यात अशाप्रकारच्या ठरावाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. परंतु दुर्दैवाने त्याची अजून अंमलबजावणी होत नाही. जळगाव किंवा धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी अडचणीच्या काळात रोखे घेण्याची तयारी दर्शविली. सरकार रोखे देत असेल तर आमच्या बँका घेण्यास तयार आहेत असे त्यांनी सांगितले. त्या 200 कोटी रुपयांमध्ये या बँकांची आर्थिक अडचण दूर झाली असती. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी शेतीसाठी सहकाराच्या माध्यमातून अत्यंत अल्प दरातील उपसा सिंचन योजना केल्या. माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी वाचलेल्या उपसा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/ ST/ KGS/

श्री. चंद्रकांत रघुवंशी...

सिंचन योजना हजार आणि पंधराशे कोटी रुपयांच्या आहेत. त्या केव्हा पूर्ण होतील याचा भरंवसा नाही. परंतु आज अस्तित्वात असलेल्या योजना थोडया फार दुरुस्तीनंतर चालू होतील आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी जाईल. यासाठी माननीय मुख्यमंत्री व माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार साहेबांकडे बैठक झाली. परंतु दुर्दैवाने त्याबाबत अजून सुध्दा निर्णय होत नाही. ज्यावेळी खानदेशचा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळी फक्त खानदेशला न्याय देतांना संपूर्ण महाराष्ट्र क्लब केला जातो. त्यामुळे या उपसा सिंचन योजनांचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी . . ..

सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून विनंती आहे की, राज्य सरकारने सुध्दा जो शेतकरी 5 एकराच्या वरील होता आणि त्या शेतकऱ्याने नियमितपणे कर्ज भरले, त्याचे कर्ज माफ करण्यासाठी 20 हजार पर्यंतची एक योजना दिली. आपण या राज्यातील शेतकऱ्याचे 6208 कोटी रुपये माफ केले असे म्हणतो. माझ्या माहितीप्रमाणे अजूनही एक हजार रुपये त्यामध्ये शिल्लक आहेत. हे जे शेतकरी आहेत, त्यांनी उपसा सिंचन योजना केलेल्या आहेत. त्यांच्या कर्जाचा हिशोब केला तर फक्त अंदाजे प्रत्येकी 25 हजार रुपयांचे कर्ज येते. आम्ही 25 हजारापर्यंतचे कर्ज माफ केले असते तर या उपसा जलसिंचन योजनांचे सर्वच कर्ज माफ झाले असते. परंतु आम्ही 20 हजारापर्यंतचे कर्ज माफ केले. त्यामुळे आज आमचा शेतकरी देखील अडचणीमध्ये आहे. या उपसा सिंचन योजना का बंद पडल्या याचा सुध्दा आम्ही विचार करावयास पाहिजे. तापीमध्ये पाणीच नव्हते म्हणून उपसा जल सिंचन योजना बंद केल्या. नाहीतर शेतकऱ्यांनी त्या उपसा सिंचन योजना बंद सुध्दा पडू दिल्या नसत्या. दुर्दैवाने आमची तापी नदी आटली. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या उपसा सिंचन योजना सहा-सहा महिने बंद पडू लागल्या आहेत. दुर्दैवाने त्याचे विजेचे बिल भरले जात नव्हते, त्याचा मेन्टेनन्स होत नव्हता. त्यामुळे या उपसा सिंचन योजना बंद आहेत. म्हणून माझी या चर्चेच्या माध्यमातून विनंती आहे की, आता जर आम्ही नियोजन केले नाही तर पुढील दोन-तीन वर्षे राज्य शासनाचे अशा प्रकारचे काही नियोजन आहे असे मला वाटत नाही जेणेकरुन आम्ही शेतकऱ्याच्या शेतामध्ये त्या बॅरेजमधील पाणी पोहोचवू शकू. पाणी हे बघण्यासाठी उपयोगाचे नाही. ते शेतकऱ्याच्या शेतामध्ये पोहोचविण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे. आमची शासनाकडे मागणी आहे की, या योजना तापी महामंडळाने ताब्यात घेऊन पाच वर्षे चालवाव्यात. त्यानंतर मात्र उपसा सिंचन योजना सहकाराच्या माध्यमातून ज्या सोसायटया असतील त्यांना त्या चालविण्यासाठी द्याव्यात. परंतु आता जर आम्ही असा विचार केला की, या योजना सोसायटयांकडे सुपूर्द करु, तर त्या कधीच सुरु होणार नाहीत किंवा त्या चांगल्या प्रकारे चालणार नाहीत. सरकारने चालविल्या तर तज्ज्ञ अधिकारी त्यांच्याकडे आहेत. महामंडळामध्ये आहेत, त्यामुळे तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या सुरु तरी होऊ शकतील आणि पर्यायाने या माध्यमातून शासन पाणीपट्टी वसूल करु शकेल. राज्यामध्ये असंख्य छोटे-मोठे प्रोजेक्ट सुरु आहेत. आतापर्यंत आमच्या प्रोजेक्टला लवकर पैसे मिळत नव्हते. कृष्णा खोऱ्याच्या

. . . .4बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी . . ..

माध्यमातून खऱ्या अर्थाने पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला. पण तापी खोऱ्याच्या माध्यमातून सुरुवातीला पाहिजे तसा विकास सुध्दा होत नव्हता. सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी, आपण खऱ्या अर्थाने माननीय राज्यपालांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनी जर निर्देश दिले नसते तर आमच्या तापी महामंडळाला सुध्दा पाहिजे तसे पैसे मिळाले नसते. तसेच विदर्भाला आणि मराठवाडयालाही मिळाले नसते. म्हणून माननीय राज्यपाल महोदयांनी निर्देश दिले, त्यामुळे तुमच्या-आमच्या भागातील अपूर्ण कामे, आज पूर्ण तरी होत आहेत. जे छोटे-मोठे प्रोजेक्ट आहेत, लघु पाटबंधाऱ्याचे प्रोजेक्ट आहेत, ते पूर्ण तरी होत आहेत, त्या माध्यमातून इरिगेशन आणि सिंचन क्षमता सुध्दा वाढत आहे हेही आम्हाला मान्य करावे लागेल. नंदूरबार जिल्हयातील 1978-79 मधील देहलीचा प्रोजेक्ट असून तो रखडलेला होता. सुरुवातीच्या काळामध्ये आदिवासी बांधावांचा त्याला विरोध होता. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये सुध्दा आदिवासी बांधव पाण्याचे महत्व समजू लागले आहेत. म्हणून त्यांची सुध्दा मानसिकता तयार झाली की, आमचे पुनर्वसन चांगले झाले, आमच्या जमिनीला चांगला मोबदला मिळाला तर ते सुध्दा जाण्यास तयार आहेत. म्हणून त्या दृष्टीकोनातून देहलीच्या प्रोजेक्टला आता चालना मिळत आहे. तो प्रोजेक्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. याठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. आपल्याकडे दोन्ही महत्वाचे विभाग आहेत. एक म्हणजे जलसंपदा विभाग, जो तापीच्या संदर्भात आपल्याशी निगडित आहे आणि दुसरा आदिवासी विकास विभाग. म्हणून खानदेशशी निगडित असे दोन्ही महत्वाचे विभाग आपल्याजवळ आहे. त्यामुळे आपण लवकरात लवकर खानदेशच्या दौऱ्यावर यावे. तेथील परिस्थिती जाणुन घ्यावी, तेथील लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करावी. कारण काही प्रश्न असे असतात की, जे चर्चेच्या माध्यमातूनच सुटू शकतात. माझी आपल्याला विनंती आहे की, तापीचे प्रोजेक्ट लवकरात लवकर कसे कार्यान्वित होतील त्यादृष्टीकोनातून लक्ष द्यावे आणि आमच्या उपसा सिंचन योजना शासनाने लवकरात लवकर ताब्यात घेऊन त्या कार्यान्वित कराव्यात अशी विनंती करुन पुनश्च या ठरावाला पाठिंबा देतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

-----

. . . .4 बी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ नेते, आदरणीय श्री.अरुणभाई गुजराथी साहेबांनी तापी महामंडळाच्या किंवा तापी खोऱ्यातील, खानदेशातील जे सिंचन प्रकल्प आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वड्डेटीवार...

या सिंचन प्रकल्पासाठी निधी अपुरा असल्यामुळे हे सिंचन प्रकल्प रखडले आणि मोठया प्रमाणात सिंचन अनुशेष निर्माण झाला आहे. अनेक प्रकल्पाच्या संदर्भात माहिती देत असतांना हे प्रकल्प तातडीने पूर्ण व्हावेत अशा प्रकारचा ठराव या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून या सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या राज्यामध्ये आघाडी सरकार स्थापन झाल्यापासनू सिंचनाकडे विशष लक्ष देण्याचे काम झाले आहे. रिजनल बॅलन्स कसा दूर होईल यादृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच निधी मिळत नसल्यामुळे वर्षा-नु-वर्षे ज्या प्रकल्पांची कामे थांबली होती त्या प्रकल्पांना सुध्दा माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार मोठया प्रमाणात निधी उपलब्ध झाली आहे. यापूर्वी आता सिंचनावर होणाऱ्या खर्चाची तुलना केली तर यापूर्वी या राज्यातील सिंचनावर राज्याच्या बजेटमध्यून जेमतेम 2100 ते 2200 कोटी रुपये खर्च होत होते. पण आत जवळपास सात ते साडेसात हजार कोटी रुपये दरवर्षी सिंचनावर खर्च करीत आहोत. महामंडळाच्या स्थापनेनंतर मात्र सिंचनामध्ये मोठया प्रमाणावर वाढ केलेली आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, खानदेशात एकूण चार जिल्हयांचा समावेश आहे. जळगाव, धुळे, नाशिक आणि नंदूरबार. या जिल्हयांमध्ये महामंडळाच्या स्थापनेपूर्वी तीन मोठे प्रकल्प, 16 मध्यम प्रकल्प आणि 197 लघू प्रकल्प असे एकूण 216 प्रकल्प पूर्ण झाले होते. त्यातून 2 लाख,90 हजार 26 हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली होती. दिनांक 1 जानेवारी 1998 च्या पूर्वीची ही स्थिती आहे. महामंडळाची स्थापना दिनांक 1-1-1998 मध्ये झाली. महामंडळाच्या स्थानेनंतर 3 मध्यम , 57 लघुप्रकल्प एक उपसा सिंचन योजना व चार वाढविस्तार कामे असे एकूण 65 प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. या पूर्ण झालेल्या प्रकल्पामुंळे जून 2008 अखेर 94 हजार 27 हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे, हे मी आदरणीय गुजराथी साहेबांना सांगू इच्छितो. एकूण विचार केला तर दिनांक 1-1-1998 पूर्वी म्हणजे महामंडळाच्या स्थापनेपूर्वी 2 लाख 90 हजार इतकी जमीन सिंचनाखाली आली होती. होती. महामंडळाच्या स्थापनेनंतर दहा वर्षामध्ये 94 हजार 27 हैक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे. तसेच 29 प्रकल्प पूर्ण करु शकलो ज्यामध्ये जवळगावच्या 19, धुळयाच्या 2 आणि नंदूरबारच्या 8 या प्रकल्पाच्या घळभरणीचे काम जवळपास पूर्ण होत आलेले आहे. त्यात प्रामुख्याने जळगाव तालुक्यातील वाघुर मोरे मध्यम प्रकल्प,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/

श्री.विजय वडेट्टीवार.....

धुळे जिल्हयातील वाडी-शेवळी मध्यम प्रकल्प व नंदूरबार जिल्हयातील शिवण,नागन व दरा या मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे. तसेच सुलवाडे, सारंगखेडा व प्रकाशा या बॅरजच्या सेवाद्वाराची कामे सुध्दा पूर्ण करण्यात आली आहेत. सभापती महोदय, सन्माननीय श्री. गुजराथी साहेबांनी जे सांगितले ते खरे आहे. या प्रकल्पांसाठी निधीची कमतरता आहे. निधी अपुरा मिळाला आहे. पण हे प्रकल्प पूर्ण न होण्यामागे अनेक कारणे आहेत. हतनूरच्या प्रकल्पाच्या संदर्भात आपण याठिकाणी सांगितले. त्या प्रकल्पाच्या सगळया परिस्थितीची आपल्याला जाणीव आहे. या प्रकल्पामध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील 244 हेक्टर जमीन जाणार आहे हा प्रकल्प पूर्ण व्हावा ही सगळयांची इच्छा आहे पण सुप्रिम कोर्टाने या संदर्भात अत्यंत कडक शब्दात सांगितलेले आहे. या प्रकल्पात मोठया प्रमाणावर वन जमीन बाधीत होणार असून 57 गावे आणि 17,216 हेक्टर जमिनीपैकी 6071 हेक्टर वन जमीन आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी आपण प्रयत्न करीत रहू, एक दिवस हा प्रकल्प होण्यामध्ये आपण यशस्वी होऊ अशी आशा बाळगायला हरकत नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार ....

सभापती महोदय, महामंडळ स्थापन झाल्यानंतर घळभरणी पूर्ण झालेले जे 29 प्रकल्प आहेत त्यांची नावे आपण म्हणत असाल तर वाचून दाखविता येतील. मोर मध्यम प्रकल्प, मातरन नाला लघु प्रकल्प, शिरपोली नेर ल.पा.प्रकल्प, बिसनेर क्रमांक 2 ल.पा. प्रकल्प, भाळगाव ल.पा.प्रकल्प, चितेगाव ल.पा.प्रकल्प, दाळन क्रमांक 2 ल.पा. प्रकल्प, जाबडी ल.पा.प्रकल्प, कोतगाव ल.पा. प्रकल्प, शहापूर ल.पा. प्रकल्प, लोहारा चिंचाटी ल.पा.प्रकल्प, मोळगाव साठवण तलाव, लोंढरे ल.पा.प्रकल्प, घोडसगाव ल.पा. प्रकल्प, खुनसर ल.पा. प्रकल्प, कुऱ्हा ल.पा.प्रकल्प, वाकडी ल.पा. प्रकल्प, शेरी साठवण तलाव, पाळढी ल. पा. प्रकल्प त्याचप्रमाणे नंदूरबार जिल्ह्यामध्ये जवळपास 8 आणि धुळे जिल्ह्यामध्ये दोन अशा प्रकारचे हे प्रकल्प आहेत. मार्च 2009 पर्यंत झालेले जे प्रकल्प आहेत त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील नांदुरी ल.पा. तलाव, निंबोळा कोल्हापूर पध्दतीचा बंधारा आणि महाल पाटणे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा हे प्रकल्प जवळपास पूर्ण होत आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी सांगितले की, निम्म तापी प्रकल्पामध्ये बुडीत क्षेत्रामध्ये 17 गावे येतात आणि त्याची अद्ययावत किंमत 1127 कोटी रुपये असून खर्च 108 कोटी रुपये झालेला आहे. अनुदान कमी असल्याने प्रगती थोडी कमी आहे. यामध्ये निधीची उपलब्धता करुन देऊन याला कशा पध्दतीने गती देता येईल याबाबतीत सुध्दा निश्चितपणे आपण प्रयत्न करु. गूळ प्रकल्प 100 टक्के पूर्ण झाला आहे. एआयबीपी अंतर्गत कालवे आणि वितरिकांची कामे प्रगतिपथावर आहेत आणि त्याला अधिक गती देण्याचे काम निश्चितपणे शासनाच्या माध्यमातून केले जाईल. अजनी प्रकल्पाच्या धरणाचे काम पूर्ण झालेले आहे आणि अनुदानानुसार, निधीच्या उपलब्धतेनुसार कालवे सुरु करण्याचे नियोजन आपण केलेले आहे. मला आपल्याला सांगावयास हरकत नाही. आदिवासी भागातील जे प्रकल्प आहेत त्यासंदर्भात माननीय राज्पालांच्या सन 2009-10 च्या निदेशात आदिवासी भागात लाभ देणाऱ्या प्रकल्पांसाठी उपलब्ध केल्या जाणाऱ्या तरतुदी या निदेशाच्या बाहेर ठेवलेल्या आहेत. खानदेशातील जळगाव, नंदूरबार व नाशिक या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणामध्ये आदिवासी क्षेत्र आहे या अंतर्गतच्या प्रकल्पांना याचा लाभ मिळणार आहे. असे निदेश माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेले आहेत. त्यातून मोठ्या प्रमाणावर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS

श्री. विजय वडेट्टीवार .....

निधी सर्वांना मिळणार आहे. कारण त्या ठिकाणी आदिवासी गावे आणि आदिवासींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या निदेशानुसार आपल्याला निधीची उपलब्धता होण्यामध्ये कोठल्याही प्रकारची अडचण आहे असे मला वाटत नाही. तापी महामंडळाच्या स्थापनेनंतर जवळपास या कामासाठी जवळपास 3145.44 कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आणि मार्च 2009 पर्यंत या प्रकल्पांवर 2727.39 कोटी रुपये खर्च झालेला आहे. आपल्याकडे शिल्लक खर्च जवळपास 418 कोटी रुपये आहे आणि काम सुरु असल्यामुळे आता आपल्याकडे तो निधी उपलब्ध आहे. कर्जरोख्यांचे व्याज आणि परतफेडीसाठी जवळपास 2166.52 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. या पध्दतीने या महामंडळाच्या स्थापनेपासून खानदेशाला 5311.96 कोटी रुपये एवढा निधी दिलेला आहे. हा निधी कमी नाही. महाराष्ट्रामध्ये सिंचनाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात, महाराष्ट्रातील शेतकरी सुखी व्हावा, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे म्हणून केंद्र शासनाने आणि राज्य सरकाराने जो शेतकरी कर्जाच्या खाईत बुडाला होता त्याला त्यातून बाहेर काढण्याचे काम, त्याला उभे करण्याचे काम केलेले आहे. माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारने तसेच राज्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख तसेच माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण साहेबांनी हे काम केलेले आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार साहेबांनी या विभागासाठी चांगला निधी उपलब्ध करुन दिला आणि आज या प्रकल्पांना गती मिळालेली आहे असे म्हणावयास हरकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. रघुवंशी साहेबांनी या ठिकाणी सांगितले की, आपल्या ज्या 64 सहकारी उपसा सिंचन योजना आहेत त्या महामंडळाने ताब्यात घ्याव्यात अशी मागणी केली. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार...

जवळपास 64 उपसा सिंचन योजनांवर मुद्दल व व्याज मिळून 359 कोटींचे कर्ज आहे. त्यामुळे या योजनांचे पुनरुत्थापन करण्यासाठी 500 कोटींची आवश्यकता आहे. शासनाला या उपसा सिंचन योजना ताब्यात घ्यावयाच्या असतील तर त्यासाठी एकूण 859 कोटी रुपये लागतील. या योजना चालल्या पाहिजेत अशी शासनाची इच्छा आहे. या उपसा सिंचना योजना बंद पडल्यामुळे शेतक-यांचे नुकसान होत आहे. त्या पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाचे प्रयत्न राहतील. नजिकच्या काळामध्ये त्यासाठी निधी उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने जरुर प्रयत्न करु आणि या योजना पुन्हा सुरु करु. तापी महामंडळ स्थापन झाल्यानंतर जवळपास सगळया प्रकल्पासाठी 10 हजार कोटींची आवश्यकता आहे हे खरे आहे. त्यासाठी मोठया प्रमाणावर निधी सुध्दा उपलब्ध करुन दिला आहे. त्यासाठी 9 हजार कोटीची आवश्यकता आहे. हे सर्व करु शकलो तर मोठया प्रमाणावर तेथे सिंचन होणार आहे. त्यासाठी शासन कोठेही कमी पडणार नाही. शासन खानदेशाच्या पाठीमागे उभे राहील. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळामध्ये खानदेशचा समावेश केलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या मनात अन्यायाची भावना आहे. परंतु शासनाकडून, पाटबंधारे विभागाकडून या भागावर अन्याय होणार नाही याची दक्षता शासन निश्चित घेईल असा आपल्याला विश्वास देतो. सन्माननीय सदस्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी अत्यंत तपशीलवार आणि अभ्यासपूर्ण उत्तर दिलेले आहे. खा-यागोटीच्या प्रकल्पाला वन खात्याची निश्चितपणे अडचण आहे. या प्रकल्पाची उंची कमी करुन तो प्रकल्प पूर्ण होऊ शकतो काय यासंदर्भात मी सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांच्याशी बोललो आहे. त्यांनी त्यावेळी असे सांगितले की, तशाप्रकारची शक्यता तपासून घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे प्रकल्प होत असेल तर तो पूर्ण करता येईल. त्याचप्रमाणे उर्ध्व तापीवर नावथा प्रकल्प आहे. तो प्रकल्प पूर्ण झाला तर त्याचाही लाभ चांगल्या प्रकारे मिळू शकेल. निम्न तापी प्रकल्पावर बुधगाव जळोद पूल आहे, त्याला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने सहानुभूपूर्वक कार्यवाही करावी. सारणखेडा, प्रकाशा आणि सुलवाडे या प्रकल्पांच्या चा-या करणार की कालवे करणार, की उपसा सिंचन योजना करणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.अरुण गुजराथी....

याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे वन खात्यामुळे 16 प्रकल्प अडकले आहेत त्यासाठी शासनाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा आणि ते प्रकल्प पूर्ण करावे. उपसा सिंचन योजनांचे कर्ज माफ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले तर खानदेशातील शेतकरी शासनाला दुवा देतील. शासनाने या प्रकल्पांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन आणि वन खात्याच्या परवानगीने ही कार्यवाही पूर्ण करावी व ती करण्यात येईल असा सन्माननीय मंत्रिमहोदयांवर आणि शासनावर माझा विश्वास असल्यामुळे ठराव मागे घेण्याची सभागृहाने मला अनुमती द्यावी.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---------

यानंतर श्री.शिगम....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. सुरेश जेथलिया)** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 13 जून, 2009 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10 ते 11.55 वाजेपर्यन्त विशेष बैठक होईल. या बैठकीत अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 20 मिनिटांनी शनिवार, दिनांक 13.6.2009 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही